सुलभ राष्ट्रीय ग्रंथमाला : पुष्पं ५७ वें

# आंपल्या गणराज्याची घडण

•

लेखक

आचार्य दादा धर्माधिकारी

संग्राहक

श्रीपाद जोशी

जून, १९५१ ]

[ मूल्य ३॥ रु.

प्रकाशक
रघुनाथ गणेश जोशी
सुलभ राष्ट्रीय ग्रंथमाला
टिळक रोड, पुणें २

संपादक
आचार्य शं. द. जावडेकर
आचार्य स. ज. भागवत

●

मुद्रक
रा. ना. सरनाईक
सुलभ मुद्रणालय
३९१ शनिवार, पुणें २

# मनोगत

प्रिय श्रीपाद,

चि. बच्चूला लिहिलेल्या पत्रांचें पुस्तक प्रसिद्ध करण्याचा तुम्ही आपला विचार मला कळविला आहे. बच्चूला दिवंगत होऊन आज तीन वर्षें होत आलीं, तरी मी त्याचा उल्लेख चिरंजीव बच्चू असाच करीत आहें. याचें कारण बच्चू हा शब्द आतां उपलक्षणात्मक झालेला आहे. माझें जेवढें अपत्यविषयक उत्कट वात्सल्य आहे त्या वात्सल्याचा तो शब्द प्रतीकात्मक आहे. बच्चूचें पार्थिव शरीर पंचतत्त्वांत मिसळून गेलें, पण त्याच्या अस्तित्वानें अजूनहि माझें सारें विश्व भारलेलें आहे. म्हणून त्याचा देह मला दिसत नसला, तरी तो मला चिरंजीवच आहे.

त्याला चिरंजीव म्हणण्याचें आणखी एक कारण आहे. तो माझें शेवटलें अपत्य होता. माझें पहिलें अपत्य माझी ज्येष्ठ कन्या आहे. तिच्या जन्माच्या वेळीं माझ्या जीवनांत पहिलें आणि क्रांतिकारक स्थित्यंतर झालें. मी कॉलेज सोडून बापूंच्या असहकारितेच्या चळवळींत सामील झालों. आपल्या ब्बीचें नांव उषा आहे. तिच्या जन्माबरोबर माझ्या जीवनाच्या एका उदात्त प्रकरणाचा आरंभ झाला. माझी उषा हैमवती, मांगल्य-प्रवर्तक आणि भाग्याची ठरली.

चि. बच्चूच्या जन्मानंतर लवकरच माझ्या आयुष्यांत दुसरें महत्त्वाचें स्थित्यंतर झालें. मी वर्धा येथें बजाजवाडींत रहायला गेलों त्यावेळीं तो सुमारें अडीच वर्षांचा असेल. बजाजवाडींत माझें कौटुंबिक जीवन अधिक व्यापक, विशद व मांगल्ययुक्त झालें. बजाजवाडी म्हणजे त्यावेळीं भारतीय राष्ट्रीयत्वांत जीं जीं दिव्य तत्त्वें होतीं, जे जे कल्याणकारक भाव होते आणि जें पावित्र्ययुक्त माधुर्य होतें त्या सर्वांचें पुण्यक्षेत्र. पुण्यश्लोक जमनालालजी यांची ती वसाहत होती. तपोधन जाजूजी यांच्यासारख्या व्रतनिष्ठ आणि वैराग्यसंपन्न साधकाचें तें निवासस्थान होतें. भाई धोत्रे यांच्यासारख्या करारी, संयमी, कुशल, बुद्धिमान् कार्यविशारदाचें तें कर्मक्षेत्र होतें. आणि पूज्य बाबूकाका (किशोरलालभाई मश्रुवाला) व गोमतीकाकू यांच्या निवासानें त्या स्थानाला तीर्थक्षेत्राचें पावित्र्य प्राप्त

झालें होतें. त्यावेळीं बल्लाभाऊंना लिहिलेल्या पत्रांत मी असें म्हटलें होतें कीं, 'पुराणांत किंवा वेदांत ज्या थोर व्यक्तींचीं वर्णनें वाचलीं तत्सम माणसें मला पाहायला मिळत आहेत असें येथें आल्यानंतर मला वाटूं लागलें.' माणसाच्या सज्जनतेवर माझी निःसीम व अबाधित श्रद्धा आहे; परंतु माझ्या मनाची ठेवण एकंदरींत भाविकपणाची नाहीं. तेव्हां पूज्य बाबूकाकांचा परिचय झाल्यानंतर माझ्या चित्तावर ही जी प्रतिक्रिया झाली, तिचें महत्त्व तुमच्या लक्षांत येईल. मी कांहीं पावित्र्यवादी किंवा व्रताचरणी माणूस नाहीं. पुष्कळदां मी आश्रमाची व आश्रमवासियांची सद्भावानें टिंगलहि करीत असें. तरी पण पुण्यश्लोक जमनालालजी, पूज्य बाबूकाका व जाजूजी यांच्या जीवनाची माझ्यावर विलक्षण छाप पडली. याचवेळीं पूज्य काकांसारख्या जिवंत विश्वकोशाचीहि उन्नतिकारक व आल्हाददायक संगती मला लाभली. विनोबा व बापू तर होतेच. बजाजवाडींत निरनिराळ्या प्रांतांतून आलेल्या कार्यकर्त्यांचीं कुटुंबें रहात असत. त्यामुळें तेथें आमच्या जीवनाला आंतर्जातीय आणि आंतर्प्रांतीय व्यापकत्व प्राप्त झालें. आमचा बच्चू अकरा वर्षें अशा वातावरणांत वाढला.

जीवन प्रांजळ असावें, त्यांत गुप्तता नसावी अशी बापूंची शिकवण. त्यामुळें बजाजवाडींत मोठें मोकळें वातावरण होतें. तेथील अनेक कुटुंबें कांहीं प्रमाणांत एकाच संयुक्त कुटुंबाप्रमाणें राहूं लागलीं. तें जीवन एका विलक्षण सुरभित्वानें व सुभगत्वानें समृद्ध झालें. गृहस्थाश्रमाचा त्याग न करतांच व्यापक कौटुंबिकतेची धन्यता मला संपादन करतां आली.

वर्ध्याला गेल्यानंतर कार्यपरत्वें मी निरनिराळ्या प्रांतांत जाऊं लागलों आणि तेथून घरीं पत्रें लिहूं लागलों. घरीं म्हणजे मालकिणीला. सगळ्या बजाजवाडींत तीं पत्रें वाचलीं जाऊं लागलीं. अशा रीतीनें पूर्वीं जीं पत्रें फक्त आमच्या घरांतच वाचलीं जात असत, तीं संबंध बजाजवाडींतील लोक आणि आमची मित्रमंडळीहि वाचूं लागली. १९४५ पर्यंतचीं बहुतेक पत्रें मालकीण, कांहीं तरुण मुलगे व आमच्या बच्चीमुळें माझ्या परिवाराशीं मुलींच्या भूमिकेवरून समरस झालेल्या मुली यांना लिहिलेलीं आहेत. तुम्हीं जीं पत्रें प्रसिद्ध करीत आहांत त्यापेक्षां तीं सारीं पत्रें अनेक दृष्टींनीं अधिक महत्त्वाचीं असण्याचा संभव आहे. पण तीं मराठी आणि

हिंदी पत्रें ज्या ज्या व्यक्तींना लिहिलीं त्यांनाच त्यांचें पुढें काय झालें तें माहीत. भाऊबिजेला आणि राखीला ओंवाळणी म्हणून दरवर्षी कांहीं पत्रें मी लिहीत असें. त्या पत्रांतहि माझी मातृनिष्ठा वेळोवेळीं प्रकट झाली आहे.

मालकिणीला मेंदूचा विकार झाल्यानंतर माझ्या जीवनांत तिसरें अन-पेक्षित स्थित्यंतर झालें. माझी उरली-सुरली गृहनिष्ठा संपली आणि कुटुंबनिष्ठा अधिक विशद व प्रांजळ झाली. बच्चू हा माझ्या गृहनिष्ठेचा एकमात्र तंतू उरला. मी त्याला पत्रें लिहूं लागलों. या अवधींत आम्हीं नागपूरला रहायला आलों, आणि मी संविधान परिषदेचा सदस्य झालों. त्या निमित्तानें दिल्लीला जाऊन राहूं लागलों. माझ्या नेहमींच्या रिवाजा-प्रमाणें मीं घरीं पत्रें लिहिलीं. माझीं मुलें आपल्या मित्रमंडळीसह तीं वाचूं लागलीं. त्यांच्या मित्रपरिवारांत कांहीं वर्तमानपत्रकारहि होते व आहेत. त्यामुळें या पत्रांपैकीं कांहीं पत्रें प्रसिद्ध झालीं आणि नंतर तोच क्रम चालू राहिला. माणसाचीं सारींच पत्रें प्रसिद्ध होणें इष्ट असतें असें नाहीं. खासगी जीवनासंबंधीं ज्यांच्या कांहीं विशिष्ट कल्पना असतील त्यांना तर तें परवडायचें नाहीं आणि आवडायचेंहि नाहीं. पण मी तर लहानपणापासून शभर माणसांच्या कुटुंबांत वाढलेला असल्यामुळें आणि पुढें आमचें कुटुंब रक्तसंबंधापुरतेंच अथवा लग्नसंबंधापुरतेंच मर्यादित न राहिल्यामुळें माझीं पत्रें कुणीहि वाचलीं तरी मला त्याचें कांहींच वाटेनासें झालें. एक चिटोरें देखील खाजगी म्हणून मांडण्याची गरज मला वाटेनाशी झाली. झालें! अशा रीतीनें पत्रें प्रसिद्ध होऊं लागलीं. माझ्या जीवनाला हा मैदानी मोकळेपणा आमच्या बच्चूच्या जन्मानंतर आला.

बच्चू बापूंच्या द्वैमासिक श्राद्धदिनीं गेला. बापूंच्यानंतर इतक्या त्वरेनें त्यानें जगाचा निरोप घेतला, कीं घणाचे दोन घाव लागोपाठ लागल्यामुळें माझ्या हृदयाला बधिरता आली. बापू आणि बच्चू यांनीं जीवनांत इतकें अभेद्य स्थान मिळविलें होतें, याची जाणीव त्यांच्या वियोगानेंच झाली. बापूंच्या जिवाचें सोनें झालें आणि तें या भूमातेच्या कणाकणांत मिसळलें पण आपलें सारें जग कसें ओकें ओकें झालें. बच्चूला परीक्षेचा ध्यास लागला होता. परीक्षा परीक्षा करीत परीक्षेला न बसतांच तो गेला. माझी मात्र आजन्म अग्निपरीक्षा सुरू झाली.

मालकिणीच्या आजारानें व बच्चूच्या मृत्यूनें मला जगांत सर्वत्र भरलेल्या उदात्त मानवी सहानुभूतीचा, निर्व्याज आस्थेचा आणि व्यापक मातृत्वाचा साक्षात्कार झाला. देवाची आठवण सतत ताजी रहावी म्हणून भक्तांनीं त्याच्याजवळ संकटांची मागणी केली. बच्चूच्या मृत्यूनें माझ्या गृहनिष्ठेला भूकंपाचा हादरा बसला. आणि मालकिणीच्या आजारामुळें माझें राऊळच कोसळलें. परंतु या संकटामुळें मला माणसांतील भगवंताचें दर्शन घडलें. त्यामुळें त्या संकटांना स्नेह-समारंभाचें पावित्र्य आलें. ज्या संकटांमुळें मला इतकें कारुण्य व सहृदयता यांचा प्रत्यय आला त्यांतून माझ्या जीवनाला शुद्धताच लाभेल असें मीं कां मानूं नये ? पित्याकडून पुत्राला नेहमीं संपत्ति मिळतेंच असें नाहीं. पण पुत्राकडून पित्याला अनेकदां जीवन समृद्ध करणारी दौलत मात्र मिळतें. आपल्या पुत्राजवळ यौवनाची भीक मागणारा ययाति अगदींच अरसिक असला पाहिजे. पुत्र हा पित्याचें नरकापासून म्हणजे अधःपतनापासून रक्षण करतो. बच्चू हा माझा कनिष्ठ पुत्र होता. म्हणूनच त्यानें माझें जीवन समृद्ध करण्याच्या आपल्या थोरल्या भावंडांच्या प्रयत्नांवर कळस चढविला. परिमित गृहजीवनाच्या व संकुचित कुलाभिमानाच्या नरकतुल्य अल्पतेंतून त्यानें मला क्षितिजव्यापी भव्यतेकडे नेलें. एका दृष्टीनें माझें निकेतन आभाळाएवढें झालें—उन्नत आणि अनंत.

मालकिणीचें व्यक्तित्व बारगळल्यानंतर वैयक्तिक व खाजगी जीवनाच्या बाबतींत मी उपसंहाराची वृत्ति अंगिकारिली. एका निराळ्या अर्थानें वानप्रस्थाची भूमिका पत्करून मी माझ्या सार्वजनिक जीवनांतच पूर्णपणें लीन होऊन गेलों. बच्चू गेल्यानंतर ती प्रवृत्ति अधिक बळावली. कदाचित् मी आत्मरत होऊन जाईन अशी शंका जवळच्या लोकांना येऊं लागली. तेव्हां महाराष्ट्रांतील अनेक अल्पवयस्क मुलांनीं मला लिहिलें, ‘ बच्चू गेला असें समजून तुम्हीं पत्र लिहण्याचें बंद करूं नका. असे कितीतरी बच्चू महाराष्ट्रांत ठिकठिकाणीं अज्ञात स्थितींत रहात आहेत.’ अशा रीतीनें अनेक मुलांमुलींनीं व्यापक पितृत्वाचें देणें देऊन मला गौरविलें. बच्चूचें तें गोजिरें, सगुण, चिमुकलें रूप बालगोपाळांच्या विश्वरूपांत विलीन झालें. व्यासांनीं जेव्हां विरह-कातर होऊन आर्त स्वरानें शुकाचार्यांना ‘ बेटा ’ म्हणून हांक मारली, तेव्हां त्या गहन अरण्यांतील पानापानानें ‘ ओ ’ दिली. व्यासांचें

पितृत्व विश्वव्यापी झालें. बच्चूचा औट हातांचा विग्रह विश्वरूपांत विलीन झाल्यानंतर माझ्या जगाला गोकुळाचें स्वरूप प्राप्त झालें. बच्चूला जीं पत्रें लिहीत होतों, तीं त्यानंतर चंदूला लिहूं लागलों. त्यांपैकीं कांहीं इतर मुलांमुलींनाहि लिहिलेलीं आहेत. त्यामुळें बच्चू हा शब्द आणखी एका अर्थानें उपलक्षणात्मक आहे, असें म्हणण्यास हरकत नाहीं.

प्रौढ माहितगार वाचकांना या पत्रांत कांहीं विशेष आहे असें वाटण्याचें कारण नाहीं. त्यांना कदाचित् ती पाल्हाळिक व कंटाळवाणीहि वाटतील. तशीं तीं न वाटलीं तरच नवल. महाराष्ट्रांतील प्रौढ व प्रगल्भ वाचकवर्ग माझ्या मानानें पुष्कळच चोकस, बहुश्रुत आहे. हीं पत्रें त्यांच्याकरितां नाहींत. तीं बच्चूकरतां लिहलीं आणि बच्चूबरोबर त्याचीं भावंडें व सौंगडीहि वाचतील, इतकी जाणीव मनांत बाळगून लिहिलीं. बच्चू सुमारें १५ वर्षांचा होता. आणि मॅट्रिकच्या परीक्षेला बसणार होता. बाल्य व तारुण्य यांच्या उंबरठ्यावर तो होता. त्यामुळें या पत्रांचें स्वरूपहि कांहींसें त्याच्या वयानुरूप संमिश्र झालेलें आहे.

पत्रें म्हणजे कांहीं निबंध नव्हत. आपल्या दररोजच्या व्यवहारांत ज्याप्रमाणें जीवनाचे कप्पे नसतात, त्याचप्रमाणें पत्रांतहि फारशी विषयवारी नसते. विषयांची विल्हे करून आपण पत्रें लिहीत नसतों. एकाच पत्रांत ब्रह्मांडांतील कुठलेहि निरनिराळे विषय येण्याचा संभव असतो. अर्थातच या पत्रांत प्रवासवर्णनेंहि आहेत आणि व्यक्तिचित्रेंहि आहेत. त्यामुळें त्यांत एकप्रकारची पंचभेळ झालेली असणार. ती कुणाला आवडेल, कुणाला आवडणार नाहीं. हा प्रश्न ज्याच्या त्याच्या रुचीचा आहे. आपल्याजवळ जें जें रुचकर व उत्कृष्ट आहे, तें नम्रभावानें पुढें ठेवावें. 'शेषम् धर्मेण पूरयेत् ।'

चि. बच्चूला आणि आपल्या पितृत्वाचें थोर वरदान मला बहाल करणाऱ्या त्याच्या समवयस्क मुलांमुलींना, आपण विनययुक्त वात्सल्यभावानें हीं पत्रें अर्पण करूं या ! कळावें, हे आशीर्वाद.

घनतोली, नागपूर
ता. १७–३–५१

स्नेहांकित,
दादा



केशव शंकर धर्माधिकारी ऊर्फ बच्चू

जन्म २४-९-३२ ] [ मृत्यु ३०-३-४८

खंडवा,
६-८-४०

प्रिय बच्चू,

परवां रात्रीं पेशावर एक्स्प्रेसनें श्री. मंडलोईसाहेबांसह निघून काल रात्रीं ८–४० ला येथें पोंचलों. मुक्काम अर्थातच मंडलोईसाहेबांकडे. येथील मंडळींच्या इच्छेला मान देऊन आज येथें मुक्काम केला आहे. सकाळीं 'महाराष्ट्र-साहित्य मंडळामध्यें' "भविष्यकाळांत महाराष्ट्रीयांची भूमिका" या विषयावर भाषण केलें. भाषणांत बरेच नवीन व उपयुक्त विचार होते. महाराष्ट्रीयांनां आपल्या विशिष्ट गुणांचा विकास समस्त राष्ट्राच्या जीवनाला पोषक होईल अशा रीतीनें कसा करतां येईल, हा मुख्य मुद्दा होता. महाराष्ट्रीयांच्या महान् गुणांचें व महान् दोषांचें उद्बोधक विवेचनहि ओघाओघानें केलेंच. संध्याकाळीं कार्यकर्त्यांची सभा. रात्रीं जाहीर सभा. उद्यां सकाळीं माधानला जायला निघेन. लोक विचारतात, या पाळीला घटना-परिषदेची बैठक इतक्या लवकर कां आटपली ?—कां आटपली ? दुसरें काय शक्य होतें बरें ? आज केवढी अनिश्चितता आहे ! उद्यांची परिस्थिति काय होईल हें सांगणें अशक्य आहे. 'मग आपण परिस्थितीचे मालक नसून गुलाम आहोंत, आपण दैवाचे कारागीर नाहीं, नशिबाचे विधाते नाहीं, असें कबूल करा' म्हणून तूं आम्हांला हिणविशील. तुझें म्हणणें खरें आहे. परिस्थिति पूर्णपणें आपल्या काबूंत नाहीं. इंग्रजांच्याहि नाहीं आणि जिनासाहेबांच्याहि नाहीं. ती तिघांच्य हि हातीं थोडी थोडी आहे, म्हणूनच अनिश्चित आहे. त्यामुळेंच आपल्या मनासारखें सारें करतां येत नाहीं. नुसती समयज्ञता व प्रसंगावधान पुरेसें नाहीं. परिस्थितीवर ताबाहि मिळवितां आला पाहिजे. ती अजून कह्यांत न आल्यामुळें विशेष कांहीं करतां येत नाहीं.

आपल्या या पवित्र व विशाल देशाचीं शकलें पडणार ही कल्पनाच

असह्य आहे. हिंदुकुशापासून कन्याकुमारीपर्यंत व कराचीपासून सदियापर्यंत हा सारा भारतवर्ष एक आहे आणि पवित्र आहे या भावनेचें बाळकडू प्यालेले आम्ही. 'पंजाब, सिंध, गुजरात, मराठा' हे सगळे एकाच राष्ट्राचे घटक मानणारे आम्ही. आमच्या रवि ठाकुरांनीं पूर्व बंगालांतील पद्मा व ब्रह्मपुत्रा यांचीं वर्णनें आपल्या साहित्यांत केलीं. तक्षशिला व श्रीनगर आणि 'मोऊन जो दडो' यांच्याबद्दल आम्हांला केवढी आत्मीयता, केवढा अभिमान! बंगालची फाळणी होऊं नये म्हणून जी चळवळ झाली तिच्या पोटीं राष्ट्रव्यापी प्रतिकारक चळवळीचा जन्म झाला. त्याच आमच्यावर संस्कृतीच्या रक्षणासाठीं पंजाब व बंगालच्या फाळणीची मागणी अट्टाहासानें करण्याची आज पाळी आलेली आहे. पंजाबचे तुकडे पडले, बंगाल दुभंगलें गेलें म्हणजे त्या भागाबद्दल आज जी आत्मीयता आपल्याला वाटते ती वाटणार नाहीं. 'पंजाब, सिंध, गुजरात, मराठा, द्राविड, उत्कल, बंग' गाऊं लागल्याबरोबर बंग/२ पंजाब/२ अशी भावना मनांत उत्पन्न होईल! हा प्रश्न फक्त भावनेचा नाहीं. जीवनाचा आहे. एकदां एक झालेल्या देशाचे तुकडे करण्याचा आहे. म्हणून या प्रश्नाचा निकाल लागल्यावांचून कशाचाहि निर्णय करणें शक्य नव्हतें. आजपर्यंत शिकविलेला इतिहास व आजपर्यंत शिकविलेला भूगोल यांचें कांहींच महत्त्व उरणार नाहीं. आपल्या जीवनांतील प्राणभूत तत्त्वच चाललें, अशा विचारानें कित्येक राष्ट्रभक्तांचीं मनें उद्विग्न व क्रुद्ध होत असल्यास नवल नाहीं.

पण वस्तुविमुख होऊनहि चालणार नाहीं. पंजाबच्या व बंगालच्या फाळणीची मागणी आपणच केली आहे. एकानें हट्ट धरला, कीं 'गाय कापा', दुसरा म्हणाला, 'उभी कापा म्हणजे दरेकाच्या हिश्याला दोन-दोन आंचळें येतील!'—ही स्थिति भयंकर असेल, पण वास्तविक आहे.

हिंदुस्थानच्या फाळणीची, 'आमुच्या प्रियकर हिन्दीस्थाना'च्या फाळणीची छाया घटना-परिषदेवर दाट होती म्हणून ती बैठक इतक्या लवकर संपली. घटना तयार करायला लागणारी बुद्धिमत्ता व पांडित्य आमच्या पुढाऱ्यांच्या अंगीं नाहीं असें थोडेंच आहे? चुटकीसरशी आदर्श घटना तयार होऊं शकेल आणि तीहि ठिगळांची वाकळ नव्हे, तर अगदीं नवीन व अखंड अशा सणंगाची! पण परिस्थितीवर अंमल गाजविण्याचें

सामर्थ्य अजून आपल्या अंगीं आलेलें नाहीं. या दृष्टीनें घटना-परिषद ही एरवीं वरिष्ठ असली तरी कालावर तिची सत्ता चालत नाहीं. तिच्या वरिष्ठपणांत हें फार मोठें वैगुण्य आहे.

परवां शनिवारीं पूज्य बापूंना भेटलों. आगगाडी स्टेशनवर उभी असतांना आगगाडींत बसलेल्या माणसाला भेटणें आणि बापूंना भेटणें अगदीं सारखें. गाडीनें शीळ वाजविली कीं सारें बोलणें संपलें, हवें तर खुंटलें म्हणा! त्यांनीं तुमच्या आईची चौकशी मुख्यतः केली.

रात्रीं व्हाइसरॉयांच्या भव्य किल्ल्यांत 'उद्यानोपहार' झाला. उभ्या जन्मांत अशा प्रकारचा हा पहिलाच प्रसंग. पण नवीन असें कांहींच वाटलें नाहीं. प्रवेश करतांना लॉर्ड व लेडी माउंटबॅटन यांच्याशीं हस्तांदोलन झालें आणि नंतर ज्याला जिकडे वाटेल तिकडे तो हिंडूं लागला. टेबलांवर बिस्किटें, केक्स, पोटॅटो चिप्स, कॉफी, टमाटो रस इत्यादि जिन्नस होते. लहर लागेल त्याप्रमाणें एखाद्या जिन्नसाचा मासला पाहत पाहत लोक हिंडत होते व गप्पागोष्टी करीत होते. यजमान व त्यांच्या पत्नीहि मोकळेपणानें गप्पागोष्टींत भाग घेत होतीं. 'खादन्न गच्छामि' व 'हसन्नजल्पे' या दोन्ही शिष्टाचारांचा भंग भलीभली शिष्ट मंडळी करीत होती. सिगारेट ओढणाऱ्या कुलस्त्रियाहि कांहीं थोड्या थोडक्या नव्हत्या! यजमान सपत्निक निघून गेल्यानंतर आम्हांला आपापल्या घरीं जायची मोकळीक मिळाली! असा हा उभ्या उभ्यानें फराळाचा समारंभ होता. व्हाइसरॉयाच्या वाड्याचें वर्णनहि मोठें मनोरंजक वाटेल तुला. पण माझ्याजवळ तेवढें भाषा-कौशल्य नाहीं.

पूज्य राजेंद्रबाबूंनाहि भेटलों. सौजन्य साकार झालें, आणि राजेंद्रबाबूंच्या रूपानें अवतरलें! त्रासिकपणा नाहीं, आढ्यता नाहीं, माणसांचा कंटाळा नाहीं! राजेंद्रबाबू राज्यपदावर बसूनहि माणूस राहिलेले आहेत. राजेंद्रबाबूंचे सेक्रेटरी व मित्र चक्रधरबाबूंना तुझी फार फार आठवण येते. तुला न आणल्याबद्दल त्यांनीं मला शंभरदां तरी दोष दिला असेल.

तुझा,
दादा

१३१, कॉन्स्टिट्यूशन हाउस,
नवी दिल्ली,
२८-४-४७

प्रिय बच्चू,

काल सुमारें २-५० लाच दिल्लीच्या विमानतळावर येऊन पोंचलों. अगदीं हवेंत तरंगत येण्याचा हा पहिलाच प्रसंग. अगदीं वाघाच्या शिकारीची तयारी केली होती मी. उपाशी तर राहिलों, विमानांत चढल्याबरोबर खुर्चीला असलेला कंबरपट्टा बांधून तर घेतला आणि कानांत बोळे तर घातले. नंतर माझें मलाच हंसूं आलें.

तुमच्यां आईबरोबर मी मागें विजापूरला गेलों होतों. तेथील 'मुलूख मैदान' (मालिक–इ–मैदान) तोफ पाहिली. त्या तोफेच्या तोंडांत प्रत्यक्ष आपल्या प्रेमाबाई बसल्या. प्रेमाबाई म्हणजे कांहीं शरीरानें देखील किरकोळ स्त्री नव्हे! त्या प्रसंगाची मला आठवण झाली. विमानांत बसलें म्हणजे एखाद्या तोफेच्या आंत बसल्यासारखें वाटतें. पण हें साम्य येथेंच संपतें.

कित्येकांना आपण एखाद्या सुसरीच्या किंवा व्हेल माशाच्या पोटांत आहोंत असाहि भास होतो. पण मला मात्र अगदींच निराळा भास आला. जमीन जसजशी लांब जाऊन अंधुक दिसूं लागली, तसतसें मला असें वाटूं लागलें, कीं आपलें पार्थिव जीवन कांहीं काळापुरतें तहकूब झालें. मेलेल्या माणसाचें शरीर पेटींत घालून जमिनींत पुरतांना मीं पाहिलें आहे. आमचीं सगळ्यांचीं शरीरें कॉफिनमध्यें घालून जमिनींत पुरून नंतर स्वर्गात पाठविण्याऐवजीं सरळ स्वर्गाकडेच रवाना करण्यांत येत आहेत, असें मला वाटलें. कोण म्हणतो, मेल्यावांचून स्वर्ग दिसत नाहीं? पण मला स्वर्ग कांहीं दिसला नाहीं. सगळ्यांनीं आपआपल्या कानांत बोळे घातलेले. कोणी कोणाशीं बोलेना. अगदीं जिकडे तिकडे स्तब्धता! सुपारी फोडतांना माझ्या अडकित्त्याची मधुर कट्कट्हि अनुभवाला येई, पण ऐकूं कांहीं येईना! तेव्हां आपण कॉफिनमध्यें बसलों आहोंत किंवा कोणी तरी आपलें

पार्सल करून दिल्लीकडे भिरकावून दिलें आहे असें मला वाटावें, हें साहजिकच नव्हतें का ? आगगाडींत स्वस्थपणें बोलण्याची सोय नसते. तेथें इतका गोंगाट असतो, कीं आपलाच आवाज आपल्याला ऐकूं येत नाहीं. त्या अव्यक्त व सर्वव्यापी नादब्रह्मांत वाणी हरपून जाते. कोठें तें आगगाडींतलें वाणीला बुडवून टाकणारे 'नादब्रह्म' आणि कोठें ही विमानांतली निर्जीव स्तब्धता ! रोज कंटाळवाणी व वायफळ भाषणें ऐकून ऐकून जेरीस आलेल्या असेंब्लीच्या स्पीकरला मात्र कानांत बोळे घालून स्वस्थ बसण्याची ही संधि स्वर्गसुखाइतकीच आनंददायी वाटेल !

मला विमान लागलें मात्र नाहीं. मळमळलें नाहीं किंवा कळमळलें नाहीं. अगदीं झोपाळ्याइतकें किंवा हिंदोळ्याइतकें देखील जाणवलें नाहीं. पण आपल्या प्रांताचे चीफ सेक्रेटरी श्री. पी. एस्. राऊ यांना माल त्रास झाला. विमान लागलें म्हणजे मळमळ सुरू होते म्हणतात. म्हणून दरेक खुर्चीच्या मागच्या बाजूला एक पिशवी असते आणि त्या पिशवींत 'Air sickness bag' अशीं अक्षरें काढलेलीं कागदाचीं मोठीं पाकिटें असतात. फार मळमळायला लागलें म्हणजे ती पिशवी तोंडाशीं धरावी. विमानांत बसल्याबरोबर एक 'पोऱ्या' लवंगाहि देतो. विमान फारसें हलत नाहीं. त्यामुळें लिहायला–वाचायला तें आगगाडीपेक्षांहि सोयीचें.

विमान फार वर गेलें म्हणजे वातावरण बरेंच थंड होतें. पण म्हणून थंडी वाजतेच असें नाहीं. तरी पण दरेक खुर्चीवर एक एक 'ब्लँकेट' ठेवलेलें असतें. पुष्कळ लोक सुरक्षित पक्ष म्हणून त्याचा उपयोग करतात. इतर करतील तसें करावें, असें मी ठरविलें होतें.—' देख चलो, ता चाल को यह चतुरन की रीत '–पण ब्लँकेट पांघरण्याचें माझ्या लक्षांतच राहिलें नाहीं. शुक्लजींनीं अधिकारवाणीनें सुचविल्यावर मीहि ब्लँकेट अंगावर घेतलें. नव्हे, पोऱ्यानें चटकन् तें माझ्या अंगावर घातलें आणि खुर्चीचा 'तक्क्या' हि थोडा आणखी मागें केला.

मला मळमळलें नाहीं आणि थंडीहि वाजली नाहीं. बसायला अगदीं जबलपूरच्या ' डी लक्स ' इतकी प्रशस्त नाहीं तरी बरीच सुखासीन खुर्ची मिळाली. तेव्हां शारीरिक दृष्ट्या माझा हा प्रवास सुखाचा झाला, हें निराळें सांगायला नकोच.

माझ्या आयुष्यांत हा अनुभव अपूर्व होता. पण तो अपूर्व असला तरी अपूर्व वाटला नाहीं. पहिला या अर्थानें अपूर्व. पण कांहीं विशेष मौज नाहीं वाटली. हवेंत तरंगत राहण्याचा आनंद कांहीं वेळ टिकतो. नंतर त्रिशंकूप्रमाणें वाटायला लागतें. जमीन स्पष्ट दिसत नाहीं आणि आकाशांत आल्याचा प्रत्यय येत नाहीं. मृत्युलोकाचा आनंद नाहीं आणि स्वर्गाचें पुण्यहि नाहीं. आपली पृथ्वी किती सुंदर, किती रमणीय आहे ! तिच्यांत विविधता तरी किती आहे !

पण विमानांतून सगळेंच भुईसपाट दिसतें. मधून मधून नद्या दिसल्या म्हणजे रमणीयत्व दृष्टीस पडतें. शहर तर एकहि दिसलें नाहीं. सगळी पृथ्वी एखाद्या भव्य 'रिलिफ मॅप'सारखी दिसते. आणि गति जवळ जवळ तासाला १७५ मैल ! त्यामुळें कालिदासाचा रघुवंश आठवला तरी सीतेला 'पश्यानवद्यांगिविभाति गंगा' म्हणून दृश्य दाखविणाऱ्या रामाचीहि नजर ठरूं शकेल असें वाटत नाहीं !

मी एकंदरींत परलोकवादी माणूस नाहीं; पण आकाशांत जर खरोखर स्वर्गसुखाचा अनुभव आला असता, तर परलोकांत प्रवासाकरितां जाण्याची हौस मला वाटली असती. पण या बंद नळींतून आकाशहि अगदीं बेताचेंच दिसतें. मधून मधून जेव्हां आपण ढगांतून जाऊं लागतों, तेव्हां ते शुभ्र ढग एखाद्या जिनिंग फॅक्टरीच्या आवारांत ठेवलेल्या कापसाच्या ढिगाप्रमाणें दिसतात. केव्हां केव्हां हे ढग अगदीं विमानाच्या खालीं येतात. त्यांचे किती तरी तुकडे लहान मुलांनीं फुंकर घालून उडविलेल्या 'म्हाताऱ्यां'प्रमाणें तरंगतांना दिसतात. तेव्हां मात्र आपण नालवाडीला पिंजणाच्या खोलींत असल्यासारखें वाटतें. 'मेघदूता'चीहि आठवण होत नाहीं असें नाहीं.

विमान क्वचित् एकादां हेलकावा घेतें, त्या वेळीं झोपाळ्यांत बसल्यासारखें वाटतें. एरवीं तें गतिमान असल्याचा भाससुद्धां होत नाहीं. आगगाडींतून किंवा मोटारींतून जगाचा अस्थिरपणा व गतिमत्त्व तरी प्रत्ययाला येतें. पण विमानांतून मात्र सारें जग 'केवळ माया' आहे, असेंच वाटतें. डोंगर, पठार, दऱ्या, खोरीं यांच्यांत फारसा फरक दिसत नाहीं. साम्यवाद्याला दिसणारें साम्य हें खात्रीनें नव्हे ! हें वेदान्त्याचें डोळस अद्वैतहि

नव्हे. हा अस्पष्ट दर्शनांतून उत्पन्न झालेला छायावाद व रहस्यवाद आहे. जगाच्या फार वर गेलेल्या माणसाला तें नीट बघावयास मिळत नाहीं. स्वतःच्या मोटारींतून प्रवास करण्यासारखी मौज इतर कशांत नाहीं.

उंचावरून जग बघायचें असल्यास एकाद्या डोंगराच्या शिखरावरून बघावें, म्हणजे दृष्टीचा टप्पा विशाल होऊनहि माणसाचे पाय जमिनीवरच राहतात. त्याच्या दृष्टींत व वृत्तींत परोक्षता येत नाहीं. या प्रवासांत आपल्याला पृथ्वीचें नीटसें दर्शन होत नाहीं. दुपारच्या उग्र प्रकाशांत तर ती अधिकच अंधुक दिसते. माणूस अगदीं परोक्षवादी बनतो.

पण याचा अर्थ असा मात्र नाहीं, कीं मी विमानांत पुन्हा बसणार नाहीं किंवा इतर कोणी बसूं नये. आपल्याला जेथें पृथ्वीचा आधार नाहीं आणि वर एकाद्या खुंटीला किंवा कडीला पिंजऱ्याप्रमाणें टांगलेलेंहि आपलें वायुयान नाहीं, अशा स्थितींत कांहीं वेळ राहण्यांत मौज तर आहेच.

१९-४-४७

संध्याकाळीं ६ ला पार्टीमीटिंग झाली. फारसें कामकाज झालें नाहीं. उद्यांपर्यंत मीटिंग तहकूब झाली. काल ११ ते १ घटना-परिषद भरली. अध्यक्षांनीं संस्थानांच्या प्रतिनिधींचें स्वागत केलें. एकंदर सोळा प्रतिनिधी हजर होते. सर बी. एल. मित्र, पनीकर, सर राधाकृष्णमाचारी इत्यादींचीं भाषणें झालीं. घटना-परिषदेतर्फे पं. जवाहरलाल यांचें भाषण झालें. नेहमीं-प्रमाणें भाषण कळकळीचें व हृदयस्पर्शी झालें. बहुतेक सारीं भाषणें इंग्रजींत झालीं. जवाहरलाल यांचें इंग्रजींत, अध्यक्षांचेंहि इंग्रजींतच. बिचारे टंडनजी ज्याला त्याला ‘ आप हिंदी में भाषण करेंगे, ’ म्हणून सुचवीत होते. पण आतां इंग्रजांचें दडपण मनावर नसल्यामुळें सगळे लोक अगदीं मोकळ्या मनानें, बिनदिक्कत, मनमुराद इंग्रजी बोलतात ! त्याचें आतां कोणाला फारसें वाटतहि नाहीं.

या पाळीला डॉ. बाबासाहेब जयकर नाहींत. पहिल्या अधिवेशनाच्या वेळीं जयकरांविषयीं दरेकाच्या मनांत विलक्षण आदर व कुतूहल होतें. मला वाटतें त्यांची कदर घटना-पंडितांपेक्षां पुष्कळ जास्त झाली असती...

डॉ. बाबासाहेब आंबेडकर या पाळीला कॉन्स्टिट्यूशन हाउसमध्येंच उतरले आहेत. आज मूलभूत हक्काचा ठराव आल्यानंतर कदाचित् ते भाषण करतील. कालच्या पार्टी-मीटिंगमध्यें त्या रिपोर्टाच्या कांहीं कलमांवर उद्बोधक व जिव्हाळ्याची चर्चा झाली. डॉ. कैलाशनाथ काटजू यांच्या ज्ञानाची चांगली छाप पडते एकंदरींत ! ठराव सरदारांचा होता. त्यांनींहि सारी चर्चा मोठ्या शांतपणानें व खेळीमेळीनें ऐकून घेतली व तिच्यांत भाग घेतला. देरेकाच्या प्रतिभेची चमक पार्टी-मिटिंगमध्येंच खरी दिसून येते. पुढाऱ्यांबद्दल लोकांच्या मनांत निःसीम आदरभाव असला, तरी एकंदर परिस्थिति इतकी चंचल, अनिश्चित व बुद्धीला आवाहन करणारी आहे, कीं लोकांचीं मनें नित्य क्षुब्ध व व्यग्र असतात; त्यामुळें देरेकाला कांहीं तरी सांगायचें असतें, सुचवायचें असतें. प्रतिकूल परिस्थितींत तल्लख माणसांची प्रतिभा अधिकच तीक्ष्ण होत असते. वातावरण अस्वस्थतेचें, चिंतेचें आणि अविश्वासाचें आहे; पण निराशेचें किंवा हतबुद्धतेचें नाहीं. जुन्या निष्ठेला हादरे बसत आहेत. नवीन निष्ठेचें मूळ अजून दृढ झालेलें नाहीं—अशी असमाधानाची, अशाश्वतेची व मार्ग-संशोधनाची परिस्थिति आहे.

आजपासून असेंब्ली सकाळीं ८–३० ते १२–३० भरणार आहे. वास्तविक याची गरज नव्हती. परवांपासून दिल्लीची हवा एकाद्या सॅनिटोरियमसारखी थंड आहे. आणि परिषदेचें सभागृह तर अगोदरच 'एअर कंडिशन्ड' आहे. कालच्या बैठकींत लोकांनीं पंखे देखील बंद करविले. अगदीं विमानांतल्याप्रमाणें थंड हवा होती. रात्रींहि बाहेर थंडी वाजली. पण जातीय वातावरण गरम आहे. लोकांत प्रक्षोभ व बेचैनी आहे. त्या मानानें नवी दिल्ली शान्त आहे.

ही बैठक बहुतेक ता. ४ पर्यंत संपेल. पुढील कार्यक्रम नंतर लिहीन.

तुझा,

दादा

१२९, कॉन्स्टिटयूशन हाउस,
नवी दिल्ली,
१-५-४७

प्रिय बच्चू ,

परवांचें पत्र पोहोंचलेंच असेल. घटना–परिषदेच्या या बैठकीचें काम उद्यां आटपेल, हें आतां स्पष्ट आहे. मूलभूत हक्कांच्या मसुद्यावर बरीच चर्चा झाली, तत्त्वांचा खल झाला; तरी पण एकंदरींत हा मसुदा घाईनेंच मंजूर करून घेण्यांत आला, असें कित्येकांना वाटत राहिलें. यांपैकीं कांहीं माणसें दुराराध्य व दोषान्वेषी असतील, पण कांहीं प्रामाणिकहि आहेत. जास्त वेळ मिळूनहि कदाचित् त्यांनीं हेंच केलें असतें; पण हा मनोभावनेचा प्रश्न आहे. आपण एखादे वेळीं घाईघाईनें जितके घांस घशांत कोंबतों, तितकेच कदाचित् स्वस्थपणानें व संथपणें चघळत चघळत खाऊं, पण समाधान अधिक होईल. तसाच कांहींसा प्रकार याहि बाबतींत आहे. ज्या-प्रमाणें वेळाच्या अभावीं चटश्राद्ध करण्यांत येतें, त्याचप्रमाणें हें अगदीं झटपट बारसें करून घेण्यांत आलें, अशी कित्येकांची भावना आहे. ही घिसाडघाईची भावना जर सभासदांच्या मनांतून काढण्यांत आली, तर कामाचा उरक कमी होण्याची भीति मला तरी वाटत नाहीं. वेळ फुकट घालवावा असें कोणालाच वाटत नाहीं. पण आपल्याला विचार करायला पुरेसा अवकाश मिळाला, एवढें समाधान दरेकाला हवें असतें. कांहींना आत्मनिवेदनाची तळमळ असते, तर कांहींना आत्मविज्ञापनेची बाधा झालेली असते. त्यांना मात्र सर्वांत जास्त चाड ‘ नाम-महिम्या ’ची असते, आणि तेंहि सर्वस्वीं ‘ स्वनाम-महिम्या ’ची. असेहि कांहीं ख्यातिलोलुप लोक नाहींतच असें नाहीं. इतर कांहीं माणसांची जीभच खाजवते. ते बिचारे राहवतच नाहीं, म्हणून बोलतात. त्यांचें बोलणें Involuntary, ‘ अनिच्छन्नपि ’ असतें, म्हणून त्यांना त्याबद्दल जबाबदार धरतां येत नाहीं.

२-५-४७

शेवटीं आज ११ वाजतां या अधिवेशनाचें काम संपलें, किंवा पाहिजे तर संपविलें म्हणा. काल व आज मला भाषण करण्याची इच्छा अगदीं अनावर झाली होती. ही घटना-परिषद् क्रांतीची प्रवर्तकच नव्हे तर क्रांतीचें साधन झाली पाहिजे, अशी माझी भावना. सामान्य माणसाच्या दृष्टीनें तीनच गोष्टींचें महत्त्व आहे–(१) जन्माश्रित प्रतिष्ठेचा म्हणजे जातिसत्तेचा नायनाट–या दृष्टीनें 'अस्पृश्यता' हा गुन्हा ठरविण्यांत परिषदेनें एक पाऊल समाजक्रांतीकडे टाकलें, असें म्हणतां येईल. (२) संप्रदायवादाचा नायनाट–या दृष्टीनें सर्व प्रकारचें धर्मान्तर निषिद्ध व बेकायदेशीर ठरवावयाला हवें होतें. हल्लीं आपण ज्याला धर्म-परिवर्तन म्हणतों, तें धर्म-परिवर्तन नसून संप्रदायपरिवर्तन व समाजपरिवर्तन असतें. त्यांत गुणापेक्षां संख्येवर, निष्ठेपेक्षां आवेशावर व आचरणापेक्षां प्रचारावर जोर जास्त असतो. त्यामुळें परधर्मद्वेष व धार्मिक दुराग्रह या दोषांना प्रोत्साहन मिळतें. म्हणून धर्मवादाचा समूळ उच्छेद करायचा झाल्यास धर्मान्तर निषिद्ध व बेकायदेशीर ठरविलें पाहिजे. सारेच धर्म जर समान असतील, तर कोणा-लाहि एक धर्म सोडून दुसऱ्या धर्माची दीक्षा घेण्याचें काय प्रयोजन? 'आपण निरनिराळ्या दर्शनांचें किंवा वादांचें प्रतिपादन व विचार करून लोकांचीं मनें वळवितोंच कीं नाहीं, मग धर्म–प्रतिपादनाला व धर्म-प्रचा-रालाच तेवढी हरकत कां?' असा प्रश्न कदाचित् तुझ्या मनांत उभा राहील. पण 'मतप्रचार' व 'धर्मप्रचार' या दोन्ही प्रवृत्ती समान किंवा समान भूमिकेवरील नाहींत. समाजवादाचें श्रेष्ठत्व व कल्याणकारकत्व लोकांना पटावें म्हणून त्याचें प्रवचन, प्रतिपादन व प्रचार करणें निराळें, आणि 'माझ्या धर्मांत न याल तर मोक्षाला अंतराल' असें लोकांना सांगून स्वधर्म-प्रचार करणें निराळें. या दृष्टीनें मला वाटतें धर्मांतर तेवढें निषिद्ध असाच निरपवाद नियम करणें श्रेयस्कर होईल. पण या मुद्दयावर बोलण्याची सोयच नव्हती. (३) गरिबीचा नायनाट–गरिबीचा नाय-नाट म्हणजे गरीब–श्रीमंत या भेदाचा नायनाट. जाती आहेत तोंपर्यंत जन्मामुळें उच्च–नीच भेदभावना राहणारच! त्याचप्रमाणें वर्ग आहेत

तोंपर्यंत संपत्तीमुळें उच्च-नीच भेदभाव राहणारच ! जन्माश्रित उच्च-नीच भेदभावाचा नायनाट करण्याकरितां म्हणजे जातिसत्ता नाहींशी करण्याकरितां ज्याप्रमाणें जातिसंस्थाच नाहींशी करायला पाहिजे, त्याचप्रमाणें वर्ग-सत्तेचा नायनाट करण्याकरितां वर्गभेदच नाहींसा केला पाहिजे. म्हणून मूलभूत हक्कांत व्यक्तीला संपत्ति बाळगण्याच्या अधिकाराबरोबरच राज्याला संपत्तीच्या अपहरणाचा किंवा समाजीकरणाचाहि अधिकार घटना-परिषदेनें द्यायला हवा होता. संपत्तीचें रक्षण म्हणजे गरिबांच्या गरिबीचें व अमीरांच्या अमीरीचें रक्षण. गरिबांची गरिबी रक्षणीय नाहीं, तिचा ताबडतोब अंत व्हायला पाहिजे. ती अन्यायमूलक आहे व अनर्थकारक आहे. श्रीमंतांची श्रीमंतीहि रक्षणीय नाहीं. ती अनीतिमूलक आहे व अपायकारक आहे. संपत्तीचें रक्षण म्हणजे गरिबांच्या क्षुद्र लोभभावनेचें रक्षण. म्हणून समाजकार्याकरितां किंवा समाजहिताकरितां संपत्तिवानांची संपत्ति राज्यसंस्थेनें ताब्यांत घेतली, तर त्यांत दोघांचेंहि कल्याण आहे. म्हणून मोबदल्याचा प्रश्नच नाहीं. निदान मोबदला दिलाच पाहिजे असें बंधनकारक विधान नको होतें. रक्तपाताबांचून अर्थक्रांति म्हणजे प्रचारानें व कायद्यानें अर्थक्रांति. त्यामुळें ज्याप्रमाणें अस्पृश्यतेच्या बाबतींत अगदीं चांगलें ठसठशीत कलम घातलें, तसेंच या बाबतींतहि घातलें असतें, तर साधारण माणसानें दुवा दिला असता. या मुद्द्यावर मी आज माझें पहिलें भाषण करायला उभा राहिलों, इतक्यांत चर्चाबंदीची सूचना मान्य करण्यांत आली. श्रीकृष्णार्पणमस्तु !

डॉ. आंबेडकरांच्या विधायक प्रतिभेचा लाभ घटना-परिषदेला मिळतो. तिचा उपयोगहि चांगला होतो. ते हल्लीं विधायक वृत्तीनें सर्व प्रश्नांच्या चिकित्सेला व विचाराला मदत करतात. त्याचें कोणालाहि वैषम्य वाटत नाहीं. उलट, कौतुकयुक्त समाधानच वाटतें. त्यांचें तें ठसकेदार व डौलदार भाषण ऐकलें म्हणजे दुसऱ्या डॉ. बाबासाहेबांच्या ( बॅ. जयकरांच्या ) भाषण शैलीची आठवण होते. घटना-परिषदेनें त्यांच्याहि विधायक प्रतिभेचा सत्कार इतक्याच आदरानें व तत्परतेनें केला असता, पण योगायोग नव्हता, दुसरें काय ?

क्रियात्मक चळवळ व घटनात्मक चळवळ या दोन्ही परस्पर–पोषक कशा होतील हा सर्वांत महत्त्वाचा मुद्दा आहे. पण याची फारशी चाड

कोणालाच दिसत नाहीं. ज्याला त्याला वाटतें, मला जें पराक्रमानें राखतां आलें नाहीं, तें कायद्यानें रक्षिलें पाहिजे. कायद्याच्या मागें लोक-शक्तीचा आधार नसला, तर तो कायदा कागदावर देखील राहत नाहीं याची जाणीव असणारा विरळा. ब्राह्मण म्हणतो, 'माझी पोथी, माझें पंचांग, माझी उपाध्येगिरी कायद्यांत अगदीं मूलभूत हक्कांत घालून ठेवा.' हिंदु म्हणतो, 'ब्राह्मणाची पोथी आणि माझें जानवें व शेंडी यांचें रक्षण नवखालींत झालें नाहीं, पराक्रम उणा पडला, म्हणून जानवें, शेंडी, मूलभूत हक्कांत नमूद करा.' शीख म्हणतो, 'तें कांहींहि म्हणा, 'किरपाण' त्यांत पाहिजेच.' रोमचा कॅथॉलिक म्हणतो, 'पवित्र दारू पाहिजे.' मुसलमान म्हणतो, 'कुरबानी' पाहिजे. आणि हें सगळें धर्मरक्षणाकरितां! त्यामुळें जन्मसत्तेचा नायनाट, धनसत्तेचा नायनाट, जातिवर्चस्वाचा नायनाट, वर्ग-वर्चस्वाचा नायनाट, हे मुद्दे धर्मावेशाच्या ओघांत पार वाहून जातात.

घटना-परिषदेच्या कामाला अजून हवा तसा रंग भरलेला नाहीं. याचें एक कारण बरेंचसें काम तांत्रिक व शास्त्रीय स्वरूपाचें असल्यामुळें पल्लेदार वक्तृत्वाला फारसा वाव नाहीं. मोजक्या भाषेंत शास्त्रीय पद्धतीनें मुद्दे मांडले म्हणजे झालें. या दृष्टीनें अल्लादी कृष्णस्वामी, राजाजी आणि डॉ. काटजू इत्यादींचीं भाषणें उपयुक्त होतात. आंबेडकरांच्या भाषणांत दोन्ही गुण असतात. दुसरें कारण असें, कीं सारेच पुढारी असल्यामुळें बहुतेक सगळ्यांना सारें कांहीं कळतें. म्हणून ज्याला अक्कल असते, त्याला बोलण्याचें फारसें धैर्यच होत नाहीं. ज्ञान व आत्मविश्वास यांचा संयोग ज्यांच्या ठिकाणीं असेल, त्यांच्याच भाषणाची छाप पडते. तिसरें कारण परिस्थिति. तिचीं रूपें क्षणोक्षणीं बदलतात आणि तीं शूर्पनखेपेक्षांहि विविध व विक्राळ असतात. 'मति रामाची विस्मित झाली' असाच अनुभव पुष्कळदां येतो. त्यामुळें लक्ष्मणाच्या सुरीला वाव असला, तरी रामाच्या मतीची करामत फारशी दिसत नाहीं.

पूज्य बापू कालच आले. अजून त्यांची भेट झाली नाहीं. बहुतेक उद्यां भेट घेईन.

तुझा,

दादा

ता. कः—दिल्लीचा उन्हाळा सुरू झाला आहे. आकाशांत अगदीं ढगासारखी व धुक्यासारखी धूळ पसरलेली असते. धूळ व झळा हें दिल्लीचें वैशिष्ट्यच आहे.

दादा

— ४ —

१४१, कॉन्स्टिट्यूशन हाउस,
नवी दिल्ली,
११-७-४७

प्रिय बच्चू,

येथें आल्यानंतर तुला दोन-चार पत्रें लिहिलीं आहेत... आम्ही दिल्लीला येऊन पोंचल्यानंतर दुसऱ्याच दिवशीं आबासाहेब काळे आले. ते आल्यामुळें मला दिल्लींतहि नागपूर वाटूं लागलें. आबासाहेब सार्वजनिक कामांत माझे एकनिष्ठ साथीदार तर आहेतच, पण त्याहिपेक्षां विशेष म्हणजे ते माझे अनन्य मित्र आहेत. वरून दिसायला वेगळ्या प्रकारचे दिसले तरी अंतरीं 'नाना कळा' आहेत. सुनिश्चित विचारसरणी आहे, अढळ निष्ठा आहे, शाबूत बुद्धि आहे, चारित्र्य आहे आणि वरच्या दर्जाची विद्वत्ता आहे. याशिवाय मित्रत्वभावना आहे, त्यामुळें त्यांचा सहवास सुखकर होतो.

पूज्य बापूंना व सरदारांना भेटलों. थोडकें पण महत्त्वाचें बोलणें झालें. बापूंची मुलाखत आपल्याला ज्या मुद्द्यांवर बोलायचें असेल त्या मुद्द्यांवर सर्वस्वीं अवलंबून नसते. ती घड्याळाच्या गतीवर अवलंबून असते. घड्याळाचा कांटा फिरला कीं बाकीचे मुद्दे कालवश झालेच. त्यांत बापूंचा दोष मात्र तिळमात्रहि नाहीं.

आमच्या घटना-परिषदेचा दिवाणखाना या पाळीला अगदीं फुलून गेलेला आहे. कांहीं जुने चेहरे दिसत नाहींत, त्यांच्याऐवजीं अनेक

अपरिचित व अनपेक्षित नवीन नवीन आकृती दिसतात. जुन्या चेहऱ्यांपैकीं भाई सोमनाथ लाहिडी व डॉ. श्यामप्रसाद मुकर्जी यांची आठवण हटकून येते. राजकीय मतभेद कितीहि असले, तरी माणसाविषयीं कौतुक किंवा आदर वाटल्यावांचून कसा राहील? सोमनाथांचा साम्यवाद घटनापरिषदेंतील चर्चेला कारल्याच्या भाजीप्रमाणें चव आणीत असे. कारण साम्यवाद हा एक संप्रदाय आहे; आणि संप्रदाय म्हटला कीं, त्यांत तीव्रता आणि कटुता ही आलीच. भाई सोमनाथांच्या भाषणांत तो कडवेपणा आणि ती खुमारी राहत असे. सबंध घटना-परिषदेंत जवळ जवळ एकहि सभासद अनुकूल नसतांना एकाद्या धार्मिक माणसाच्या निष्ठेनें भाई सोमनाथ आपल्या मताचें प्रतिपादन करीत असत. सांप्रदायिक माणूस प्रचारपरायण व प्रतिपादन-पटु असावा लागतो. म्हणून त्याला वस्तुनिदर्शक आंकडे आणि माहिती यांचें दारूकाम दाखवावें लागतें. सोमनाथ लाहिडी पट्टीचे वक्ते नाहींत; पण सांप्रदायिकाच्या वक्तृत्वाला आवश्यक ते सर्व गुण त्यांच्याहि वक्तृत्वांत असत.

श्यामबाबू कांहीं हाडांचे सांप्रदायिक नव्हत. त्यांच्या विचारसरणीला बंगाली माणसांच्या भावनाप्रधानतेची बैठक आहे. पण एकंदरींत माणूस अत्यंत समंजस, उमदा व अनाग्रही. घटना-परिषदेच्या पहिल्या अधिवेशनांत त्यांचीं जीं भाषणें झालीं, तीं फारशीं वक्तृत्वपूर्ण नसलीं, तरी भाषेच्या, विचारांच्या, स्पष्टतेच्या आणि ओजस्वितेच्या दृष्टीनें वरच्या दर्जाचीं होतीं. पक्षसभेंतहि ते एकंदरींत मोठ्या विधायक वृत्तीनें चर्चेंत भाग घेत आणि नवीन मुद्दे किंवा उपसूचना सुचवीत. घटना—परिषदेंत हिंदुमहासभेच्या या समुच्चयवादी शहाण्या पुढाऱ्याची अनुपस्थिति जाणवते.

आणखीहि एका व्यक्तीची आठवण माझ्यासारख्याला झाल्यावांचून राहत नाहीं. माझ्यासारख्याला म्हणण्याचें कारण आहे. लोकांचें लक्ष वेधण्याइतका चळवळेपणा जयरामदासजींच्या ठिकाणीं नाहीं. त्यांची वृत्ति एकंदरींत प्रसिद्धिपराङ्मुख. ते अगदीं क्वचित् प्रसंगींच बोलत. पण त्यांच्या बोलण्यांत मुद्देसूदपणा असे, मांडणींत समतोलपणा असे, आणि प्रतिपादनांत दृढता असे.

२२-७-४७

आमच्या घटना-परिषदेंत हाताच्या बोटांवर मोजण्याइतके देखील राष्ट्रीय मुसलमान नाहींत. आसफअलीसाहेब अमेरिकेला गेले. त्यांची आठवण यावी इतका सक्रिय भाग त्यांनीं घटना-परिषदेच्या कार्यांत कधींच घेतला नव्हता. बादशाह खान यांना सरहद्द प्रांताच्या भवितव्याची इतकी विवंचना होती, कीं त्यांच्यासारख्या कर्मयोग्याला सभा-सम्मेलनांतील शाब्दिक कार्यक्रमांत गोडी वाटणें शक्य नव्हतें. त्यांनीं राजेंद्रबाबूंच्या अभिनंदनार्थ घटना-परिषदेंत एक भाषण सोप्या उर्दूत केलें आणि त्यानंतर परिषदेच्या सभागृहाकडे पाठ वळवून सीमाप्रांतांतील कुरुक्षेत्राकडे वळले.

आतां बादशाह खानांप्रमाणेंच राष्ट्रीय मुसलमानांचे सर्वमान्य पुढारी व संयुक्त राष्ट्रीयत्वाचे प्रभावशाली प्रवक्ते मौलानासाहेबहि आमच्या परिषदेचे सभासद राहिलेले नाहींत. मौलानासाहेबांच्या कुशाग्र बुद्धिमत्तेचा, असंदिग्ध विचारसरणीचा आणि विद्वत्तापूर्ण वक्तृत्वाचा लाभ घटना-परिषदेला फारसा कधींच लाभला नाहीं. परिषदेच्या सभागृहांत ते फार थोडा वेळ येऊन बसत. पाहणाराला त्यांच्या चर्येवर चिंता व विषाद यांची दाट छाया पसरलेली दिसत असे. राष्ट्रीय मुसलमानांच्या भूमिकेच्या असफलतेविषयीं तर त्यांच्या मनांत अनंत भावनांचें व विचारांचें काहूर माजलेलें नसेल ना? मौलानासाहेबांनीं परिषदेच्या पहिल्या अधिवेशनाच्या वेळीं पक्षाच्या पहिल्याच सभेंत डॉ. बाबासाहेब जयकरांच्या उपसूचनेवर मोठें बिनतोड व सडेतोड भाषण केलें होतें, पण त्यानंतर त्यांनीं स्तब्धता स्वीकारली.

रफीसाहेबांनींहि घटना-परिषदेंत कधीं तोंड उघडलें नाहीं. पक्षाच्या सभेंतहि ते कधीं बोलत नाहींत. राष्ट्रीय मुसलमानांच्या बिरादरीपैकीं तेच काय ते आतां उरले आहेत.

मुस्लिम लीगचे जवळ जवळ सगळे सभासद या पाळीला हजर आहेत. बोलण्याची एकहि संधि सहसा जाऊं द्यायची नाहीं असा त्यांचा बाणा दिसतो. त्यांच्यांत बेगम ऐजाझ रसूल याहि आहेत. बेगमसाहेबांनींहि घटना-परिषदेंत भाषण केलें, आणि तेंहि मंत्रिमंडळाच्या निर्मितीसारख्या अंमल शास्त्रीय स्वरूपाच्या मुद्द्यावर. चौधरी खलिक-उज्जमान हे लीग

पक्षाचे नेते आहेत. युक्तप्रांतीय खानदानी मुसलमानांची सगळी ' तहजीब ' ( संस्कृति ) त्यांच्या ठिकाणीं आहे.

आसामचे मुहम्मद सादुल्लासाहेब यांचें भाषण फारसें वक्तृत्वपूर्ण नसतें. पण त्यांचें इंग्रजी बरेंच शुद्ध असतें. भाषणांत उपरोध व खोचदारपणाहि थोडा फार असतो.

मद्रासचे पोकरसाहेब कोठलाहि हिंदु किंवा मुसलमान सभासद हिंदींत किंवा उर्दूत बोलूं लागला कीं, त्यानें इंग्रजींत बोलावें म्हणून मोठ्या अट्टाहासानें मागणी करतात. आणि तरीहि उर्दू हीच आमची भाषा आहे हा मुसलमानांचा आग्रह कायमच आहे.

जुने लढवय्ये, सर्व-तंत्र-स्वतंत्र मुरब्बी लीगी, साम्यवादी मौलाना हसरत मोहानी यांचा तृतीय पंथ आहे. त्यांचा आवाज, लहानपणीं मुलें आंब्याच्या रोपट्याची कोय वाजावितात, त्यासारखा किंचित् आहे. त्यांच्या भाषणानें घटना-परिषदेंत उभयपक्षांचें थोडेसें मनोरंजन होतें. त्यांच्या म्हणण्यांत मुद्दा नसतो असें नाहीं; पण एकीकडे ते जातिवादी लीगचे सभासदहि आहेत आणि दुसरीकडे साम्यवादीहि म्हणवितात. म्हणून त्यांच्या भाषणाकडे कुणीच लक्ष देत नाहीं.

मुस्लिम लीगचे सभासद नुकतेच आलेले असल्यामुळें इतक्यांत त्यांच्या-विषयीं विशेष लिहितां येणें शक्य नाहीं. त्यांची वागणूक एकंदरींत दरबारी शिष्टाचाराची आहे. पहिल्याच दिवशीं हिंदी सरकारशीं एकनिष्ठ राहण्याचें तोंडभर आश्वासन लीग पक्षाच्या पुढाऱ्यानें व प्रमुख सदस्यांनीं दिलें; तरी पण हिंदी-संघापेक्षां त्यांच्या मनांत पाकिस्तानाविषयीं जास्त निष्ठा व आत्मीयता आहे हें उघड आहे. कारण त्या पाकिस्तानकरितांच आतांपर्यंत त्यांनीं चळवळ केली, कांगावा केला, आकाशपाताळ एक केलें. अशा स्थितींत घटना--परिषदेंतील लीगेतर सदस्यांचा त्यांच्यावर विश्वास कसा बसावा ? पण ही वस्तुस्थिति जाणून आत्मपरीक्षण करण्याऐवजीं आसामचे माजी मुख्य प्रधान सादुल्लासाहेब यांनीं अशी तक्रार केली, कीं ' येथें आम्हाला अविश्वासानें वागविण्यांत येतें. दरेकाला आमचा वहीम वाटतो.' ---खाई त्याला खवखवें दुसरें काय !

घटना-परिषदेचें काम अन्याच वरच्या पातळीवर चालतें. श्री. कनुभाई मुन्शी हे घटना-परिषदेचे मुन्शीच आहेत. तें काम त्यांना साधतें व साजतेंहि. पक्ष-सभेंत व परिषदेंतहि त्यांना सारा वेळ उभेंच राहावें लागतें. मसुदे तयार करणें, त्यांतील मुद्द्यांचें स्पष्टीकरण करणें, आक्षेपांना उत्तर देणें, उपसूचना स्वीकारणें इत्यादि इत्यादि सारीं जिकिरीचीं कामें त्यांनाच करावीं लागतात. घटना-निर्मितीच्या कामांत या बारीक तपशिलांच्या कामाचें विशेष महत्त्व असतें. म्हणून कनुभाई मुन्शी यांना घटना--परिषदेचे उपाध्ये, मुनीम व चिटणीस म्हणतां येईल.

सर अल्लादि कृष्णस्वामी अय्यर आणि सर एन्. गोपालस्वामी अय्यंगार हे घटना-परिषदेचे दोन प्रमुख कायदेपंडित किंवा शास्त्री आहेत. शास्त्रार्थाचा किंवा व्यवस्थेचा प्रश्न उपस्थित झाल्यास या दोघांचें मत विचारण्यांत येतें. यांच्याच बरोबरीचे व तोलाचे घटना--शास्त्री व कायदेपंडित डॉ. आंबेडकर यांना मानण्यांत येतें. सर अल्लादि यांचें वक्तृत्व अगदींच वक्तृत्वहीन असतें. शरीरप्रकृतीमुळें त्यांना उभें राहून बोलणें जमत नाहीं. बसून बोलण्याची त्यांच्यापुरती खास परवानगी आहे. आपल्या जागेवरून ते मोठ्या आवाजांत अगदीं पिनलकोडाच्या भाषेंत, अडखळत अडखळत पण ठासून बोलतात. हा आवाज कोठून निघतो याचा शोध गॅलरींतील प्रेक्षक मोठ्या कुतूहलानें करीत असतात.

सर अल्लादींच्या मानानें सर गोपालस्वामींवर बोलण्याचे प्रसंग फार कमी येतात. त्यांच्याहि ठिकाणीं वक्तृत्वाचा अभावच आहे. पण प्रत्येक शब्दावर आघात देऊन तो वेगवेगळा उच्चारण्याची त्यांची पद्धत असल्यामुळें त्यांचें म्हणणें कळायला वेळ लागत नाहीं.

जुन्या मुरलेल्या कायदेपंडितांपैकीं आपल्या प्रांताचे डॉ. गौर हे तिसरे सर घटना--परिषदेच्या पटावर आहेत. अगदीं पहिल्या अधिवेशनांत त्यांनीं आपल्या बुद्धीची थोडी फार चुणूक दाखविण्याचा प्रयत्न केला. पण त्यानंतर त्यांनीं परिषदेच्या कामांत मुळींच लक्ष घातलेलें नाहीं. आणि मागल्या अधिवेशनापासून तर ते हजरहि राहत नाहींत.

डॉ. गौर यांचें नांव आठवल्यानंतर अर्थातच दृष्टि आपल्या प्रांताकडे वळते. प्रतिनिधींपैकीं यतिराज ( श्री. ह. वि. कामत ) हे सगळ्यांत जास्त बोलणारे. यतिराजांचें इंग्रजी भाषेचें ज्ञान बऱ्यापैकीं आहे. त्यामुळें त्यांच्या भाषणांतील भाषा शुद्ध असते. यतिराजांनंतर बोलण्याच्या बाबतींत डॉ. पंजाबराव देशमुख यांचा क्रम लागतो. पंजाबराव बॅरिस्टर आहेत, आणि त्यांना राज्यकार्याचा थोडा फार अनुभवहि आहे. इंग्रजी भाषा शुद्ध बोलतां येते. श्री. हेमचंद्रराव खांडेकर हे कसलेले सभावीर आहेत. मराठी, इंग्रजी व हिंदी या तिन्ही भाषांत आपलें म्हणणें व्यवस्थितपणें मांडण्याची हातोटी त्यांना अवगत आहे. आपल्या प्रांतीय असेंब्लींतहि ना. मिश्रांना वगळलें, तर खांडेकरांच्या तोडीचे वक्ते थोडेच आहेत. बाबू गोविंददासहि मधून मधून व्यासपीठावर येत असतात. काझी करीमुद्दीनसाहेब यांनीं आपल्या लीगी बाण्याला अनुसरून पहिल्याच दिवसापासून बोलायला सुरुवात केलेली आहे. ब्रिजलाल बियाणी तल्लख बुद्धीचे व व्यवहारचतुर गृहस्थ आहेत; पण त्यांनीं घटना-परिषदेंत मौनव्रत स्वीकारलेलें दिसतें. शुक्लजींना बोलण्याचें प्रयोजन उरत नाहीं. प्रांतिक असेंब्लींतहि ते कामापुरतेंच बोलतात.

या मौनव्रतधारी लोकांत सुप्रसिद्ध विधानशास्त्री बी. शिवराव हेहि आहेत. त्यांनीं अभ्यासकांना उपयुक्त व मार्गदर्शक असा ग्रंथ राज्यघटनेवर लिहिलेला असूनहि घटना—परिषदेंत त्यांचें अस्तित्व कुणाच्या लक्षांतहि येत नाहीं. पक्षसभेंतहि त्यांची उपस्थिति ध्यानांत येत नाहीं.

जुन्या घटना—शास्त्रज्ञांपैकीं पंडित हृदयनाथ कुंझरू केव्हां केव्हां भाषण करतात. त्यांचें भाषण अर्थातच युक्तिवादपूर्ण व मुद्देसूद असतें. पण त्यात वक्तृत्वाची तडफ किंवा नवविचारांचा जिवंतपणा नसल्यामुळें फारसें तेज पडत नाहीं. डॉ. किचलू या सुप्रसिद्ध कायदेपंडिताविषयीं मागल्या पत्रांत लिहिलेंच आहे.

कुठलाहि ठराव असला, कीं त्याला श्री. के. संतानम् आणि अनंतशयनम् यांची एखादी तरी उपसूचना असावयाचीच. श्री. अनंतशयनम् यांचें वर्तन त्यांच्या नांवाच्या अगदीं विरुद्ध आहे. ते अनंत जागरूक आणि नित्य उभे असतात; किंवा सापाचें अंथरूण असल्यामुळें त्याच्यावर

लोळण्याची हिंमत होत नाहीं असें म्हणा ! श्री. संतानम् यांच्या उपसूचनेंत कांहीं तरी महत्त्वाचा मुद्दा असतो. त्यामुळें त्यांच्या सूचनेवर उद्बोधक चर्चा होते. भाषणें मात्र दोघांचींहि कांहीं सुश्राव्य नाहींत.

श्री. बापूसाहेब गुप्ते यांचाहि उल्लेख उपयुक्त उपसूचना मांडणारांमध्यें करावा लागेल.

चर्चेंत उपयुक्त व विचारप्रवर्तक भर घालणारांमध्यें पंडित गोविंद वल्लभ पंत यांचें नांव प्रामुख्यानें घेतलें पाहिजे. पंतजींनीं बरींच हिंदी व्याख्यानें मीं यापूर्वी ऐकलेलीं आहेत. पण तीं मला अगदींच रटाळ आणि सामान्य वाटलीं होतीं. पंतजींचीं भाषणें वक्तृत्वशून्य असतात. त्यांचीं वाक्यें ओबडधोबड आणि नागमोडीं असतात. पण भाषा विषयाला अनुरूप आणि परिणामकारक असते. हिंदी भाषा त्यांना स्वाभाविक आहे. पण त्यांचें इंग्रजी कमाबलेलें आहे.

पंतप्रधानांत चर्चापटुत्वाच्या बाबतींत पंतजींच्या नंतर बाळासाहेब खेरांचें नांव घेतलें पाहिजे. बाळासाहेब महाराष्ट्रीय असूनहि इंग्रजी शुद्ध बोलतात. पण बाबासाहेब जयकर, अच्युतराव पटवर्धन, डॉ. आंबेडकर यांच्यासारख्या अनेक महाराष्ट्रीयांनीं इंग्रजी वक्तृत्वाबद्दल लौकिक संपादन केलेला असल्यामुळें आम्हां महाराष्ट्रियांच्या राजभाषा विरोधाला यापूर्वीच बट्टा लागलेला आहे. बाळासाहेब खेर नेहमीं मार्मिक मुद्दा उपस्थित करतात. त्यांच्या बोलण्यांत कळकळ असते आणि त्यामुळें जोरहि असतो. गव्हर्नरांच्या खास अधिकारांविषयीं झालेल्या चर्चेंत त्यांनीं आपल्या भाषणांनीं अक्षरशः सभा जिंकली.

शीख मंडळींपैकीं सरदार उज्वलसिंग आणि त्यांचे इतर एकदोन सोबती हे चांगल्यापैकीं वक्ते पूर्वीच्या संचांत होते, पण आतां ते नाहींत. परिषदेंत हिंदी ख्रिस्ती व निमगोरे यांच्यापैकीं फ्रॅंक ॲंटनी हे उत्कृष्ट वक्ते आहेत. भाषा, मांडणी व ऐट या सर्वच दृष्टींनीं त्यांचें वक्तृत्व आकर्षक असतें. प्रेटर हेहि वाईट वक्ते नाहींत. आणि माझ्या शेजारीं बसणारे गिब्बन तर पाकिस्तानांत निघून गेले. मोठा तडफदार माणूस होता, पण अंमळ तल्लख व चंचल स्वभावाचा !

आमचे रुस्तमकाका म्हणजे रुस्तम खुर्शिद सिध्वा हे दादाभाई, फिरोजशाह, नरीमन घाटाचे पारशी आहेत. त्यांना जातिवाद खपत नाहीं. प्रतिवाद सहन होत नाहीं. त्यांचें राष्ट्रीयत्व अगदीं शंभर नंबरी आणि भावनकशी आहे. रुस्तमकाकांना सौम्यपणानें बोलतांच येत नाहीं. त्यांचें वक्तृत्व शिवी हातोड्याच्या पद्धतीचें आहे.

मसानींचा थाट रुस्तमकाकांच्या अगदीं विरुद्ध. रुस्तमकाका नेहमीं बोलतात. पुष्कळ बोलतात. मिनू मसानी थोडें बोलतात, मोजकें बोलतात. मसानींची भाषा मोठी सुंदर व वळणदार असते.

आदिवासियांचे प्रतिनिधि जयपालसिंह. यांचा खाक्या कांहीं औरच आहे. भाषा, शैली, ऐट या सर्वच बाबतींत त्यांचा थेट साहेबी थाट. 'आम्ही आदिवासी या देशाचे खरे मालक आहोंत, आणि आपला न्याय्य हक्क प्रस्थापित करण्याकरितां सहा हजार वर्षांपासून सतत झगडत आहोंत' हें वाक्य त्यांच्या त्या ऐटबाज भाषणांत कोठें तरी आलेंच पाहिजे. घटना-परिषदेच्या सभागृहांत गंभीर किंवा कंटाळवाणी चर्चा चालूं असतांना विनोदाची एखादी लहर उत्पन्न करणारे श्रीप्रकाशजी आहेत. आकृति धिप्पाड असून अगदींच हेमाडपंती नाहीं. चेहऱ्यावर सुखभावी छटा नित्य उमटलेली दिसते. गृहस्थ मोठे मार्मिक, विचारवान व चिकाटीचे आहेत. त्यांना एक उपसूचना मांडावयाची होती. तिच्यासाठीं ते जवळ जवळ दहांदा उभे राहिले. अध्यक्षांनीं त्यांना सुरुवातीलाच सांगितलें, कीं 'तुमच्या उपसूचनेचा विचार शेवटीं करूं.' तरी पण कांहीं तरी निमित्त काढून ते आपला 'चांदभाई' पुढें करीत. अध्यक्ष म्हणाले, "शेवटीं सांगतों म्हणून तुम्हांला आश्वासन दिलें आहे ना?" श्रीप्रकाशजी उतरले, 'Yes Sir, But I thought an occasional reminder may be helpful.' सभागृहांत हंशा पिकला.

भावी स्वराज्याच्या अध्यक्षाचे कुठल्याहि व्यापारधंद्यांत किंवा इतरत्र आर्थिक हितसंबंध नसावेत, अशा अर्थाच्या कलमावर चर्चा चालली होती. कुणी म्हणाला, 'राष्ट्राध्यक्ष कुठल्याहि कंपनीचा डायरेक्टर असतां कामा नयेत.' दुसरा म्हणाला, 'त्याचे शेअर्सहि असतां कामा नयेत.' तिसरा

म्हणाला, 'त्याला कुठलेंहि वर्षासन, वेतन अगर नेमणूक असतां कामा नये.' बरीच गरमागरम चर्चा झाली. इतक्यांत अत्यंत साळसूदपणाचा आव आणून श्रीप्रकाशजी म्हणाले, 'Sir, I have an humble suggestion to make. Let us lay it down that a candidate for 'Presidentship' should have no ostensible means of livelihood!' कंटाळवाणें व तंग वातावरण एकदम निवळलें.

राष्ट्राध्यक्ष कृपलानी यांना बोलण्याचे प्रसंग फारच क्वचित् येतात. आणि त्या क्वचित् प्रसंगींहि त्यांच्या वक्तृत्वाचा ठसा नेहमीं उमटतोच असें नाहीं. पण १६ तारखेला पक्षसभेंत 'हायकमांड' वरील आक्षेपांचें निरसन करतांना त्यांनीं जें लहानसेंच भाषण केलें, त्याची गणना त्यांच्या संस्मरणीय भाषणांत करावी लागेल.

घटना-परिषदेच्या कामांत सक्रिय लक्ष घालणाऱ्या व्यक्तींपैकीं देवीप्रसाद खैतान या धनिक गृहस्थांचा उल्लेख करणेंहि जरूर आहे. पक्षसभेंत व असेंब्लींत ते आपली पिवळी पगडी घालून नेहमीं हजर असतात आणि दरेक प्रश्नाच्या चर्चेत आस्थेनें भाग घेतात. गृहस्थ अभ्यासू असून बोलण्याची पद्धति व भाषा व्यवस्थित आहे. मतें मात्र त्यांच्या आर्थिक परिस्थितीला अनुरूप अशींच आहेत.

हिंदी ख्रिस्त्यांपैकीं फादर डिसूझा यांचें नांव उल्लेखनीय आहे. त्यांची बोलण्याची एक खास लकब आहे. संस्कृताप्रमाणें इंग्रजी शब्दांतलाहि शेवटला 'अ' संपूर्ण उच्चारतात, त्यांच्या भाषणांत गोड युक्तिवादाचा भाग असतो.

संस्थानिकांच्या नवीन आलेल्या प्रतिनिधींपैकीं म्हैसूरचे दिवाण सर ए. रामस्वामी मुदलियार यांचीं भाषणें जोरकस व पाणीदार होतात. भाषा अगदीं निर्दोष असते असें नाहीं, पण आवाज खणखणीत व बोलण्याची तऱ्हा बऱ्यापैकीं.

बापूजी अणे चर्चेत उत्साहानें भाग घेतात. पण त्यांच्या पुराण-प्रिय शैलीमुळें यंत्राशीं त्यांचें फारसें जुळत नाहीं. म्हणून मायक्रोफोनच्यासमोर

उमें राहूनहि त्या ' नवाट ' उपकरणाच्या तंत्रानें वागणें त्यांना आवडत नाहीं. त्यांच्या बोलण्यांत मुद्दा असतो. पण अलीकडे त्यांच्या शब्दांना घशांतच घुटमळत राहण्याची खोड जडली आहे.

संस्थानिकांच्या दिवाणांपैकीं सर्वांत प्रगतिप्रिय व कमींत कमी आग्रही बडोद्याचे दिवाण सर ब्रजेंद्रलाल मित्तर हे आहेत. उत्कृष्ट कायदेपंडित म्हणूनहि त्यांचा मान आहे. इतर दिवाणांत बरेच चाणाक्ष मुत्सद्दी असतील. पण सर ब्रजेंद्रलाल मित्तर हे संस्थानी राजकारणांत कुजलेले नसल्यामुळें त्यांची वृत्ति बरीच सरस आहे. बोलणें नेमकें व मोजकें.

घटना–परिषदेच्या स्वरूपाविषयीं कांहीं लिहिण्यापूर्वीं बाह्यांगावर थोडीशी नजर टाकणें मौजेचें वाटेल. हिंवाळ्यांत घटना परिषदेंत निरनिराळ्या रंगांचे पोषाख पाहायला मिळत. पण एप्रिल अधिवेशनापासून परिषदेचें सभागृह अगदींच फिकें, विवर्ण ( Colourless ) झालेलें आहे. मुसलमान सभासदांचे पोषाखहि फारसे रंगदार नाहींत. अगदीं गांधीछाप वेषांत फक्त एकटे शंकररावच असतात. पण पुष्कळशा ' क्लॉथ बाऊंड ' बावळ्या वेषधाऱ्यांपेक्षां त्यांचा तो पंचा आणि उपरणें हीं जास्त नीटनेटकीं दिसतात.

घटना-परिषदेंत एकंदर १२ स्त्रिया आहेत. पण त्यांच्या पोषाखांत इंद्रधनुष्याचे सात रंग देखील येत नाहींत. नाहीं तर तुम्ही लाहोरच्या अनारकलींत किंवा हैदराबाद सिंधच्या एखाद्या सार्वजनिक बागेंत कॉलेज–कन्यकांचा एखादा झुपका पाहा–इंद्रधनुष्यांत असतील नसतील तेवढ्या सगळ्या रंगांचें ' प्रात्यक्षिक ' तुझे मास्तर तुला दाखवूं शकतील ! सरोजिनी नायडू, अमृत कौर, अम्मु स्वामिनाथन् , जी. दुर्गाबाई, हंसा मेहता, कमला चौधरी, सुचिता कृपलानी, पूर्णिमा बानर्जी, बेगम रसूल, दाक्षायणी वेला–युधन, रेणुका रॉय आणि विजयालक्ष्मी पंडित या बारा स्त्रिया घटना–परिषदेच्या सदस्य आहेत. पण त्यांच्यापैकीं रंगांची आरास करण्याची हौस कुणालाच दिसत नाहीं. विजयालक्ष्मीबाईंचें घरचें नांव ' सरूप ' असें आहे. नांवाप्रमाणेंच त्यांचें रूप असून त्यांना ' कांहींहि ' शोभतें. विजयालक्ष्मी–बाईंचीं फारशीं भाषणें मीं ऐकलेलीं नाहींत. पण एप्रिलच्या अधिवेशनाच्या वेळीं आमच्या कॉन्स्टिटयूशन क्लबमध्यें त्यांचें U. N. O. वर जें भाषण

झालें, तें मी कधींहि विसरणार नाहीं. एखादी देवांगना भूतलावर येऊन दिव्य शब्दांत आत्मप्रत्ययाचा व अढळ निष्ठेचा संदेश सांगत आहे, असा क्षणभर भास झाला. वक्तृत्व नाटकी थाटाचें नव्हतें. स्वरांत फारसा आरोह–अवरोहहि नव्हता. हातवारे मुळींच नव्हते आणि तरीहि भाषण अप्रतिम होतें. पण घटना परिषदेंत विजयालक्ष्मीबाईच्या बुद्धीची चमक कधींच दिसली नाहीं. परिषदेंत त्यांचें एक भाषण झालें, पण तें अगदीं वेठ वळल्यासारखें. वाक्यें देखील गुळगुळीत उतरलीं नाहींत. घटना-परिषदेंत त्यांचा जीव नव्हता हेंच खरें. त्यामुळें आज त्या येत नाहींत म्हणून कोणाला चुकल्यासारखेंहि वाटत नाहीं.

इतर स्त्रियांपैकीं श्री. हंसा मेहता यांनीं राष्ट्रीय ध्येयाच्या ठरावावर एक ३–४ मिनिटांचें भाषण केलें. पण त्यांत त्या मुळींच खुलल्या नाहींत. श्री. दुर्गाबाई, दाक्षायणी आणि बेगम रसूल यांचीं भाषणें झालीं. दुर्गाबाई व दाक्षायणी यांच्या ठिकाणीं वक्तृत्व बेताचेंच. त्या मानानें बेगम रसूल यांचें वक्तृत्व अधिक चमकदार. पण एक मुसलमान तरुण स्त्री भरसभेंत बुरख्यावांचून बोलते, याचेंच लोकांना विशेष कौतुक वाटतें.

स्त्रियांमध्यें मुद्दे, भाषा व भारदस्तपणा या गुणांच्या दृष्टीनें अग्रस्थान-- अर्थात् मी सरोजिनीबाईंबद्दल बोलत नाहीं—राजकुमारी अमृत कौर यांनाच द्यावें लागेल. राजकुमारींचें इंग्रजी, भाषा, शब्दयोजना, उच्चार व आघात या सर्वच दृष्टींनीं अगदीं निर्दोष असतें; त्यांचीं वाक्यें रेखीव व सुंदर असतात; आणि त्यांच्या बोलण्यांत निष्ठेचा जोर असतो.

रेणुका रॉय फार प्रौढ वयाच्या असतील, अशी माझी कल्पना होती. पण ती चुकीची ठरली. त्याहि मधून मधून बोलतात. त्यांच्या वक्तृत्वांत लक्षांत भरण्यासारखे गुणहि नाहींत आणि दोषहि नाहींत.

सुचेता, पूर्णिमा व अम्मू स्वामिनाथन् यांनीं आतांपर्यंत तोंड उघडलें नाहीं. पूर्णिमादींना एक दिवस सहज विचारलें, ‘ तुम क्यों नहीं बोलती ? ’ त्यांनीं सहजभावानें उत्तर दिलें, “ जब हमारा दृष्टि-बिंदु कोई न कोई रख ही देता है तो क्या महज रौब जमानेके लिये बोलें ? ” सुचिता देखील तैलबुद्धीची आणि कर्तबगार बाई आहे. पण त्यांनाहि बोलण्याची कधीं प्रेरणा झाली नसावी.

घटना-परिषदेंत आलेल्या या स्त्रिया 'पोशाखी स्त्रिया' ( Blue Stockings ) नाहींत हें यावरून तुझ्या लक्षांत येईल. त्यांच्या बुद्धिमत्तेबद्दल, कार्यनिष्ठेबद्दल, कर्तृत्वशक्तीबद्दल व शीलाबद्दल कोणत्याहि राष्ट्राला आदर व अभिमान वाटेल अशाच त्या आहेत. म्हणूनच बारा स्त्रिया असूनहि घटना-परिषदेंत रंगांची रेलचेल नाहीं.

परवांचा दिवस ( ता. २२ ) म्हणजे या अधिवेशनांतला अमर्दी सुवर्णाक्षरांनीं कोरून ठेवण्यासारखा दिवस. त्या दिवशीं नवीन झेंड्याची प्राणप्रतिष्ठा झाली. झेंड्याच्या ठरावावरील जवाहरलालजींचें भाषण ऐतिहासिक व चिरस्मरणीय झालें. कोणी म्हणतात जवाहरलाल वक्ते आहेत, कोणी म्हणतात नाहींत. याचा निर्णय तज्ज्ञांनीं करावा. पण श्रोत्यांच्या अंतःकरणाचा ठाव घेण्याची शक्ति जवाहरलालांच्या साध्या जिवंत वक्तृत्वांत आहे, हें केव्हां केव्हां अत्यंत उत्कटत्वानें प्रत्ययाला येतें. जवाहरलालांच्या शरीरांप्रमाणेंच त्यांचें हृदयहि सुंदर आहे. त्यांच्या पोशाखाप्रमाणेंच त्यांचें मन निर्मळ व उज्ज्वल आहे. आमचा हा पुढारी अत्यंत प्रांजळ व थोर आहे, प्रामाणिक व उदात्त आहे. आचरणाप्रमाणेंच आकृतिहि सुंदर असली म्हणजे माणसाचा आनंद द्विगुणित होतो. जवाहरलालांचा आवाज खणखणीत किंवा भरदार नाहीं. किंचित् कोवळा व नाजूक आहे. पण त्यांत एक प्रकारचा सुरेलपणा व पौरुषाची लकेर आहे. त्यांच्या उभें राहण्याच्या पद्धतींत व हावभावांत एक प्रकारची कुलीनता, घरंदाजपणा व शान आहे.

जवाहरलालजींनीं जेव्हां झेंड्याचा ठराव मांडला त्या वेळीं साऱ्या सभागृहांत एक प्रकारची पवित्र व प्रसन्न शांतता होती. सभासदांचीं मनें उत्कंठित झालेलीं होतीं. जवाहरलालांचें भाषण त्या उदात्त प्रसंगाला अनुरूप असें उदात्त व अद्‌भुत झालें. त्यांत उदात्त भावना, सोप्या, गोड व हृदयस्पर्शी भाषेंत व्यक्त झाल्या होत्या. सर्वच दृष्टींनीं भाषण अपूर्व रोमहर्षक झालें. "तच्च संस्मृत्य संस्मृत्य हृष्यामि च पुनः पुनः" सगळी सभा अक्षरशः मंत्रमुग्ध झाली होती. भारतमातेच्या प्रतिष्ठेचें प्रतीक अशी ती अनुपम पताका हातांत घेऊन हा भारतमातेचा लाल जेव्हां उभा राहिला तेव्हां स्फूर्तीचे सागर हेलावूं लागले.

त्या राष्ट्रध्वजाला मुस्लिम लीगचे पुढारी खलीकसाहेब, सादुल्लासाहेब यांनीं अदबीनें प्रणाम केला. ते म्हणाले, " Sir, I Salute this flag and pledge my loyalty to it. "

जवाहरलालांच्या भाषणानंतर एकहि भाषण व्हावयाला नको होतें. पण कित्येकांना राहवलेंच नाहीं. बाळकृष्ण शर्मा, गोविंद मालवीय यांच्या-सारख्या प्रचंड वक्त्यांचीं भाषणेंहि जवाहरलालांच्या त्या गंगेसारख्या मंजुळ, गंभीर वक्तृत्वासमोर फिक्कीं पडलीं. गोविंद मालवीय यांचें वक्तृत्व प्रसिद्धच आहे. सुमारें सात आठ वर्षांपूर्वीं काशीच्या साहित्य-संमेलनांत खवळलेला जन-समुदाय त्यांनीं आपल्या दणदणीत व रम्य वक्तृत्वानें क्षणार्धांत शान्त केला होता. तो प्रसंग मला आजहि आठवतो. हिंदीप्रमाणें इंग्रजींतहि गोविंद मालवीय यांचें वक्तृत्व सुंदर असतें. बाळ-कृष्ण शर्मांचें भाषण भावनामय झालें, पण जवाहरलालांच्या भाषणानंतर या दोघांच्या भाषणांचा कांहींच परिणाम झाला नाहीं. फार काय, राधा-कृष्णन् यांचें व्याख्यान देखील नेहमींसारखें उठावदार वाटलें नाहीं. जवाहरलालांच्या अद्‌भुतरम्य वक्तृत्वासमोर त्या दिवशीं कुणाचीहि रसवंती खुलून दिसली नाहीं.

म्हणून शेवटीं परिषदेच्या आग्रहावरून सरोजिनीदेवी बोलायला उठल्या. सरोजिनीबाई आमच्या आईच्या वयाच्या असतील. मातेच्या अधिकारानें त्यांनीं केलेल्या भाषणांत लालित्य होतें. संगीत होतें. काव्य होतें. माधुर्य होतें. त्या दिवशींच्या सोहळ्याची गोड परिपूर्ति त्यांच्या भाषणानें झाली.

पाकिस्तानच्या वादाचा आपल्याला प्रतिकूल का होईना पण एकदांचा निकाल लागल्यामुळें आतां घटना-परिषदेचें काम जारीनें सुरू झालें आहे. घटना-परिषद ही सर्वसत्ताधीश आहे, कोठल्याहि बाह्य सत्तेचा अंमल तिच्यावर चालणार नाहीं, अशी आम्हीं प्रतिज्ञा केली. पण त्यानंतर लवकरच घटना-परिषदेचे कांहीं सभासद बरखास्त झाले व कांहीं नवीन येऊन दाखल झाले. आणि हें सर्व घटना–परिषदेनें स्वीकारलेल्या नियमांच्या विरुद्ध घडून आलें. तेव्हां श्रीप्रकाश यांनीं मोठा रास्त व मार्मिक ' पॉईंट ऑफ ऑर्डर ' उपस्थित केला. परिषदेचे अध्यक्ष त्यावर काय

निर्णय देणार? परिषदेचे पुढारी नेहरू, पटेल यांनीं स्वीकारलेल्या योजनेमुळें या घडामोडी झाल्या होत्या; तेव्हां पर्यायानें त्या घटना-परिषदेच्या अव्यक्त संमतीनेंच झालेल्या होत्या. मग नुसत्या तांत्रिक आक्षेपांची दखल कोण घेतो! 'ज्याच्या हातीं ससा, तो पारधी!'

पण आपल्याच घटना-परिषदेची अमर्यादा आपल्याच हातून व्हावी, हें अर्थातच पटेल-नेहरूंच्या न्यायबुद्धीला व संस्थानिष्ठेला प्रशस्त वाटलें नाहीं. म्हणून त्यांनीं श्रीप्रकाशजींचा-'झालें तें रीतसर झालें,' अशा अर्थाचा ठराव मान्य करून घेण्याचें ठरविले आहे.

परिषदेसमोर प्रांतीय घटनेच्या व भारतीय संघराज्याच्या मुख्य मुख्य तत्त्वांचा आराखडा आहे. त्यांत निर्भेळ प्रेसिडेन्शिअल (अध्यक्ष-प्रधान) किंवा निर्भेळ मिनीस्टेरिअल (मंत्री-प्रधान) पद्धतींपैकीं कोटलीहि एक स्वीकारलेली नाहीं. दोन्ही पद्धतींचा मधुर 'गंगाजमनी' संगम साधण्याचा प्रयत्न केलेला आहे. कोणी म्हणतात, 'अरे, हा सुंदर समन्वय नव्हे. हा समेट आहे! ही भेसळ आहे. अत्यंत निकृष्ट प्रतीची चालचलाऊ तडजोड आहे. ही योजना शास्त्रशुद्ध नाहीं. टिकाऊ नाहीं. जगाच्या इतिहासांत आजपर्यंत अनेकदां समेट समन्वयाच्या वेषांत मिरविलेला आहे!'

या आराखड्यांत अगदीं नवीन, मूलगामी किंवा क्रांतिकारक असें कांहीं नाहीं, हें खरें आहे. पण ती केवळ इकडून तिकडून गोळा केलेल्या चिंध्यांची कंथा आहे, हेंहि म्हणणें बरोबर नाहीं. त्या योजनेंत अंध अनुकरण नाहीं. सामंजस्य आहे आणि प्रगतिशीलताहि आहे. पण शेवटीं हें मधुर समन्वयाचें 'गंगा-जमनी सणंग' ठरणार कीं चिंध्यांची वाकळ, याचा निर्णय काळच करील.

या पाळीला मुस्लिम लीगप्रमाणेंच संस्थानांचे प्रतिनिधीहि आलेले आहेत. त्यांच्यामुळें परिषदेच्या बाह्य रूपाला थोडीशी विविधता आलेली आहे. आपले डॉ. खरे आणि बापूजी अणे जेव्हां परिषदेच्या सभाभवनांत आपापल्या पुणेरी पगड्या घालून दाखल झाले, त्या वेळीं सगळ्यांना मोठी गंमत वाटली. पण असे तुरळक अपवाद सोडले, तर एकंदरींत संस्थानांच्या प्रतिनिधींमध्येंहि चार चौघांसारखाच आधुनिक देशी किंवा विदेशी पोशाख करणारीं माणसें जास्त.

अजून कांहीं बडीं बडीं संस्थानें वळत नाहींत. संस्थानिकांच्या क्षुद्र स्वार्थापायीं व वैयक्तिक महत्त्वाकांक्षेपायीं प्रजेचें अपरिमित नुकसान होत आहे. तात्पुरत्या फायद्याच्या लोभानें हिंदुस्थानांतील हे संस्थानिक जर पाकिस्तानाकडे वळले, तर कालांतरानें संस्थान व संस्थानिक यांचा मागमूसहि उरणार नाहीं, हे या अल्पदृष्टि संस्थानिकांच्या लक्षांत येत नाहीं. इस्लामी संप्रदायाचा स्टीम रोलर त्यांना सगळ्यांना चिरडून टाकून भुईसपाट केल्यावांचून राहणार नाहीं, हें त्यांच्या लक्षांत जितक्या लवकर येईल तितकें बरें! एरवीं त्यांचें आजचें अहंनिष्ठ धोरण आत्मघातकीपणाचें ठरणार, हें निश्चित आहे. नीलवर्ण शृगालाची गति त्यांच्या कपाळावर लिहिलेली असल्यास न कळे! पण तुला येथील गमती सांगण्याचें सोडून मी राजकारणाच्या किंचित् गंभीर चर्चेकडे न कळत वळलों. आतां वेळींच हा मोह आवरलेला बरा! नाहीं तर हें बेसुमार लांबलेलें पत्र एरंडाचें गुऱ्हाळच होईल. म्हणून आतां पुरे!

दिल्लीला अजून पावसाळा रीतसर सुरू झालेला नाहीं. पावसाची एखादी सर मधून मधून येते. पण साधारणपणें उन्ह बरेंच प्रखर असतें. धूळहि अगदीं उन्हाळ्यासारखी उडत असते आणि अंतरिक्षांत तिच्या ढगासारख्या राशी दिसतात.

बबनचें ठीक चाललें आहे. झेंड्याच्या दिवशीं नेमका तो परिषदेला हजर राहूं शकला नाहीं. त्यांत त्याचा काडीइतका दोष नव्हता. योगायोग म्हणायचा, दुसरें काय?

तुझा,

दादा

नवी दिल्ली,

१५-८-४७

प्रिय बच्चू,

मी ता. ११ ला येथें येऊन पोंचलों. नैतूलपासून कुसुम पंत बरोबर होती. आगगाडींत बसल्याबरोबर तिच्या मुलाला आजीचा व मावश्यांचा वियोग जाणवूं लागला. त्यानें रडायला व हट्ट करायला सुरुवात केली. नुकतीच झालेली दोन महिन्यांची मुलगी मांडीवर होतीच. मधून मधून तीहि सहानुभूतिपर रुदन करीत असे. जवळजवळ तीन तासपर्यंत दोघांनीं मिळून बिचाऱ्या कुसुमला जीव नकोसा करून टाकला. मातृत्वाचा आनंद ब्रह्मानंदाचा सहोदर असतो, असें मराठीचे सुप्रसिद्ध लघुकथा–लेखक प्रभाकर पाध्ये यांनीं मला नुकत्याच पाठविलेल्या एका पत्रांत म्हटलें आहे. अर्थात् त्यांची पत्नी कमुताई पाध्ये हिला अनुलक्षून त्यांनीं तें वाक्य लिहिलें आहे. पण आजारी व क्षीण झालेल्या कुसुमचे ते हाल पाहून प्रभाकर-रावांनीं सदर वाक्य उपरोधिक अर्थानें लिहिलें असावें, असें मला वाटलें. कुठल्याहि आनंदाचें वर्णन करतांना 'पुत्रजन्मसमः किल' म्हणण्याची आतां सोय राहिलेली नाहीं! पण म्हणून कुसुमचें मूल आम्हांला आवडत नव्हतें किंवा त्याचा आम्हांला राग आला, असें मुळींच नाहीं. पुढें त्याच्या-मुळें आम्हांला मोठी करमणूक झाली. पण बिचाऱ्या कुसुमला मात्र त्यानें अगदीं सतावून सोडलें.

बबनराव ता. १२ ला सकाळीं मसूरीची 'नैनी' हवा खाऊन परत आले. पूर्वीं राजांच्या राण्या गंगेंत स्नान करून गेल्या म्हणजे साऱ्या गंगा-जलाला कस्तूरीचा सुगंध येत असे, असें वर्णन आहे. मसूरी म्हणजे आधु-निक 'खुशालचेंडू' व साधनसंपन्न लोकांची विलासभूमि. तेथें साधें पाणी पिणारीं व सिगारेट न ओढणारीं माणसें विरळा. त्यामुळें तेथील हवेला कसला गंध येत असेल याची कल्पना करतां येण्यासारखी आहे. पावसा-ळ्याचे दिवस असल्यामुळें सारें मसुरी गांव अभ्रावगुंठित राहत असे. म्हणून बबनरावांना नगाधिराजाचें डोळे भरून दर्शन झालें नाहीं. एक

दिवस ढगांचा पडदा थोडासा दूर सरल्यामुळें त्यांना नंदादेवी शिखराचें अदृष्टपूर्व उज्ज्वल रूप पाहायला मिळालें. बबनरावांनीं समुद्र पाहिला, गंगा पाहिली आणि हिमालयहि पाहिला. इतक्या भांडवलावर आतां त्यांना व्यवस्थित गप्पा मारतां यायला हरकत नाहीं.

आम्ही येथें आल्यापासून सत्ता-ग्रहण-पर्वाचे वेध सुरू झालेले होते. परिचित, अपरिचित, अतिपरिचित व अल्पपरिचित सर्वच प्रकारच्या लोकांची सदस्यांकडे पासांकरितां वर्दळ सुरू झालेली होती. स्वतःच्या महत्त्वाच्या जाणीवेनें आमचें वजन खरोखरच वाढण्याच्या बेतांत आलें होतें. पण येणाऱ्या लोकांपैकीं एकालाहि आपण पास देऊं शकत नाहीं, ही वस्तुस्थिति आमच्या असमर्थतेची आठवण करून देत होती. म्हणून वजन न वाढतांच मन मात्र खट्टू होत असे.

तारीख चौदाला मध्यरात्रीं व तारीख पंधराला सकाळीं झालेलीं घटना-समितीचीं अधिवेशनें खरोखरच संस्मरणीय होतीं. स्वातंत्र्य आलें, मनु पालटला, आतां आपले सारे पांग फिटतील अशा अपेक्षेनें व उत्कंठेनें वातावरण सजीव झालेलें नव्हतें, हें खरें आहे. स्वातंत्र्याची ऊब, तेज आणि प्रकाश हीं सर्व दिशांत व्यापलेली दिसत नव्हतीं, हेंहि खरें आहे. लोकांना आपल्या परिस्थितींत परिवर्तन झाल्याची अनुभूति येत नव्हती. पण ‘ सत्तांतराचा विधि ’ मात्र केवळ औपचारिक अथवा लटोपटीचा नव्हता, हेंहि तितकेंच खरें आहे. या दृष्टीनें हा सत्तासंक्रमणाचा समारंभ अपूर्व उत्साहाचा आणि उल्हासाचा नसला, तरी खोटा किंवा पोकळ नव्हता. आजपासून परकीय सत्तेच्या ‘ अंताचा आरंभ ’ झाला. ज्या दिवसाचें दर्शन व्हावें म्हणून पितामह महर्षि दादाभाईनीं उत्तरायणाची वाट पाहात शरपंजरीं पडलेल्या भीष्माप्रमाणें नव्वद वर्षें वाट पाहिली, ज्या दिवसाकरितां लोकमान्यांनीं अतुल पराक्रम केला, सावरकरांनीं जिवाचें रान केलें, जयप्रकाशांनीं निःशस्त्र गनिमी युद्धाची कमाल केली आणि नेताजी सुभाषचंद्र बोस यांनीं समर-कर्माचा कळस केला, त्या दिवसाची प्रभा फांकली. देशाचे मूर्धाभिषिक्त पुढारी, राजवैभवाचा त्याग करून राजसत्तेचे अधिकारी बनलेले जवाहरलाल लोकांचे प्रतिनिधि म्हणून

सत्तेचा परिग्रह करायला पुढें सरसावले होते. ज्याच्या तपोबलामुळें हा सोन्याचा दिवस उगवला तो या युगांतील सर्वश्रेष्ठ मानव आपल्या अनुपस्थितीनेंच सर्वत्र व्यापून राहिलेला भासत होता. सगळ्यांच्या मनांत, प्रत्येकाच्या जिह्वेवर त्याचें नांव सतत नाचत होतें. त्यागाच्या, तितीक्षेच्या व युद्धाच्या वेळीं सर्वांच्या पुढें असणारा तो आमचा लोकविलक्षण पुढारी या वेळीं कोठें आहे, हा प्रश्न लोकांच्या चर्येवर जणुं लिहिलेला होता. त्या प्रश्नाचे पडसाद वातावरणांत उठत होते. मला भागवतांतील शुकाचार्यांचें वर्णन करणारा श्लोक आठवला. विरक्त होऊन निघालेल्या शुकाच्या मागें महामुनी द्वैपायन व्यास शोकविह्वल होऊन निघाले आणि 'शुका! शुका!' म्हणून अगदीं पिसाटाप्रमाणें हांका मारूं लागले. तेव्हां चराचराशीं तादात्म्य पावलेले शुकाचार्य प्रत्येक वृक्षाच्या पानांपानांतून 'ओ' देऊं लागले. शुकाचार्यांच्या वतीनें तें सारें अरण्यच व्यासांना प्रत्युत्तर देऊं लागलें. "यं प्रव्रज्यंतमनुपेतमपेतकृत्यम् द्वैपायनो विरहकातर आजुहाव। पुत्रेति तन्मयतया तरवोऽभिनेदुस् तं सर्वभूतहृदयं मुनिमानतोऽस्मि" जो जनतेशीं तन्मय होऊन एकजीव झालेला आहे, दरिद्रीनारायण हेंच ज्याचें इष्ट दैवत आहे, तो गांधी सत्तांतरसमारंभांत कसा दिसेल? कुठून दिसेल? जेथें जेथें दैन्य असेल, दुर्बलता असेल, दुर्भिक्ष असेल, जेथें मित्रत्वाची गरज असेल, दिलाशाची अपेक्षा असेल, तेथें तो धांवून जातो. तो सत्तेच्या सिंहासनावर दिसणार नाहीं. धर्माचार्यांच्या पीठावर आढळणार नाहीं. त्याचा शोध मठांत करणें व्यर्थ आहे. तसाच आश्रमांतहि करणें व्यर्थ आहे. त्यानें सत्तेच्या गादीकडे जशी पाठ फिरविली, तशीच आश्रमांतील झोपडीकडेहि फिरविली. जी लंगोटी सेवेंत प्रत्यवाय करील ती अनर्थकारकच ठरेल. अपरिग्रहव्रताला ती हरताळ फांसते. तसा 'कौपीनवंत' 'भाग्यवंत' नसतो. म्हणून गांधी 'अनिकेत' आहे. जेथें जेथें सेवेला अवकाश असेल तेथें तेथें तो आहे. तो म्हणतो, 'आतां माझें स्थान नोआखालींत आहे, पश्चिम पंजाबांत आहे, सिंधमध्यें आहे, काश्मीरमध्यें आहे.' "जेथें जेथें भयग्रस्त आणि पीडित मानव आहे तेथें तेथें माझें स्थान आहे." अशा या विश्वकुटुंबवृत्तीच्या माणसाचें अस्तित्व सर्वत्र भरून राहिलेलें आहे. व्यासाच्या हांकेसरशी ज्याप्रमाणें झाडांतून प्रतिध्वनि उठले त्याप्रमाणें दिल्लीच्या

वातावरणांतील दरेक परमाणु-परमाणूंत गांधींच्या अस्तित्वाची प्रतीति येत होती. म्हणून त्यांच्या शारीरिक उपस्थितीची फारशी आवश्यकताहि भासत नव्हती. हा माणूस अक्षरशः ' विराट् पुरुष ' झाला.

तारीख चौदा व तारीख पंधरा या दोन्ही दिवशींचे सभारंभ प्रसंगानुरूप व परिस्थितिनुरूप असेच झाले. त्यांत हुरळून गेलेल्या वृत्तींचा उन्मादकारी व उच्छृंखल आनंद नव्हता. सत्ताप्राप्तीची नशा नव्हती. राज्यप्राप्तीचा अभिमान नव्हता. तो उत्सव नव्हता. तो एक पवित्र समारंभ होता. एखाद्या धर्मविधीइतकाच गंभीर आणि मंगल. त्या रात्रीं घटनापरिषदेचें सभागृह फारसें सजवलेलें नव्हतें. दिव्यांचा लखलखाट नव्हता. चित्रांची, पताकांची आरास नव्हती. वैभवाच्या प्रदर्शनाचा प्रयत्न नव्हता. उथळ हृदयांत आनंदहि मावत नाहीं. तो जणूं कांहीं उतूं येतो. तसें झालें नव्हतें. स्वातंत्र्यप्राप्तीच्या आनंदाबरोबरच त्यांतील वैगुण्याचीहि अत्यंत उत्कट जाणीव होती. त्यामुळें एकंदर वातावरण वास्तविकतेनें व परिमित प्रसन्नतेनें अनुप्राणित झालेलें होतें.

तो मध्यरात्रींचा सत्ताग्रहण—विधि पाहून मला कृष्णजन्माची आठवण झाली. त्या पतितोद्धारकाचाहि जन्म असाच मध्यरात्रीं आणि काळोखांत झाला. कुणी म्हणतात, मध्यरात्रीची वेळ अशुभ आहे. वेळ कुठलीच शुभ नसते किंवा अशुभ नसते. माणूस आपल्या पराक्रमानें एखाद्या वेळेला शुभत्व आणून देतो. राम ज्या वेळीं जन्मले ती घटका शुभच असली पाहिजे. शिवाजीनें ज्या वेळीं स्वराज्याची लढाई सुरू केली तीहि घटका शुभच असली पाहिजे. भारतीय जीवनाला सर्वांगीण उज्ज्वलता व प्रतिष्ठा प्राप्त करून देणारा पार्थसारथि, गीतेचा प्रवक्ता ज्या मध्यरात्रीं जन्माला आला, ती मध्यरात्र अशुभ कशी असूं शकेल ? मध्यरात्रीं फक्त निशाचर, दुराचारी व पापी लोकच जगतात असें नाहीं. मध्यरात्रीं जन्माला येऊन अखिल जगाला दिव्य ज्ञानाचा प्रकाश देणारा ' योगियांचा राणा ' म्हणतो, ' सर्व भूतांस जी रात्र, जागतो संयमी तिथें ! ' राष्ट्रसूत्रधार जवाहरलाल नेहरूंनीं आपल्या भाषणाचा आरंभ जवळ जवळ याच भाषेंत केला. ते म्हणाले, " सारें जग गाढ निद्रेंत मग्न असतांना आमच्या देशांत स्वातंत्र्याचें उद्बोधन होत आहे. "

श्रीकृष्णाचा जन्म बंदिगृहांत झाला. पूर्वी कारागृह अपवित्र मानण्यांत येत असे. समाजांतील दुष्प्रवृत्त, दुर्वर्तनी आणि तिरस्कृत लोकांच्या राहण्याचें टिकाण. पण त्याच कारागृहांत भगवंताचा पूर्णावतार जो श्रीकृष्ण त्याच्या आईबापांना, अपराधी म्हणून नव्हे तर राजशत्रु म्हणून, दिवस काढावे लागले; आणि त्याच कारागृहाला, साधूंच्या त्या एकमेव परित्रात्यानें स्वतः जन्म घेऊन पुनीत केलें. अमंगळाला आपल्या पुरुषार्थानें मांगल्याचें रूप देणाऱ्या भगवान् श्रीकृष्णाचा जन्म कारागृहांत झाल्यामुळें कारागृह पुनीत झालें, प्रतिष्ठित झालें. समाजसेवकांचें व देशभक्तांचें निवासस्थान झालें. साधूच्या कुटीइतकेंच कारागृहहि पवित्र मानलें जाऊं लागलें. पराक्रमी पुरुषांच्या पुरुषार्थाचा हा प्रताप आहे. तीर्थक्षेत्रें इतर मानवांना पवित्र करतात, पण संत हे स्वतःच्या स्पर्शानें तीर्थाला पावित्र्य आणून देतात. कृष्ण-जन्म-स्थान ज्याप्रमाणें आमच्या देशाच्या स्वातंत्र्याच्या इतिहासांत एक महत्त्वाचें पवित्र ' राष्ट्रतीर्थ ' बनलें, त्याचप्रमाणें मध्यरात्रींचा कृष्णजन्म-मुहूर्तहि शुभप्रद व कल्याणकारी ठरो !

कृष्ण-जन्माची आठवण मला आणखीहि एका कारणामुळें आली. त्याचाहि उल्लेख जवाहरलालांनीं ओझरता केला. ते म्हणाले, " आपण स्वातंत्र्य मिळविण्याची प्रतिज्ञा केली, ती आज पूर्णतः नसली तरी, बहुतांशीं तडीला गेलेली आहे. " ' पूर्णतः नसली तरी ' हे शब्द अर्थगर्भित आहेत. अजून आपल्या स्वातंत्र्याचा कांहीं भाग ' कंसां 'त आहे, असा त्या शब्दांचा ध्वनि आहे; आपली शाब्दिक कोटी करण्याची हौस भागविण्या-करितांच मी ' कंस ' शब्दाचा प्रयोग केलेला नाहीं, हें यावरून तुमच्या लक्षांत येईल. इंग्रजांचें राज्य गेलें, याविषयीं मला शंका वाटत नाहीं. आमच्या मनोवृत्तींत, भाषेंत व परिस्थितींत त्याचे कांहीं अवशेष व खुणा अजून कांहीं काळपर्यंत शिल्लक राहातील. पण इंग्रजांचें राज्य गेलें, निदान निश्चितपणें जायला आरंभ झाला, यांत शंका नाहीं. पण जनतेचें राज्य अजून ' कंसां 'त च आहे. अजून जमीन व अस्मान व्यापून टाकणारें दारिद्र्य आहे. सगळ्या पृथ्वीला ग्रासूनहि शिल्लक राहील इतकी भयंकर बुभुक्षा माजलेली आहे. अज्ञान तर अंधकाराइतकेंच गाढ व सार्वत्रिक आहे. पाकिस्तानच्या भीतीचें भूत अजून कायमच आहे. लाहोरला राक्षसी वृत्तीचें

भयानक विक्रीडित चालूं आहे. लाहोरचा वणवा शान्त करायची ताकद ज्या सत्तेंत नाहीं, त्या सत्तेचा उदय लोकांचीं हृदयें प्रफुल्लित कसा करूं शकेल ? लाहोरला सुरू असलेल्या प्रलयंकर प्रकारांच्या नुसत्या बातम्या ऐकूनसुद्धां हृदय पिळवटतें.

स्वातंत्र्याची देवता आली खरी, पण ती लक्ष्मीचें किंवा सरस्वतीचें सौम्य, सुंदर, आल्हाददायक रूप घेऊन नाहीं आली. ती कालीचें भयानक रूप घेऊन आली. त्यामुळें आमचीं मनें दबलेलीं अगर पिचलेलीं नसलीं तरी प्रसन्न नाहींत. स्वातंत्र्यप्राप्तीचा आनंद निर्भेळ नाहीं. स्वातंत्र्याचा सूर्य उगवला, पण त्याला ग्रहण लागलेलें आहे. म्हणून मीं म्हटलें कीं, कृष्णजन्माच्या शुभ मुहूर्तावर या देशांत लोकसत्तेचा जन्म झाला खरा, पण अजूनहि तिचा कांहीं भाग ' कंसां 'त आहे.

मी कांहीं राज्यारोहणाचे प्रसंगहि पाहिलेले आहेत. त्या वेळीं जो थाटमाट, जो भपका, जो लखलखाट असतो त्याची कल्पनाच करावी. पण ता. १४ चा व १५ चा समारंभ राज्यारोहणाचा नव्हता. दारिद्र्यानें पीडलेल्या, जातिवादानें व संप्रदायवादानें गांजलेल्या, दुर्भिक्षानें अन्नाला मोताद झालेल्या भारतीय जनतेचा तो सत्ताग्रहण-विधि होता. म्हणूनच तो एखाद्या धार्मिक विधीइतकाच साधा, सुटसुटीत व पवित्र होता.

ता. १४ च्या मध्यरात्रींचा समारंभ प्रसंगाला अनुरूप असाच झाला. समारंभाची मुख्य भाषा हिंदीच होती. इंग्रजीला अनुवादाची भाषा म्हणून हिंदीच्या बरोबरीचें स्थान होतें. वातावरणांत सर्वत्र स्वातंत्र्याच्या स्वागताची वृत्ति ओतप्रोत भरलेली होती. स्वागताचा आनंद जबाबदारीच्या जाणिवेनें सौम्य झालेला होता.

अध्यक्ष राजेंद्रबाबूंचें वक्तृत्व एरवीं मोठें मनोज्ञ वाटतें. त्यांची ती सुबोध पण अतिशय नागर भाषा, सरळ मांडणी व स्पष्ट आवाज यांच्या योगानें ते सुबुद्ध लोकांच्या मनांवर चांगला परिणाम करतात. पण आज त्यांनीं आपलें भाषण वाचून दाखविलें. लेखी वक्तृत्व अधिक नेमकें, रेखीव, कांटेकोर असेल. पण त्यांत सहजता नसते, ताजेपणा नसतो,

जिवंतपणा नसतो. राजेंद्रबाबूंच्या व्याख्यानाचा उठावा तसा ठसा उठला नाहीं.

उदात्त-गंभीर प्रसंगाच्या वेळीं उदात्त गंभीर भाषण करणें पं. जवाहरलालांना जसें साधतें, तसें इतर कोणाला क्वचितच साधतें. पण जवाहरलालांचेंहि आजचें भाषण परिणामकारक झालें नाहीं. त्यांचें हिंदी अतिशय मधुर असतें–अगदीं सुबोध, शिष्ट व गोड. पण त्यापेक्षां त्यांचें इंग्रजी किती तरी पटीनें सुंदर व प्रभावशाली असतें. पण आज त्यांनींहि आपलें भाषण वाचून दाखविलें. लेखी वक्तृत्वाचे अपरिहार्य दोष त्यांत आलेच. १९१४ सालीं मद्रासला भरलेल्या कॉंग्रेस अधिवेशनाचे स्वागताध्यक्ष म्हणून डॉ. सुब्रह्मण्यम् अय्यर यांनीं ‘ Written eloquence ’ ( लेखी वक्तृत्वा )च्या दोषाचें जें मार्मिक विवेचन केलें आहे, त्याची मला आठवण झाली. थोर प्रसंगीं जवाहरलालांचें सहजस्फूर्त वक्तृत्व फारच हृदयस्पर्शी व प्रभावशाली असतें. आजचें त्यांचें वाचन उत्कृष्ट असूनहि अर्थातच ती करामत दाखवूं शकलें नाहीं.

मुस्लिम लीग पक्षाचे नेते चौधरी खलिक उज्जमान यांनीं जवाहरलालांच्या ठरावाला दुजोरा दिला. हिंदुस्थानच्या जनतेची सेवा करण्याचें व्रत पतकरण्याची प्रतिज्ञा आज आपण केली पाहिजे, असें त्यांनीं मोठ्या आवेशानें सांगितलें. पण त्यांच्या शब्दांत हृदय असावें असा भास झाला नाहीं. सुचेताबाईंनीं जेव्हां आरंभीं ‘ वन्दे मातरम् ’ म्हटलें त्या वेळीं मुस्लिम लीगचा एकहि सभासद–अगदीं औषधालादेखील–सभागृहांत हजर राहिला नाहीं. राष्ट्रगीत संपल्याबरोबर मात्र सर्व सभासद आंत आले. मुस्लिम समाज फक्त कट्टा संप्रदायवादीच नाहीं, तर भयानक प्रमाणांत गतानुगतिक आहे. परमतसहिष्णुता त्याच्या वृत्तींत शिरूंच शकत नाहीं. खिलाफत चळवळीच्या ऐन उत्कर्षाच्या काळांत तो ‘ हिंदु-मुस्लिम की जय ’ म्हणायचा, पण ‘ वन्दे मातरम् ’च्या जोडीला ‘ अल्ला हो अकबर ’ म्हटल्यावांचून त्याला चैन पडत नसे. इकबालनें मायदेशाला ‘ नया शिवाला ’ म्हटलें, ‘ अहले वतनका मुझको हर जर्रा देवता है ’ ( अवघ्या मायभूमीचा कणकण मला देवतेप्रमाणें आहे. ) म्हणून मायदेशाचा गौरव केला, तरी त्यांत त्यांना

मूर्तिपूजेचा वास येत नाहीं, पण 'वन्दे मातरम्'मध्यें मात्र त्यांना 'बुतपरस्ती' (मूर्तिपूजा) दिसते. 'वन्दे मातरम्'चा स्वीकार करावयाचा नाहीं असें एकदां ठरलें तें ठरलें. मुसलमान समाज निर्धन असेल, अशिक्षित असेल, आडमुठाहि असेल, पण त्याच्यांत ही जी सहज ऐक्याची भावना आहे तिच्यामुळें त्या समस्त समाजाला एका अभेद्य फळीचें स्वरूप प्राप्त झालेलें आहे. या फळीची उभारणी मात्र असहिष्णुतेच्या व संकुचित संप्रदायवादाच्या पायावर झालेली असल्यामुळें कटुता व तीक्ष्णता हीं त्या समाजाचीं प्रमुख लक्षणें व अंगभूत दोष आहेत. चौधरी खलिकसाहेबांचें साळसूद भाषण चालू असतांना त्या पक्षाच्या या वर्तनांचा दंश सभासदांच्या मनाला सलत होता. लीगपक्षाच्या या वृत्तीची प्रतिक्रिया झाल्यावांचून राहणार नाहीं असें त्या दिवशींच्या एकंदर संतप्त वातावरणावरून वाटतें. प्रतिज्ञा घेतांना मुस्लिम लीगचे सभासद सामील झाले. त्यांनीं कदाचित् मनोभावानें प्रतिज्ञा घेतली असेल. पण मुसलमानेतर सभासदांना मात्र हा सारा मानभावीपणाचा प्रकार वाटला. एखाद्या पवित्र समारंभांत मलिन अंतःकरणानें सामील होऊन त्याला गालबोट लावण्यासारखा हा प्रकार वाटला! 'वन्दे मातरम्' म्हणजे कांहीं 'श्रीराम जयराम जयजय राम' नव्हे!

१९२०–२१ सालीं नवीन सुधारणांचा उपक्रम करतांना ड्यूक ऑफ् कॅनॉट म्हणाले होते, 'I found the shadow of Amritsar lengthened over the fair face of India.' आजहि स्वातंत्र्याच्या उदयकालीं पाकिस्तानी वृत्तीची काळीकुट्ट छाया भारतमातेच्या निरुपम सुंदर मुखावर पसरलेली दिसते. लाहोरची होळी होत असतांना, स्वातंत्र्याच्या आनंदांतहि साऱ्या मानवी भावना होरपळून निघत आहेत!

मुस्लिम लीग पक्षाच्या नेत्यांनंतर डॉ. राधाकृष्णन् यांचें भाषण झालें. पण तेंहि नेहरूंसारखें हृदयंगम व चित्तवेधक नव्हतें. नेहरूंसारखीं भरदार व घोंसदार वाक्यें नव्हतीं, शब्दहि नेहरूंसारखे निवडक व सुंदर नव्हते. पण ता. १४ च्या सर्व भाषणांत त्यांचेंच भाषण उल्लेखनीय झालें. वेद, उपनिषदें किंवा गीता या प्राचीन ग्रंथांतील एखादें प्रसंगोचित वचन

उद्धृत करून श्रोत्यांच्या मनाची पकड घेण्याची त्यांची हातोटी वाखाणण्यासारखी आहे.

बरोबर मध्यरात्रींच्या ठोक्याला सत्ताग्रहणाचा मुहूर्त होता. हिंदु परंपरेंत वाढलेल्या सभासदांचे हिंदु संस्कार उद्भूत होऊन अनावर झाले. पं. गोविंद मालवीयांनीं ' शङ्खं दध्मौ प्रतापवान् '—मांगल्यसूचक शंख फुंकला ! गांधींच्या नांवाचा जयघोष झाला ! नेताजींचाहि जयजयकार झाला ! सर्व सभासदांनीं गंभीरपणानें व पावित्र्याच्या भावनेनें सेवेला वाहून घेण्याची प्रतिज्ञा घेतली.

या प्रतिज्ञेंत ईश्वराचा उल्लेख नाहीं. यतिराजांना व इतर कांहीं सदस्यांना ही गोष्ट खुपली. ' ज्याच्या सत्तेवांचून एक पान देखील हलत नाहीं ', ' जयाचिये सत्ते वेदांसी बोलणें ', ' ज्याच्या भीतीनें वायु वाहतो, सूर्य प्रकाशतो ', ' भीषास्याद् वातः पवते भीषोदेति सूर्यः ' त्याचा उल्लेख न करणें म्हणजे कृतघ्नपणाची व अहंकाराची कमाल झाली, असें त्यांना वाटलें. परब्रह्माच्या कृपेनें देवांना जय मिळाला. पण या मूढग्राही अहंमन्य देवांना ' अस्माकमेवायं विजयोऽस्माकमेवायं महिमेति ' असेंच वाटलें. यतिराजांनीं पक्षसभेंत मुद्दा उपस्थित केला. या जडवादी जगांत ईश्वराला बिचाऱ्याला जागाच नाहीं का हो, असा प्रश्न त्यांच्या आध्यात्मिक हृदयानें केला. डॉ. पी. के. सेन यांनीं मोठ्या तोलून मापून निवडक शब्दांत, निष्ठेच्या कळकळीनें सात्त्विक आवेशयुक्त भाषेंत पाठिंबा दिला. डॉ. राधाकृष्णन् यांनीं आचार्यांच्या अधिकारानें सामोपचाराच्या पण निश्चयात्मक भाषेंत सांगितलें, " हें सारें स्वतःच्या पुरुषार्थाचें फळ आहे, असें मानण्यांत अहंमन्यता आहे. ही आत्मसंभावित वृत्ति आहे. ' ईश्वरोऽहम्, अहं भोगी ' हीं लक्षणें आसुरी संपत्तीचीं आहेत. आज मिळत असलेली सत्ता ईश्वरी कृपेचा प्रसाद आहे. हवें तर ईश्वराचें नांव नका घेऊं. पण हें स्वातंत्र्य स्वपराक्रमार्जित आहे अशा अर्थाचे अहंकारसूचक शब्द गाळून टाका आणि त्यांत ईश्वराचें नांव नसलें तरी त्याचा ' भाव ' येऊं द्या. ' अत्यंत नम्रपणें ' असे शब्द घाला. "

पं. जवाहरलालांचा मूळचा मसुदा होता. जवाहरलाल म्हणजे मोकळ्या मनाचे, अनाग्रहाचे पुतळेच. जुळवून घेण्यास नेहमींच तयार. ते म्हणाले,

" अहो, आम्ही काय ईश्वरद्रोही आहोंत ? वैरभावानें मुद्दाम देवाचें नांव वगळलें असें आपण कां मानतां ? सदासर्वकाळ ज्यांच्या जिह्वाग्रावर ईश्वराचें नांव खेळतें त्या गांधींनीं कधीं ईश्वराचा उल्लेख करण्याचा आग्रह धरला नाहीं. आजपर्यंत आपण अनेकदां गंभीर व पवित्र प्रतिज्ञा घेतल्या, त्यांतहि कोणी ईश्वराचा उल्लेख करण्याची सूचना केली नाहीं. आजपर्यंत चालत आलेल्या शिरस्त्याला अनुसरूनच हा मसुदाहि तयार करण्यांत आला. यांत कांहीं अश्लाघ्य हेतु किंवा योजना आपण पाहूं नका. "

झालें. प्रतिज्ञेच्या भाषेंत सुधारणा झाली. सर्वांचें समाधान झालें. जवाहरलाल निरीश्वरवादी पंथाचे असतील, पण वृत्तीनें आस्तिक आहेत. कांहीं ईश्वरवादी पंथाचीं माणसें वृत्तीनें आस्तिक नसतात. अशा माणसांपैकीं कित्येकांनीं यतिराजांचें अभिनंदन केलें आणि म्हटलें, " अहो, भगवंताचें नांव पाहिजेच. हा सारा त्याच्याच कृपेचा प्रताप आहे ! " मला येशूचें वाक्य आठवलें, ' Not all those that call me Lord, shall enter the Kingdom of Heaven " अर्थात् यतिराजांची ' ईश्वर-निष्ठा ' यापैकीं नाहींच.

आपल्या मनांत इष्ट फरक करण्याची तयारी हा जवाहरलालांचा मोठाच गुण आहे. बुद्धिवादी माणूस म्हणून जो गुण ठरतो तोच पुढारी व शासक म्हणून दोष ठरतो. जवाहरलाल बोलूं लागले म्हणजे ते युक्तिवाद करीत असल्याचा, पटवून देण्याचा प्रयत्न करीत असल्याचा, पटवून घेण्यास तयार असल्याचा भास ऐकणाराला होतो. ठाम मताची, निश्चित निर्णयाची छाप मनावर पडत नाहीं. तेच सरदार बोलूं लागले म्हणजे त्यांच्या घणाचे ठोके हृदयांत प्रतिध्वनित होतात. तेथें युक्तिवाद नाहीं, हुज्जत नाहीं, अनिश्चय नाहीं, शंकेला जागा नाहीं. ऐकणाराच्या मनावर निश्चिततेचा, खंबीरपणाचा ठसा उमटतो. जवाहरलालांचें भाषण बुद्धीला मोदप्रद वाटतें, सुसंस्कृत मनाला त्यांतील मर्यादशीलतेमुळें आकर्षक वाटतें; पण सरदारांचें सडेतोड, रोखठोक, खरें खडतर वक्तृत्व सामान्य माणसाच्या हृदयांत प्रत्यय उत्पन्न करतें. जवाहरलाल व सरदार मिळून बनलेल्या 'संयुक्तपुरुषा'-कडे या वेळीं या देशाचें नेतृत्व आहे.

प्रतिज्ञाविधीनंतर पुन्हां सुचेता कृपलानी व नंदिता कृपलानी यांनीं ' सारे जहाँसे अच्छा ' व ' जनगणमन ' म्हटलें आणि समारंभाचा पहिला हप्ता संपला. समारंभ संपल्यानंतरहि ' कौन्सिल हाउस 'च्या बाहेर पडायला अर्धा तास लागला. लोकांच्या गर्दीनें सारीं दारें अडविलीं होतीं. जवाहर-लालांचें दर्शन घेतल्यावांचून आम्ही हटणार नाहीं, असा त्यांचा हट्ट होता.

तारीख पंधराचा समारंभ अधिकच गद्यमय आणि साधा होता. साधे-पणांतील सौंदर्य एखाद्या वेळीं अगदीं अभावितपणें प्रत्ययाला येतें. पांढरा रंग अगदीं साधाच असतो, पण हिमालयाचें धवलत्व मनाला मोहून टाकतें. ता. १५ ला नवे गव्हर्नर जनरल लॉर्ड माऊंटबॅटन यांचा शपथविधि होता. लॉर्ड माऊंटबॅटन हे पडले इंग्रज. इंग्रजाबद्दल आमच्या मनांत एक प्रकारची उफराटी ' अहंभावना ' आहे. त्यामुळें फक्त माऊंटबॅटन आले तर आम्ही ' उत्थापन ' देणार नाहीं, अध्यक्षांबरोबर आले तरच देऊं, अशी कुजबूज ऐकूं येऊं लागली. पण माऊंटबॅटन अध्यक्षांसहच आले. तेव्हां तो प्रश्न उत्पन्नच झाला नाहीं. आल्यानंतर त्यांना मध्यें बसविण्यांत आलें. तेंहि अनेकांना आवडलें नाहीं. या इंग्रजाची एवढी मिजास कशाला, ही मुळांतली भावना. पाकिस्तानांत याच्या उलट वृत्ति असेल. जिनांनाच जास्तींत जास्त मान दिला पाहिजे असें तेथें दरेकाला वाटणार. येथेंहि माऊंटबॅटनच्या ठिकाणीं जवाहरलाल असते, तर त्यांना याहिपेक्षां अधिक इतमामानें वागवावें असेंच सर्वांना वाटलें असतें, कारण आतां गव्हर्नर जनरल म्हणजे आमच्या सरकारचा सनदशीर प्रमुख आहे, वरिष्ठ अधिकारी आहे. पण तो आम्ही नेमलेला असला, तरी इंग्रज आहे म्हणून या ' कंसां'तील मनोवृत्ति एकदम उफाळल्या. लॉर्ड माऊंटबॅटन म्हणाले, " मला आतां तुम्ही आपल्यापैकींच समजा. " तेव्हां टाळ्या तर वाजल्या, पण मनांत वाटलें, यांनीं " मला तुम्ही आपला सेवक समजा, " म्हणायला हवें होतें. जो आजपर्यंत मालक म्हणून मिरवीत होता, त्याच्याकडून किमान पक्षीं एवढी तरी अपेक्षा असणें स्वाभाविक आहे.

राजे सहावे जॉर्ज यांच्या संदेशाला उत्तर देतांना राजेंद्रबाबूंनीं 'Loyal thanks ' ' राजनिष्ठायुक्त धन्यवाद ' दिले, ही गोष्ट मनाला 'खटकली'.

त्यांनीं 'respectful' 'humble' काय हवें तें म्हटलें असतें तरी चाललें असतें. राजेंद्रबाबू विनयशीलतेची, सौजन्याची, संभावित वृत्तीची मूर्ति आहेत. त्यांनीं शत्रूलाहि विनय व सौजन्य दाखवावें. पण 'राजनिष्ठे'ची भाषा आतां संपली पाहिजे. जिनांच्या भाषणांतील अहंकार सोडून तिला, तर त्यांतील आत्मप्रत्ययाचा सूर व बरोबरीच्या नात्याची ऐट मोठी मनमोहक वाटते.

असे अनेक 'कंसां'तील भाव मनांत पिंगा घालूं लागले. पण 'सर्वारंभाहि दोषेण धूमेनाग्निरिवावृताः' म्हणून एकंदरींत हाहि समारंभ संयमपूर्ण व पावित्र्ययुक्त असाच झाला असें म्हणण्यास हरकत नाहीं. गव्हर्नर जनरलची मिरवणूक पाहायला लक्षावधि लोक जमले होते. लॉर्ड माऊंटबॅटनहि मोठ्या मोकळ्या मनानें लोकाशीं हस्तांदोलन करीत होते. बबनला वाटत होतें, 'एका इंग्रजाचा इतका बडेजाव? हें आपल्याला कांहीं रुचत नाहीं!'

या प्रसंगाचीं वर्णनें कुशल वार्ताहरांनीं केलेलीं आहेतच. कांचेच्या कपाटांत ठेवलेल्या पुतळ्याप्रमाणें 'रेडिओ'चे प्रतिनिधीहि सभागृहांत बसलेले होते. दिवाण चमनलालांसारख्या कसलेल्या व कुशल वृत्तपंडितानें साऱ्या समारंभाचें सभाष्य वर्णन केलेलेंच आहे. म्हणून मी पुन्हां अकुशल वर्णन करून तुझ्या तोंडाची चव कशाला घालवूं?

'असेंब्लीगृहा'च्या बाहेर जमलेली गर्दी बघायला म्हणून अगदीं वर चढूं लागलों तों जिन्याच्या भिंतींवर विडा थुंकलेला दिसला. यतिराज म्हणाले, 'स्वातंत्र्य आल्याचा हा प्रत्यक्ष पुरावा आहे!' पण याहिपेक्षां भयंकर व दुःखदायक पुरावा संध्याकाळीं दिसून आला. लोकांनीं एकमेकांना चेंगरण्यांत, तुडविण्यांत व चिरडण्यांतच इतका आनंद मानला कीं, झेंडा कसाबसा उभारून धक्के खात परत फिरण्यापलीकडे गव्हर्नर जनरललाहि कांहीं करतां आलें नाहीं. स्वातंत्र्याच्या त्या उच्छृंखल विचेष्टितांत भल्याभल्यांची दुर्दशा झाली. स्त्रियांची स्थिति तर विचारूंच नये. त्या जिवंत घरीं पोंचल्या हें त्यांच्या मुलांबाळांचें किंवा भावी पतींचें नशीब!

आमचें रक्षण आम्हांला नित्य आश्रय देणाऱ्या 'मोटारभवानी'नें केलें. महाराष्ट्र क्लबांतील एका कार्यक्रमाला हजर राहून आम्ही 'झेंडावंदना'ला

जाणार होतों. पण महाराष्ट्र क्लबांतून परत येतांना वाटेंतच पेट्रोल संपलें आणि मोटार बंद पडली. पेट्रोलचा शोध केला, पण बहुतेक पंप शुष्क झालेले होते. यावरून तुला गर्दीची कल्पना येईल. रस्त्यांतून मुंग्यांसारखी माणसांची व वाहनांची रीघ लागलेली होती. पांच साडेपांच लक्ष लोकांनीं फुललेलें तें मैदान आम्हांला पहायला सांपडलें नाहीं.

रात्रीं १२ वाजतां थोडेंसें पेट्रोल मिळालें. तेव्हां आम्हीं नव्या दिल्लींतील व जुन्या दिल्लींतील 'दीपविलास' पाहून आलों. 'इंडिया गेट'च्या मैदानांत लाल रंगाचीं कारंजीं उडत होतीं आणि झाडें देखील दिव्यांनीं सजविलेलीं होतीं. चांदणी चौकांतील 'कारंजें' आणि 'घंटाघर' अगदीं 'दीपमय' होतीं. दिल्ली स्टेशनावरहि चांगली आरास होती. दिवाळीचा अगदीं कळस दिल्ली टाऊन हॉल व क्वीन्स पार्कमध्यें होता. सारी इमारत, बागेंतील कुंपणें, रस्ते, झाडें सर्व कांहीं दीपमय होतें. इकडे दिवाळी, तिकडे लाहोरला प्रलयंकर होळी ! इकडे स्वातंत्र्याचें स्वागत, तिकडे त्याच्या जबाबदारीची वेदना !

कोठें तारीख पंधराचा संध्याकाळचा कार्यक्रम आणि कोठें तारीख सोळाच्या सकाळचा लाल किल्ल्यावरील कार्यक्रम ! 'इंडिया गेट' वरील कार्यक्रमांत 'स्वातंत्र्य' नव्हतें, 'तंत्राचा प्रभाव' होता, गोंधळ होता, अनियंत्रित उत्साहाचे चाळे होते. पण लाल किल्ल्यावरील समारंभ सर्वच दृष्टींनीं अपूर्व होता. तेथें व्यवस्था होती, शिस्त होती आणि सभ्यपणाहि होता. जवळ जवळ सात साडे सात लक्ष लोकांनीं जवाहरलालांचें लांबलचक भाषण कौतुकास्पद शांततेनें व उत्सुकतेनें ऐकलें. गोंधळाचें किंवा गोंगाटाचें नांवदेखील नव्हतें.

'लाल किल्ला' म्हटला कीं, नेताजींचें स्मरण हटकून झालेंच पाहिजे. 'चलो दिल्ली' आणि 'लाल किल्लेपर गाडके' हे उद्घोष त्यांच्या प्रतापामुळेंच सार्वत्रिक झाले. जयप्रकाश, शार्दूलसिंह व इतर 'लाल किल्ल्याचे वीर' यांच्यामुळें लाल किल्ल्याला जें पावित्र्य लाभलें त्याहिपेक्षां अधिक महत्त्व त्याला 'आझाद हिंद फौजे'च्या खटल्यामुळें आलें. तारीख सोळाच्या भव्य व अपूर्व समारंभांत तेथें हजर असलेल्या आझाद हिंद सैनिकांचा गौरव करण्यांत आला नाहीं. झेंडा फडकावला गेला त्या वेळीं शहानवाझ,

सहगल किंवा धिल्लाँ अथवा लक्ष्मी यांचा सन्मान करण्यांत आला नाहीं. जवाहरलालांच्या भाषणांत कोठें नेताजींचा गौरवयुक्त उल्लेख आला नाहीं. त्यांच्या अभूतपूर्व पराक्रमाचें कौतुक करण्यांत आलें नाहीं. जवाहरलालांच्या मनांत किंतु होता किंवा अढी होती म्हणून त्यांनीं मुद्दाम ते उल्लेख वगळले असें मुळींच नाहीं. पण ही गोष्ट मनोदशेची द्योतक आहे. गांधींचें नांव कोणाला सुचल्यावांचून राहील का ? मग नेताजींचेंहि नांव कां सुचलें नाहीं ? लाल किल्ला व नेताजी यांचा संबंध अभेद्य आहे. नेताजींचा हा अबुद्धिपूर्वक अनुल्लेख मला घटना-परिषदेंत व इतरत्रहि जाणवतो. पण आज तर तो अगदीं खुपला ! जयप्रकाश, त्यांचे सोबती व नेताजी या सर्वांना मीं कृतज्ञतापूर्वक मनोमय वंदन केलें.

रात्रीं पुन्हां जवाहरलालांच्या एका सन्मानसमारंभाला जाऊन आलों. रस्त्यांत तोबा गर्दी होती. पण आज पेट्रोल मिळत होतें. पेट्रोलच्या अभावीं रस्त्याच्या कडेला निष्प्राण होऊन पडलेल्या मोटारी आज दिसत नव्हत्या. मालाचे ठेले, बसेस्, लॉऱ्या, मोटारी, टांगे, बैलगाड्या, खटारे यांची एकच गर्दी होती. तरी पण इतक्या गर्दींतहि स्वतःच्या बायकांना किंवा इतर स्त्रियांना सायकलवरून घेऊन जाणारे ' वीर ' होतेच. सायकलवर स्वतः, एक स्त्री आणि तिच्या मांडीवर मूल अशा थाटांत अगदीं वरातींतल्याप्रमाणें मिरवतांना दिसत हे हरीचे लाल ! सर्कशींतहि इतकें विलक्षण व कौतुकास्पद कसब पाहायला मिळालें नसतें. पायीं चालणारीं माणसें तर मुळीं शुद्धीवरच नव्हतीं. त्यांच्या कानांत स्वातंत्र्याचें वारें शिरलें होतें. स्वातंत्र्याचा ' उन्माद ' त्यांना झालेला होता. त्यांच्या अंगांत ' आझादी ' आली होती. त्यामुळें वाहनांनाच त्यांच्या जिवाची काळजी घ्यावी लागे ! कक्का धुळेकर स्वातंत्र्याच्या भावावेशांत बेहोष, खूष होऊन म्हणाले, " यह है जनता. स्वतंत्रता के नशे में मतवाली हो रही है ! "

पण लाहोरच्या हृदयद्रावक व उद्वेगजनक बातम्यांनीं हृदय करपलेलें होतें. बापूजी अणे म्हणाले, " स्वातंत्र्य आलें, आतां या क्षणीं मरायला तयार आहें ! " कक्का धुळेकर म्हणाले, " बस, आज आमचे सारे पूर्वज वैकुंठाला गेले ! कृतार्थ झालों आज ! "...पण...पण त्यांच्याहि हृदयांतून एक विसंवादी सूर निघतच होता. लाहोरच्या अमानुष प्रकाराला

आळा घालण्याचें सामर्थ्य जोंपर्यंत आलें नाहीं, तोंपर्यंत हें स्वातंत्र्य निर्भेळ नाहीं, निरपवाद नाहीं, निरापद नाहीं ! ब्रिटिश सत्तेची सावलीहि राहणार नाहीं, पण सांप्रदायिकतेच्या हडळीचा हैदोस केव्हां थांबेल ? आज मनांत निराशा नाहीं, निरुत्साह नाहीं, संताप आहे, तळमळ आहे, बेचैनी आहे, हुरूप आहे.

आमच्या जुन्या पुढाऱ्यांची अवसानें बारगळलीं किंवा 'बुद्धि नाठी' झाली, असें मला वाटत नाहीं. परिस्थिति इतकी गुतागुंतीची व अवघड आहे कीं, त्यांची योजनाशक्ति उणी पडते; त्यांचा पराक्रम प्रतिबद्ध होतो; त्यांची बुद्धि अवरुद्ध होते. या परिस्थितींत तरुणांच्या पौरुषाला आवाहन आहे ! या परिस्थितींतहि ज्याला निष्ठेच्या प्रकाशांत मार्ग स्पष्ट दिसतो आणि जो आपल्या निष्ठेप्रमाणें धैर्यानें पाऊल टाकीत राहतो असा उभ्या देशांत एकच महात्मा आहे. इतर लोक ज्या दिवशीं महोत्सव साजरा करतात. त्या दिवशीं तो उपवास व प्रार्थना करायला सांगतो. गांधी खरे क्रांतिकारक आहेत.

बाळू म्हणेल, इतकीं लांबलचक कंटाळवाणीं पत्रें लिहायला तुम्हांला मोकळा वेळ आहे, पण 'रामराज्या'वर लेख लिहायला मात्र सवड नाहीं. त्याची तक्रार खरी आहे. पण त्याचा आक्षेप बरोबर नाहीं. प्रचलित परिस्थितीमुळें मनांत भिन्न भिन्न विचारांचें इतकें काहूर माजलें आहे कीं, रामराज्यावर लिहिण्याइतका 'मनःप्रसाद' कसा लाभावा ? रामराज्याचीं गोड स्वप्नें पाहूं शकण्याइतकें मनःस्वास्थ्य तर हवें ना ! मन थकलें म्हणजे संप्रसादाची ( गाढ झोंपेची ) स्थिति येऊन शून्यता येईल किंवा अप्रवृत्ति येईल. पण मनोहर स्वप्नें पाहायला चित्त शांत नसलें, तरी प्रसन्न असावें लागतें. आजच्या परिस्थितींत कैफ किंवा गुंगी उत्पन्न करण्याचें सामर्थ्य आहे, पण मनःप्रसादाला ती सर्वस्वीं प्रतिकूल आहे. रामराज्यावर लिहिण्याचा 'योग' तूर्त तरी दिसत नाहीं. तुला पत्रें लिहितों तीं चित्ताला विरंगुळा म्हणून. तीं कशींहि लिहिलीं तरी कोण पाहतो ?

तुझा,

दादा

ती. स्व. वडिलांचे सेवेसीं,

अपत्यें दादाचा शि. सा. न. वि. वि.

आपलें ता. ६ चें पत्र येथें ता. १० ला पोंचलें. ता. ११ ला दुपारीं १२ वाजतां मी येथें येऊन पोंचलों. तेव्हांपासून आपल्या पत्राची दररोज चौकशी करीत आलों. पण आजपर्यंत शोध लागला नाहीं. आज अनपेक्षितपणें तें पत्र आलें. येथून नागपूरला पाठविण्यांत आलें असावें असा माझा तर्क होता. पण तो चुकीचा ठरला. कारण पत्रावर नागपूरच्या पोस्टाचा एकहि शिक्का नाहीं. नुसतें 'मेंबर, कॉन्स्टिट्युअंट असेंब्ली' म्हटलें तरी आजपर्यंत पत्रें वेळेवर पोंचत असत. पण अलीकडे बराच घोटाळा होऊं लागला आहे. याचें कारण दोन सरकारें झाल्यामुळें नोकरवर्गाचीहि वांटणी झाली आहे. पोस्ट खात्यांतूनहि कांहीं वाकबगार माणसें गेलेलीं आहेत. म्हणून अव्यवस्था आहे.

आपलें पत्र वाचून हृदय भरून आलें. अलीकडे शिक्षणपद्धतींत कौटुंबिक शाळांवर ( Residential Schools ) बराच जोर देण्यांत येत आहे आणि तो बरोबरहि आहे. 'कौटुंबिक शाळा' या शब्दाचा अभिप्रेत अर्थ 'शाळा हेंच कुटुंब' असा आहे. पण ज्या दिवशीं 'कुटुंब हीच शाळा' होईल त्या दिवशीं खऱ्या अर्थानें 'कौटुंबिक शाळा' हा शब्द अन्वर्थक ठरेल. तूर्त मुद्दा इतकाच कीं, कुटुंब आणि शाळा यांच्यांत जितका अभेद साधतां येईल तितकेंच शिक्षण सार्थ होईल. माझ्याबाबतींत असेंच कांहींसें झालेलें आहे. आपल्या वटवृक्षासारख्या विशाल व रक्षणदायी कुटुंबांतून मला जितकें जीवनोपयोगी शिक्षण मिळालें तितकें कुठल्याहि शाळा-कॉलेजांतून मिळालेलें नाहीं. कुटुंबाच्या बाहेर जें शिक्षण मिळालें तेंहि शाळेबाहेरूनच मिळालें. पण अगदीं नकळत, सहजगत्या कुटुंबांत मिळालेलें शिक्षणच एकंदरींत माझ्या आयुष्यांतील मुख्य शिदोरी आहे.

कै. ती. स्व. बापूजी, आबाजी व मोठी आई हीं तीन माणसें सोडून दिलीं तर माझ्या जीवनावर आपल्या घरांतील ज्या माणसांचा खोल व

चिरस्थायी परिणाम झाला, त्यांत तिघांची गणना प्रामुख्यानें केली पाहिजे : ( १ ) परमपूज्य भाऊसाहेब, ( २ ) आपण, आणि ( ३ ) गं. भा. दादी आत्या ( लळी दादी ).

आत्या, मोठी प्रखर स्वभावाची—उग्र म्हटलें तरी चालेल; अत्यंत दारिद्र्यांत वाढलेली आणि बालविधवा. त्यामुळें तिच्या स्वभावाला वस्तऱ्याच्या धारेसारखी तीक्ष्णता आलेली होती. बुद्धिहि अतिशय तरल. माझ्यावर पोटच्या गोळ्याइतका जिव्हाळा. लहानपणापासून तिच्याकडून माझ्या आध्यात्मिक वृत्तीला उत्तेजन मिळालें. पोटच्या पोराइतकें तिनें माझें कौतुक केलें; प्रतिकूल वातावरणांतहि सांप्रदायिक धार्मिकतेच्या आणि परंपरागत प्रतिष्ठितपणाच्या दलदलींत तिनें मला फसूं दिलें नाहीं. माझी मुलुखावेगळीं नवथर मतें ऐकून तिचें हृदय उचंबळून येत असे. पुढें पुढें ती पायां पडूं लागली तेव्हांपासून एका प्रचंड हानीची भावना मला जाणवूं लागली. आपली धर्ममाता हरवली असें मला वाटलें आणि हृदयाला धक्का बसला. आतां तर तिचें नश्वर शरीरहि नाहींसें झालें. त्या माझ्या आध्यात्मिक जननीला वंदन असो !

परमपूज्य भाऊसाहेबांचें नांव घेतल्याबरोबर अंतःकरणांत कृतज्ञतेचें भरतें येतें. भाऊसाहेबांनीं माझें 'उपनयन' केलें. मूलग्राही पद्धतीनें विचार करण्याचें वळण त्यांनीं माझ्या बुद्धीला लावलें. बुद्धीची गति, विचार करीत असतांना, कोठेंच अडखळूं देऊं नये, कुंठित होऊं देऊं नये, स्तंभित होऊं देऊं नये, हें त्यांच्याजवळून शिकलों. लोकमान्य टिळक म्हणजे आम्हांला जवळजवळ देवाइतकेच पूज्य. मतानें मी रानडे-आगरकरांचा अनुयायी होतों. पण लोकमान्य मला खरोखरच 'भूदेव' वाटत होते. बिपिन पाल व अरविंद यांच्या प्रतिभेचा माझ्या मनावर विलक्षण परिणाम झालेला होता. पण लोकमान्य हिंदुस्थानच्या दुबळ्या जनतेच्या वतीनें जुलुमाचा प्रतिकार करायला मृत्युलोकांत धांवून आलेले देव-प्रतिनिधी आहेत, हीच आमची लहानपणाची भावना. प्राचीनकालीं इंद्राच्या साह्याला मृत्युलोकांतील पराक्रमी राजे धांवून जात असत. त्यांचें ऋण फेडायला जनतेच्या कैवाराकारितां हा देवलोकींचा प्रतिनिधि धाडण्यांत आला, असा आमचा समज असे.

अशा लोकमान्यांच्या ‘ गीतारहस्या ’ची भाऊसाहेब अतिशय निर्दय-पणानें चिकित्सा करीत. आमचीं हृदयें संतप्त होऊन जात. लोकमान्यांच्या विरुद्ध विचार करण्याची कल्पना मनाला सहनच होत नसे. पण भाऊसाहेबांनीं कठोर बुद्धिवादाची दीक्षा आम्हांला दिली. उराशीं कवटाळून ठेवलेल्या भावना, कल्पना व समजुती यांचा बुद्धीच्या प्रखर खड्गानें छेद होत असलेला पाहण्याची हिंमत त्यांच्या कृपेनेंच माझ्या बुद्धींत आली. आज त्यांच्या व माझ्या वागणुकींत व विचारसरणींत दोन ध्रुवांइतका भेद दिसतो. त्यांच्या दृष्टीनें मी उन्मार्ग-गामी आहें मला सद्‌गति लाभणें शक्य नाहीं. मजविषयींच्या कळकळीमुळेंच त्यांच्या कोमल हृदयाला दारुण व्यथा होतात. तरी पण त्यांच्या आणि माझ्या वृत्तींत फरक नाहीं. त्यांच्या अन्तःकरणाच्या अन्तःस्तलांतून माझ्या कल्याणाकरितां निरंतर आशीर्वाद निघत असतील याविषयीं माझ्या मनांत तिळमात्र शंका नाहीं. मूलगामी विचारांची दीक्षा देणारे भाऊसाहेब सुदैवानें अजून आहेत. पण त्यांच्यापासून मला जी संपत्ति मिळायची होती ती मिळून चुकली.

आपणांलाच लिहीत असलेल्या पत्रांत आपल्याविषयीं काय लिहूं? लहानपणीं लोककार्याची स्फूर्ति मला आपणांपासूनच मिळाली. भाऊसाहेबांना ‘ लौकिकाची चाड ’ नव्हती; आत्याला ती दृष्टि नव्हती; बापूजी-आबाजी यांच्या कल्पनाच कांहीं निराळ्या होत्या; गांवांतील ‘ उठाठेवी ’ करून सामुदायिक जीवन निर्माण करण्याचा प्रयत्न एकटे आपणच काय ते करीत होतां. आपला देखणा व रुबाबदार चेहरा आम्हांला आवडे. आपला भरदार व मधुर आवाज आम्हांला ऐकावासा वाटे. आपल्या नाटकांतील भूमिका आम्हांला थरारून सोडीत. आपलीं कीर्तनें, पोवाडे ऐकून आम्हीं हुरळून जात असूं. ‘ वन्दे मातरम् ’ ‘ शिवाजी महाराज की जय ’, ‘ शिवाजी उत्सव ’, ‘ केसरी ’, ‘ लोकमान्य टिळक ’—या सर्व सत्त्वांचा प्रथम परिचय आम्हांला आपल्यामुळें झाला. मला सार्वजनिक जीवनाची स्फूर्ति व दीक्षा आपल्यापासून मिळाली. मातेच्या वात्सल्यानें माझ्या अल्पस्वल्प गुणांचें आपण प्रमाणाबाहेर कौतुक केलें. त्यामुळें आपल्याविषयीं जी मधुर भावना माझ्या मनांत आहे ती इतकी संमिश्र आहे कीं, तिचें एका शब्दांत वर्णन करतां येणें शक्य नाहीं.

पुण्यश्लोक बाबासाहेब व पूज्य आई यांच्या हाडामांसाचा तर हा पिंडच आहे. पुण्यश्लोक बाबासाहेबांचें साधुत्व कोणाच्या प्रत्ययाला आलेलें नाहीं ? चोखपणा, सचोटी, कमालीचा हळुवारपणा या त्यांच्या गुणांची छाप शतांशानें तरी आमच्या जीवनावर उमटली आहे कीं नाहीं, देव जाणे ! आईप्रमाणेंच मामांच्याविषयींहि लिहिणें जड जातें. आत्याप्रमाणेंच मामा मला थोर मानूं लागले. त्यामुळें प्रेमाच्या एका मोठ्या निधीला मी अंतरलों, असें मला वाटूं लागलें.

आपल्या पत्रामुळें अन्तःकरणांत भावनांचें नृत्य सुरू झालें. त्यांच्या उद्रेकांत जे उद्‌गार बाहेर पडले ते तसेच लिहिण्यांत आले. त्यामुळें आपल्या पत्राचें उत्तर एकीकडेच राहिलें.

तारीख चौदा व पंधराच्या प्रसंगांचें वर्णन मीं आपणांस लिहून पाठवावें अशी आपली इच्छा असणें अगदीं स्वाभाविक आहे. त्या प्रसंगाचें सविस्तर वर्णन मीं बच्चूला लिहून पाठविलें आहे. त्याची एक नक्कल आपणाकडे धाडून द्यायला लिहितों. माझें वर्णन भावनात्मक आहे, कथनात्मक नाहीं. पत्रें माझीं खासगीच असतात. लिहितांना प्रकाशनाची कल्पना अजून माझ्या मनाला शिवत नाहीं. कांहीं दिवसांनीं त्या कल्पनेचें दडपण मनावर जर नकळत येऊं लागलें तर माझीं पत्रें नीरस व कृत्रिम होतील. प्रभुकृपेनें अजून प्रकाशनाची कल्पना माझ्या मनांत येत नाहीं.

तारीख चौदाचा मध्यरात्रींचा प्रसंग धूमधडाक्याचा अगर थाटामाटाचा नव्हता. तो राजवैभवाला हपापलेल्या एखाद्या सत्ताकांक्षी राजाचा राज्याभिषेक-विधि नव्हता. त्यामुळें त्यांत कृतार्थतेची भावना असली, तरी वैभवप्राप्तीचा हर्ष नव्हता. लग्नविधींत व यज्ञविधींत किंवा लग्नविधींत व व्रतबंधसमारंभांत जो फरक असतो, तोच येथेंहि होता. हा एका राष्ट्राचा व्रतबंधविधि होता, आमच्या राष्ट्राला त्या दिवशीं द्विजत्व आलें. त्याचा दुसरा जन्म झाला. कांहीं लोकांना वैभवप्रदर्शनाची अनावर हौस असते. ते मुंजींतहि लग्नांतल्यासारखे अनेक अननुरूप सोहळे मोठ्या अट्टाहासानें करतात. कांहीं हरीचे लाल तर नायकिणींचे नाच देखील त्या ब्रह्मचर्यदीक्षासमारंभांत करवितात !

भारतमातेचीं दोन शकलें झालीं असतांना लाहोर, बंगाल इत्यादि ठिकाणीं निरर्थक व अमानुष अत्याचार चालू असतांना, लोक अन्नान दशेला प्राप्त झाले असतांना, त्यांच्या चितेवर साटोऱ्या तळून खाण्याची अमानुष बुद्धि कोणाला होणार ?

स्वातंत्र्याचा उदय खरोखरच मध्यरात्रींच्या काळोखांत होत होता. जिकडे तिकडे मध्यरात्रींच्या अंधकारासारखाच घनघोर व वनदाट विषाद पसरलेला होता. लाहोरच्या करुण किंकाळ्या मन कावरेंबावरें करून सोडीत होत्या. पारतंत्र्यनाशाचा संतोष होता; पण स्वातंत्र्यप्राप्तीचा आनंद व्यक्त करण्यासारखी परिस्थिति नव्हती.

राजेंद्रबाबू, जवाहरलाल, डॉ. राधाकृष्णन् यांनीं भाषणें केलीं. त्यांच्या उद्‌गारांत, त्यांच्या चर्येवर, त्यांच्या एकंदर वागणुकींत धन्यता होती, उमेद होती, उत्साहहि होता, पण प्रसन्नता नव्हती. जवाहरलाल नेहमींप्रमाणें खुलले नाहींत, राधाकृष्णन्‌च्या भाषणांतहि ती नेहमींची प्रतिभेची चमक नव्हती. गोरगरीबांपर्यंत स्वराज्याची ऊब पोंचलेली नव्हती. त्यांचा अन्न, आच्छादन व आश्रय यांचा प्रश्न अजून सुटलेला नव्हता. त्यामुळें स्वातंत्र्य आल्याबद्दलचें मंद स्मित वातावरणांत अनुभवाला येत होतें, पण टवटवीची छटा दिसत नव्हती.

तारीख चौदाला मध्यरात्रींच्या ठोक्याला सगळें वातावरण एक प्रकारच्या धन्यतेनें व पवित्र निग्रहानें ओथंबलेलें होतें. जनतेच्या सेवेचा संकल्प सदस्यांनीं अध्यक्षांबरोबर मोठ्या गांभीर्यानें व भाविकतेनें उच्चारिला. मध्यरात्रींच्या त्या प्रशान्त वेळीं त्या गंभीर ध्वनीचे पडसाद क्षितिजापर्यंत उमटत असावेत असा भास झाला. लाहोरला प्रलयाग्नि पेटला नसता, तर देवांनीं विमानांत बसून पुष्पवृष्टि करायला येण्यासारखा हा पुण्यप्रसंग होता.

तारीख पंधराच्या प्रसंगांतहि आक्रोशकारी आनंद नव्हता. गव्हर्नर जनरलनें " आजपासून साम्राज्यसत्ता संपली; तुमचे तुम्ही मालक झालांत " असें जाहीर केलें. जो राजा पूर्वीं हिंदुस्थानच्या जनतेचा उल्लेख ' माझे लोक ' म्हणून करीत असे त्यानें आतां त्यांचा उल्लेख ' तुमचे लोक ' म्हणून केला. हे शब्द परिस्थितींतील परिवर्तनाचे द्योतक आहेत. हें सारें

परिवर्तन इतक्या अभावितपणानें व अनपेक्षितपणानें झालें कीं, लोकांना एकाएकीं तें खरें देखील वाटत नाहीं. यूनियन जॅकच्या ठिकाणीं खरोखरच तिरंगी निशाण फडकूं लागेल, गव्हर्नर जनरलहि त्याला वंदन करील, हें परवां परवांपर्यंत पुष्कळांना खरेंदेखील वाटत नव्हतें. त्यामुळें ता. १४ व ता. १५ चे समारंभ पाहून त्यांनीं डोळे चोळून पाहिले, स्वतःला चिमटा घेऊन पाहिला, तरी अजून आपण स्वप्नांत नसल्याची त्यांची खात्री झालेली नाहीं ! नियति अघटितघटनापटु आहे ! प्रभूची लीला अतर्क्य आहे !

दिल्लीच्या लाल किल्ल्यावर तिरंगी निशाण फडकत असलेलें आपण आपल्या डोळ्यांनीं पाहूं ही कल्पना किती लोकांना आली असेल ? कराची, लाहोर येथील सरकारी इमारतींवर तिरंगी निशाण फडकत नाहीं म्हणून रडत बसायचें, जळफळत बसायचें, कीं तीनचतुर्थांश हिंदुस्थानवर तें फडकूं लागलें आणि 'यूनियन जॅक'ची सत्ता कोठेंच राहिलेली नाहीं याबद्दल समाधान मानावयाचें, हा मनोवृत्तीचा प्रश्न आहे. दिल्लीच्या लाल किल्ल्यावर हिंदुस्थान सरकारच्या पंतप्रधानानें स्वतःच्या हातानें लॉर्ड माऊंटबॅटन यांच्या समक्ष जेव्हां तिरंगी निशाण फडकाविलें तेव्हां दिल्लीच्या लक्षावधि जनतेला अस्मान ठेंगणें वाटलें !

एकंदरींत साराच समारंभ मोठा स्फूर्तिदायक झाला. परिस्थितीवर विषादाची छाया पसरलेली आहे, पण आशेचे किरणहि पाहणाराला सहज दिसण्यासारखे आहेत. "आशायां परमं दुःखं" असेल पण आशेंतच प्रगति आहे, जीवन आहे.

वस्तुकथनात्मक वर्णन मला जमण्यासारखें नाहीं. एकंदर प्रसंगाचें भावनाचित्र मी आपण समोर उभें केलेलें आहे. मला वाटतें, आपल्या वात्सल्याला तें मधुर वाटेल. कळावें.

आपला,

दादा

१३९, कॉन्स्टिट्यूशन हाउस,
नवी दिल्ली,
१९-११-४७

प्रिय बच्चू,

ऑ. इं. कॉ. क. च्या निमित्तानें अनेक समाजवादी मित्रांची गांठ पडली. डॉ. लोहिया पुष्कळच दिवसांनंतर भेटले. अच्युतराव अगदीं आमच्या शेजारींच कोठें तरी उतरले होते म्हणतात! पण भेटीचा योग आला नाहीं. '४२ नंतर अच्युतरावांची भेटच झाली नाहीं. जयप्रकाशबाबूंचीहि भेट तेव्हांपासून झालेली नाहीं. अनेक समाजवादी व्यक्तींशीं माझे स्नेहसंबंध बरेच निकटचे आहेत. त्यांच्यांत आणि माझ्यांत एक प्रकारचें वृत्तिसाम्य आणि विचारसाम्य आहे.

काल संध्याकाळीं पुन्हां पूज्य बापूंकडे जाऊन आलों. मागच्या भेटीच्या वेळीं कांहीं बोलायचें आहे म्हणून म्हणाले होते. पण काल त्यांना तें कांहीं आठवत नव्हतें. आम्हांला कांहीं बोलायचें नव्हतेंच. तेव्हां पांच मिनिटांतच ही मुलाखत संपली. बापूंना आमचें मोठें कौतुक वाटलें असावें.

शरणार्थी लोकांच्या गर्दीमुळें दिल्लीची लोकसंख्या बरीच वाढलेली आहे. त्या वाढीचा परिणाम दिल्लीच्या नित्य-जीवनावरहि झालेला आहे. या शरणार्थी लोकांनीं इतके अमानुष जुलूम व अत्याचार सहन केलेले आहेत, कीं त्यांची वृत्ति व बुद्धि ताळ्यावर राहाणें शक्यच नव्हतें. त्यांच्या बेताल वृत्तीचा आणि प्रक्षुब्ध बुद्धीचा परिणाम अर्थातच दिल्लीच्या नागरिक जीवनावर व नित्याच्या व्यवहारावर होतो. पण या शरणार्थींना येथील व्यवस्थेंत व्यत्यय आणूं दिला किंवा शान्ततेंत बिघाड करूं दिला, तर त्यामुळें खुद्द शरणार्थींचें व देशाचेंहि अपरिमित नुकसान होणार आहे. शरणार्थींच्या वृत्तींतून व्यवस्थेची जाणीव, शिस्तीची भावना आणि सभ्यता नाहींशी झालेली दिसते. छळलेल्या, पीडलेल्या आणि नाडलेल्या माणसाला एक

प्रकारच्या आत्मदयेच्या भावनेनें पछाडलेलें असतें. त्यामुळें जगाच्या सहृदयतेवर, औदार्यावर व उपकारबुद्धीवर आपला परिस्थितिसिद्ध अधिकार आहे, अशी त्यांची वृत्ति बनलेली असते. म्हणून मधूनमधून दिल्लीच्या वातावरणांत शरणार्थींच्या प्रत्याघातवादी वृत्तीचे पडसाद उमटतात. वातावरण केव्हां नासेल याचा नियम नसतो.

आमची असेंब्ली सुरू होऊन तीन दिवस झाले. श्री. दादासाहेब मावळणकर खरोखरच मोठे दक्ष व चतुर अध्यक्ष आहेत. त्यांच्या नियमनांत ढिलेपणा नाहीं. शिस्त आहे आणि कडकपणाहि आहे. याशिवाय सभेचा वेळ फुकट न जाऊं देण्याची हातोटीहि आहे. सौजन्याकरितां तर त्यांची सर्वत्र ख्यातीच आहे. एकंदरींत हिंदुस्थानच्या पहिल्या पार्लमेंटचा सभाध्यक्ष तिला शोभण्याजोगाच आहे.

सरकारी बांकावरील व्यक्तींपैकीं जुन्या कसलेल्या व वाकबगार पुढाऱ्यांविषयीं आणि मंत्र्यांविषयीं विशेष लिहायला नकोच. पण श्री. जगजीवनराम यांचा उल्लेख करणें जरूर आहे. त्यांचे विचार स्पष्ट असतात, भाषाहि त्या विचारांना अनुरूप अशी स्पष्ट, सोपी आणि समर्पक असते. घोंसदार वाक्प्रचार किंवा कलाकुसरीची भाषा वापरण्याचा फारसा मोह नाहीं. बोलण्याचीहि विशेष हौस दिसत नाहीं. बोलणें कामापुरतें पण प्रयोजनानुरूप असतें. वक्तृत्वाची शोभा त्यांत नसते. अगदीं संथपणानें आणि शब्द तोलून निश्चित भाषेत आणि निश्चयात्मक रीतीनें ते आपली बाजू मांडतात.

प्रांतिक कायदेमंडळाच्या सभासदांनीं मध्यवर्ती कायदेमंडळाच्या कामकाजांत भाग घेऊं नये, असा संकेत ठरलेला आहे. असा प्रघात पाडण्याची सूचना आमचे पुढारी पंडित जवाहरलाल यांनीं केलेली आहे घटना परिषदेच्या कामांत प्रांतिक असेंब्ली सदस्यांनीं भाग घेणें इष्ट व आवश्यक आहे, असें त्यांस वाटतें; पण मध्यवर्ती कायदेमंडळांत सदर सभासदांनीं भाग घेणें जवाहरलालजींना तितकेंच अनिष्ट व अयोग्य वाटतें. पुढल्या बैठकीपासून हा संकेत अमलांत येईल. औचित्याच्या दृष्टीनें आणि कार्यक्षमतेच्या दृष्टीनें मला वाटतें असा प्रघात पाडणें श्रेयस्कर ठरेल.

मौलाना अबुल कलाम आझाद यांनीं आमच्या असेंब्लींत आज पहिल्यांदाच एक सरकारी ठराव मांडण्याच्या निमित्तानें अक्षरशः तोंड

उघडलें. त्यांनीं आपला ठराव सोप्या उर्दूत वाचून दाखविला. त्यांना इंग्रजीचें अजिबात वावडें दिसतें. माणूस चोखंदळ असला म्हणजे त्याला आपलें अज्ञान विशेष जाणवतें. मौलानासाहेब अयोग्य नाहींत, हें सांगायला नकोच. त्यांच्या ठिकाणीं अयोग्यतेचा भ्रमहि नाहीं. पण इंग्रजी भाषेचा शुद्ध प्रयोग येणार नाहीं, या जाणिवेमुळें त्यांनीं तिच्यावर पूर्ण बहिष्कार घातलेला आहे. राजाजींचें हिंदीच्या बाबतींत असेंच मत आहे. चोखंदळ-पणामुळें चुका करण्याचें धाडस कमी होतें आणि ते नवीन ज्ञानप्रयोगाच्या आड येतें.

तुझा,
दादा

— ८ —

१३९, कॉन्स्टिटयूशन हाउस
नवी दिल्ली,
२०-११-४७

प्रिय बच्चू,

कालचें पत्र पोंचेलच. आज विशेष कांहीं लिहिण्यासारखें नाहीं. घटना-परिषदेच्या मानानें मध्यवर्ती असेंब्लींत वातावरण एकंदरींत बरेंच आळणी आणि नीरस वाटतें. प्रश्नोत्तरांचा तास थोडासा चटकदार असतो. पण तोहि प्रश्नोत्तरांची मर्यादा बहुतेक सभासद पाळीत नाहींत म्हणूनच. एरवीं तोहि कायम ठश्याच्या स्वरूपाचाच वाटला असता.

या असेंब्लींत अंमळ सैल शिस्त आहे. कारण सभागृह लहान आहे आणि सभासदांची संख्या मोठी आहे. त्यामुळें जागा नेमलेल्या नाहींत. वाटेल त्यानें वाटेल तेथें बसावें. अर्थातच कित्येकदां प्रमुख माणसांनाहि मागील बांकावर बसण्याची पाळी येते. या अनौपचारिकतेंत एक प्रकारची गंमतहि आहे. पण दादासाहेब मावळणकराच्या शिस्तप्रियतेला ती फार दिवस

खपण्यासारखी नाहीं. पक्षनेते पं. जवाहरलाल यांच्या आदेशात्मक सूचने-प्रमाणें प्रांतिक असेंब्ली सदस्यांनीं आपला गाशा गुंडाळला म्हणजे उरलेल्या सभासदांना ठराविक जागा नेमून देतां येतील.

कामकाजांतहि अजून कॉंग्रेस पक्षाची कडक शिस्त आलेली नाहीं. परवां तर कॉंग्रेस सदस्यांनींच मजूरमंत्र्यांच्या एका ठरावाला विरोध केला आणि मतमोजणीपर्यंत पाळी आली. कॉंग्रेससरकारच्या विरुद्ध आम्ही त्याच पक्षाच्या कांहीं सदस्यांनीं मतें दिलीं. इतरहि कांहीं सरकारी ठरावांवर कॉंग्रेस सदस्यांचीं अनुकूल-प्रातिकूल भाषणें होतात. मला वाटतें १५ ऑगस्टनंतर सभागृहांत एकच पक्ष वस्तुतः उरल्यामुळें पक्षाच्या शिस्तीची कडकपणानें अंमलबजावणी करण्याची गरज वाटत नसावी. परिणाम मात्र पथ्यकारकच झाला आहे. एकंदरींत वातावरण अधिक मोकळें व जिवन्त वाटतें.

मदन मोहन चतुर्वेदी येथें दोनचार दिवस होता. त्यानें आणून दिलेल्या औषधानें माझ्या प्रकृतीला गुण आला. मदन माझा मित्र होता व आहे. त्याचें वर्तन आणि व्यवहार मला अनेकदां गैर आणि अप्रशस्त वाटला. मीं त्याबद्दल त्याची निर्भत्सनाहि केली. तरी मला त्याचा स्नेह नकोसा व अग्राह्य कधींच वाटला नाहीं. विद्या व पैसा कोठूनहि घ्यावा असा शिष्ट-मान्य व्यवहार रूढ आहे. नीचापासूनहि विद्या घ्यावी आणि अपवित्र ठिकाणीं पडलेल्या सोन्याचाहि संग्रह करावा, असें सुज्ञांचें मत आहे. सोंवळा ब्राह्मण शूद्रान्न घेणार नाहीं, पण शूद्राच्या पैशाला विटाळ नसतो. हाच न्याय औषधालाहि लागू करण्यांत येतो. औषध कोणाचेंहि घ्यावें. त्यानें गुण येतोच. मला वाटतें हाच न्याय स्नेहालाहि लागू करण्यांत आला पाहिजे. माणसाचा स्नेह नेहमीं पवित्रच असतो. त्याचें मूल्य अगदीं स्वतंत्र नि निरपेक्ष असतें. वडील—धाकटा, थोर—लहान, गरीब—अमीर, वाईट—चांगला असा भेद त्यांत नाहीं. मदनचा मजविषयीं स्नेह कायम आहे. त्यामुळें त्यानें दिलेल्या औषधांत स्नेहशक्तीची भर पडली. जग मदनला सोदा व अपराधी म्हणतें; तो अपराधी व प्रमादशील असल्यामुळेंच मला आपला सजातीय वाटतो. जग ज्यांना अपराधी माणसें म्हणतें त्यांच्या ठिकाणीं एक प्रकारचा दिलदारपणा आणि राकट उमदेपणा असल्याचा अनुभव येतो. उलटपक्षीं व्यवस्थित चारित्र्यवान् मानल्या जाणाऱ्या लोकांमध्यें एक प्रकारचा

संकुचितपणा, क्षुद्र हिशेबीपणा, कार्पण्य व कांटेकोरपणा दिसून येतो. तें असो. 'औषध तेवढें गंगाजळ' हें जसें खरें, त्याचप्रमाणें 'प्रेम तेवढें अमृत' हेंहि खरेंच आहे.

तुझा,

दादा

— ९ —

१३१, कॉन्स्टिट्यूशन हाउस,
नवी दिल्ली,
२१-११-४७

प्रिय बच्चू,

तुम्हांला रोज एक कार्ड लिहावें असें मी कबूल केलें होतें. त्याऐवजीं जवळ जवळ रोज एक पत्र लिहीत आहें. तेव्हां मी आपला करार सव्याज पाळला, हें आक्रूला कबूल करावें लागेल.

आज एक फोन करण्याच्या निमित्तानें शंकररावांकडे गेलों होतों. तेथेंच जेवलों. अर्थातच तेथें सावंत भेटले. त्यांनीं व दत्तानें बबनची चौकशी केली. बबननें एकहि पत्र पाठविलें नाहीं अशी तक्रार सावंतांनीं केली. सावंतांच्या गंगाविहाराचें वर्णन 'सत्यकथे'च्या ज्या अंकांत आलें आहे तो अंकहि त्यांना पाहायला मिळालेला नाहीं. तो पाहाण्याची त्यांना उत्कंठा आहे.

शंकररावांशीं त्यांच्या कार्यपद्धतीबद्दल बोलणें झालें. त्यांच्या ठिकाणीं अहंमन्यता आणि घमेंड आली आहे, असा कांहीं मित्रांचा ग्रह आहे. मला तसें वाटलें नाहीं. एक प्रकारचा आत्मप्रत्यय आहे आणि आत्मविश्वास आहे. काय करायचें याची निश्चित कल्पना आहे आणि कसें करायचें याची सुनिश्चित योजना आहे. आपल्याभोंवतीं अनुयायांचा गट गोळा करून आपलें नेतृत्व दृढ करण्याचा अश्लाघ्य हेतु दिसत नाहीं. ज्यांचीं व त्यांचीं मतें जुळत नाहींत अशीं माणसें त्यांच्याशीं निरनिराळ्या क्षेत्रांत

सहकार्य करीत आहेत. त्यामुळें त्यांच्या कार्यपद्धतींत निष्ठेची उत्कटता असली, तरी सांप्रदायिक संकुचितता आणि व्यवच्छेदकता नाहीं.

द्वारकाप्रसाद मिश्र व शुक्लजी काल हरद्वार-हृषीकेश–लक्ष्मणझूला पाहून आले. मिश्रांनीं आपल्या पुस्तकांत या स्थानांचें वर्णन न पाहतांच केलेलें आहे. कै. तात्या ( वा. म. ) जोशी यांनीं आपल्या 'रागिणी' नांवाच्या सुप्रसिद्ध कादंबरींत हिमालयाचें वर्णनहि असेंच न पाहतां केलें आहे. त्यामुळें त्यांनीं हिमालयांत आम्रवृक्षाचें वर्णन केलें आहे. वाल्मीकि, कालिदास, भवभूति, विद्यापति, तुलसीदास इत्यादि अनेक थोर कवींच्या वर्णनांवरूनहि तशीच शंका येते. पण कुमारसंभवांतील हिमालयवर्णनांत आंब्याच्या वृक्षाऐवजीं ' देवदार ' चा उल्लेख करण्याची जी काळजी कालिदासानें घेतली आहे, ती ' रागिणी 'कर्त्यांनीं घेतलेली नाहीं.

काल सायंकाळीं पांच वाजतां असेंब्लींत ' रेल्वे बजेट ' सादर करण्यांत आलें. येथें बजेट ५ वाजतां सादर करण्यांत येत असतें. ' गतानुगतिको लोकः ' हें वाक्य इंग्लंडच्या ' लोकसभातंत्रा 'ला अक्षरशः लागू पडतें. परंपरागत तंत्राचें पालन इंग्रज मोठ्या दक्षतेनें करीत असतात. त्यांच्या वर्तनांतील पुराणप्रियता अद्वितीय आहे. तिचेंच अनुकरण येथेंहि होत असतें. संध्या करीत असतांना बापाच्या खांद्यावरील उपरणें घसरून पडत असे म्हणून पितृभक्त मुलानें तें मुद्दाम काढून टाकण्याची दक्षता बाळगली ! अशांतलेच हे अंधपरंपरावादी प्रकार आहेत.

मला गणिताचा मनापासून तिटकारा वाटतो. आंकड्यांचीं वांकडीं टोकें मला बोंचतात. हिशेब माझ्या वृत्तीला करकचून टाकतो. त्यामुळें बजेट मला कळत नाहीं. आणि बजेटवरील भाषण ग्रीक-लॅटिनसारखें वाटतें. पण रेल्वेबजेटवरील डॉ. जॉन मथाई यांचें भाषण मला अतिशय रोचक व उद्बोधक वाटलें. त्यांनीं सरकारचा पक्ष मोठ्या कुशलतेनें, उद्बोधक व मनोरंजक पद्धतीनें आणि जोरदारपणें मांडला. आमचे गणिताचे मास्तर जर याच्या दशांश प्रमाणांत शिक्षणपटु असते, तर माझा गणितद्वेष इतका जाज्वल्य खात्रीनें राहिला नसता. डॉ. मथाई यांनीं लेखी भाषणाचें वाचन नाहीं केलें. फक्त टांचणांवरून दीड तासपर्यंत मोठें सयुक्तिक भाषण केलें.

सबंध दिवस बसून बसून कंटाळलेले सभासद त्यांचें भाषण अगदीं शांतपणें ऐकत होते. त्यांची जिज्ञासा सारखी वाढतच होती. इतक्या अप्रिय पक्षाचें इतक्या शिताफीनें त्यांनीं प्रतिपादन केलें !

श्री. षण्मुखम् चेट्टी, अर्थमंत्री, हेहि मोठे हुशार व तडफदार आहेत. त्यांची ' ओ ' ला ' वो ', ' ए ' ला ' ये ', ' अ ' ला ' एय ' म्हणण्याची दक्षिण भारतीय लकब कानांत भरते. ' ओन्ली ' ला ' वोन्ली ', ' एण्ड ' ला ' येण्ड ', ' अर्थ ' ला ' येअर्थ ' म्हणण्यांत ते श्री. अनंतशयनम् अय्यंगारांच्याच जातीचे आहेत. पण त्यांच्या बोलण्यांत एक प्रकारचा तडफदारपणा व मुद्देसूदपणा असतो. त्यांच्या मुद्द्यांना टोंक असतें. ते नुसतेच ' गोलमटोल ' ठोकळे नसतात.

डॉ. पट्टाभींचें मुलखमैदान वक्तृत्व या दरबारी वातावरणांत मोकळेपणानें आपली करामत दाखवूं शकत नाहीं. त्यांना अंमळ अवघडल्यासारखें व ओशाळल्यासारखें होत असावें.

या असेंब्लीची जागा पुरेशी मोठी नसल्यामुळें जवळ जवळ सर्वच वक्ते मायक्रोफोनवांचूनच बोलतात व त्यांचीं भाषणें चांगलीं ऐकूंहि येतात. या हॉलची व गॅलऱ्यांची रचना त्या दृष्टीनें फार सोयीची आहे.

तुझा,

दादा

१३९, कॉन्स्टिट्यूशन हाउस,
नवी दिल्ली,
१७-११-४७

प्रिय बच्चू,

परवां एक लांबलचक पत्र तुला पाठविलें, तें पोंचलेंच असेल. या खाळीला आमचा प्रवास कसा झाला, तें त्यावरून लक्षांत येईल.

दिल्लीची हवा फार चांगली आहे. ऑ. इं. कॉं. क. च्या प्रतिनिधींच्या गर्दीमुळें कॉन्स्टिट्यूशन हाउसमध्यें अव्यवस्था आणि गोंधळ यांचें साम्राज्य आहे. या अव्यवस्थेची जाणीव अर्थातच जेवणाच्या दालनांत सर्वांत जास्त होते. आपल्याइकडील प्रयोजनांत सर्वांत अधिक गोंगाट, गैरशिस्तपणा आणि गोंधळ भोजनप्रसंगींच करण्याची परंपरा आहे. तिचें रक्षण आम्ही सर्व मिळून मोठ्या हिरिरीनें व कसोशीनें करीत असतों आणि त्याच पवित्र पुराणपूत परंपरेला अनुसरून सारें खापर व्यवस्थापकांच्या माथीं फोडून मोकळे होत असतों. अन्नाचा प्रकार आणि त्याचें मूलद्रव्य फारसें चांगलें नसतें. त्यामुळें माझी जरा गैरसोय होते; पण तिचा वचपा स्नेही व परिचित मंडळी यांच्या संगतिसुखानें भरपूर निघतो. गर्दी कमी झाल्यानंतरहि जर जेवणांत सुधारणा दिसली नाहीं, तर परत राजनारायणकडे जाईन.

आन्नासाहेब, भीकूलाल, अप्पाजी गांधी आणि मार्तण्डराव जोग यांची सोबत आहे. * * * चे भगवंतराव देशमुखहि अनायासें दिल्ली पहायला आलेले आहेत. ऑ. इं. कॉं. क. च्या इतर सभासदांबरोबरहि अशींच दोन-दोन, चार-चार माणसें सहज आलीं आहेत आणि त्या सर्वांनीं कॉन्स्टिट्यूशन हाउसला वरपक्षाकडील वऱ्हाडी मंडळींचा जानवसा समजून त्याचा अपूर्व गौरव केला आहे. सर्वत्र आपलेंच घर समजण्याची जी ‘वसुधैव कुटुंबकम्’ वृत्ति आपल्या रक्तांत भिनली आहे, तिची ज्यांना कदर नाहीं, त्यांना यांत गबाळपणा, अजागळपणा, गैरशिस्तपणा दिसतो; पण मला वाटतें, ही आपल्या अनौपचारिक आणि अकृत्रिम जीवनाची दुसरी बाजू आहे!

· परवांपासून ऑ. इं. कॉ. क. ची बैठक कॉन्स्टिटयूशन क्लबमध्यें चालू आहे. प्रेक्षकांना बंदी असल्यामुळें आबासाहेबांची दिल्लीची खेप फुकटच गेली. मलाहि जातां आलें नाहीं. त्यामुळें विशेष कांहीं लिहितां येण्यासारखें नाहीं. कृपलानींनंतर अध्यक्ष कोण होणार, हा चर्चेचा विषय आहे. आजकाल 'खळबळ' 'सनसनी' ही अगदीं मामुली गोष्ट झालेली आहे. त्यामुळें ऑ. इं. कॉ. क. ची फारशी कोणी दखल घेत असल्याचें दिसत नाहीं. गांवांत कोठें खळबळ किंवा सनसनी दिसत नाहीं.

दिल्लीला हल्लीं शरणार्थींची गर्दी आहे. बिचारे पोळलेले आणि होरपळलेले आहेत. त्यांची वृत्ति शांत व समतोल कशी राहूं शकेल? पूर्वीच्या कोपिष्ट ब्राह्मणांच्या शीलाला अनुसरून दम भरून, तंबी देऊन, शिव्याशापांची पुष्पांजलि वाहून हक्कानें अन्न, आच्छादन व आश्रय या सोयींवर आपला आपत्तिसिद्ध हक्क सांगतात. त्यांच्या पीडाप्रेरित दुरुत्तरांना व कटुवचनांना आशीर्वाद व साधुवाद समजून सरकार, काँग्रेस व इतर परोपकारी माणसें मोठ्या तत्परतेनें त्यांना यथासंभव साहाय्य करीत आहेत.

आज स्वतंत्र भारताच्या सर्वसत्ताधीश असेंब्लीचें पहिलें अधिवेशन सुरू झालें. अजून 'स्वतंत्र' शब्द लक्षणेनें वापरलेला आहे. तो स्वातंत्र्याचा सूचक आहे, वाचक नव्हे. नवीन घटना अमलांत आली म्हणजे खऱ्या अर्थानें स्वतंत्र पार्लमेंट भरेल. पण, प्रत्यक्ष स्थितीच्या दृष्टीनें आजची असेंब्लीहि पूर्ण स्वतंत्र अशीच आहे. असेंब्लीचा उपक्रम गंभीर व उत्साहपूर्ण वातावरणांत झाला. माजी व्हॉइसरॉयांच्या 'बॉक्स' मध्यें राजाजी आपली मुलगी नम्मगिरी हिच्यासह येऊन बसले होते. सभेला सुरुवात राजेंद्रबाबूंनीं लहानसें भाषण करून केली आणि नंतर दादासाहेब मावळणकर बिनविरोध 'स्पीकर' म्हणून निवडून आल्याचें जाहीर केलें. पं. जवाहरलाल व सरदार वल्लभभाई यांनीं दादासाहेबांना अध्यक्षपीठावर नेऊन बसविलें. दादासाहेबांच्या अभिनंदनार्थ भाषण करतांना जवाहरलालजींनीं त्यांची मोजक्या शब्दांत यथार्थ पण भरपूर स्तुति केली. त्यांच्या निःपक्षपाती समतोल वृत्तीची, न्यायप्रियतेची आणि सौजन्याची सर्व पक्षांनीं प्रशंसा केली. "स्वतंत्र हिंदुस्थानच्या पहिल्या असेंब्लीचे आपल्याला अध्यक्ष

निवडलें याबद्दल मी त्या असेंब्लीचें अभिनंदन करतों. " हें वाक्य जवाहरलालजींनीं आपल्या भाषणाच्या आरंभीं व शेवटीं असें दोनदां उच्चारिलें.

कामकाज अगदींच रूक्ष व रटाळ स्वरूपाचें होतें. पण त्यावरहि मनोरंजक चर्चा झाली आणि गोविंद मालवीयांचें एक गरगरीत भाषण झालें. देशबंधु गुप्त आणि जयनारायण व्यास यांनींच काय तीं हिंदींत भाषणें केलीं. बाकी सारें काम इंग्रजींत. इंग्रजांची सत्ता गेल्यामुळें आतां इंग्रजीविषयींचा राग पार मावळला आहे !

आजची आमची सभा घटना-परिषदेच्या सभागृहांत न भरतां जुन्या असेंब्लीच्या सभागृहांत भरली होती. प्रेक्षकांच्या गॅलऱ्या जास्त मोकळ्या आहेत आणि फार उंचावर नाहींत. त्यामुळें सभेंत विरळपणाचा किंवा तुटकपणाचा भास होत नाहीं.

तुझा,
दादा

— ११ —

१२९, कॉन्स्टिट्यूशन हाउस,
नवी दिल्ली,
२३–११–४७

**प्रिय बच्चू ,**

आज कॉनॉट सर्कसच्या मैदानांत जरा वेळ आम्ही विसाव्याकरितां बसलों होतों. इतक्यांत तेथें एक वेडी आली. तीहि भारतमाता, सुभाषबाबू, जवाहरलाल, गांधी यांच्याविषयीं बोलत होती. त्या वेडीचीं कित्येक वाक्यें अगदीं मालकिणीच्या तोंडून ऐकायला मिळणाऱ्या वाक्यांसारखीं होतीं. इतरांना तिची कींव आली. मला ब्रह्मांड आठवलें !

आबासाहेब उद्यांच्या ग्रँड ट्रंकनें निघणार होते. पण उद्यां मुहर्रम असल्यामुळें कदाचित् स्टेशनावर सहज जाता येणार नाहीं अशी शंका

आल्यामुळें मी त्यांना परवां जाण्याचा आग्रह केला. अशी शंका येण्याचें मुख्य कारण दिल्लीला मुहर्रमचें नेहमींचें स्वरूप मुळींच दिसून येत नाहीं. मुहर्रम असल्याचा नुसता भास देखील होत नाहीं. ताबूत दिसत नाहींत, स्वाऱ्या नाहींत, वाघहि नाहींत. उत्सवांत नित्याची उत्सववृत्ति दिसली नाहीं म्हणजे चुकल्याचुकल्यासारखें वाटतें. शांतताहि—नव्हे स्तब्धता—मनाला खुपते. कांहीं तरी बिघडलें असल्याची जाणीव मनाला टोंचत राहते. तसें या वेळीं दिल्लीला वाटतें. मुहर्रमची उत्सववृत्ति कोठेंच आढळून येत नाहीं. साऱ्या देशांत एक प्रकारचें कृत्रिम स्तब्धतेचें आणि सतत स्फोटकोन्मुखतेचें वादळी, मलिन आणि भारावलेलें वातावरण आहे. अनेक शहरें दारूच्या कोठारासारखीं झालेलीं आहेत. दिल्ली म्हणजे राजधानीचें शहर. ती इतर साऱ्या नगऱ्यांची राणी. त्यामुळें तिच्या ठिकाणीं राणीचा तल्लखपणा, लहरीपणा आणि मिजासखोरपणा इतर नगऱ्यांच्या मानानें जास्त प्रमाणांत आढळतो. इतर शहरांतहि नेहमीं ठिणगी पडण्याचाच अवकाश असतो. तीं केव्हां पेट घेतील याचा नेम नसतो. पण दिल्ली राणीच्या डोळ्यांतून केव्हां ठिणगी पडेल आणि तिच्यामुळें केव्हां भडका उडेल, हें सांगतां येणें शक्य नाहीं. पांच मिनिटांपूर्वी शांत असलेलें वातावरण एकाएकीं क्षुब्ध होतें, दुकानें बंद होतात, साऱ्या दिल्लीनगरींत भीतियुक्त आणि संतापयुक्त खळबळ होऊन जाते !

आज आम्ही चांदणी चौकांत जायला निघालों. रस्त्यांत कॉनॉट सर्कस-मध्यें एकजण म्हणाला, 'शहरांत जायचं असेल तर संभाळून जा. शहरांत दंगा आहे.' तरी आबासाहेब, अप्पाजी पाठक आणि मंडलोईसाहेब या तिघांच्या जिवावर मी गेलोंच. कोठें कांहीं नव्हतें. चांदणी चौकांत खाद्यपदार्थांचीं दुकानें, खोमचे, ठेले, गाड्या इत्यादिखेरीज करून इतर सर्व दुकानें रविवारमुळें बंद होतीं. पण रविवार संध्याकाळ असल्या-मुळेंच लोकांची खूप गर्दी होती. चाट, टिकिया, पुलाव, पकोडी, कचोडी इत्यादि वस्तूंचा 'मजा' चाखण्यांत लोक गर्क होते. आम्ही आबा-साहेबांच्या भाच्याकरितां घंटेवाल्याच्या दुकानांतून खाऊ घेतला आणि स्टेशनकडे वळलों. पार्कमध्यें एक गृहस्थ भेटला. म्हणाला, 'आतां घंटा-घराजवळ 'झगडा' झाला. पोलिसांनीं गोळीबार केला. लोक धूम पळत

आहेत ! ' पुढें गेलों तों दुसरा म्हणाला, ' कर्फ्यू लागू झाला आहे. मोठीच ' गडबड ' आहे. ' पण कोणाच्याच वागण्यांत किंवा बोलण्यांत घाबरटपणा किंवा भेदरल्याचें चिन्ह दिसेना. रस्त्यांत बायका, मुलें, म्हातारे बेफिकीर हिंडत होतीं, पार्कात खेळत होतीं, ' खोमच्या ' जवळ ' चाट ' चाटीत होती. स्टेशनवरहि सारे व्यवहार नित्याप्रमाणें चालले होते. पण ' झगडा हो गया, ' ' कर्फ्यू हो गया, ' ' शहरमें बडी गडबड है 'च्या आरोळ्या मधून मधून ऐकूं येत होत्या. टांगेवाल्यांची पोळी पिकली. टॅक्सीवाल्यांना फावले. कॉनॉट सर्कसपर्यंत जाण्याकरितां चौपट पांचपट पैसे आमच्याजवळ मागूं लागले. मोठ्या शिताफीनें भीतियुक्त प्रक्षुब्ध वातावरणाचा फायदा ते घेऊं लागले. आम्हीहि अंमळ गोंधळलों, घोटाळलों. पण अव्वाच्या सव्वा पैसे देण्याची तयारी नव्हती आमची. पांच मैल पायींच चालण्याचा निश्चय केला. इतक्यांत ओखल्याची बस मिळाली. कसेबसे आंत शिरलों. नव्या दिल्लींत येऊन पोंचलों. रस्त्यांत चांदणी चौकांत ' फवाऱ्या 'जवळ, पीपलवाले महादेवजीजवळ, दारागंजांत, कोठेंच गडबड दिसली नाहीं. प्रक्षोभ होता, घाबरटपणा होता, खळबळ होती, पण सारे व्यवहार चालूच होते ! तरी पण गडबड झाल्याची बातमी नुसती हूल नव्हती. तिच्यांत बराच तथ्यांश होता. पण एखाद्या राजाच्या आवडत्या राणीप्रमाणें दिल्ली राणीचा हा आतां देहस्वभावच झाला असल्यामुळें चाणाक्ष व्यापारी व व्यवसायी परिस्थितीचा फायदा मोठ्या कौशल्यानें घेतात आणि सामान्य लोक प्रक्षुब्धतेकडे फारसें लक्ष देत नाहींत.

आबासाहेबांबरोबर मीहि येण्याचा बेत केला होता. कारण प्रांतिक असेंब्लीच्या सदस्यांनीं आतां या असेंब्लींत राहूं नये असें पक्षनेत्यानें सुचविलें आणि पक्षसभेंत त्याला कोणी विरोध केला नाहीं. जेथें आपल्या रहाण्याची गरज नाहीं, किंबहुना जेथें न राहणेंच श्रेयस्कर मानलें जातें, तेथें क्षणभरहि राहणें मला कमीपणाचें व गौण वाटतें. म्हणून आतां तावडतोब येथून कूच करण्याचें मीं ठरविलें. येथें राहण्यांत मोह व लोभ यांचा आरोप येण्याचाहि सकारण संभव मला दिसला. जेथें राहण्यांत गौणत्व येत असेल, तेथें राहणें माझ्या वृत्तीला खपणेंच शक्य नाहीं. म्हणून मी लागलीच निघून येणार होतों. माझ्यापुरतें तेंच योग्यहि झालें असतें.

पण हा प्रश्न वैयक्तिक स्वरूपाचा किंवा नुसता भावनेचा नाहीं. घटना-परिषदेंत तर प्रांतिक असेंब्ली सदस्यांनीं हजर राहावें अशी अपेक्षा आहे. कारण घटना-परिषद राष्ट्राच्या आयुष्यांत एकदांच भरत असते. म्हणून सामान्य कायदेमंडळाचे नियम, संकेत व प्रघात तिला लागू होत नाहींत. मला वाटतें, घटना-परिषदेलाच कायदेमंडळाचें स्वरूप देणें हाहि एक अगदींच अपूर्व आणि अपवादभूत उपक्रम आहे. ही गोष्टहि एकदांच होऊं शकते. ती ठराविक मुदतीपुरती एक प्रकारचा आपद्धर्म म्हणून पतकरलेली आहे. तेव्हां तिच्या बाबतींत सामान्य कायदेमंडळाचे शिष्ट संकेत किंवा रूढ प्रघात लागू करणेंहि प्रशस्त नाहीं. त्यामुळें कांहीं प्रांतांचे खरे प्रतिनिधी बाद होतील आणि त्या प्रांतांतर्फे निवडून आलेले अन्य-प्रांतीय प्रांत-प्रतिनिधी म्हणून राहतील. हरिजनांचे कदाचित् फार थोडे प्रतिनिधी उरतील. ज्यांनीं कांहीं ठराव, बिलें किंवा उपसूचना दिल्या असतील, त्यांच्या बाबतींत अपवाद करावा लागेल. ज्यांना आपापल्या क्षेत्रांतील नित्याचीं कामें संभाळून येथील अनुभवाचा लाभ घेतां येणें शक्य असेल, त्यांनाहि कोडगेपणाचा आरोप टाळण्याकरितां परत जावें लागेल. अशा रीतीनें केवळ रूढिप्रियतेमुळें अनेक गुंतागुंतीचे प्रश्न उत्पन्न होतात.

कांहीं मंडळी या प्रश्नांचा निकाल लावून घेणार आहेत. कांहीं रूढिवाद्यांनींहि या मुद्द्यांत बराच अर्थ असल्याचें कबूल केलें आहे. ज्यांचे ठराव व उपसूचना आहेत त्यांनाहि आपला पक्ष नेत्यापुढें मांडायचा आहे. म्हणून त्यांनीं मला घाई न करण्याची सूचना केली आहे. चारचौघांत राहावें लागतें, त्यामुळें कांहीं दिवस वाट पाहाणें प्राप्त आहे. एरवीं आतां येथें राहण्यांत शोभाहि नाहीं, गोडीहि नाहीं—तात्त्विक मुद्द्यावरच धोरण बदललें तर गोष्ट वेगळी !

दुहेरी सदस्यत्व एकंदरींत अप्रशस्त व कार्यनिष्ठेंत व्यत्यय आणणारें असें प्रत्यवायात्मक मानलें जावें, हा परिपाठ कोणालाहि पटण्याजोगा आणि इष्टच आहे. पण घटनासमितीच्या बाबतींत अपवाद करणें कार्यसिद्धीच्या दृष्टीनेंच आवश्यक वाटलें. घटनासमितीचेंच रूपांतर कायदेमंडळांत झाल्या-नंतर या अपूर्व कायदेमंडळालाहि अपवाद म्हणून तोच न्याय लागू व्हावा, असें श्री. हरिभाऊ पाटसकर आणि इतर कांहीं सदस्य यांस वाटतें. कारण

जुनें कायदेमंडळ विलीन झाल्यामुळें आतां निरनिराळ्या प्रांतांना रीतसर प्रातिनिधित्व लाभण्याचा दुसरा मार्ग नाहीं. या मुद्द्याचा निकाल दोन चार दिवसांत लागेल. तोंपर्यंत वाट पाहाण्याचें ठरलें आहे.

आज ११ वाजतां सकाळीं प्लाझांत ‘ सम्राट् अशोक ’ या नवीन बोल-पटाचें उद्‌घाटन झालें. घटनासमितीच्या सदस्यांना व इतर पुढाऱ्यांना निमंत्रण होतें. राजेंद्रबाबू, बाबासाहेब आंबेडकर, दादासाहेब मावळणकरहि हजर होते.

बोलपट कांहीं डोक्यांत, कानांत अगर मनांतहि भरण्यासारखा नाहीं. मी कांहीं निढावलेला ‘ सिनेमाखोर ’ माणूस नाहीं. माझें अंतःकरण त्या बाबतींत निगरगट्ट झालेलें नाहीं. सिनेमांतील उदात्त अगर करुण दृश्यांचा ठसा माझ्या मनावर सहज उमटतो. पण कथानक, संविधानक, संभाषणें, आवाज, दृश्यें—या कुठल्याच दृष्टीनें या बोलपटानें हृदयाला चटका लावला नाहीं.

२४-११-४७

काल दिल्लीचें वातावरण ज्या प्रकारामुळें तापलें होतें त्याची हकीकत आज समजली. पुल बंगश नांवाच्या भागांत एका शीखानें एका मुसल-मानाच्या घराचा ताबा घेण्याचा प्रयत्न केला. झटापटींत पांच माणसें (मुसलमान) ठार झालीं. अफवा उठली, कीं हिंदू ठार झाले. चांदणी-चौकांत दोनचार मुसलमानांना भोंसकण्यांत आलें. लष्करी पहाऱ्यांत कांहीं मुसलमान चांदणीचौकांतील आपल्या दुकानांचा ताबा घेण्यास आले. लष्करच्या लॉरीवर दगड फेकण्यांत आले. शिपायांनीं गोळीबार केला. सगळ्या शहराचें वातावरण गरम झालें. प्रक्षोभसुलभ आळींत कर्फ्यू ‘जारी’ झाला. दिल्लीची ही अशी लहरी ‘ तब्येत ’ आहे. जुन्या मशिदी, दर्गे इत्यादि ठिकाणीं कोळश्यानें किंवा खडूनें अथवा शाईनें शिवमंदिर, धर्म-मंदिर, राममंदिर इत्यादि अक्षरें काढलेलीं असून त्यावर शिखाधारी व्यक्तींचा ताबा आहे. कॉनॉट सर्कसमधील पेव्हमेंटवरील दुकानावर व इतर दुकानांवर ‘ हिंदु दुकान ’ ‘ हिंदु शॉप ’ असें लिहिलेलें आहे. ‘ काबीज करणें ’ हें हल्लीं दिल्लींत आलेल्या अभ्यागतांचें धोरण दिसतें.

पण दिल्लीला ‘ अंधेरनगरी ’ झाली तर काश्मीरवर परिणाम काय होईल, याचा विचार करण्याइतका विवेक कोणांतच शिल्लक राहिलेला नाहीं.

श्री. हरिभाऊ पाटसकर यांच्या सूचनेवरून त्यांच्या पत्राचा निकाल लागेपर्यंत थांबण्याचें ठरलें आहे. एकट्यानेंच आपल्यापुरतें वागणें इष्ट नाहीं असें पाटसकरांचें म्हणणें पडलें.

आम्ही आपापल्या प्रांतांत परत जावें असेंच सरदारांचेंहि मत आहे. शुक्लजींनीं त्यांना विचारलें. जवाहरलाल आणि सरदार यांचें संयुक्त व्यक्तित्व म्हणजेच आजचें प्रभावी आणि जोमदार नेतृत्व. त्या दोघांचे गुण परस्परपूरक आहेत आणि दोघांचेंहि कर्तृत्व एकमेकांना पोषक आहे. इतर बाबींप्रमाणेंच याहि बाबतींत दोघांचेंहि एकमत आहे. तरी पण पाटसकरप्रभृति मित्रांचा सल्ला मानणें प्राप्त आहे. आणखी चार दिवस वाट पाहूं.

तुझा,

दादा

— १२ —

१३९, कॉन्स्टिट्यूशन हाउस,
नवी दिल्ली,
२५-११-४७

प्रिय बच्चू,

आज आबासाहेब जाणार म्हणून ते पूज्य बापूंचा निरोप घ्यायला जाऊन आले. मंडलोईसाहेब, अप्पाजी पाठक व मी बरोबर होतों. काल पूज्य बापूंचा ‘ मौन दिन ’ असल्यामुळें त्यांचें लेखी भाषण डॉ. सुशीला नायर यांनीं वाचून दाखविलें. त्यांच्या हृदयाला पडत असलेला पीळ त्या भाषणांत प्रकट झालेला होता. शीखांची फार कडक आणि कळकळीच्या भाषेंत कान-उघाडणी केली. ‘ अप्रियस्यच पथ्यस्य वक्ता ’ होण्याचा अधिकार त्यांनीं

प्रदीर्घ सेवेनें आणि निरपेक्ष प्रेमदानानें संपादन केलेला आहे. 'लोकानुरंजन' करणारा हा लोकप्रतिनिधि शासक किंवा लोकमतानुवर्ती राजा नव्हे. तो लोकहिताचें अनुसंधान ठेवून लोकांना हितबोध करणारा आणि त्यांच्याशीं हुज्जत घालून त्यांना प्रबोध करणारा राष्ट्रपुरुष आहे, दीप्ति आहे आणि तरवारीच्या धारेची तीक्ष्णताहि आहे. त्याची भूमिका रामाचीहि नाहीं आणि भीष्म–द्रोणांचीहि नाहीं.

प्रार्थनेनंतर बापू अर्धा तास फिरतात. त्यानंतर खोलींत येतात. आम्ही त्यांच्या खोलींत त्यांची वाट बघत बसतों. त्याप्रमाणें कालहि बसलों. बापू येतांच त्यांना प्रणाम केला आणि पांच मिनिटांतच निरोप घेतला. बोलायचें नव्हतेंच. दुहेरी सदस्यत्व निषिद्ध मानलें गेल्यामुळें मीहि लवकरच जाईन असें त्यांस सांगितलें. 'जाण्यापूर्वी भेटून जा' इतकेंच त्यांनीं नेहमींप्रमाणें सांगितलें.

परत येतांना एक गंमत झाली. स्वामीदत्त नांवाचा एक उत्तर भारतीय ब्राह्मण तरुण भेटला. बिचारा संस्कृत 'पढलेला' आहे. इकडे–तिकडे पुराण प्रवचनें करून व्यासवृत्तीनें निर्वाह करण्याचा प्रयत्न करून करून थकला. आतां वृत्तीच्या शोधार्थ मुलूखभर हिंडत आहे. शिक्षणखात्यांत कोठें तरी संस्कृताच्या अध्यापकाची जागा मिळाली तर पाहावी म्हणून निघाला. 'मरता क्या नहीं करता?' मृत्यूची छाया दिसूं लागली म्हणजे प्राण हेच विश्वासांतलें अंतिम व श्रेष्ठतम् मूल्य वाटतें. जीव वांचविण्याकरितां हवें तें धाडस व पाप करायला माणूस तयार होतो. त्याला विवेक सुचत नाहीं, तत्त्वज्ञान रुचत नाहीं आणि उपदेश पचत नाहीं. 'आधीं प्राणधारणा, मग सारें कांहीं' असें त्याला वाटतें. स्वामीदत्त म्हणाला, "पोट रिकामें असलें म्हणजे विचार पोटाच्या पोकळींतच घोळत राहतात, ते मेंदूपर्यंत पोंचतच नाहींत, जठराग्नींत जळून भस्मसात् होतात, त्यांची राखदेखील बाहेर दिसत नाहीं!" स्वामीदत्त ब्रह्मज्ञान बोलला. श्वेतकेतूला छांदोग्यांत त्याच्या बापानें सिद्धान्त सांगितला, 'अन्नमयंहि सोम्यमनः' ...'अरे, मन हें अन्नमय आहे!' त्या औपनिषद् सिद्धान्ताचा जळजळीत प्रत्यय क्षुधादग्ध स्वामीदत्ताला येत होता. स्वामीदत्त अन्नब्रह्माच्या शोधाकरितां निघाला होता. संकोच, लाज, सभ्यता, यांची त्याला दरकार

नव्हती. जेथें जेथें अन्नाची किल्ली असेल तेथें तेथें बेधडक जावें, हेंच त्याला माहीत. तो सरदारांकडे गेला, तो जवाहरलालांकडे गेला–त्यांना भेटला. त्यांच्यासमोर केवढाले प्रश्न आहेत. पण त्याच्यासमोर तर क्षुधाच बकासुराएवढें अक्राळविक्राळ रूप धारण करून उभी होती. त्या राक्षसीच्या भयंकर जबड्यांत इतर सारे प्रश्न गडप झालेले होते.

तो राजेंद्रबाबूंकडे गेला. तेथें मानवाला मानव भेटला! मीं म्हटलें, “आजीबाईच्या गोष्टींत हत्तिणीनें गोंवऱ्या वेंचणाराला माळ घातली म्हणजे तोहि गादीवर बसे. राजेंद्रबाबू सामान्य माणसांच्या जातीचा आहे. सामान्य माणसाचें दुःख जाणून घ्यायला त्याला ‘ त्याच्या वंशाला ’ जावें लागत नाहीं. तो ‘ गोंवऱ्यावेंच्या ’ नसला तरी त्या जातीचा आहे.”

‘ तो शिवाजी राजा झाला ’–कोणता शिवाजी? याचीं अनेक उत्तरें आहेत. पण तो राजेंद्र राजा झाला!–कोणता राजेंद्र?–एकच उत्तर आहे. तो राजेंद्र जो राजा होऊनहि माणसांतून उठला नाहीं. ज्यानें राजवेषाचें ग्रहणहि सहज केलें आणि त्यागहि सहज केला. कोणचा राजेंद्र? जो राजा असूनहि माणूसच राहिला तो. राजेंद्रबाबूंनीं केवळ करुणा म्हणून स्वामीदत्ताला स्वदस्तुरचें पत्र दिलें आणि त्याला ना. संपूर्णानंदांकडे जायला सांगितलें. दानवृत्तींत पात्रापात्राचा विवेक असतो. करुणेच्या ओघांत विवेक टिकत नाहीं. ‘ His pity gave ere charity began ’ ‘ धर्मराज ’ या नांवांत ‘ धर्म ’ व ‘ राज्य ’ यांची युति आहे. ‘ धर्मराज ’ हा ‘ युधिष्ठिर ’-हि होता. राजेंद्रबाबूंच्या नांवांत ‘ राजा ’हि आहे आणि ‘ इंद्र ’हि आहे. पण त्यांच्या आचरणांत धर्म आहे आणि ‘ राजत्व ’ आहे. ‘ राजा आदमी ’ म्हणजे दिलदार माणूस, उमदा माणूस, थोर मनाचा माणूस. अन्नाध्यक्ष म्हणून अन्नदान करण्याची त्यांची वृत्ति. अन्नदानाला पात्रापात्र पाहावें लागत नाहीं. ‘ रिकामें पोट ’ अन्नदानाला अगदीं योग्य ‘ पात्र ’ ठरतें. म्हणून त्यांनीं स्वामीदत्ताला अन्नप्राप्तीचें तिकिट दिलें. हा अन्नदाता आतां राष्ट्रसभाध्यक्ष झालेला आहे.

स्वामीदत्त दिवसभर रखडून थकलेला होता. त्याला जुन्या दिल्लीची वाट सुचेना. रात्रीं सगळीकडे कर्फ्यूचा अंमल होता. कांहीं भागांत तर

चोवीस तासांचा कर्फ्यू आहे. बिचारा गोंधळला होता. पण भुकेनें त्याच्या बुद्धीचें खोबरें करून खाल्लें होतें. तो त्या स्थितींतहि तत्त्वज्ञान बोलत होता. त्याची बुद्धि स्वस्थ नव्हती. तो ' अर्धवट ' बनलेला होता. आजच्या विषम परिस्थितींत जीवनार्थ सतत धडपडणाऱ्या मध्यम वर्गाचा, त्यांतल्या बुद्धिजीवी वर्गाचा प्रतिनिधि होता. या वर्गाच्या प्रक्रियेला आरंभ झालेला आहे. द्रव्यजीवी वर्ग सत्ताधिष्ठित आहे. त्याची चंगळ आहे. श्रमजीवीवर्ग सत्तोन्मुख आहे. त्याला सत्तेचे व अधिकाराचे डोहाळे लागलेले आहेत. बुद्धिजीवी वर्गाच्या गोंवऱ्या ओंकारेश्वराला गेल्या आहेत. त्याची बुद्धिशक्ति बारगळूं लागलेली आहे. विक्षिप्त, क्षुधार्त, अन्नवेडा स्वामीदत्त त्या वर्गाचा प्रतिनिधि आहे. तो ' पांथस्थ ' आहे. अगदीं ' रस्त्यावरला जीव ' ( on the streets ) आहे.

काल बसगाड्या, टांगे इत्यादि सारीं वाहनें जुन्या दिल्लींत रात्रीं जायला तयार नव्हतीं. आबासाहेब व अप्पाजी पाठक यांनीं स्वामीदत्ताला बसनें पाठविण्याचा प्रयत्न केला, पण तो साधणें शक्यच नव्हतें. म्हणून त्यांनीं त्याला आपल्या बरोबर जेवूं घातलें आणि आमच्या खोलींत परत आणलें. तेथें आम्ही त्याला अंथरूण व पांघरूण दिलें. मी त्याला तसें आश्वासन दिलें होतें. हा आमचा ' अतिथि ' सकाळीं पुन्हां ' पांथस्थ ' झाला. त्याचा ' अन्नसाधना 'चा शोध पुन्हां अव्याहत सुरू झाला !

दिल्लीचें वातावरण अजून अशांतच आहे. दिल्लींत स्वायत्त शांतता कायम रहाणें काश्मीरच्या व हैदराबादच्या प्रश्नाच्या दृष्टीनें किती महत्त्वाचें आहे, याची जाणीव कोणालाच नाहीं. उन्माद आणि आवेश यांनीं जबाबदारीची जाणीव आणि विवेक यांचा मागमूसहि उरूं दिलेला नाहीं.

तुझा,

दादा

ता. क.—कालच्या पत्रांत मीं लिहिलें, कीं आमचें प्रभावी व संभावित नेतृत्व सरदार-जवाहर यांच्या संयुक्त व्यक्तित्वानें निष्पन्न झालेलें आहे. त्याची प्रचीति आज पुन्हां आली. प्रश्नोत्तरांच्या वेळीं नाजुक व

गुंतागुंतीच्या प्रश्नांची सरदारांनीं मोठी रोखठोक व सडेतोड पण मोठीं कुशल उत्तरें दिलीं. "आमची राजनीति दुबळी नाहीं." "हैदराबाद आपल्या देशांतील सर्वांत मोठें संस्थान आहे. त्या संस्थानचा प्रश्न समाधान-कारक रीतीनें सुटला तर त्यांत आपल्या राज्याचा फायदा आहे. म्हणून हा प्रश्न नाजुकपणें, चातुर्यानें व शांतपणानें हाताळला पाहिजे." "इत्ते-हादुलमुसलमीन"च्या पुढाऱ्याला मी तर बोलावलें नव्हतें! ना. सदस्यांची तशी इच्छा असल्यास त्यांना मी आमंत्रणें देईन." अशीं अनेक विनोद-गर्भ दृढतेचीं उत्तरें सरदारांनीं दिलीं. त्या उत्तरांत एक प्रकारचा विनोद होता, पण गंभीर सामर्थ्यभावना मुख्य होती.

जवाहरलालांनीं काश्मीरबद्दल आपलें निवेदन वाचून दाखविलें. त्यांत भाषासौंदर्य तर होतेंच, भावनांचा उद्रेक होता, आर्यतेची आभा होती आणि विनययुक्त आत्मप्रत्ययाची लकेर होती. पाकिस्तान सरकारवर असंदिग्ध पण शिष्ट भाषेंत गंभीर आरोप होते. 'काश्मीरमध्यें आम्ही जें केलें त्याचा जाब मी जगासमोर द्यायला केव्हांहि तयार आहें.' असे उद्गार त्यांनीं काढले. आपला पक्ष सत्पक्ष, या जाणिवेनें त्यांच्या त्या वीरोचित भाषेंत सात्त्विकतेची छटा उमटली होती.

वल्लभ-जवाहर युतीच या वेळीं आमच्या भाग्योदयाची अग्रदूती होणार आहे.

आज रेल्वे बजेटवर चर्चा चालू आहे. रेल्वे-प्रवासाच्या कष्टाची करुण-कथा सांगण्याचा क्रम सुरू आहे. आत्तांच आबासाहेबांना स्टेशनवर पोंचविलें. पण ग्रँड ट्रंक गाडीच आली नव्हती. ती सहा तास उशीरां येणार आहे. जी गाडी येते तीच परत जाते. गाड्यांची आणि एंजिनांची इतकी टंचाई आहे. एवढ्या लांबच्या प्रवासाकरितांहि दोन गाड्यांपेक्षां अधिक गाड्या ठेवतां येत नाहींत. आबासाहेबांची गाडी संध्याकाळीं ६ नंतर येणार आणि त्यानंतर शक्य तितक्या लवकर जाणार.

रेल्वे स्टेशनावरहि दिल्लीच्या परिस्थितीचें दर्शन झालेंच. आपल्या प्रांतांतील जुने प्रसिद्ध कायदेपंडित, आमच्या वडिलांचे व शुक्लजींचे सहाध्यायी, दद्दाजी (पं. सीताचरण) दुबे प्लॅटफॉर्मवर भेटले. त्यांनीं दाढी

काढून टाकल्यामुळें त्यांना ओळखायला क्षणभर वेळ लागला. दद्दाजी म्हणाले, " ओळखलेंत मला तुम्हीं? मीं दाढीला रजा दिली. नाहीं तर दाढीपायीं मुंडी देण्याची पाळी आली असती!"

स्टेशनवर सर्वत्र आश्रयार्थी पसरलेले आहेत. तेथेंच राहातात, तेथेंच स्वयंपाक करतात, तेथेंच जेवतात व झोपतात. ज्यांना अशा स्थितींत राहावें लागतें त्यांना सभ्यतेची दरकार कशी राहाणार? आश्रयार्थी हा एक फार मोठा प्रश्न होऊन बसला आहे. त्यानें घराबाहेर घरंदाजपणालाहि रजा दिलेली आहे. त्याच्या कुलाबरोबर त्याची कुलीनताहि गेली. त्यानें दिल्ली-करांना जीव नकोसा करून सोडलेला आहे. तो स्वतःला ' शरणार्थी ' किंवा ' आश्रयार्थी ' म्हणवून घेण्यास तयार नाहीं. तो म्हणतो मला ' पंजाब-पीडित ' म्हणा. त्याचें ' माथें फिरलें ' आहे. त्याच्या ठिकाणीं मुलुख-गिरीच्या वृत्तीचा संचार झालेला आहे. या शरणार्थींनीं जर आपल्या उन्मादाला आळा घातला नाहीं, तर राजधानीची धडगत नाहीं. जेथें जेथें अन्नाचा सांठा असेल तेथें तेथें भुकेचा हक्क आहे, हें तत्त्व त्यांनीं आश्रयाला लागू केलें आहे. जेथें जेथें जागा असेल तेथें तेथें तर ते आपला हक्क सांगतातच. पण जेथें मुसलमानांची जागा असेल, तिच्यावरहि ते आपला हक्क सांगतात. म्हणून ' आश्रयार्थी ' हा एक आपत्तिकारक प्रश्न होऊन बसला आहे.

तुझा,

दादा

दिल्ली,
२६-११-४७

प्रिय बच्चू,

काल तुला पत्र लिहिल्यानंतर संध्याकाळीं राजनारायणकडे राहायला गेलों. येथें आणखी दोनचार दिवसच राहण्याचा प्रश्न होता. पण पोटाचा विकार कांहीं केल्या काबूंत येईना. आहार कमी करून किंवा लंघन करूनच प्रकृति सांभाळावी लागे म्हणून राजनारायणकडे जाण्याचा विचार ठरविला. परंतु वस्तुतः मला कॉन्स्टिटयूशन हाउसमध्येंच जास्त मोकळें व प्रशस्त वाटतें. तेथें स्वातंत्र्य आहे आणि सोबतहि आहे. जेवणाच्या दिवाणखान्यांतहि मोटी मौज वाटते. कॉन्स्टिटयूशन हाउसच्या जीवनांत मित्रांचा सहवास आणि वैयक्तिक स्वातंत्र्य यांचा सुंदर समन्वय आहे. शारीरिक सुखसोयींत फारशी उणीव भासत नाहीं. पण ज्याला पथ्य पाळायचें असेल किंवा साधारण बऱ्या आहाराची गरज असेल त्याला आरोग्याचें मोल द्यावें लागतें.

तरी पण एकंदरींत कॉन्स्टिटयूशन हाउसमध्येंच मन अधिक रमतें. कोणाच्या घरीं किंवा कुटुंबांत आतां राहावेसें वाटत नाहीं. राजनारायण अतिशय प्रेमळ व अगत्यशील आहे. तो व्यवस्थेंत कोणताहि दोष उरूं देत नाहीं. मला असेंब्लींत स्वतः पोंचवून देतो. त्याच्या घरीं पथ्याची सोय व इतर सर्व व्यवस्था अगदीं उत्कृष्ट आहे. राजनारायणचें सौजन्य व विनयशीलता हीं वाखाणण्यासारखीं आहेत. पण माझी वृत्तिच निराळी बनलेली आहे. मी गर्दींतच वाढलों आहें. गर्दींतच जगतों. मला गर्दींतच काम सुचतें. त्यामुळें कॉन्स्टिटयूशन हाउसमध्यें मला जितकें करमतें तितकें राजनारायणच्या घरीं, हल्लीं तो एकटाच असला तरी—करमत नाहीं.

आज यमुनेच्या वाळवंटांत सहल केली. यमुनेची माती पाहून तुमच्या आईची आठवण झाली. तिला ती माती फार आवडते! अखेर, वैष्णवाचीच मुलगी ती!

काल व आज दिल्लींत शांतता होती. फारशी गडबड झाली नाहीं. परिस्थिति अशीच राहिल्यास सर्व व्यवहार सुरळीत चालतील. अगदीं अनपेक्षितपणें आज रावसाहेब पटवर्धनांची गांठ पडली. फार आनंद झाला. त्यांचा व माझा स्नेहसंबंध जुनाच आहे. ते काश्मीरला उद्यां सकाळीं जात आहेत. समाजवादी पुढाऱ्यांच्या ताज्या दमाचा, साजुक विचारांचा आणि संक्रामक उत्साहाचा देशाला जितका लाभ मिळेल तितका हवाच आहे.

तुझा,
दादा

— १४ —

नवी दिल्ली,
ता. २७-११-४७

प्रिय गंपू,

काल संध्याकाळीं अंदाजपत्रक सादर झालें. फडणीस ना. षण्मुखम् चेट्टी यांनीं आपलें भाषण खणखणीत व स्पष्ट आवाजांत मोठ्या आकर्षक रीतीनें वाचून दाखविलें. त्यांच्या भाषण करण्याच्या शैलींत तडफ आणि स्पष्टपणा आहे. एकंदरींत भाषण भरीव स्वरूपाचें आणि योग्यतापूर्ण होतें. पण ना. चेट्टींचें 'येळकोट' कांहीं पूर्णपणें गेलेलें नाहीं. गृहस्थ जीर्णमतवादी आहेत. त्यांचा जुनाटपणा या भाषणांतहि मधून मधून डोकवावयाचाच. 'खाजगी मालकी'चा पुरस्कार, 'संमिश्र अर्थ-शास्त्रा'चें प्रतिपादन, हिंदी स्वातंत्र्यप्राप्तीचें सारें श्रेय आंतरराष्ट्रीय परिस्थितीला व ब्रिटिशांच्या आत्मत्यागाला देण्याची वृत्ति—या सर्व गोष्टी पुराणमतवादाला शोभण्यासारख्याच होत्या.

आज हरिभाऊ पाटसकरांचा भाषावर प्रांताचा ठराव येणार होता. तो पंतप्रधानांच्या आश्वासनानंतर परत घेण्यांत आला. डॉ. पट्टाभींच्या

' मिलिशिया ' च्या ठरावावर मोठ्या उच्च स्वरांत रटाळ भाषणें झालीं. ठराव सर्वानुमतें मंजूर होणार हें निश्चित. तो झालाहि पाहिजे आणि त्याची अंमलबजावणीहि ताबडतोब झाली पाहिजे. ' नान्यः पन्था विद्यते । '

तुझा,

दादा

— १५ —

नवी दिल्ली,
२९-११-४७

प्रिय गंपू,

असेंब्लींत आज शरणार्थींचा प्रश्न आहे. त्यामुळें प्रेक्षकांची गर्दी आहे. समाजवादी मित्र आतांपर्यंत असेंब्लीकडे ढुंकूनहि पाहात नसत. पण त्यांची लोककल्याणाची कळकळ इतकी प्रबल आहे, कीं शरणार्थींच्या प्रश्नावरील चर्चा ऐकायला रावसाहेब पटवर्धनहि आले. ते एव्हांना काश्मीरांत असते. पण स्वतः शेखसाहेबच हल्लीं दिल्लींत असल्यामुळें ते शेखसाहेबांबरोबर जातील. शेखसाहेबांनीं काश्मीरमध्यें जें विलक्षण कार्य केलें, त्याची स्तुति सर्वांच्या तोंडून ऐकायला मिळते. काल बाबासाहेब देशपांडे (श्री. पी. वाय्.) व अप्पाजी पाठक यांचे एक मित्र श्री आर. एल. राव यांच्याकडे चहाला गेलों होतों. हे गृहस्थ नुकतेच काश्मीरला जाऊन आले. ते म्हणत होते, कीं प्रमुख शहरांचे बाजार अजून पूर्ववत् मालानें व लोकांनीं गजबजलेले आहेत. सारा माल भरपूर व स्वस्त मिळतो. त्यांनींहि शेखसाहेबांची तारीफ केली.

रावसाहेब पटवर्धनांबरोबर श्री. अप्पासाहेब पंत व बाळकृष्णपंत शिखरेहि भेटले. दोघांची भेट बरेच दिवसांनीं झाली.

आज शरणार्थींच्या प्रश्नावरील चर्चा रंगत आहे. दिवाण चमनलाल यांचें पाणीदार व कळकळीचें भाषण झालें. अलीकडे दादा (आचार्य)

कृपलानी व सुचेता दीदी असेंब्लींत येत नाहींत, पण आज सुचेताबाईहि आल्या आणि त्यांनीं आपलें पहिलें भाषण केलें. भाषणांत सहजता होती. त्या अनुभवजन्य ज्ञानाच्या प्रत्ययानें बोलल्या. त्या बोलल्याच–त्यांनीं व्याख्यान नाहीं दिलें.

डॉ. पट्टाभि बोलले. पण त्यांच्या वक्तृत्वाच्या विलासाला असेंब्लीचें सभागृह अनुरूप नाहीं. येथें त्यांचें वक्तृत्व विशेष खुलत नाहीं. शरणार्थींचा प्रश्नच इतका निकडीचा व जिव्हाळ्याचा आहे, कीं त्यावर बरींच भाषणें होणें स्वाभाविकच आहे. बऱ्याच विधायक सूचना करण्यांत येत आहेत.

तुझा,
दादा

## — १६ —

नवी दिल्ली,
३०-११-४७

प्रिय बच्चू,

काल दुपारीं २–३० ला पार्लमेंटमध्यें सरदारांनीं हैदराबादविषयीं कैफियत सादर केली. सरदारांचेंच निवेदन तें. त्यांत जवाहरलालांच्या निवेदनांतील साहित्यिक सौष्ठव किंवा कलात्मकता नव्हती. अगदीं सीधें, सरळ, खरें खडतर निवेदन होतें. पण शिपाईगड्याचा फटकळपणा किंवा भरमसाट मनमोकळेपणाहि त्यांत नव्हता. त्यांत मुत्सद्द्याची सावधगिरी आणि दक्षता भरपूर होती. पांच-दहा मिनिटांतच निवेदन वाचून झालें.

सायंकाळीं रामलीला मैदानांत शेख अब्दुल्लांचें एका विराट् जाहीर सभेंत भाषण झालें. शेखांना पाहण्याचा हा पहिलाच प्रसंग. उंच सडसडीत, धिप्पाड बांधा, गोरा रंग, तरुण वय, खणखणीत आवाज, बोलणें अगदीं साधें, पण अंत:करणापासून. माणूस एकंदरींत धार्मिक वृत्तीचा नाहीं.

नैतिकता आणि आर्थिक न्यायाची स्थापना यांची विशेष चाड आहे त्यांना. धर्मा-धर्मांतील लढ्याऐवजीं अमीर-गरीबांचा लढा करणें अधिक जरूरीचें च इष्ट आहे या गोष्टीवर विशेष जोर देतात. एकंदरींत लढ्याची भूमिका बदलून धर्मवादाचा व जातिवादाचा नायनाट करण्याचें तंत्र स्वीकारण्याकडे कल आहे शेखसाहेबांचा.

माझा त्रावणकूरचा तरुण मित्र पी. एम्. टॉमसहि काल भेटून गेला. तो इतके दिवस आला नाहीं याचें मला आश्चर्यच वाटलें होतें, पण तो आपल्या घरीं त्रावणकूरला गेला होता. हा खिस्ती तरुण मोठाच स्नेहाळु व गोड आहे. माझी त्याची गांठ बेंगलूरहून येतांना आगगाडींत पडली. तो परिचय स्नेहांत परिपक्व झाला. आतां तो तुमच्यांपैकीं एक झालेला आहे. जगांत आपण ज्यांना सामान्य माणसें म्हणतों त्यांच्यांत असामान्य सहृदयता आणि स्नेहार्द्रता असल्याचें दिसून येतें. विक्रमजीत गौबाची भेट अशीच आगगाडींत झाली होती. तो प्रति गंपूच झाला. ब्रह्मदेव भींगरा, पूरणचंद बनसल हीं पंजाबी मुलें माझ्याजवळ पास मागायला आलीं. ओळखीचें पर्यवसान स्नेहांत व नंतर आतमभावांत झालें. ' ही सारी पृथ्वी सोन्याची होवो ' असा वर ज्यानें मागितला त्याला निर्जीव सोनें मिळलें, पण सोन्यासारखीं माणसें अंतरतात. सोन्यासारख्या माणसांच्या सोनेरी वृत्तींनीं आणि सोन्यासारख्या करणीनें हें जग खरोखर ' सु-वर्ण '—चांगल्या वर्णाचें-होतें. जीवनाला रंग व बहर येतो.

आज रविवार म्हणून राजनारायणच्या मोटारींतून ओखल्याला जाऊन आलों. ओखल्याला दोन प्रेक्षणीय ठिकाणें आहेत. दोन्ही मनुष्यकृत आहेत. पण एक प्राकृतिक असून मानवकृत आहे आणि दुसरें तर सांस्कृतिकच आहे; म्हणजे शंभर टक्के मानवाचीच कृति आहे. एक यमुनेचा कालवा आणि दुसरें ' जामिया मिल्लिया इस्लामिया ' हें मुसलमानांचें राष्ट्रीय विद्यापीठ.

हरद्वारला ज्याप्रमाणें गंगेला वळवून माणसानें स्वतःच्या फायद्याकरितां कालवा काढला आहे किंवा बेझवाड्याला कृष्णेच्या प्रचंड प्रवाहाला बांध घालून कालवा काढला आहे, त्याचप्रमाणें ओखल्याला गंगेच्या

सहगामिनी यमुनेला बांध घालून कालवा काढला आहे. पूर्वी धार्मिक नित्यविधींत वापरण्याकरितां गंगाजलाची झारी किंवा सुरई भरून ठेवीत. महामना मालवीयांसारखे कांहीं श्रद्धाळु विद्वान पिण्याकरितां गंगाजळाचे डबे परदेशीं घेऊन गेले. आजच्या काळांत पृथ्वीची उत्पादनशक्ति वाढवून गंगेचा व यमुनेचा प्रसादच नित्य खायला मिळावा म्हणून पराक्रमी श्रद्धावानांनीं कालवे काढले आहेत. येथून पुढें यमुनेंत पाणी बेताचेंच राहतें. कारण बरेंचसें पाणी कालव्यांत जातें. यमुनेचें पात्र रुंद आहे, पण त्यांत वाळूच वाळू आहे. पाण्याची त्या मानानें एक बारीकशी धार कायम ती आहे. कालव्याजवळ धरण असल्यामुळें यमुनेला पाणी बरेंच आहे आणि तेथें नौकाविहाराचीहि सोय उत्तम आहे. धरणांतून एक लहानशी धार जिन्यासारख्या लहान लहान कुंडांतून वाहाते. या कुंड-सोपानाला 'मत्स्यसोपान' (फिशलॅडर) म्हणतात. येथें मासे धरण्याची मनाई आहे. इतर सर्व ठिकाणीं परवाना काढून मासे धरतां येतात. आज रविवार असल्यामुळें अनेक 'मत्स्य-भक्षक' लोक मासे धरायला मुद्दाम आलेले होते.

हें ठिकाण फारसें निसर्गरमणीय नसलें, तरी यमुनेचें पात्र, कालवा, पार्क, झाडें, विशाल वटवृक्ष, रेस्ट हाउस आणि सुंदर रस्ते यांमुळें मनाला आल्हादकारक वाटतें. हौशी लोक येथें वनभोजनाकरितां येतात. एकंदरींत करमणुकीकरितां सहल करण्यासारखें हें ठिकाण आहे. यमुनातीरच आहे, त्या अर्थी गोपाळकाल्याला व वनक्रीडेला अनुकूलच आहे.

'जामिया मिल्लिया इस्लामिया'च्या इमारती इस्लामी स्थापत्यकलेंत आधुनिक स्थापत्यविज्ञानाची भर घालून बांधलेल्या आहेत. इमारती विटांच्याच आहेत. विटांवर सीमेंट किंवा चुना लावलेला नाहीं. सॅरेसेनिक पद्धतीचे घुमट मात्र पांढरे आहेत. एकंदरींत इमारती मोकळ्या, हवेशीर, साध्या व सुंदर आहेत. संस्था पाहण्याचा योग रविवारामुळें आला नाहीं. तेव्हां जामियाच्या अंतरंगाविषयीं कांहीं लिहितां येणें शक्य नाहीं.

परवां पूर्णिमेलाहि सुट्टी होती. पण त्या दिवशीं सहल करायला जाण्या ऐवजीं आम्ही 'रीगल'मध्यें 'क्षुरस्य धारा' (Razor's Edge)

हा इंग्रजी बोलपट पाहायला गेलों होतों. इंग्रजी बोलपटांतील चित्रकला, ध्वनिविन्यास, वगैरे उत्कृष्ट असतात पण मला त्यांतलीं संभाषणें समजत नाहींत आणि संविधानकहि कळत नाहीं. त्यामुळें मुळींच मौज वाटत नाहीं. एरवींहि मला आतांशा ‘ सिनेमा ’ ‘ बोलपट ’ वगैरे पाहण्याची यत्किंचितहि आवड राहिलेली नाहीं. त्यांत कांहींच गम्मत वाटत नाहीं. त्यामुळें आजची सहलच मला अधिक आवडली.

तुझा,
दादा

— १७ —

ग्रँडट्रंक एक्सप्रेस,
२-१२-४७

प्रिय गंपू,

आज स्टेशनवर मंडलोईसाहेबांनीं तुझें पत्र आणून दिलें. मंडलोई-साहेब व मी ग्रँडट्रंकनें रवाना झालों. कालचें तिकीट न मिळाल्यामुळें चोवीस तास उशीर झाला. अशा वेळीं वेळ मोठा जड जातो. अगदीं एक एक क्षण लोखंडाच्या साखळदंडासारखा जड वाटतो. काम नसलें म्हणजे कंटाळा येतो. कंटाळा आला म्हणजे वेळ खायला धांवतो. वेळाचा ‘ काळ ’ होतो.

आज ग्रँडट्रंक अगदीं वेळेवर निघाली. मोठीच गफलत झाली म्हणायची. मागल्या मंगळवारीं आम्ही आबासाहेबांना दुपारीं दोन वाजतां स्टेशनवर पोंचविलें. गाडी सहा तास लेट होती. म्हणजे सुमारें सहाला संध्याकाळीं येणार होती. अर्थात् रात्रीं आठ नंतर जाईल असा अंदाज आम्हीं केला. पण ग्रँडट्रॅकविषयीं कोणाचा अंदाज कधीं बिनचूक ठरला आहे ? त्या दिवशीं गाडी सहा तासांऐवजीं बारा तास उशीरां आली. म्हणजे मध्यरात्रीं येऊन सुमारें दोन वाजतां उत्तर रात्रीं निघाली. आपल्या जुन्या कालगणनेप्रमाणें

उत्तररात्रीं दोनपर्यंत तोच दिवस धरावा असा एक पक्ष आहे. त्याला अनुसरून आबासाहेब मंगळवारींच निघाले! त्यानंतर ग्रँडट्रंकनें बरेंच सातत्य दाखविलें. कमींत कमी दोन तास तरी लेट होण्याचा क्रम तिनें प्रामाणिकपणें व कसोशीनें राखला. आजहि जवळ जवळ एकपर्यंत ती आलीच नव्हती. त्यामुळें कमींत कमी दोन तास तरी उशीरा जावी असा कयास राजनारायणनें केला. पण ग्रँडट्रंकनें आपलें ब्रीद पाळलें! राजनारायणच्या अंदाजाप्रमाणें मी स्टेशनवर आलों असतों तर गाडी हमखास चुकली असती. स्टेशनवर प्रतीक्षा करीत वेळ घालविण्याच्या तयारीनें मी आलों तों गाडी अगदीं कूच करण्याच्या 'शानींत' (टेचांत) उभी होती! पण आपण वेळेवर निघालों याबद्दल तिला राहून राहून पश्चात्ताप होत असावा, असें तिच्या एकंदरींत 'गतिविधी'वरून वाटतें!

कालचा दिवस मंडलोईसाहेबांबरोबर चांदणी चौकांत 'मटरगश्ती' (भटकंती) करण्यांत घालविला—हो, अगदीं घालविलाच; एरव्हीं तो गेला नसता. कालचा दिवस कौन्सिल हाउस, कनॉट सर्कस, चांदणी चौक, कॉन्स्टिटयूशन हाउस मिळून घालविला. आज दुपारपर्यंतचा वेळ काढावयाचा होता. यमुनेच्या तीरावर आणि फ्लॅगस्टाफ टेकडीवर थोडी 'चहलकदमी' (शतपावली) करून आलों. युनिव्हर्सिटीकडे जाणारीं मुलें, मुली व सभ्य गृहस्थ देखील झुडपांचीं रानबोरें तोडून तोडून खात होतीं. दिल्लीला रस्त्यांत, चव्हाट्यावर किंवा बाजारांत खाणें निषिद्ध नाहीं, उलट अगदीं शिष्टसम्मत आहे, सभ्यपणाचें आहे. मींहि सहज चार रानबोरें कांट्यांनीं केलेला तीक्ष्ण प्रतिकार सहन करून खाऊन पाहिलीं. हीं बोरें अगदीं लहान असतात—तुळशीमाळेंतील मण्यांएवढीं—किंचित् मोठीं पण तुरट किंवा आंबट नसतात. फार गोड असतात. 'शबरींचीं बोरें' व्हायला सर्वथा योग्य अशीं! पूज्य जमनालालजींच्या आई दादीजी, त्यांच्या बहिणी, पूज्य माताजी वगैरे मारवाडांतून असलीं बोरें मुद्दाम मागवून वर्ध्याला खात बसतात. 'जगण्याकरितां खावें' हा नियम आध्यात्मिक आहे. पण माझ्या पार्थिव वृत्तींत तो बाणला नाहीं. जगण्याकरितां साधक खातो किंवा पशुहि खातो. सगळे मानवी प्राणी स्वादाकरितां, सोबतीकरितां आणि गमतीकरितांहि खातात! —'सहनौभुनक्तु।' कोणाबरोबर खावें नि कोणाबरोबर खाऊं नये यावर

सगळ्या आचारधर्मांचा डोलारा उभारला आहे. मीं तीं बोरें केवळ मासला पाहण्याकरितां म्हणून चघळलीं. त्या टेकडीवर तरी सभोंवारचा देखावा गम्मत म्हणूनच पाहायला गेलों होतों. गम्मत म्हणून फिरणें, गम्मत म्हणून पाहणें, गम्मत म्हणून बोलणें, गम्मत म्हणून खाणें—यांतहि जीवनाची गम्मत आहे. यमुनातटाकीं वनमाली तरी 'गोपाळकाला' व खेळच करीत होता ना ?

ता. ३-१२-४७

पत्र मथुरेला यमुनातीरीं सुरू केलें तें हुशंगाबादला संपवीत आहें. कारण इटारसीला हें पत्र गाडींतील टपालाच्या डब्यांत टाकायचें आहे.

तुझा,

दादा

(३० मार्च १९४८ ला [illegible] देवाज्ञा झाली.
(यानंतरची पत्रें)

— २८ —

१३९, कॉन्स्टिटयूशन हाउस,
नवी दिल्ली,
६-११-४८

प्रिय चन्दूराजा,

दुपारीं एक पत्र लिहिलें तें पोंचेलच. कॉन्स्टिटयूशन हाउसचा अनुभव तुम्हांला आहेच. येथील राहण्याची व्यवस्था जितकी उत्तम तितकीच खाण्याची व्यवस्था रद्द आहे. कॉन्स्टिटयूशन हाउसचा याबाबतींतील दुर्लौकिक बराच पसरलेला आहे आणि तो नाहींसा करण्याची चाडहि फारशी येथील कंत्राटदारांना दिसत नाहीं. येथें आल्याबरोबर पुन्हां ती ठराविक दिनचर्या सुरू झाली. तोच पहांटेचा चहा, तीच 'छोटी हजरी,' तेंच 'लंच,' तोच दुपारचा चहा, आणि तेंच 'डिनर'. हिंदुस्थान सरकारनें 'करड' खाण्याचा हुकूम काढल्यामुळें आतां आमचा 'केटरर' अगदीं जाडाभरडा तांदूळ आम्हांला हक्कानें घालूं शकतो.

परवां घटनापरिषदेला सुरुवात झाली. घटनेच्या मसुद्यावरील चर्चेला आरंभ डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनीं केला. त्यांचें भाषण नेहमींप्रमाणें समर्पक व उद्बोधक झालें असावें, असें वर्तमानपत्रांवरून दिसतें. त्यांच्या-नंतरच्या सर्वच वक्त्यांनीं त्यांच्या भाषणाचा उल्लेख करतांना त्यांच्या बुद्धि-मत्तेची व प्रतिपादनशैलीची स्तुति केली. पण आंबेडकरांचें भाषण म्हटलें कीं त्यांत कांहीं अप्रिय, आह्वानात्मक व झोंबणारीं विधानें कोठें तरी आलींच पाहिजेत. खेड्यांचें त्यांनीं केलेलें वर्णन यथातथ्य नाहीं, असें म्हणणें कठिण आहे. खेड्यांतील जीवनाला दुसरी बाजू आहे. आंबेडकरांनाहि ती माहीत आहे. पण शहर काय तें अमंगल आणि खेडें म्हटलें कीं तें निरागस, निष्पाप असें ज्यांचें म्हणणें असेल, त्यांना आंबेडकरांनीं ग्रामीण जीवनाची दुसरी बाजू दाखवून दिली. ग्रामपंचायतीच्या प्रयोगाविषयीं विनोबांनीं स्वराज्यशास्त्रांत जें ओझरतें विधान केलें आहे, त्याची आठवण मला झाली. पण खेड्यांवर टीका करील तो डॅण्डी, तो ‘ कोक्सकोम्ब ’, तो ‘ आंबट-शोकी, ’ तो ‘ गुलहौशी, ’ तो ‘ मिजासखोर ’ असा हल्लीं समज आहे. म्हणून दरेक ग्रामराज्यवाद्यानें किंवा जनतंत्राऐवजीं ग्रामतंत्राचा पुरस्कार करणारानें आंबेडकरांवर यथेच्छ तोंडसुख घेतलें.

निर्भेळ लोकशाहीची स्थापना व्हावी या बुद्धीनें भिन्न मतदारसंघां-प्रमाणेंच राखीव जागाहि रद्द करण्यांत याव्या, असें प्रतिपादन अनेक वक्त्यांनीं केलें. त्यांत आपल्या प्रांतांतील मुस्लिम लीगचे माजी सभासद काझी करीमुद्दीन हेहि आहेत. मुसलमानांच्या दृष्टीनें देखील राखीव जागा असणें हिताचें नाहीं, असें ते म्हणाले. काझीसाहेबांच्या भाषणाचें बरेंच कौतुक झालें. अनुभवानंतर का होईना पण ज्यांना शहाणपण सुचतें त्यांच्या-विषयीं आशा वाटायला जागा आहे. मुसलमान ही अल्पसंख्याक जमात असली तरी तिच्यांत आणि अस्पृश्य व आदिवासी यांच्यांत फरक आहे. अस्पृश्य व आदिवासी या मागसलेल्या जातींची भूमिका निराळी आहे. मुसलमान व ख्रिस्ती या संप्रदायनिष्ठ जमाती कायम राहतील व आपापली संख्या वाढविण्याचा प्रयत्नहि करीत राहतील, पण अस्पृश्यांची अस्पृश्यता व आदिवासींची असमर्थता नाहींशी झाली म्हणजे या दोन्ही जमाती भारतीय समाजाशीं एकजीव होऊन जातील. पुन्हां पूर्वीं मुसलमानांचें

राज्य होतें व आजहि मुसलमानांना आपल्या संप्रदायवादानें जें मिळवायचें होतें तें त्यांनीं मिळविलें आहे. त्यांचें या देशांत एक स्वतंत्र राज्यच स्थापन झालें. आदिवासी व अस्पृश्य यांना सामान्य नागरिकत्वाचे हक्क तत्त्वतः दिले गेले, तरी त्यांचा व्यवहारतः उपभोग घेण्याचें सामर्थ्य त्यांच्या ठिकाणीं येईल, अशी तरतूद कांहीं कालपर्यंत करणें आवश्यकच आहे.

काल घटना-परिषदेची बैठक पुन्हां १० ते १ आणि ३ ते ४–१५ झाली. घटनेच्या मसुद्यावरील चर्चा पुढें चालू झाली. अनेक वक्त्यांनीं आपापलीं मतें थोडक्यांत मांडलीं. मनांत ठसण्यासारखें भाषण असें कोणाचेंच झालें नाहीं. घटना-परिषदेंतील वादकुशल माणसें हजरहि फार थोडीं होतीं. त्यांतल्या त्यांत श्री. के. सन्तानम् यांनीं थोडक्यांत चांगले मुद्दे मांडले. त्यांची टीका व सूचना भरीव स्वरूपाच्या होत्या. श्री. मंडलोईसाहेबांनींहि घटना-परिषदेंतील आपलें पहिलें भाषण काल केलें. ते इंग्रजींत बोलले. येथें इंग्रजींत बोलल्यावांचून छाप पडत नाहीं, कारण हिंदींतील खाचाखोंचा, श्लेष व भाषासौष्ठव यांचा आस्वाद फारच मोजक्या लोकांना घेतां येतो. इंग्रजी विषयींचा पूर्वींचा तिरस्कारहि आतां उरलेला नाहीं.

आतांपर्यंत जवळ जवळ पंचवीस तीस वक्त्यांनीं चर्चेंत भाग घेतला. अजून बऱ्याच लोकांचीं नांवें यादींत आहेत. म्हणून अध्यक्षांनीं चर्चेकरितां आणखी एक दिवस दिलेला आहे. घटना घडविण्याचें कार्य हें ऐतिहासिक कार्य आहे. म्हणून घटनेविषयीं आपापलें मत सांगण्याची इच्छा दरेकाला असणें स्वाभाविक आहे. पण विद्वज्जनांच्या व विशेषज्ञांच्या या परिषदेंत बोलण्याचें धैर्यच मला होत नाहीं. येथील सभासदांना आपल्यापेक्षां जास्त कळतें, ही जाणीव तोंडाला कुलुप घालते. शिवाय इंग्रजी बोलण्याचा सराव आतां मला मुळींच राहिलेला नाहीं. इंग्रजींत विचार करूं लागलों म्हणजे कागदावर अगदीं अस्खलित व उत्कृष्ट इंग्रजी भाषणें लिहून काढतों, पुष्कळदां मनांतल्या मनांत अनेक इंग्रजी व्याख्यानें अगदीं ऐटीत देतों. पण सभेंत मात्र बोबडी वळते. एके काळीं मी एक नाणावलेला इंग्रजी वक्ता व बऱ्यापैकीं इंग्रजी लेखक होतों, हें माझें मला देखील खरें वाटत नाहीं.

राजेंद्रबाबूंना बरें नसल्यामुळें उपाध्यक्षांनीं काम चालविलें. राजेंद्र-बाबूंना आतां दगदग व त्रास सोसवत नाहीं. दुपारच्या बैठकींत जवाहर-

लाल आले. त्यांनीं परिषदेच्या दिवाणखान्यांत प्रवेश केला त्या वेळीं सभासदांनीं टाळ्यांच्या गजरानें त्यांचें स्वागत केलें. सभेच्या नियमांचें भान न राहून कांहीं सभासद तर उभेहि राहिले. जवाहरलाल किंवा सरदार यांच्यापैकीं कोणीच आज भाषण केलें नाहीं.

संध्याकाळीं मंडलोईसाहेबांबरोबर कनॉट सर्कसमध्यें चक्कर मारून आलों. शेव्हिंग ब्रश, टूथ पेस्ट वगैरे वस्तु घ्यायच्या होत्या त्या घेतल्या. आज शनिवार असल्यामुळें कनॉट सर्कसमध्यें तोबा गर्दी होती. माणसाला मोकळें किंवा न थांबतां चालणें अगदीं अशक्य होतें. शरणार्थींचीं दुकानें आतां पूर्वींच्या मानानें बरींच व्यवस्थित झालेलीं आहेत. मागल्या पाळीपेक्षां या पाळीला नीटनेटकेपणा थोडा अधिक आहे.

तुझा,
दादा

— १९ —

१३९, कॉन्स्टिटयूशन हाउस,
नवी दिल्ली,
७–११–४८

प्रिय चन्दू

आज रविवार, पण रिकामपणचे अनेक उद्योग होतेच. सकाळीं रामध्यानी येऊन गेले. बरेच दिवसांनंतर त्यांची भेट झाली. मैत्रीला उजाळा देत रहाण्याची हातोटी त्यांना साधलेली आहे. जैनेन्द्रचीहि चिठ्ठी आली होती. त्याला माझी आठवण हटकून येते. परवां दुपारीं त्याच्याकडे जेवायलाच जायचें कबूल केलें.

सकाळीं १०–३० ते १२–१५ म्हणजे ब्रेकफास्ट व लंचच्या मधल्या वेळांत पार्टीच्या सभेंत जवाहरलालांचें भाषण झालें. भाषण खासगी स्वरूपाचें होतें. त्यानंतर तिसरे प्रहरीं ४ ते ६ येथील 'तेज' पत्राचा रौप्य-

महोत्सव मोठ्या थाटामाटानें साजरा करण्यांत आला. 'तेज' पत्र हल्लीं देशबंधु गुप्तांचें आहे. देशबन्धु गुप्त हे दिल्लीचे प्रमुख नागरिक आणि जवळ जवळ सार्वजनिक यजमान आहेत. त्यांच्या आतिथ्याला व औदार्याला सीमाच नाहीं. शक्तीची, साधनांचीच मर्यादा आहे. या समारंभाला खुद्द राजाजी, जवाहरलाल, पट्टाभि, टंडनजी, झाकिरसाहेब, श्यामाबाबू, जगजीवनराम इत्यादि सारी मंडळी हजर होती. भाषणें झालीं. राजाजींचें 'गुरोस्तु मौनं व्याख्यानम्' झालें. जवाहरलालांनीं बरीच गम्मत व विनोद केला. येथें अनेक मित्रांच्या गांठी पडल्या.

रात्रीं पुन्हां रशियन एंबसींत क्रांतिदिन साजरा झाला. ७ नोव्हेंबर म्हणजे रशियन क्रांतीचा दिवस. हल्लीं रशियन राजदूत कॉन्स्टिट्यूशन हाउस समोरील त्रावणकूर हाउसमध्यें राहतात. आज तेथें दीपोत्सव होता. सारी इमारत निरनिराळ्या रंगांच्या दीपमालिकांनीं नटविलेली होती. झाडांना दिव्यांचींच फळें लावण्यांत आलीं होतीं. दिल्ली शहरांतील सारी आधुनिकता आणि अद्यतनता आपल्या संपूर्ण वैभवांत तेथें प्रकट झाली होती. या दृष्टीनें हा समारंभ फारच यशस्वी म्हणावा लागेल. तऱ्हेदार अद्यतन पोषाखांचें, दागदागिन्यांचें प्रदर्शनच भरलें होतें जणूं. निरनिराळीं खाद्य-पेयें तबकांत घेऊन खानसामे लहान लहान 'झुबके' करून उभ्या असलेल्या पाहुण्यांपुढें जात आणि ज्याला जो जिन्नस आवडेल तो त्याचा आस्वाद घेई आमच्यासारखे जे अगदीं 'निरामिषभोजी' होते त्यांना बटाट्याचें काप व खारा मेवा भरपूर मिळे. कित्येकांना सौम्य पेयें पुरेशी उत्तेजक—नव्हे स्फूर्तिदायक—वाटत नाहींत. त्यांना 'वोडका'ची चव घ्यावीशी वाटे. एक ज्वलज्जहाल देशभक्त मित्र म्हणाले, 'वोडका'ची चव पहाण्याची फार इच्छा झाली होती. पण काँग्रेसमध्यें आल्यापासून कित्येक वर्षांत मद्याला शिवलों नाहीं. म्हणून असें तें जालिम मद्य पिण्याचें धैर्य झालें नाहीं.

रशियन राजदूत व त्यांच्या पत्नी निरोप देतांना मोठ्या आग्रहानें पावरोटीची एक रुपयाएवढी चकती देत. तिच्यावर एक घट्ट काळा पदार्थ

लावलेला होता. मी विनयपूर्वक म्हटलें, ' मी शाकाहारी आहें, मला क्षमा करा. ' यजमान म्हणाले, ' अहो, हा फक्त मासाच आहे. ' मी औपचारिक स्मित करून कसाबसा निसटलों ! पण बहुतेकांनीं तो पदार्थ त्यांच्या देखत तोंडांत घातला.

वरच्या वर्गांत मद्य-मांसाचें प्रस्थ वाढत असलेलें पाहून मनाला कसें-सेंच वाटतें. मद्य-मांससेवनाची तयारी हें सुधारणेचें व आधुनिकतेचें लक्षण मानलें जातें. इंग्रजी राज्यानंतर मांसाची व मद्याची प्रतिष्ठा विशेष वाढली. जेथें बुद्धधर्माची फार मोठी प्रतिष्ठा आहे, त्या चीन व जपान देशांतहि मद्य व मांस यांचा निषेध नाहीं. मांस व मद्य यांचा निषेध, निदान त्यांना गौण मानणें, भारतीय संस्कृतीचें वैशिष्ट्य आहे. पण आधुनिकतेच्या हव्यासापायीं त्याचाहि लोप होत आहे. हें सांस्कृतिक प्रगतीचें लक्षण खास नव्हे.

उद्यां पुन्हां १० ते १ व ३ ते ५ घटना-परिषदेची बैठक आहे.

तुझा,

दादा

— २० —

१२९ कॉन्स्टिट्यूशन हाउस,

नवी दिल्ली,

९-११-४८

प्रिय चन्दूराजा,

यापूर्वींचीं पत्रें पोंचलींच असतील. मला येथें येऊन तीन दिवस झाले, पण तुमच्यापैकीं कोणाचेंच पत्र आलें नाहीं. तुमच्याविषयीं काळजी वाटते.

काल व आज पुन्हां घटनापरिषदेची बैठक १० ते १ व ३ ते ५ झाली. राजेंद्रबाबू आजारीच आहेत अजून. त्यामुळें डॉ. एच्. सी. मुखर्जींनींच काम चालविलें. उपाध्यक्षहि सर्वस्वीं अध्यक्षांना अनुरूप असेच आहेत. सभ्य, न्यायप्रिय, कार्यकुशल.

काल उपाध्यक्षांनीं अल्पमतांच्या प्रतिनिधींना पहिली संधि देण्याचें ठरविलें होतें. मुस्लिम लीगच्या सभासदांपैकीं बहुतेक बोलले. काझी करीमुद्दीन यांनीं मुसलमानांना राखीव जागा नकोत म्हणून सांगितलें. त्यांत कांहीं विशेष होतें असें नाहीं. पण त्यांच्यापैकीं जें ' गणंग ' आहेत, त्यांचा मात्र सुभ जळल्या नंतरहि पीळ अद्याप कायम आहे. लखनौच्या प्रो. लारींचें भाषण मोठें मासलेवाईक झालें. पाकिस्तानच्या निर्मितीकरितां आपल्या मगदुराप्रमाणें झुंजणारा हा बहाद्दूर आतां म्हणूं लागला, ' पाकिस्तानांत काय चाललें आहे याच्याशीं मला कांहीं कर्तव्य नाहीं. मी हिंदुस्थानचा नागरिक या नात्यानें बोलतों आहें ! ' श्री. हसन इमाम यांनींहि साळसूदपणाचा आव आणून म्हटलें, ' मागल्या गोष्टी विसरा. आम्हांला डागण्या देऊं नका. आतां आमच्या हक्कांचे रक्षण करा. पाकिस्तानचें अनुकरण तुम्हीं नका करूं. ' स्व-पराक्रमानें मिळविलेल्या पाकिस्तानविषयीं त्यांनीं काढलेले हे उद्‌गार उपरतीचे होते, हें कोणाला आणि कसें खरें वाटावें ! ज्या मुसलमानांनीं या देशावर एके काळीं एकछत्र सत्ता गाजविली आणि ज्यांनीं स्वतःकरितां सवता सुभा उभारून वेगळा संसार थाटला त्यांनीं राखीव जागांची मागणी करणें त्यांना शोभतहि नाहीं आणि आवश्यकहि नाहीं. सांप्रदायिक अल्प संख्याकांना प्रचारस्वातंत्र्य असल्यामुळें त्यांची संख्या वाढण्याची शक्यता अध्याहृतच आहे. मागसलेल्यांना हा न्याय लागू नाहीं. म्हणून दोघांकरितां निरनिराळे नियम घातले पाहिजेत.

काल सकाळची बैठक संपण्यापूर्वीं जवाहरलालांचें भाषण झालें. सबंध सभा-भवन शान्त व स्तब्ध होतें. अगदीं टांचणीचाहि आवाज ऐकूं आला असता. जवाहरलालांचा आवाज गंभीर व मधुर होता. त्यांच्या तोंडून एकामागून एक भरीव, रेखीव व निर्दोष वाक्यें निघत होतीं. घटनेच्या मूलभूत कल्पनेची व आधारभूत प्रमेयांची सोपी व सोपपत्तिक मीमांसा त्यांनीं केली. जवाहरलालांची मैदानी भाषणें इतकीं प्रभावशाली वाटत नाहींत. पण सभाभवनांत केलेलीं त्यांचीं भाषणें फारच परिणामकारक व श्रुतिमधुर वाटतात. ज्यांना सार्वजनिक सभांतील अनियंत्रित वक्तृत्वाची संवय आहे, त्यांना सभाभवनांतील भाषणें साधत नाहींत. त्यांना अवघडल्या-

सारखें वाटतें. त्यांच्या तोंडून गुळगुळीत वाक्यें बाहेर पडण्याऐवजीं तुटक व कडक कडक वाक्यें निघतात. चांगल्या पट्टीच्या वक्त्यांचीहि सभाभवनांत ही स्थिति होते.

नंतर कांहीं मुद्द्यांना उत्तर देणारें श्री. अल्लादि कृष्णस्वामींचें भाषण झालें. त्यांनीं अडखळत अडखळत आपल्या जागेवरूनच भाषण केलें. तें सगळी-कडे नीट ऐकूंहि आलें नाहीं.

यतिराज व मंडलोईसाहेब यांच्या आग्रहामुळें मीहि वक्त्यांच्या यादींत नांव देऊन ठेवलें होतें. भाषणहि मनांत घोळत होतें. इंग्रजींतच बोलणार होतों. पण इतरांचीं भाषणें ऐकून ऐकून कान किटून गेले आणि बोलण्याची इच्छा मनांतल्या मनांत जिरून गेली. नांव परत घेण्याच्या बेतांत आलों होतों. पण अध्यक्ष मला संधि देतील असा संभव दिसला नाहीं, म्हणून नांव परत घेण्याचा विचार अमलांत आणला नाहीं. घटनापरिषदेंतील व असेंब्लींतील वातावरण माझ्यासारख्याला स्फूर्ति येण्याला फारसें अनुकूल नसतें. ज्या माणसांचा आत्मप्रत्यय बलवान् असतो किंवा ज्यांची अहंता दांडगी असते अशा दोन प्रकारच्या माणसांना बोलण्याची स्फूर्ति अथवा अवसान येतें. दोन्ही प्रकारच्या माणसांचीं भाषणें मात्र चांगलीं ठसठशीत व भरदार होतात. घटनापरिषदेंत न दिलेलें माझें हें दुसरें व्याख्यानहि टांचणाच्या रूपानें माझ्याजवळ आहे.

घटनेवरील चर्चेच्या ऐतिहासिक विवादोत्सवांत आपणहि भाग घ्यावा अशी बहुतेक सभासदांची इच्छा असणें साहजिक होतें. पूर्वीच्या योजने-प्रमाणें ही सर्वसामान्य चर्चा शनिवारींच संपायला हवी होती. पण बोलणा-रांच्या यादींत शंभरावर नांवें असल्यामुळें अध्यक्षांनीं कालचा दिवस दिला होता. पण कालहि सर्वांना संधि देतां आली नाहीं. म्हणून आजचा दिवस आणखी दिला. आज चर्चा शेवटीं संपवावी लागली. आज मी फारसा उत्सुक नव्हतोंच. अध्यक्षांनीं माझें नांवहि पुकारलें नाहीं.

आजचीं भाषणें त्या मानानें बरींच चांगलीं झालीं. नवीन सभासदांपैकीं कांहीं चांगले कसलेले वक्ते आहेत आणि कांहीं होतकरू आहेत. तिरुमलराव यांच्या भाषणाचा वेग व भाषा चांगली होती. कॉमनवेल्थशीं हिंदुस्थानचा संबंध कां नसावा याचें जोरदार विवेचन त्यांनीं केलें.

मत्स्य यूनियनमधील राजबहादुर नांवाच्या एका तरुण सदस्याची इंग्रजी बोलण्याची लकब मोठी ऐटदार होती. मोठें दबदार व शुद्ध इंग्रजी अगदीं स्वाभाविकपणें व अस्खलित रीतीनें बोलला. अभिनय किंवा हातवारे मुळीच नव्हते. मला श्याम पंडितांच्या मराठी वक्तृत्वाची आठवण झाली.

प्रो. रंगांचें भाषण मोठें मुद्देसूद झालें. त्यांनीं घटनेच्या मसुद्यावर विधायक, मार्मिक आणि मार्गदर्शक स्वरूपाची टीका केली. आज त्यांच्या व्याख्यानांत पाल्हाळ मुळींच नव्हता.

श्री. अनंतशयनम् अय्यंगार हे आमच्या असेंब्लींतील फारच खंदे वक्ते आहेत. त्यांच्या जिभेला खरोखरच शीण येत नाहीं. ती एकदां सुरू झाली, कीं कोठेंच अडखळत नाहीं. मात्र त्यांच्या बोलण्यांत असभ्यपणा किंवा कटुता मुळींच नसते. नेहमीं कांहीं तरी महत्त्वाचा मुद्दा असतो. गृहस्थ बोलके आहेत पण तोंडाळ नाहींत; स्पष्टवक्ते आहेत पण फटकळ नाहींत; अघळपघळ आहेत पण भरमसाट नाहींत. त्यांनीं टीकाकारांच्या मुद्यांना मोठीं तारतम्यपूर्ण उत्तरें दिलीं.

या वादसमारंभाला शोभा आणण्याकरितां श्री. रेणुका राय बोलल्या. काल बेगम आयझाझ रसूल बोलल्या होत्या. बेगम रसूल यांच्या भाषणानें वातावरणाला एक प्रकारचें मार्दव व माधुरी येते. रेणुका राय सरावलेल्या ‘ सभापंडिता ’ असल्यामुळें त्यांच्या भाषणांत कांहीं सूचना व मुद्देहि असतात.

आज आपल्या प्रांताच्या असेंब्लीचे अध्यक्ष ‘ बडेदाऊ ’ घनश्यामसिंह गुप्तहि बोलले. जोरदार इंग्रजींत त्यांनीं आपलें म्हणणें अगदीं मोजक्या शब्दांत बिनतोड रीतीनें मांडलें आणि तेंहि अगदीं मोजक्या वेळांत. अध्यक्षांवर घंटा वाजविण्याची पाळी येऊं दिली नाहीं. ते आपल्या ‘ सभाध्यक्षा ’च्या शीलाला जागले.

श्री. महावीर त्यागी यांचें अगदीं ‘ कंकणी ’ थाटाचें पल्लेदार भाषण झालें. “ मला या राज्य-घटनेंत गांधींचें दर्शन कोठेंहि होत नाहीं. तिच्यांत दारूबंदी नाहीं, ग्रामोद्योग नाहींत, ग्रामसंजीवन नाहीं,—गांधींना जें जें प्रिय होतें, त्यांपैकीं कांहींच नाहीं. गांधींनीं म्हटलें कीं, सर्व संपत्तिमान् हे त्या

संपत्तीचे संरक्षक आहेत. तुम्ही म्हणतां त्यांची मालमत्ता काढून घेतांना त्यांना मोबदला देऊं. सार्वजनिक उपयोगाकरितांच जो मालमत्तेचा उपयोग करतो तो 'ट्रस्टी'. तो 'संरक्षक'. त्याच्याजवळची मालमत्ता सार्वजनिक हिताकरितां घेणें म्हणजे त्याचा हेतु तडीला नेण्याकरितां मदत करणें होय. मग त्याला मोबदला कसला देणार तुम्हीं?"–असा सरळ, सडेतोड युक्तिवाद या खऱ्या खडतर गृहस्थानें केला. ते पुढें म्हणाले, "या देशांतील मातीच्या एकेका कणावर व गवताच्या एकेका तृणांकुरावर कोणाची तरी मालकी आहेच. मग तुम्ही मोबदला कशा–कशाबद्दल आणि कसा देणार? तुम्हांला जर रक्तरंजित क्रांति टाळायची असेल तर मालमत्तेचें राष्ट्रीयीकरण त्वरित करा." असा खणखणीत इशारा त्यांनीं दिला. 'या देशांत अल्प-संख्याक बिल्पसंख्याक कोणी नाहींत. जे गरीब व अज्ञ आहेत ते बहु-संख्याकच आहेत. त्यांनाच खरे अधिकार देण्यांत येणार आहेत. अल्प-संख्याकांच्याकरितां कांहीं सोय करण्याचें कारण नाहीं,' असा करडा इशारा त्यांनीं अल्पसंख्याकांना दिला.

आंबेडकरांनीं खेड्याविषयीं जे उद्गार काढले त्याबद्दल दरेकानें त्यांच्या-वर यथेच्छ आग पाखडली. महावीर त्यागींनीं त्यांच्यावर चांगलेंच तोंड-सुख घेतलें. 'ज्या खेड्यांनीं चिमूर-अष्टींत पराक्रम केला, तीं खेडीं जिवन्त स्फूर्तीचे झरे आहेत, तीं घाणीचीं डबकीं नाहींत.' असें त्यांनीं बजावलें. एरव्हीं व्याकरणाची फारशी तमा न बाळगणारे महावीर त्यागी आज आवेशाच्या भरांत बरेंच शुद्ध इंग्रजी बोलले. 'Democracy is an exotic on the Indian soil' (हिन्दुस्थानच्या जमिनीवर लोक-शाहीचें रोपटें विजातीय आहे,) अशा अर्थाचे उद्गार सुमारें तीस वर्षांपूर्वीं एका इंग्रज मुत्सद्द्यानें काढले होते. त्या वेळीं तात्यासाहेब केळकरांनीं प्राचीन ग्रंथांतून अनेक दाखले देऊन या देशांतील जमिनींतून लोकशाही कशी उत्पन्न झाली हें सिद्ध केलें. पण तात्यासाहेब किंवा इतर संशोधक यांनीं हिंदुस्थानांत ज्या प्रकारच्या लोकशाहीचें अस्तित्व सिद्ध केलें ती लोकशाही म्हणजे प्रातिनिधिक व निर्भेळ लोकसत्ता नव्हे. ती लोकमताला मान देणारी मर्यादित राजसत्ताच होती. राजाची गादी वंशपरंपरेनें चालत असे. बिचाऱ्या आंबेडकरांवर उगाचच गहजब केला.

त्यांचे सहकारी मित्र श्री. अल्लादि कृष्णस्वामीहि म्हणाले, 'I must also express my emphatic dissent from his observation that democracy in India is only a top-dressing on Indian soil.' (हिंदुस्थानच्या भूमीवर लोकशाही हा फक्त वरवरचा शृंगार आहे या डॉ. आंबेडकरांच्या विधानाला माझा तीव्र विरोध आहे.) प्रकाशम् तर म्हणाले कीं 'दक्षिण भारतांत कांचीजवळ एका खेड्यांत एक देऊळ आहे. त्या देवळांत 'बॅलट पेपर'चेंहि वर्णन कोरलेलें आहे.' पण्डित विश्वंभर दयाल त्रिपाठी 'आर्यावर्ता'च्या बाण्याला जागून म्हणाले कीं, बौद्धांच्या काळांत कांहीं प्रदेश राजांच्या अंमलाखालीं होते आणि कांहीं 'गणाधीनाः' होते. आंबेडकरांनीं खेड्यांविषयीं जी तिरस्काराची भाषा वापरली आणि ज्या तऱ्हेनें खेड्यांचा निषेध केला तो करणें अत्यंत अप्रयोजकपणाचें होतें यांत शंका नाहीं. 'यांत शहरी माणसाची चढेल वृत्ति' दिसून आली असें यतिराजांप्रमाणेंच अनेकांना वाटलें.

पण आंबेडकरांच्या विधानांत मुळींच तथ्यांश नाहीं असेंहि कोणाला म्हणतां येणार नाहीं. आपल्या देशाच्या आर्थिक व सामाजिक जीवनाचा मुख्य घटक 'जात' होती. सारी आर्थिक संघटना जातीच्याच आधारावर झालेली होती. जातिधर्म व नागरिकधर्म जवळ जवळ अभिन्न होते. निरनिराळ्या जातींच्या राहाण्याचीं ठिकाणें वेगळीं, धंदे वेगळे, रहाणी वेगळी, खाणेंपिणें वेगळें, आणि स्मशानेंहि वेगळीं, अशी सर्वसामान्य परिस्थिति होती. दरेक खेड्याचा व शहराचा नकाशा आजहि पुष्कळ अंशीं याच धर्तीचा आहे. ग्रामपंचायती व जातिपंचायती यांना सहयोगानें काम करावें लागे. कारण 'ग्रामण्य' व 'बहिष्कार' हीं दोनच अन्तिम 'दण्डाधिष्ठानें' (Sanctions) होतीं. दरेक प्रश्नाचा विचार जातीय दृष्टीनें करण्याची खोड त्यामुळेंच आपल्याला जडलेली आहे. राष्ट्रभाषेचा प्रश्न घ्या, पशुधनाच्या रक्षणाचा व संवर्धनाचा प्रश्न घ्या, कलेचा प्रश्न घ्या—कोठलाहि प्रश्न घ्या, त्याला हटकून जातीय स्वरूप आलेंच पाहिजे. म्हणून आंबेडकर म्हणाले, कीं जातीय वृत्तीचा नायनाट करून नागरिकवृत्तीचा विकास करायचा असेल, तर जातीच्या पायावर

आधारलेल्या लोकशाहीचा कांहीं उपयोग होणार नाहीं. जातीय घटकां· ऐवजीं आर्थिक घटकांचें संयोजन करावें लागेल.

आज आपल्या प्रांतांत ग्रामपंचायती, न्यायपंचायती व जनपद या ग्रामसंस्थांचा उपक्रम झालेला आहे. पण या योजनेंत आर्थिक संयोजनाचा कोठेंच पत्ता नाहीं. फक्त राज्यसत्तेचें विभाजन आहे. तेंहि कितपत संविभाजन आहे, यांत शंकाच आहे. आर्थिक दृष्टीनें स्वयंपूर्ण किंवा स्वावलंबी होण्याची पात्रता पाहून ग्रामांचें किंवा ग्रामपुंजांचे घटक बनविण्याऐवजीं खेडें व तालुका हे घटक मानण्यांत आले. याचें कारण आर्थिक संयोजनाचें निश्चित चित्र किंवा आराखडा आपल्या डोळ्यांपुढें नाहीं. आपल्याला समाजवादी संयोजन करायचें आहे कीं विकेंद्रीकरणाच्या तत्त्वावर आधारलेलें गांधीवादी संयोजन हवें आहे, यंत्रीकरण कसें व किती प्रमाणांत करायचें आहे यांविषयीं आपल्या मनाचा निश्चयच झालेला नाहीं. म्हणून राज्यसंस्थेच्या स्वरूपाचा आराखडा कुठल्याहि अर्थ-संयोजनाला अनुसरणारा नाहीं.

मसुद्यांतील चौथ्या भागांत राज्यकारभाराच्या मार्गदर्शक तत्त्वांचा उल्लेख आहे. पण मालमत्तेच्या संरक्षणाकरितां जशीं स्पष्ट व निश्चित कलमें घालण्यांत आलेलीं आहेत, तशीं संपत्तीच्या केंद्रीकरणाच्या विरुद्ध आणि 'आर्थिक संविभागा'ला पोषक अशीं निश्चित व असंदिग्ध कलमें घालतां आलीं तरच संपत्तिहीन वर्गाचें कल्याण होईल; एरव्हीं नाहीं. या भूमीच्या वारश्याला जे मुकले आहेत, तेच तिचे खरे वारसदार बनले पाहिजेत. ज्यांना नागविण्यांत आलेलें आहे, त्यांचीच या 'नानारत्नावसुंधरे'वर मालकी प्रस्थापित झाली पाहिजे. पण या बाबतींत जोंपर्यंत आमच्याच मनाचा निश्चय होत नाहीं, तोंपर्यंत आंबेडकर-कमिटीला बोल लावून काय फायदा ?

'मधमाश्यांचा पोवळ्यासारख्या' अर्थसंस्थेला (Beehive Pattern) जग आतां उबगलें आहे. पण त्याला कबुतरांच्या खुराड्यांच्या आकृतींचें ( Pigeon-hole Pattern ) संयोजनहि नको आहे. विकेंद्रीकरण व स्वयंपूर्णता यांचेंहि भलतेंच प्रस्थ माजवून त्याचा बाऊ करणें इष्ट होणार नाहीं. हा देश तुटक व असंयुक्त ग्रामराज्यांची 'वाकळ' व्हायला नको

आहे. तें अखंड ' सणगच ' व्हायला पाहिजे. म्हणून स्वयंपूर्णता व परस्परपूरकता, स्वावलंबन व परस्परावलंबन यांचें तारतम्य साधलें तरच आर्थिक व सामाजिक जीवनाची अखंडता व अविभक्तता साधतां येईल आणि त्यांतून विधायक व जिवंत राजकीय आणि राष्ट्रीय ' एकत्वा 'चा विकास होईल. या दृष्टीनें 'ग्रामसंजीवन' ' विकेंद्रीकरण ' व ' पशुसंगोपन ' या तत्त्वांच्या आधारावर संपत्तीवर ' समाजस्वामित्व ' स्थापून तिच्या ' संविभागा 'ची योजना आंखावी लागेल. तोंपर्यंत घटनेवर समाजवादाचा ठसा उमटणें किंवा गांधीवादाची छाप दिसणें कसें शक्य आहे?

राष्ट्रभाषेचा प्रश्न व भाषावार प्रांत या दोन प्रश्नांचा उल्लेख जवळजवळ प्रत्येक वक्त्यानें केला. ही हिंदीवाल्यांची ' भाषांधता ' Linguistic Fanaticism आहे, असें श्री. मैत्र म्हणाले आणि श्री. टी टी. कृष्णमाचारींनीं तर त्यांच्या भाषाभिनिवेशाचें वर्णन ' भाषिक साम्राज्यवाद ' या शब्दानें केलें. मला वाटतें, अजून मुसलमानी आग्रही वृत्तीचें भूत आमच्या मनांत कायम असल्यामुळेंच वादाला इतकें तीव्र स्वरूप प्राप्त झालें आहे. इंग्रज होता तोंपर्यंत त्याच्याबद्दलचा राग आपण त्याच्या भाषेवर, त्याच्या पोषाखावर, त्याच्या संस्कृतीवर काढत होतों. तो गेल्यानंतर आतां इंग्रजी विषयींचा रोष पार नाहींसा झाला आहे. मुसलमान या देशांत असले, तरी त्यांचें वर्चस्व किंवा दुराग्रह आतां चालणें शक्य नाहीं. म्हणून उर्दूवरील रोषहि आतां कमी कमी होत जाईल. तो कमी झाल्यानंतर जर राष्ट्रभाषेचा प्रश्न हातीं घेतला, तर पुष्कळशी कटुता टाळतां येईल.

भाषावार प्रांताच्या प्रश्नालाहि उगीचच जातीय, सांस्कृतिक आणि उप राष्ट्रवादाचें स्वरूप प्राप्त झालेलें आहे. रशियांतील ' राष्ट्रीयसंघराज्य ' (National Federalism), किंवा स्वित्झर्लंडचा ' Cultural Federalism ' सांस्कृतिक संघराज्यवाद, हे आपल्याला उपयोगी पडणारे तोडगे नाहींत. बंगाली भाषा बोलणारांचे व पंजाबी बोलणारांचे दोनदोन प्रांत झाले, सिंधी बोलणाऱ्या हिंदूला सिंधमध्यें थारा नाहीं, हें विसरून कसें चालेल ? पूर्व पंजाबांत शीख व हिंदु यांच्यामधून विस्तव जात नाहीं. हिंदु लोक शीखांच्या आक्रमणशील वृत्तीला अगदीं कंटाळले आहेत. भाषा ही माणसाच्या स्नेहसंबंधाचें साधन आहे आणि भांडणाचेंहि अवजार आहे.

तेव्हां या वेळीं भाषावाद माजविणें हितकर होणार नाहीं. कारण दरेक प्रश्नाला शेवटीं जातीय स्वरूप यावें, ही या देशापुरती नियति दिसते.

वादविवादाला उत्तर देण्याचें आंबेडकरांनीं टाळलें. त्यांच्या कमिटीच्या वतीनें श्री. एन्. माधवराव व महमद सादुल्ला यांनीं उत्तरें दिलीं. माधवरावांचें भाषण रटाळ झालें. गांधींचें नांव घेणारांची उगीच कुचेष्टा करण्याचा प्रयत्न त्यांनीं केला. भाषणांतील भाषा बरी होती. मुद्देहि साधारण बरे होते, पण शैली नीट नव्हती.

श्री. महम्मद सादुल्ला कमिटीच्या वतीनें आक्षेपांना उत्तर देण्यास उभे राहिले यांत आमचें वैशिष्ट्य व मर्यादा आहे. एके काळीं कट्टा लीगवादी असलेला एक मुसलमान घटना-परिषदेच्या मसुदा कमिटीतर्फे घटना-समितीच्या स्वदेशभक्त त्यागी सदस्यांच्या आक्षेपांना उत्तर देण्याचा अधिकारी मानला जातो, ही गोष्ट आमच्या राज्याच्या उदार वृत्तीची द्योतक आहे. एखाद्या हिन्दूच्या बाबतींत पाकिस्तानांत हें शक्य झालें असतें का ?

सादुल्लांचें भाषण माधवरावांपेक्षां बरें पण एकंदरींत पाल्हाळिक व रटाळच झालें. माधवराव व सादुल्ला या दोघांनींहि टीकाकारांच्या मुद्द्यांना मात्र अम्मळ बरीं उत्तरें दिलीं. सगळींच उत्तरें बिनतोड किंवा सयुक्तिक असणें अशक्यच होतें.

सादुल्लांचें भाषण सुमारें ५–१५ ला संपलें. अध्यक्षांनीं मुद्दाम परिषदेची बैठक ठरलेल्या मर्यादेपेक्षां पंधरा मिनिटें अधिक चालू ठेवली.

त्यानंतर त्याच ठिकाणीं सदस्यांकरितां श्री. दादासाहेब मावळणकरांचें त्यांच्या विलायतच्या प्रवासावर लहानसें भाषण झालें. या प्रवासाचा दादासाहेब व त्यांच्या पत्नी यांच्या प्रकृतीवर फार इष्ट परिणाम झालेला आहे. दोघांचीहि चर्या प्रफुल्लित व प्रमुदित दिसली.

उद्यांपासून रविवारपर्यंत सुट्टी आहे. जवळ जवळ तीन हजार उपसूचना आहेत. तेव्हां आतां पार्टीच्या सभा वारंवार होतील. म्हणून वाचन व मनन सारखें करावें लागणार.

तुझा,

दादा

१३९ कॉन्स्टिट्यूशन हाउस,
नवी दिल्ली,
१०-११-४८

प्रिय चन्दूराजा,

कालचें पत्र गंपूच्या पत्त्यावर पाठविलें. तुझ्या पत्त्यावर दोन पत्रें पाठविलीं. त्यांचीं उत्तरें आलीं नाहींत. स्वतंत्र पत्रहि तुमच्याकडून आलेलें नाहीं. त्यामुळें तुझ्या नांवाचीं पत्रें गंपूच्या पत्त्यावर पाठवीत आहें.

आज असेंब्लीला सुट्टी असल्यामुळें दुपारीं जैनेंद्रांकडे जाऊं शकलों. अनायासें त्या भागांत गेलोंच होतों म्हणून राजघाटावरील प्रार्थना-भूमीचेंहि दर्शन घेऊन आलों. ज्या ठिकाणीं बापूंच्या शरीराचा दहनविधि झाला, तेथें एक चौथरा केलेला आहे. चौथऱ्याच्या चहूंकडे सीमेंटची फरशी आहे. नंतर लहानसें कंपाऊंड आहे. सगळा थाट अगदीं साधा आहे. तेथून जवळजवळ तीन फर्लांगावर यमुनेचें वाळवंट व पाणी आहे. यमुनेच्या तीरावर अनेक पराक्रमी पुरुषांचीं व राजांचीं थडगीं आहेत. कांहीं हिन्दु व मुसलमान साधुसंतांच्या समाधीहि दिल्लीला आहेत. राजे, सेनापति, राजगुरु व राजर्षि यांच्या छत्र्या व समाधी दिल्लीला असल्या-मुळें तें नगर राजक्षेत्र व राज्यक्षेत्र झालें आहे. पण दिल्लीच्या मातींत राष्ट्रपित्याचें, लोकर्षीचें पवित्र भस्म मिसळलें नव्हतें जुन्या काळीं कोठलाहि प्रासाद किंवा राज्यभवन बांधतांना बळी देण्याची पद्धत होती म्हणतात. जीवमात्राला अभयदान व जीवदान देणें हेंच ज्याचें जीवनव्रत होतें, त्यानें लोकराज्याचा पाया रचतांना आत्मबलिदान केलें. त्या पुण्यश्लोकाच्या विभूतीनें पावन झालेली भूमि आज पाहून आलों. गीतेचा प्रवक्ता वृन्दा-वनविहारी याच्या चरणस्पर्शानें पुनीत झालेला कालिन्दीचा किनारा लोकराज्याची मुहूर्तमेढ रोवणाऱ्या लोकर्षीच्या चिताभस्मानें अधिक पुनीत झाला.

जैनेंद्रांशीं बराच वेळ गप्पागोष्टी झाल्या. मी राजघाटावर जाऊन आल्याचें ऐकून त्यांनाहि बापूंची आठवण झाली. ज्या वेळीं देशांत स्वातंत्र्याचा उत्सव चालला होता त्या वेळीं बापू नवाखालींत पायीं हिंडत होते ! जणूं कांहीं स्वराज्य मिळालें या महान घटनेमुळें त्यांच्या जीवन-चर्येंत कांहींच फरक पडला नाहीं. कर्मयोग्याच्या कर्तव्याला अन्तच नाहीं. स्वराज्य आलें, पण त्यांचें कार्य चालूच होतें.

जैनेंद्र हिंदुस्तानी पक्षाचे आहेत. त्यांचें म्हणणें असें आहे, कीं पाकिस्तानचा कित्ता गिरवून आपण जर हिंदुत्ववादी बनलों, तर पाकिस्तान वज्रलेप होईल. इंग्रज गेले, पण इंग्रजी भाषा जोंपर्यंत वापरांत राहील, तोंपर्यंत इंग्रजांशीं आपला संबंध येण्याची शक्यता राहील. परंतु उर्दूचा जर संपूर्ण अव्हेर करण्यांत आला, तर येथील लोकांचे विचार तेथील लोकांपर्यंत पोंचणारहि नाहींत. पाकिस्तानचें उदाहरण समोर ठेवून आपण जर त्याचेंच अनुकरण करण्याचें ठरविलें, तर आपलें भवितव्य उज्ज्वल नाहीं, असें त्यांचें मत आहे आणि तें अगदीं बरोबर आहे. पण हिंदुस्तानी पक्षाचे समर्थन करतांना त्यांचें म्हणणें इतकेंच आहे, कीं नागरी लिपीलाच मान्यता असावी, फक्त उर्दू लिपीचा निषेध नको. माझ्या मतें भाषेचा प्रश्न सांप्रदायिक भूमिकेवरून विचारांत घेणेंच चुकीचें आहे. त्या प्रश्नाचा विचार व्यवहाराच्या सोयीच्या दृष्टीनें आणि आन्तरप्रांतीयतेच्या उत्कर्षाच्या दृष्टीनेंच केला पाहिजे. मला तर हिंदीवादी व हिंदुस्तानीवादी दोन्ही पक्षांतील समंजस व्यक्तींत मतभेद फारसा आढळला नाहीं. नांवा-विषयीं भांडण दिसतें. तरी पण दोन्ही पक्षांत आग्रही माणसें असल्यामुळें त्या प्रश्नावर असेंब्लींत रण माजणार असें दिसतें. वेळेवर स्फूर्ति झाल्यास मीहि भाग घेईन. राष्ट्रीयत्वाच्या नांवाखालीं जर हिंदुत्वच निरनिराळीं सोंगें घेऊन मिरवूं लागलें, तर देशाला अत्यंत भयंकर परिस्थितीला तोंड द्यावें लागेल, यांत शंका नाहीं.

हिंदुत्वाच्या पोटीं अनेक सांप्रदायिक संकुचित भावनांचा जन्म होईल. पंजाबांतील शीखांमुळें तेथील हिंदूंच्या नाकीं नव आले आहे. सुमारें तेवीस चोवीस वर्षांपूर्वी कानपूर कॉंग्रेसच्या वेळींच मला अशी शंका आली

होती, कीं मुसलमानांचा प्रश्न सुटण्याच्या बेतांत आल्यानंतर कदाचित् हिंदु-शीख प्रश्नाला तोंड द्यावें लागेल. दुसरीकडे जाट-हिंदु प्रश्नहि उद्भवण्याची भीति वाटूं लागली आहे. अशा वेळीं भिन्नत्वाच्या बाबींवर जोर देण्याऐवजीं ' एकत्वाच्या व समानत्वाच्या बाबींवरच भर देणें देशहिताचें होईल. कानपूर कॉंग्रेसच्या वेळीं कोहाट प्रकरण होऊन गेलेलें होतें. मौलाना शौकत अली आणि बापू यांच्यांत मतभेद झाला होता. लाला लजपतराय, स्वामी श्रद्धानंद यांनीं प्रतिकारात्मक व आत्मरक्षणात्मक हिंदू चळवळीला आरंभ केला होता आणि स्वामी सत्यदेव परिव्राजकांसारख्या प्रचारकांनीं ' हिंदु संगठन का बिगुल ' फुंकायला सुरुवात केली होती. ज्या वेळीं उत्तर हिंदुस्थानांत अशा रीतीनें हिंदु ' वयं पञ्चाधिकंशतम् ' वृत्तीनें वागत होते, त्या वेळीं देखील शीख कार्यकर्ते व पुढारी यांच्या वृत्तीवरून माझ्या मनाला वरील शंका चाटून गेली होती. पाकिस्तानांत प्रान्तवाद, भाषावाद, मुल्की गैरमुलकी, सिंधी-सिंधीतर, पठाण-पठाणेतर यांसारखे वाद माजोत अगर न माजोत, हिंदुस्थानांत मात्र सांप्रदायिकता बळावली तर तळपट झाल्यावांचून रहाणार नाहीं. सायंकाळीं मंडलोईसाहेबांचीं दोन मुलें आलीं. तीं अलीगडहून आलीं. त्यांचें म्हणणें असें कीं अलीगडला रा. स्व. संघाचा ' जोर ' विशेष आहे. उघडच आहे. तेथें मुसलमानांचें एक विद्यापीठ दृष्टीपुढें उभें आहे. मुसलमानाला समोर ठेवूनच संघाची चळवळ सुरू करण्यांत आली आहे, त्यामुळें तो जेथें समोर असेल तेथेंच तिला ' जोर ' येतो. निषेधात्मक व्यावर्तक चळवळींची ही प्रकृतिच असते. संघाच्या चळवळींतील हा मूलभूत दोष आहे. पाकिस्तानच्या निर्मितीनंतर आतां मुसलमानांच्या प्रश्नाची तीव्रता उत्तरोत्तर कमी कमी होत जाणार आणि राष्ट्रीय संघटनेच्या योजनेंत संघाला भूमिकाच उरणार नाहीं.

तुझा,

दादा

१३९, कॉन्स्टिटयूशन हाउस,
नवी दिल्ली,
१४-११-४८

प्रिय गंपू,

तुझें पत्र कालच पोंचलें. बाळूच्या पत्रांत तुलाहि उत्तर लिहिलें आहे.

आज जवाहरलालांचा ६० वा वाढदिवस. लहान मुलें, मुली, तरुण, तरुणी, म्हातार, म्हाताऱ्या, सर्व प्रकारच्या, सर्व वर्गाच्या, सर्व जातींच्या, व सर्व स्थितींतल्या लोकांनीं आपल्या प्रधानमंत्र्याचा जन्मोत्सव मोठ्या जिव्हाळ्यानें व उत्साहानें साजरा केला. प्रधानमंत्र्याच्या भव्य प्रासादाच्या विस्तीर्ण प्रांगणांत माणसांची वर्दळ सबंध दिवसभर अव्याहत चालू होती. 'त्यांच्यासारखा पुढारी या देशाला लाभला हें या देशाचें सद्भाग्य आहे', असे धन्योद्‍गार त्यांच्या टीकाकारांच्याहि तोंडून निघत होते. जवाहरांना टीकाकार आहेत, विरोधकहि असतील, पण शत्रु नाहींत. कारण हा माणूस खरोखर आध्यात्मिकतेचा पुतळा आहे. त्याच्याइतका प्रांजळ वृत्तीचा, उमद्या मनाचा, प्रेमळ पुढारी दुसरा नाहीं. त्याच्याशीं भांडल्यानंतरहि त्याचें मन मोडवत नाहीं. आपलें मत सोडतांना व दुसऱ्याचें ग्रहण करतांना त्याचा अहंकार आडवा येत नाहीं म्हणून आपला आग्रह सोडून त्याचें म्हणणें ऐकण्यांत इतरांनाहि मानहानि किंवा कमीपणा वाटत नाहीं. जवाहरलाल या देशाला लाभलेलें वरदान आहे. बापूंना म्हातारपणीं दीर्घ व खडतर तपाचरणानंतर लाभलेला हा त्यांचा खरा उत्तराधिकारी आहे. महत्प्रयासानें उत्तरवयांत दशरथाला रामराज्याचा संस्थापक पुत्र लाभला. बापूंना भारतीय स्वराज्याचा प्रथम सूत्रधार म्हणून लोकादराला पात्र झालेलें हें पुत्ररत्न लाभलें. त्यांच्या तपाचें हें फळ आहे. 'हिन्दुस्थान टाइम्स'चा अग्रलेख वाचनीय आहे.

आज कॉन्स्टिटयूशन हाउसच्या अंगणांत कॉंग्रेस पक्षातर्फे जवाहरलालांना संध्याकाळीं ५ ला उद्यानोपाहार देण्यांत आला. तो प्रसंग अत्यंत हृदय-

स्पर्शी झाला. सरदारांनीं अभिनंदनपर भाषण केलें. इतकें निर्दोष इंग्रजी मीं सरदारांच्या तोंडून यापूर्वीं कधींहि ऐकलें नव्हतें. काय एक एक वाक्य निघत होतें. सरदारांचें हृदय त्यांच्या शब्दांतून प्रकट होत होतें. या करड्या माणसाचें हृदय प्रेमानें इतकें ओतप्रोत भरलेलें पाहून धन्यता वाटली ! खंबीर मनांत व कणखर अंतःकरणांत टिकाऊ प्रेमाला सुरक्षित आयतन मिळतें. कमकुवत मनांत व दुबळ्या हृदयांत तें ठरूं शकत नाहीं. सरदार म्हणाले, " बापूंना माणसाची अचूक परीक्षा होती. त्यांनीं कांहीं वर्षांपूर्वीं गंभीरपणानें जाहीर केलें होतें कीं, जवाहरलाल हेच माझे उत्तराधिकारी होतील. बापूंचें म्हणणें किती बरोबर होतें याची प्रचीति आपणांस आज येत आहे. जवाहरलालांच्या योग्यतेचा, त्यांच्याइतक्या थोर मनाचा आणि चारित्र्यवान् व स्नेहसंपन्न पुढारी इतर कोणताहि देशाला लाभलेला नाहीं. मी आणि ते सख्ख्या भावांसारखे आहोंत. त्यामुळें मला त्यांच्याविषयीं बोलतांना संकोच वाटतो. त्यांनीं ज्या धडाडीनें व कौशल्यानें वादळांत व तुफानांतहि आपलें तारूं हाकारलें त्याच्याबद्दल आपलें हृदय अभिमानानें व कौतुकानें भरून येतें. हा कुशल कर्णधार आम्हांला अजून अनेक दशकें लाभो ! त्यांचा दांडगा उत्साह, अदम्य संकल्पशक्ति आणि कर्तृत्व देव कायम ठेवो ! " सरदारांच्या प्रत्येक शब्दांत विशेषतः त्यांच्या स्वरांत त्यांच्या हृदयांतील जिव्हाळा उमटलेला होता.

जवाहरलालांचें हिंदुस्तानी सोपें व गोड असतें. पण त्यांचें इंग्रजी मात्र कलापूर्ण व सुश्लिष्ट असतें. प्रत्येक शब्द मोहकपणें नृत्य करीत बाहेर पडतो. त्यांनीं सहज विनययुक्त व प्रेमार्द्र शब्दांत उत्तर दिलें. सरदारांविषयीं ते म्हणाले, ' त्यांच्याबद्दल मी काय बोलूं ? त्यांना जर संकोच वाटला, तर मला किती वाटत असेल ? ते व मी सख्ख्या भावाप्रमाणें बरोबर राहिलों व वागलों. मला व साऱ्या देशाला बळ देणारे ते आपले आधारस्तंभ आहेत. ते नसते तर या देशाचा इतिहास निराळ्याच रीतीनें लिहिला गेला असता.'

सरदारांचें भाषण हृदयंगम झालें. दरेक वाक्यानंतर ' ऐका ! ऐका ! '-चा ध्वनि ऐकूं येत होता ! जवाहरलालांचें भाषणहि मनाची पकड घेणारें झालें. दोघांनींहि एकमेकांना कडकडून आलिंगन दिलें ! हरिहरांच्या भेटी-

सारखा तो सोहळा मंगलसूचक झाला ! राजेन्द्र, जवाहर, सरदार या त्रिमूर्तींत बापूंची शक्ति मूर्त स्वरूपांत कायम आहे. म्हणूनच या देशाला उत्कर्षाची आशा आहे. देव त्यांना सुरक्षित व सुखी ठेवो !

पांच दिवसांच्या सुट्टीनंतर घटना-परिषदेची बैठक उद्यां होणार. पण या पांच दिवसांत अनेक मुद्द्यांचा काथ्याकूट होऊनहि निष्पन्न कांहींच झालें नाहीं. सारी चर्चा एरंडाच्या गुऱ्हाळाप्रमाणें निष्फल झाली. देशाचें नांव, घटकांकरितां संज्ञा इत्यादि विषयांवर खडाजंगी होते. 'नांव', 'संज्ञा', 'परिभाषा' हे सारे भाषेचेच प्रश्न आहेत. त्यामुळें येऊन जाऊन सारे प्रश्न भाषेच्या मुद्द्यांच्या खडकांवर आपटतात. भाषेचा प्रश्न आला कीं प्रत्येकाच्या भाषेला ऊत येतो आणि भाषा हें वादविवादाचें तीक्ष्ण हत्यार आहे यापलीकडे कांहींच निष्पन्न होत नाहीं. 'शंकर्स वुईकली'मध्यें एक मोठें गमतीचें 'व्यंगचित्र' आहे. पंतजी, श्रीबाबू व शुक्लजी हे युक्तप्रांत, बिहार व मध्यप्रांत या तीन प्रांतांचे हिंदीवादी मंत्री, टंडनजी व गोविंददास या दोन हिंदीवादी प्रांताध्यक्षांच्या साक्षीत्वाखाली दक्षिण-भारताच्या तोंडाला चाडी लावून हिंदीचें रसायन बळजबरीनें ओतीत आहेत असा देखावा दाखविला आहे. घटनापरिषदेंतील दाक्षिणात्य सभासदांच्या मनोवृत्तीचें हें 'कार्टून' द्योतक आहे. म्हणून भाषेचा प्रश्न आला कीं तो शब्दांच्या पलीकडे जात नाहीं.

बाबासाहेब आंबेडकरांच्या ज्ञानाचा, विचारांच्या असंदिग्धतेचा व मेंदूच्या शाबूतपणाचा प्रत्यय पदोपदीं येतो. मसुदा त्यांचाच असल्यामुळें अनेक मुद्द्यांचा व कलमांचा खुलासा अधिकारवाणीनें त्यांनाच करावा लागतो. त्यांच्या ठसठशीत वाक्यरचनेची व खणखणीत आवाजाची छाप पडते.

वादाच्या मुद्द्याच्या बाबतींत जवाहरलालांचें मत बहुधा निर्णायक मानलें जातें. ज्ञान, अनुभव व भावना या तिन्ही बाबतींत त्यांचा अधिकार सगळ्यांना मान्य झालेला आहे. म्हणून त्यांचें म्हणणें न रुचलें किंवा न पटलें तरी त्यांच्याविरुद्ध जाण्याचा बहुतेक कोणाचा जीवच होत नाहीं. जवाहरलाल हुज्जत घालतात, समजूत काढतात, युक्तिवाद करतात पण हें

सारें प्रेमळपणानें व सात्त्विक आवेशानें. सरदार दोन तासांचा वादविवाद घणाच्या एका घावानें चूरचूर करून टाकतात. ते म्हणतात, कोऱ्या कागदावर काळीं अक्षरें काढल्यानें वस्तुस्थिति पालटत नाहीं. त्यांच्या शब्दांत वस्तुस्थितीचें तर्कशास्त्र असतें, म्हणून त्यांचें म्हणणें न आवडलें, बुद्धीला ग्राह्य न वाटलें, तरी त्याला विरोध करण्याची कोणाला धमक राहत नाहीं; कारण, ज्याच्या अंगीं वस्तुपरिवर्तनाची धमक असेल तोच त्यांचें म्हणणें खोडून काढूं शकेल. वस्तुस्थितीचें तर्कशास्त्र म्हणजे अविवेकी आग्रह असें कोणता बुद्धिवादी म्हणूं शकेल ? त्यामुळें सरदार आग्रही आहेत, असेंहि कोणाला वाटत नाहीं.

दिल्लीचा हिंवाळा अजून जारीनें सुरू झालेला नाहीं. आतां थोडा थोडा भासूं लागला आहे. देश स्वतंत्र झाला म्हणजे त्याचा एका अर्थानें नव्हे, अनेकदृष्टींनीं—पुनर्जन्म झाला. मुलीचें लग्न झालें व गृहप्रवेश झाला म्हणजे तिच्या नवीन ' संसाराला ' किंवा ' आयुष्याला ' आरंभ होतो. मग तिचें नांव काय ठेवावें याची चर्चा होते. त्याचप्रमाणें आपल्या देशाच्या बाबतींत होत आहे. या भूमीच्या स्वतंत्र संसारास सुरुवात होत आहे. तेव्हां तिचें नांव काय ठेवावें येथपासून वादाला आरभ आहे. कोणी म्हणतो ' भारत ' म्हणा, कोणी ' भारतवर्ष ' म्हणा म्हणतो, कोणाचें म्हणणें ' हिंद ' म्हणा, किंवा ' हिंद देश ' म्हणा. या सर्वांचें म्हणणें असें, कीं इंग्रजींत देखील ' इंडिया ' हें नांव नको. देशाचें नांव हें 'विशेषनाम' असल्यामुळें त्याचे इंग्रजी व हिंदी असे पर्याय हवेत कशाला ? ' इंडिया ', ' गँजीस ', ' इंडस ' अशांसारखीं नांवें इंग्रजांनीं दिलीं म्हणून आम्हीं तींच कायम ठेवावीं असें थोडेच ? म्हणून इंडिया हें नांव नको.

याच्या विरुद्ध ' इंडिया ' नांवाचें समर्थन करणारे म्हणतात, कीं ' इंडिया ' हें नांव ' इंदु ' किंवा ' हिंदु ' शब्दापासूनच आलेलें आहे. ' हिंदयाना 'ऐवजीं ' इंडिया ' म्हटलें. आन्तरप्रान्तीय व्यवहारांत त्या नांवानें हिंदुकुशापासून कन्याकुमारीपर्यंत व कराचीपासून सदियापर्यंत साऱ्या देशाचा, म्हणजे पाकिस्तान ज्यांतून वेगळें काढलेंत, त्या सबंध देशाचा बोध

होतो. म्हणून पाकिस्तान वेगळें झाल्यानंतरहि आपण त्याच नांवाचा आग्रह धरण्यांत मौज आहे. 'पाकिस्तान' हा निराळा तुकडा आहे, पण उरलेला देश 'इंडिया'च आहे. पाकिस्तानच्या लोकांना आपण या उरलेल्या भागाला 'इंडिया' नांवानें ओळखावें, हें मान्य नाहीं. त्यांना तर 'भारत', 'हिंदुस्थान' यासारखें नांवच इष्ट वाटतें. कारण मग 'इंडिया'चे हे दोन भाग झाले, असें त्यांना म्हणतां येईल. बाहेरच्या जगाला ते सांगतील, कीं आतां 'इंडिया' शिल्लक नाहीं. 'पाकिस्तान' व 'हिंदुस्थान' किंवा 'भारत' असे दोन स्वतंत्र देश आहेत. हा एक मुद्दा. दुसरा मुद्दा असा, कीं इतर देशांशीं जे करारमदार झाले आहेत, त्यांत 'इंडिया' हेंच नांव वापरलेलें आहे. अखेरीस माणसाचें नांव हें इतरांकरितांच असतें. तेव्हां आन्तरराष्ट्रीय व्यवहारांत घोटाळा होऊं नये, म्हणून 'इंडिया' हेंच नांव कायम ठेवावें.

'भारत' किंवा 'हिंदुस्थान' पक्षाचें म्हणणें असें, कीं 'भारत' व 'हिंदुस्थान' हे शब्द या देशांतील लोक सबंध देशाकरितांच वापरीत आलेले आहेत. येथील मुसलमानहि पाकिस्तानासकट या साऱ्या देशाला हिंदुस्थानच म्हणत असत. तेव्हां 'पाकिस्तान' काढलें, तरी उरलेलें 'हिंदुस्थान' म्हणजे 'हिंदूंचा देश' नसून 'हिंदीस्तान' किंवा 'हिंद-देश' आहे. 'हिंदुस्थान' हें नांव 'पाकिस्तान'च्या पथ्यावर पडतें म्हणून तें नको असें म्हणणें असेल, तर 'पाकिस्तान'ला कुठलें नांव अनिष्ट वाटतें याविषयीं 'पाकिस्तान'चा कौल घेतल्यानंतर जें नांव त्यांना नकोसें असेल, तेंच नेमकें स्वीकारावें. हा मार्ग विधायक राष्ट्रनिर्मितीचा नव्हे. यांत या देशाच्या नांवाची निवड करणें शेवटीं पाकिस्तानच्या हातीं जातें.

'हिंदु' हें नांव परक्यांनीं दिलेलें असल्यामुळें 'इंडिया'प्रमाणेंच तें त्याज्य आहे, असाहि एक मुद्दा पुढें मांडण्यांत येतो. पण आतां त्या नांवाचा अंगीकारच नव्हे, तर अभिनिवेश धारण करण्यांत आलेला आहे. हिंदुत्व हेंच राष्ट्रीयत्व मानण्यापर्यंत मजल गेलेली आहे. त्यामुळें या युक्तिवादांत अर्थ नाहीं. पण 'हिंदु' हें एका जमातीचें व धर्माचेंहि नांव आहे, म्हणून 'हिंदुस्थान' नांवाला 'पाकिस्तान'च्या प्रतियोगी नांवाचें स्वरूप येऊन त्याला जातीयतेचा दर्प येईल, या म्हणण्यांत मात्र तथ्य आहे.

म्हणून ‘ भारत ’ किंवा ‘ हिंद ’ अथवा ‘ हिंद देश ’ म्हणायला हरकत दिसत नाहीं. पण बहुमत ‘ भारता ’लाच अनुकूल दिसतें. नांवाचा आग्रह सोडला, तर राष्ट्रभाषेचाहि प्रश्न तेव्हांच सुटेल. फक्त देवनागरी लिपीला मान्यता द्यावी. प्रांतीय-भाषा-भाषी लोक उर्दू लिपि शिकण्याच्या भानगडींत पडणार नाहींत. ते देवनागरी शिकतील. प्रांतीय भाषेच्या प्रकृतीला अनुसरून ते पारिभाषिक व इतर शब्द निर्माण करतील. अशा रीतीनें राष्ट्रभाषा हिंदीच्या स्वरूपाचा विकास होईल. तिला ‘ हिंदुस्थानी ’ हें नांव दिलें, तरी तिच्या स्वरूपांत फरक पडणार नाहीं. आजच आग्रह धरला, तर त्याला ‘ उत्तर भारत वि० दक्षिण भारत ’ व ‘ हिंदुत्व वि० अहिंदुत्व ’ असें नसतें स्वरूप प्राप्त होतें.

संस्थानें पुष्कळ प्रमाणांत काबूंत आलेलीं पाहून आतां सगळ्यांना वाटतें, कीं तीं प्रांतांच्या पंक्तीला आणून बसविलीं पाहिजेत. त्यांच्याशीं जे करारमदार केले त्यांची कोणालाच विशेष चाड वाटत नाहीं पण या बाबतींत आपल्याला कितीहि घाई असली तरी हा प्रश्न शहाणपणानें व गंभीरपणानें सोडवावयाला पुरेसा वेळ दिलाच पाहिजे. अर्थात् या बाबतींतील कलमांची भाषा थोडीशी मोघम आणि असमाधानकारक असणें अपरिहार्यच दिसतें.

ज्या बाबतींत आमचे विचार अजून स्पष्ट नाहींत किंवा परिस्थिति गुंतागुंतीची आहे, त्या बाबींविषयींचीं कलमें मनासारखी सुनिश्चित आणि सुस्पष्ट नाहींत, याबद्दल तक्रार करण्यांत अर्थ नाहीं. आमच्या मानसिक व व्यावहारिक परिस्थितीचें प्रतिबिंब त्या त्या कलमांत उमटलेलें आहे. घटनेंतील प्रमुख दोषांचें बीज येथें आहे.

राष्ट्रगीताचाहि प्रश्न सहज सुटण्याजोगा दिसत नाहीं. श्री. द्वारकाप्रसाद मिश्रांचें गीत शब्दांच्या व अर्थाच्या दृष्टीनें चांगलें आहे. क्लिष्ट असलें तरी सुटसुटीत आहे. पण ‘ जनगणमन ’चा रचयिता एक राष्ट्रकवि आहे आणि ‘ वन्दे मातरम् ’ हें क्लिष्ट असलें, तरी तें पद चिरंजीव झालेलें आहे. म्हणून नवीन पद स्वीकारण्याकडे फारसा कल दिसत नाहीं. विमलाताईंनीं ‘ वन्दे मातरम् ’ लाच ‘ जनगण ’च्या तालावर नाचविण्याचा प्रयत्न केलेला आहे. पहावें त्याला कितपत अनुकूलता मिळते ती !

' नांव ', ' भाषा ', ' राष्ट्रगीत ', राज्याच्या घटकांचें स्वरूप, या सर्वच बाबतींत अशी अनिर्णयाची परिस्थिति असल्यामुळें कामांत उरक व तडफ येण्याचा फारसा रंग दिसत नाहीं; तरीपण शीघ्र न झाला, तरी शेवटीं परिस्थित्यनुरूप शक्य तितका सम्यक् निर्णय होईल, असा मात्र भरंवसा वाटतो.

तुझा,

दादा

— २३ —

१३९, कॉन्स्टिटयूशन हाउस,
नवी दिल्ली.
ता. १९-११-४८

प्रिय बबन,

घटनापरिषदेचें काम मंद गतीनें, पण निश्चित गतीनें, चालू आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्यासारख्या प्रसिद्ध विधिपंडिताकडे पौरोहित्य आहे. त्यांच्या मदतनिसाचें काम अनंतशयनम् अय्यंगार अविरतपणें आणि नित्य जागरूकतेनें करीत आहेत. घटनेंत अनेक प्रकारचे फेरफार व सुधारणा सुचविणाऱ्या उपसूचना आलेल्या आहेत. पण त्यांच्यापैकीं फार थोड्या स्वीकारल्या जाण्याचा संभव आहे. समाजवादी व अन्य आर्थिक-क्रांति-वादी व्यक्तींच्या उपसूचना खरोखर मनाला पटतात. त्यांच्यावरून थरारून सोडणारीं भाषणें करण्याची स्फूर्ति होते ! माझ्याप्रमाणेंच इतरांनाहि वाटतें. ' दारिद्र्य ' व ' ददात ' यांचा नायनाट करायला ' मालकी ' व 'मिळकत' यांचा नायनाट करणें अगत्याचें आहे, हें सर्वांना मान्य आहे. पण घटनेंत तशा प्रकारचें कलम घालण्याची आवश्यकता अनेकांना मान्य नाहीं. काय असेल तें असो, या तत्त्वांचा व त्यांवर आधारलेल्या कलमांचा घटनेच्या आधारभूत प्रमेयांत समावेश व्हावा, असें वाटल्यावांचून रहात नाहीं. त्यामुळें जरा अवघडल्यासारखें वाटतें.

काझी करीमुद्दीन यांनीं मोठा शिताफीचा डाव टाकला. मद्य व मादक पदार्थ यांच्या निषेधाचें कलम घटनेच्या मार्गदर्शक सिद्धान्तांत घालावें अशी त्यांनीं उपसूचना आणली. काँग्रेस सभासदांनीं आणि गांधीनिष्ठांनीं देखील अशा प्रकारची सूचना मांडली नाहीं. ती एका काँग्रेसेतर मुसलमानानें आणली. लो. टिळक व म. गांधी या दोन्ही राष्ट्रनेत्यांनीं दारूबंदीकरितां जिवाचें रान केलें आणि देशांतील कित्येक लोकांनीं तो कार्यक्रम यशस्वी करण्याकरितां प्राणहि पणाला लावले. त्याच दारूबंदीकरितां एक सूचना काँग्रेसेतर माणसाकडून मांडण्यांत आली याच कारणाकरितां तिचा अव्हेर कसा करतां येईल ? गांधीजींच्या नांवावर आम्हांला अहिंसेची, राष्ट्रैक्याची व शिस्तीची आठवण करून देणारे शास्त्रवादी, जातिवादी आणि तुरुंगाचे अधिकारी या देशांत कांहीं कमी नव्हते. पण त्यांचें म्हणणें कितीहि मानभावीपणाचें असलें, तरी त्यांतल्या तत्त्वांना विरोध कसा करतां येईल ? असा एक पेंच काँग्रेस पक्षावर काझी साहेबांनीं टाकलेला आहे.

त्यामुळें मोठा विचित्र प्रसंग उद्‌भवला. या उपसूचनेला विरोध करावयाचा असें मनाशीं ठरवून उत्कलचे माजी पंतप्रधान श्री. विश्वनाथदास यांनीं मोठा गमतीचा युक्तिवाद केला. ते म्हणाले, ‘ अहो, दारूबन्दी नुसती करून कसें चालेल ? या उपसूचनेंत अफूबंदी नाहीं. दारूपेक्षां अफू कांहीं कमी भयंकर नाहीं. अफूचा उल्लेख नाहीं म्हणून ही उपसूचना अग्राह्य आहे. दुसरें असें, कीं आम्ही दारूबन्दीची प्रत्यक्ष अंमलबजावणीहि सुरू केलेली आहे. दारूबंदी हा आचारात्मक कार्यक्रम आहे. तें कांहीं निव्वळ तत्त्व नव्हे. तेव्हां दारूबंदीचा समावेश तत्त्वांत न करतां प्रत्यक्ष करावयाच्या गोष्टींत केला पाहिजे. म्हणून मी या उपसूचनेला विरोध करतों. ’ बाबू गोविंददास म्हणाले, ‘ या उपसूचनेंतील तत्त्व सर्वमान्य आहे. सर्व धर्मांच्या, सर्व पक्षांच्या, सर्व तऱ्हेच्या लोकांना मान्य आहे. तें कलम कदाचित् या खंडांत बसण्यासारखें नसेल. पण घटनेंत योग्य ठिकाणीं त्याला जागा मिळणें जरुरीचें आहे. ’ श्री. महावीर त्यागी यांनीं नेहमींप्रमाणें मोठें सडेतोड, कळकळीचें आणि फटकळ भाषण केलें. ते म्हणाले, “ आम्ही ज्या दारूबंदीकरितां लोकांना चळवळ करायला उद्युक्त केलें, ती आम्हींच कां सोडून देणार आहोंत ? मी घटनापंडित नाहीं. पण मी कृतिपंडित आहें. माझ्याजवळ शब्दपांडित्य नाहीं पण

अनुभवपांडित्य आहे. मी घटनाशास्त्र्यांना विनवितों, कीं त्यांनीं या तत्त्वाचा समावेश योग्य ठिकाणीं योग्य शब्दांत करावा. ”

हा सर्व विरोध हल्लींच्या समाजरचनेंतूनच उत्पन्न झालेला आहे. बापू म्हणत असत, कीं माझ्या साऱ्या विधायक कार्यक्रमांचा एकमेकांशीं अभेद्य संबंध आहे. तुम्ही एक कार्यक्रम हातीं घेतलांत कीं त्यांतून बेमालूमपणें दुसरा निघतो आणि अशा रीतीनें तुम्हांला समाजक्रांतीच्याच उद्योगाला आरंभ करावा लागतो. हीं सारीं व्यसनें अत्यंत संपन्न व अत्यंत विपन्न अशा दोनच वर्गांत दिसून येतात. जेथें आळस असेल किंवा बेकारी असेल, तेथें वेळ हा काळाचें स्वरूप घेऊन खायला धांवतो; त्याचप्रमाणें जेथें विश्रांतीचा अभाव असेल तेथें आणि जेथें रिकामपणामुळें जगणेंहि सुचत नसेल तेथें व्यग्र किंवा सुन्न झालेल्या चित्ताला उत्तेजक गुंगीची गरज भासते. म्हणून मद्यपान, अफू, गांजा, भांग, व्यभिचार हीं व्यसनें अतिश्रांत वर्गाच्या जीवनाचें वाटोळें करणारीं अधम झालेलीं आहेत आणि तींच अतिविश्रांत वर्गाचीं प्रतिष्ठित करमणुकीचीं साधनें झालीं आहेत. एकाला देहभान विसरल्यावांचून शीणाचा विसर पडत नाहीं, दुसऱ्याला स्वतःला व जगाला विसरण्यावांचून सर्वव्यापी निष्क्रियतेंतून सुटकेचा मार्ग दिसत नाहीं. जुगार, मादक द्रव्यें आणि इतर व्यसनें आजच्या समाजरचनेमुळें आलेल्या पुरळासारखीं आहेत. खरें विष आंतच आहे. म्हणून माणसाला निर्व्यसनी बनवावयाचें असेल, तर त्याला उपयुक्त श्रमांत गुंतवा आणि परिग्रहाच्या मोहापासून वांचवा, असा दुहेरी कटाक्ष बापूंचा होता. कायद्यानें दारूबंदी होऊं शकेल, पण निशा किंवा कैफ यांच्या अमलाखालीं जाण्याची माणसाची वृत्ति कमी होणार नाहीं. असें आहे म्हणूनच परिस्थितींत आपल्याला असा विरोध दिसून येतो. तथापि दारूबंदीच्या कायद्यालाहि कोण कसा विरोध करूं शकणार ? आणि तोहि हिंदुस्थानांत ? या देशांत मद्यपान करणारी देवता नृशंस देवता आहे. मद्य-मांस सेवन हा वामाचार मानलेला आहे. आणि दारूबंदीचा समावेश लोकचारित्र्याच्या पायावर लोकराज्याची उभारणी करण्याकरितां योजिलेल्या विधायक कार्यक्रमांत करण्यांत आलेला आहे. तेव्हां काझीसाहेबांच्या उपसूचनेचा अव्हेर कोणत्या मुद्द्यावर करतां येईल ! कॉंग्रेसमध्यें कांहीं कमी बुद्धिमान् माणसें

नाहींत. काझीसाहेबांच्या आव्हानाला समर्पक व चोख उत्तर देण्याची युक्ति तीं माणसें शोधून काढतील आणि दारूबंदीचा समावेश करून घेतील.

पण माझ्या म्हणण्यांतला मुद्दा तुझ्या ध्यानांत आला असेल. सामाजिक व आर्थिक परिस्थितींतून ज्या सुधारणेला पोषण मिळत नाहीं, ती मूळ धरत नाहीं. ज्यांना मरायलाहि फुरसत नाहीं आणि ज्यांना जगायलाहि मेहनत करावी लागत नाहीं, अशा दोन्ही प्रकारच्या लोकांना स्वतःला विसरण्याचा प्रयत्न करावा लागतो. दोघांच्याहि जीवनाला रुचि नसते, त्यामुळें बाह्य व्यंजनांच्या साहाय्यानें कृत्रिम रुचि निर्माण करावी लागते. जुगार व मद्य हीं साधनें जीवनांत अपथ्यकर व कृत्रिम रुचि निर्माण करतात. तुम्ही जुगाराला मनाई कराल, तर लोक पत्त्यांच्या खेळांत, लॉटरींत, घोड्यांच्या शर्यतींत आणि इतर असंख्य प्रकारांत जुगार दाखल करण्याच्या युक्त्या काढतील. अर्थशुद्धीवांचून तत्त्वशुद्धि नाहीं हेंच खरें.

श्री. मोहनलाल गौतम यांनीं फांशीची शिक्षा रद्द करण्याची सूचना आणली. तिचाहि स्वीकार करणें शक्य वाटलें नाहीं. ' गाय ही अवध्य ठरवावी ', असा आग्रह धरणारीं माणसें देखील माणसाला अवध्य ठरवायला तयार नाहींत. आततायी माणसाला, दुर्जनाला मारणें हें धर्मकृत्य आहे, असें ते देवादिकांचे दाखले देऊन प्रतिपादन करतात. जे हल्लींच्या आर्थिक व्यवस्थेमुळें गुन्हेगार बनलेले आहेत; त्यांच्या शिक्षेला हळूहळू शिक्षणाचें स्वरूप येऊन ' तुरुंग ' हीं अनुशीलन-गृहें बनलीं पाहिजेत, हें तत्त्व जुने धार्मिक वळणाचे डीन इंगसारखे विचारक आणि आधुनिक मार्क्स-वादी क्रांतिकारक या दोघांनाहि सारखेंच मान्य आहे. पण जे लोक स्वतःचें किंवा स्वतःच्या मूठभर वर्गाचें प्रभुत्व व वर्चस्व स्थापन करण्याकरितां समाज-व्यवस्थाच उलथून पाडण्याचा प्रयत्न करतात, ते लोकद्रोही व समाजद्रोही आहेत, ते विषबीजांसारखे आहेत, त्यांचें ताबडतोब निर्मूलनच करणें आवश्यक असतें, हें तत्त्वहि दोघांना सारखेंच मान्य आहे. डीन इंग या प्रक्रियेला ' Weeding out '—केरकचरा खणून काढण्याची प्रक्रिया म्हणतो, तर रशियाचा क्रांतिवादी ' Purge ' आंतरिक सफाईची प्रक्रिया म्हणतो. आपल्या येथेंहि कासम रझवी, बापूंचा मारेकरी व अशींच इतर माणसें जगण्यास पात्र आहेत, असें अत्यंत दयाळु माणसालाहि वाटत नाहीं. तेव्हां

शिक्षा सामान्य गुन्हेगारापुरतीच फार तर रद्द होण्याचा संभव. पण असें सशर्त व मर्यादित कलम घटनेची शोभा व किंमत वाढविणार नाहीं.

लोकसत्तेची अंतिम परिसीमा म्हणजे राज्यकर्ते व प्रजाजन, म्हणजेच सरकार व लोक यांच्यांतील भेद पूर्णपणें नाहींसा होणें. याचेंच नांव राज्य-सत्तेचें विलिनीकरण. सरकार हें लोकांत मिसळून तदाकार झालें, म्हणजे त्याला मोक्ष मिळाला. हें साध्य करण्याच्या प्रक्रियेला विकेंद्रीकरण म्हणतात. राज्यसत्तेचें वितरण–वांटप–म्हणजे विकेंद्रीकरण. तिचें वांटप होतां होतां दरेकाच्या वांट्याला सारख्याच प्रमाणांत सत्ता आली म्हणजे लोकांचें जीवन व शासन यांत फरक उरणार नाहीं. अर्थात् सर्व व्यक्ती स्वयंशासित होतील. सरकार हें जनतेएवढें होऊन जाईल. मग कोणी शासक नाहीं आणि कोणी शासित नाहीं. जो राजा तोच प्रजा आणि जी प्रजा तोच राजा. या विकेंद्रीकरणाचें साधन म्हणून बापूंनीं ग्रामसंजीवनाची व ग्रामराज्यांची कल्पना मांडली होती. पण संपत्तीचें विकेंद्रीकरण झाल्यावांचून सत्तेचें विकेंद्रीकरण अशक्य आहे. खाजगी मालमत्ता म्हणजे व्यक्तीच्या ठिकाणीं संपत्तीचें केंद्रीकरण, म्हणजेच सांठा किंवा संग्रह आहे, तोंपर्यंत वितरण कसें होणार? आणि वितरणच नाहीं तर विलिनीकरण कुठलें?

त्यामुळें खेड्यापाड्यांच्या सुधारणेविषयीं किंवा स्थानिक स्वराज्याचीं जिवंत केंद्रें बनविण्याचीं कितीहि कलमें घटनेंत घातलीं, तरी जोंपर्यंत अर्थ-रचनेविषयीं निर्णय होत नाहीं, तोंपर्यंत त्या योजनांतहि 'जीव' किंवा 'राम' राहणार नाहीं. अशा रीतीनें सर्वच प्रश्न शेवटीं आर्थिक संयोजनावर अवलंबून असल्यामुळें व्यसन-व्यभिचारासारख्या नैतिक प्रश्नांपासून तों शरीरश्रमाचा नियम, मालमत्तेचें नियंत्रण व पशुसंगोपन यांसारख्या आर्थिक व अर्थनैतिक प्रश्नांपर्यंत सर्वच प्रश्नांच्या बाबतींत किंचित् अनिर्णय, दुर्बल निष्ठा आणि संकल्पाचा अभाव दिसून येणें अपरिहार्य आहे. श्री. दामोदर स्वरूप शेठ आणि श्री. मोहनलाल गौतम यांच्या उपसूचनांचें स्वरूप समाजवादी असलें, तरी त्या ग्राह्य होत्या आणि समाजांत आवश्यक आर्थिक परिवर्तन घडवून आणण्याच्या दृष्टीनें इष्टहि होत्या. पण 'शुद्ध लोकसत्ते'च्या निव्वळ तात्त्विक कल्पनेच्या नांवावर त्यांचा अव्हेर करण्यांत आला. ही शुद्ध लोकशाही आर्थिक स्वातंत्र्याच्या अभावीं गर्भावस्थेंत तरी जन्माला

येईल का ? शुद्ध लोकशाही म्हणजे औपचारिक लोकशाही, बाह्य लोकशाही. नुसता लोकशाहीचा आकार. अपरिग्रही व श्रमनिष्ठ व्यक्तींचा समाज बनल्यावांचून त्या लोकशाहींत प्राण उत्पन्न होणें शक्य नाहीं. आमच्या पक्षाला हें सारें कळतें व पटतें; पण तें अमलांत आणायला जी मनाची तयारी आणि कर्तृत्वशक्ति लागते ती पुरेशी नाहीं. हाहि परिस्थितीचाच परिणाम आहे. या देशांत राष्ट्रीयत्व–म्हणजे लौकिक राष्ट्रनिष्ठा–आणि जातिनिरपेक्ष नागरिकत्व या भावनांचा विकास व प्रस्थापना करण्यावर सर्वांचा पहिला कटाक्ष असल्यामुळें तूर्त तरी इतर सान्या बाबी थोड्याफार मागेंच पडणार. म्हणूनच डॉ. बाबासाहेब आंबेडकर, गोपालस्वामी अय्यंगार, अल्लादि कृष्णस्वामी अय्यर, माधवराव, यांच्यासारखे पुराणप्रिय व ग्रंथवादी घटनापंडित आपल्या या नवीन घटनेचे अध्वर्यु आहेत. त्यांतल्या त्यांत डॉ० बाबासाहेब हे सामाजिक बाबतींत क्रांतिवादी व मागासलेल्यांचे आणि गोरगरिबांचे कैवारी असल्यामुळें तिच्यांत आर्थिक व सामाजिक क्रांतीच्या आधारभूत तत्त्वांचा आदरपूर्वक उल्लेख आलेला आहे. निव्वळ राजकीय लोकशाही म्हणजे लोकशाहीचें बाह्यरूप, आकार. त्यांत कुठलें द्रव्य भरावयाचें तें ज्याचें त्यानें ठरवावें. लोकशाहीचा आकार राज्यव्यवस्थेचा विषय आहे. म्हणून प्रागतिक व उदारमतवादी लोक लोकशाहीचें प्रतिपादन करतात. उलट, लोकशाहीच्या आंतील द्रव्याची ज्यांना किंमत असते, ते आर्थिक लोकशाहीवर अधिक जोर देतात. हेच क्रांतिवादी. पण हल्लींच्या घटनेला ठिगळें लावून तें कार्य साधणार नाहीं. क्रांतीचें यंत्र म्हणून तिचा उपयोग करण्याचें कौशल्य संपादन करावें लागेल. याच अर्थानें बाबासाहेब आंबेडकर घटनेला यंत्राची किंवा उपकरणाची उपमा देतात. मार्क्सप्रणीत अथवा गांधीप्रणीत संयोजनाचें उपकरण होण्याची पात्रता या घटनेंत आहे, यांत मात्र शंका नाहीं. आतांपर्यंतची परंपरागत लोकशाही जातीयतेच्या द्रव्याची बनलेली होती. आतां तिच्यांत जातिनिरपेक्ष व धर्मनिरपेक्ष नागरिकतेचें द्रव्य भरावयाचें आहे. तेवढें या घटनेनें साधण्यास हरकत नाहीं. म्हणून तिला ठिगळें लावण्यांत अर्थ दिसत नाहीं.

आतां दिल्लीचें स्वरूप मागच्या वर्षाच्या मानानें बरेंच नीटनेटकें दिसतें. शरणार्थींचीं दुकानें व वसाहती आतां पुष्कळच व्यवस्थित दिसतात. लाल

किल्ल्यासमोर ' लजपतराय मार्केट ' म्हणून एक नवीन मार्केटच त्यांच्या करितां तयार करविण्यांत आलें आहे. अर्थातच त्यांच्यामुळें वस्तूंचे व वाहनांचे भाव त्या मानानें बरेच कमी झाले आहेत. अस्वच्छताहि पूर्वीपेक्षां कांहीं कमी दिसते.

तुझा,
दादा

— २४ —

१३१, कॉन्स्टिटयूशन, हाउस
नवी दिल्ली.
ता. २८-११-४८.

प्रिय चन्दूराजा,

बाळूला काल एक कार्ड पाठविलें, तें आज पोंचलें असेल. मला ता. ७ ला जबलपूरला जायचें आहे. ता. ८ लाच परत येईन. घटना परिषद ता. १३ पर्यंत चालून कॉंग्रेसकरितां व नाताळनिमित्त ता. २६ पर्यंत बन्द राहील. पुढें ता. २७ ते १५ जानेवारीपर्यंत चालेल. माझा कल जबलपूरला जाण्याचा नव्हता. पण पूर्वींच्या कार्यक्रमाप्रमाणें घटनापरिषद ता. ९ लाच कॉंग्रेसकरितां बंद होणार होती. म्हणून मीं तें आमंत्रण स्वीकारून चुकलों. ती ' चूक ' आतां भोंवल्यावांचून कशी राहील ?

आज धाकट्या (जयदयाल) डालमियांकडे कमलनयन बजाज भेटला. त्यानें जयपूरला येण्याविषयीं आग्रह केला. माझा कल जाण्याकडे नव्हता. जेथें आपला उपयोग नाहीं तेथें कशाला जा, असा विचार मनांत आला. एक कानपूरचें ( १९२५ ) अधिवेशन सोडलें, तर मी अजून कॉंग्रेसचें अधिवेशन कांहीं पाहिलें नाहीं. १९२० ची नागपूर कॉंग्रेस अगदीं आपल्या अंगणांत झाली. पण पाहुण्यांची इतकी गर्दी होती, कीं त्यांच्या व्यवस्थेत व आजारी पाहुण्यांच्या शुश्रूषेतच सारा वेळ जात असे. त्या वेळीं देखील कॉंग्रेस पहायला

मिळाली नाहीं म्हणून मन खट्टू झालें नाहीं. आतां तर माझ्या भावना व चित्ताचे आवेग बरेच सौम्य झाले आहेत. पण कमलनयनच्या आग्रहास्तव जाऊन येईन. दुसरें काय !

मध्यें टॉमसकडे जाऊन आलों. त्याची पत्नी, मावसभाऊ, पत्नीची त्रीण इत्यादि सारीं माणसें मोठ्या आपुलकीनें वागलीं. ख्रिस्ती झालेलीं माणसें फार तर नांवें बदलतात, पण भाषा सहसा सोडीत नाहींत. त्यामुळें त्यांच्यांत परक्याप्रमाणें वाटत नाहीं. मुसलमान झालेलीं माणसें भाषा सोडण्याचा प्रयत्न करतात. ज्यांना उर्दूचे अवाक्षर येत नाहीं, तींहि माणसें प्रांतीय भाषेविषयीं आत्मीयता बाळगण्याऐवजीं उर्दूचा अभिमान धरतात. म्हणून त्यांच्यांत व आपल्यांत नसतें अंतर निर्माण होतें. टॉमस त्रावणकोरचा आहे. त्याची आणि आपली भाषा एक नाहीं. पण धर्मांतराबरोबर त्यानें नामान्तर केलेलें असलें, तरी भाषांतर केलेलें नाहीं; हें पाहून तो आपल्या-पैकींच आहे, असें वाटायला लागतें. मी त्याच्याशीं इंग्रजींत बोलतों, पण तीं सारीं मंडळी आपसांत मल्याळींत बोलतात म्हणून त्यांच्याविषयीं आत्मीयता वाटते. त्यांनीं धर्मांतर केलें असलें, तरी ते लोक ‘ बाटगे ’ नाहीं वाटत. माझ्या कौटुंबिकतेला नवीन नवीन आलंबनें मिळत आहेत. स्वायत्त संयुक्त कुटुंब-भावनेचा विकास याच पद्धतीनें नाहीं का होणार ?

एका बाबतींत माझें भाग्य फार थोर आहे. मला ठिकठिकाणीं मित्रलाभ अनायासें होतो. हे मित्र बहुधा खालच्या वर्गांतले व तरुण असतात. त्यामुळें मित्रलाभाबरोबर पुत्रलाभहि होतो. मला अनुयायी किंवा शिष्यवर्ग नको आहे. त्यांचें मला भय वाटतें. तुम्ही माझीं मुलें आहांत, पण अनुयायी किंवा शिष्य नाहीं. तुम्ही माझ्याशीं भांडतां, माझ्या मताविरुद्ध वागतां तरी तुमच्या व माझ्या प्रेमांत अंतर येत नाहीं. त्याचप्रमाणें मला हे जे आप्त लाभतात, त्यांचा निरपेक्ष स्नेह मला मिळतो. मतें बदललीं म्हणजे अनुयायित्व संपतें, शिष्यत्व संपुष्टांत येतें; पण आयुष्य संपलें तरी स्नेह संपत नाहीं. मला सर्व प्रांतांची, सर्व जातींची, सर्व धर्मांची आप्तमंडळी लाभतात. पंजाबी, सिंधी, काठियावाडी, बंगाली, आसामी, उडिया, दक्षिण भारतीय वगैरे वगैरे. त्यांची भाषा, त्यांचा पोषाक, त्यांची राहणी, कशांतच परकेपणा दिसत नाहीं. मित्रत्वाला जातगोत,

प्रांत, संप्रदाय इत्यादींपैकीं कांहींच लागत नाहीं. अशा रीतीनें जीवनांतून अखिल भारतीय नागरिकत्व विकास पावेल.

नवीन घटना शक्य तितक्या लवकर मान्य व्हावी आणि अमलांत यावी अशी तळमळ नेहरूंच्या व इतर जबाबदार व्यक्तींच्या मनाला लागून राहिलेली आहे. नेहरूंची तरतरी व तडफ अजूनहि कौतुकास्पद आहेत. त्यांनीं व इतर सूत्रचालकांनीं कामांत शक्य तितकी शीघ्रता व वेग आणण्याचे निरनिराळे उपाय योजायला सुरुवात केली आहे. ज्या घटनेच्या एकेका शब्दाचा कीस पुढें न्यायालयांत निघेल, त्या घटनेंतील प्रत्येक शब्द व प्रत्येक मात्रा याना महत्त्व आहे, हें सर्वांनाच मान्य आहे. पण ज्या उपसूचना फक्त विराम चिन्हें, अवतरण चिन्हें, उपपदें, विशेषणें इ० विषयींच्या म्हणजे व्याकरणविषयक असतील, त्या अध्यक्षांनीं मसुदासमिती-कडे फेर विचाराकरितां पाठवाव्या असें ठरलें. ज्या उपसूचना एकाच आशयाच्या असतील, त्यांच्यापैकीं सर्वांत समर्पक किंवा व्यापक तेवढ्या चर्चेकरितां मंजूर कराव्या, असे कांहीं नवीन नियम मान्य करून घेतले आहेत. त्यामुळें काम फारसें रेंगाळणार नाहीं. पण त्वरेपायीं कार्यांत उणीव किंवा दोष राहणार नाहीं, याचीहि काळजी घ्यावीच लागेल. म्हणून काम दीर्घसूत्रीपणानें न चाललें, तरी घाईघाईनें होणार नाहीं. ता. १५ जानेवारीपर्यंत घटना मान्य करावी असे प्रयत्न चालू आहेत. ते मात्र कितपत यशस्वी होतील याविषयीं शंका वाटते. कारण 'अपकर्ष' करतों म्हटलें तरी तो असा किती करतां येईल? त्वरा कशी करतां येईल, दिरंगाई कशी टाळतां येईल, याच्या चर्चेंतच एक दिवस गेला. परवांपासून सकाळीं ९ ते ११ पार्टी-मीटिंग आणि दुपारीं ३ ते रात्रीं ८ पर्यंत परिषदेचें अधिवेशन असा कार्यक्रम ठरला आहे.

कुठलाहि प्रश्न आला, कीं त्यांत जातिभेद व प्रांतवाद आलाच पाहिजे. हे दोन्ही वाद जणूं या देशाच्या पांचवीलाच पुजलेले आहेत. जाति-वादाचा आधार धर्म व संस्कृति हीं दोन तत्त्वें आहेत. हिंदी संघराज्याची भाषा—सरकारी भाषा—हिंदी असावी हें आतां सर्वमान्य झाल्यासारखें आहे. पण हिन्दी भाषेच्या प्रयोगाला तात्काळ आरंभ करावा असें म्हटलें, कीं

दक्षिण भारतावर आक्रमण होत आहे, अशी तक्रार तेव्हांच सुरू होते. दाक्षिण भारतांतील विचारी लोकांना हिंदीच्या प्रयोगाला आरंभ शक्य तितक्या लवकर व्हायला पाहिजे हें पटतें. पण त्यांपैकीं बहुतेकांना हिंदी येत नाहीं. त्यामुळें त्यांच्यापैकीं जे सेवाभावी आहेत त्यांना वाटतें कीं आपला पुरेसा उपयोग होणार नाहीं; आणि जे सत्तावादी किंवा नोकरीवादी आहेत, त्यांना आपली किंमत व महत्त्व राहणार नाहीं, अशी धास्ती वाटते. आतांपर्यंत इंग्रजी ही राजभाषा होती. म्हणून ज्यांना इंग्रजी चांगलें येत असें, त्यांची किंमत असे. आज दिल्लीच्या सेक्रेटरिएटमध्यें मूठभर अय्यंगारांचें प्राबल्य आहे. उद्यां हिंदी राज्यभाषा झाली म्हणजे हिंदी भाषीयांचें महत्त्व वाढेल आणि दाक्षिणात्यांचें महत्त्व कमी होईल. म्हणून हिंदीच्या बाबतींत कोणी घाई केली, कीं उत्तर–दक्षिणवादाला रंग चढतो. प्रांतवादाचें हें एक नवें आणि अधिक भयानक स्वरूप आतां प्रकट होऊं पाहात आहे.

पूर्व पंजाबांत शिखांच्या संप्रदायवादाचें घोडें बेफाम धांवूं लागलें आहे. त्याचें स्वरूप दुहेरी आहे. पश्चिम पंजाबांतील बहुतेक शीख चांगले सुखवस्तु होते. त्यांना आपल्या मालमत्तेला मुकावें लागलें. पूर्व पंजाबांत आल्यानंतर त्यांची पूर्वींची प्रतिष्ठा व श्रीमंती गेली. या भागांतील इतर शिखहि गरीब आहेत. पूर्व पंजाबांतील मालमत्तेचे धनी हिंदु आहेत, म्हणून शिखांना मोठें अपमानाचें जिणें जगावें लागतें, अशी त्यांची भावना आहे. पूर्व पंजाबांत शिखांचा प्रश्न आर्थिकहि आहे. पश्चिम पंजाबांत त्यांना जे हाल सहन करावे लागले आणि जें नुकसान सोसावें लागलें तें लक्षांत घेतां त्यांच्या मनांत तीव्र असंतोष व चीड असणें अगदीं स्वाभाविक आहे. पूर्व पंजाबांत त्यांच्यावर लक्ष्मीची अवकृपा आहे. त्यामुळें ते संतप्त व प्रक्षुब्ध आहेत. भाषेच्या प्रश्नानें त्यांच्या संतापांत व असंतोषांत तेल ओतलें आहे; व हिंदु लोकांना आमच्यावर हिंदी लादायची आहे, त्यांना पंजाबीचें व गुरुमुखीचें वावडें आहे, अशी तक्रार अकाली पुढारी उघड उघड करीत आहेत. अशा रीतीनें आपल्या देशांतील आर्थिक, भाषिक व सांस्कृतिक प्रश्न शेवटीं जातीयतेंत परिणत होतात. आर्थिक व जातीय प्रश्नांची गुंतागुंत पंजाबांतील शिखांच्या लढ्याचें वैशिष्ट्य

आहे. पंजाबांतील मुसलमान, शिख व हिंदु या तिघांचीहि भाषा 'पंजाबी'च आहे. पण सांप्रदायिक वृत्तीचा पगडा इतका खोल व घट्ट बसलेला आहे, कीं भाषा देखील ऐक्याचें साधन ठरत नाहीं. भाषावारीनें एकजिनसीपणा वाढतो, हें तत्त्व निरपवाद नाहीं, हें यावरून सिद्ध होतें. पाकिस्तानचा प्रयत्न अर्थातच शिख-हिंदु-वाद वाढावा असा आहे. भाषावाद, संप्रदाय-वाद, लिपिवाद, या अनंत वादांच्या साहाय्यानें भारतवर्षांत यादवीचीं बीजें रुजावींत हें पाकिस्तानच्या पथ्यावर आहे. म्हणून तूर्त या साऱ्या वादांना डोकें वर काढूं देणें सर्वथा अनिष्ट आहे. दहा वर्षेंपर्यंत घट्ट राहून वादांची तीव्रता कमी होऊं द्यावी.

घटनेंत कलम घालून किंवा कलम घालण्याचें नाकारून हे प्रश्न सुटतील असें मात्र नाहीं. घटनेची मदत होऊं शकेल. लोकजीवन सांप्रदायिकता, जातीयता व प्रांतीयता या त्रिदोषांपासून मुक्त व्हावें म्हणून प्रत्यक्ष विधायक राष्ट्र-निर्मितीचे प्रयोग करावे लागतील. क्रान्तिवादी लोकांचें सारें लक्ष तिकडे लागलेलें आहे. लोकजीवनाची भूमिका तयार झाली, कीं राज्यघटना आपोआप विकसित होईल. तीच खरी प्राणवान् व प्राणदायी घटना होईल. म्हणून विनोबांसारखे विधायक प्रयोगी घटनेकडे द्यावें तितकें लक्ष देत नाहींत. ते लोकराज्याची भूमिका निर्माण करण्यांत निमग्न आहेत. इतरांच्या बाबतींत 'लिखत पढत वाको पढवा दे' हें त्यांचें नित्याचें अविरोधी धोरण आहे. दादा कृपलानींचेंहि हल्लीं असेंच तटस्थतेचें धोरण आहे. त्यांनीं लोकसेवासंघाचें कार्य हातीं घेतलें आहे. घटनेच्या बाबतींत 'कोरा कागद काळी शाई' हीच वृत्ति आहे. या मंडळींच्या 'रामसुमर'-मधून तरी बापूंचें 'रामराज्य' उदयाला येवो म्हणजे झालें. राज्यें कागदा-वर नमूद केलीं जातात, पण तीं आधीं जीवनांत निर्माण होतात आणि नंतर कागदावर उतरतात.

घटनेंत संरक्षक कलमें घालण्याविषयीं अस्पृश्यांचा व इतर मागासलेल्या जातींचा फार मोठा कटाक्ष. पण जातवारीचें तत्त्व एकदां आलें, कीं मग तें कडेपर्यंत जातें. त्याला अंत कोठेंच नाहीं. आर्थिक, शैक्षणिक किंवा इतर दृष्टीनें मागासलेले हें वर्णन कुठल्या जातीला लागूं नाहीं ! कोठें

ब्राह्मण आर्थिक दृष्टीनें मागासलेले आहेत, कोठें शिख मागासलेले आहेत, कोठें न्हावी मागासलेले आहेत, कोठें कोष्टी मागासलेले आहेत; सारांश, या नाहीं त्या बाबतींत सर्वच मागासलेले आहेत, म्हणून सर्वांना खास हक्क व सवलती हव्यात. अकाली दलाचे पुढारी तारासिंह म्हणतात, "हिंदु जातींचा व संप्रदायाचा विचार करूं नका म्हणतात, याचें कारण ते स्वतः जातीय आहेत. त्यांचें बहुमत असल्यामुळें त्यांना स्वतःची सत्ता, स्वतःची भाषा व स्वतःचीं मतें इतरांवर बळजबरीनें लादावयाचीं आहेत. जाति-निरपेक्ष लोकशाही हा हिंदु-जातिवादाचा बुरखा आहे." तारासिंहांनीं हा आरोप तोंडभर करायला सुरवात केली आहे. दाक्षिण भारतीयांना 'अस्पृश्य व मागासलेले' या शब्दांऐवजीं 'ज्यांचे पुरेसे प्रतिनिधि निवडून आले नसतील त्या जाती' असे शब्द हवे आहेत, कारण तेथें 'बहुजन' व 'ब्राह्मणेतर' यांच्यापैकीं साऱ्याच जाती मागासल्याचा दावा करतात. जेव्हां खुद्द डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनींच त्यांची सर्वांची समजूत घातली, तेव्हां त्यांचें थोडेसें समाधान झालें.

आमच्या घटनापरिषदेंत समाजवाद्यांशीं अहमहमिकेनें स्पर्धा करून क्रांतिकारक भूमिका घेणारा लीगवादी मुसलमान आहे. पाकिस्तानच्या निर्मितीनंतर त्याला आतां येथें निर्भेळ समाजवादी राज्य हवें आहे. प्रो. लारी यांनीं अशी उपसूचना आणली आहे, कीं फांशीची शिक्षा रद्द व्हावी. गांधींला अवध्य ठरवूं इच्छिणाराला ते जणूं म्हणत होते, कीं आधीं माणूस तर अवध्य ठरवा. मानवी जीवनाची किंमत ओळखा. पण प्रो. लारींची हिम्मत हा बोध पाकिस्तानला करण्याची होणार नाहीं. लक्षावधी लोकांची केवळ ते मुसलमानेतर आहेत म्हणून कत्तल होत असलेली पाहूनहि पाकिस्तानला मानवी जीविताची महती सांगण्याचें धैर्य लारीसाहेबांना कधीं होणार नाहीं.

पण पाकिस्तान किंवा मुसलमान काय करतात इकडे लक्ष न देतां आपण स्वतंत्रपणें या मुद्याच्या गुणदोषांचा विचार करणेंच रास्त होईल. लोक-द्रोहाचें किंवा राष्ट्रद्रोहाचें पातक करणाऱ्याला देहान्त प्रायश्चित्तच दिलें पाहिजे, असें बहुतेक सर्वांना वाटतें. पण गोडसेसारख्यांवर कायद्यानें राष्ट्र-

द्रोहाचा किंवा राज्यद्रोहाचा आरोप करतां येत नाहीं. मग त्याच्यासारख्या मानवद्रोह्यांना फांशीची शिक्षा देऊं नये काय? असा प्रश्न एकदम मनांत उभा राहतो. त्यामुळें शेवटीं अशा प्रकारचा नियम करण्याची कोणाच्याचं मनाची तयारी दिसून येत नाहीं.

तुझा,
दादा

— २९ —

नवी दिल्ली,
११-१२-४८

प्रिय चंदूराजा,

हा प्रवास त्या मानानें सुखाचा आणि मौजेचाहि झाला. विमान चालू झाल्यानंतर थोड्याच वेळानें न्याहारी मिळाली. न्याहारींत सँडविच, बिस्किटें, केळीं, चहा किंवा कॉफी, सुका मेवा आणि मुखशुद्धीकरितां सुपारी, लवंग, वेलची, लेमन ड्रॉप्स इत्यादि देतात. याचा निराळा आकार पडत नाहीं. मध्येंच आपण किती उंचावरून उडत आहोंत, गतीचें मान किती आहे, वक्तशीर आहोंत कीं कांहीं अगोदर किंवा उशीरां जात आहोंत, कुठल्या भागांत आहोंत, इ. माहितीचें पत्रक प्रवाश्यांना दाखविण्यांत येतें, वर्तमानपत्रें, मासिकें इत्यादि असतातच. मधून मधून सुका मेवा व सुपारी पुढें करण्यांत येते.

आमचा प्रवास सुमारें सहा-साडेसहा हजार फूट उंचीवरून १८५ मैलांच्या गतीनें चालला होता. अर्थात् हें आम्हांला सांगण्यांत आल्यानंतरच समजलें. कित्येक मैलांचा प्रदेश दृष्टीच्या टप्प्यांत असल्यामुळें तो भरभर नजरेआड होत नाहीं, त्यामुळें भान होत नाहीं. गतिमानाप्रमाणेंच हवामानाचेंहि भान होत नाहीं. निघालों तेव्हां बाहेर चांगलीच थंडी होती. पण विमानांत मात्र त्या मानानें थंडी कमी वाजते. विमानाच्या आंतील हवामानांत

हिंवाळ्यांतील व उन्हाळ्यांतील फरक बाहेरच्यापेक्षां पुष्कळच कमी जाणवतो. जसें गतिमानाचें तसेंच हवामानाचें. रिक्षेंत किंवा टांग्यांत गतीची जाणीव होते, पण विमानांत गतीची जाणीव अशी फार थोडी होते.

दिल्ली ते कानपूरपर्यंतचा प्रवास यमुनेच्या क्षेत्रांतून झाला. यमुनेचें पात्र, तिचे कालवे, पोट-कालवे, बारके बारके पाट, यांचें जाळें त्या सपाट प्रदेशावर पसरलेलें पाहतांना मोठी मौज वाटते. कानपूर जवळ आल्यानंतर गंगा दिसूं लागते. कानपूरला आमचें विमान सुमारें २० मिनिटें थांबलें. पुढें प्रयागपर्यंतचा प्रवास गंगामाईच्या इलाख्यांतून झाला. प्रयागला १०–१५ ला सकाळीं पोंचलों.

प्रवास फारच आरामाचा झाला. थंडी नाहीं, वारा नाहीं, धूळ नाहीं, धूर नाहीं. माणूस अगदीं कांचेच्या कपाटांत ठेवल्यासारखें स्वच्छ रहातें. पण हा प्रवास सुखाचा असला, तरी मुबलक जागा मिळाल्यास आग-गाडीच्या प्रवासांत जी मौज वाटते किंवा उत्तम व स्वतंत्र मोटारीच्या प्रवासांत जी 'जवळीकीची प्रतीति' येते, ती या प्रवासांत नाहीं. वरून दिसणाऱ्या दृश्यपटांतहि एक प्रकारचें सौन्दर्य, एक प्रकारची गोडी असते; नाहीं असें नाहीं. पण ही रुचि वेगळी. मोटारच्या प्रवासाची रुचि कांहीं औरच आहे. विमान हें वाहन नवीन असल्यामुळें अजून माझ्या ठिकाणीं 'विमान वृत्ति'-air-mindedness- बाणली नाहीं, हेंहि एक कारण असूं शकेल. पण तसें म्हणावें तर मला तो प्रवास सुखाचा असल्यामुळें इष्टहि वाटतो. अगदींच बिन-भानगडीचा.

त्रिवेणीवरहि जाऊन आलों. ४–३० वाजून गेले होते. वारा बराच होता. तरी पण त्रिवेणींत आंघोळ करण्याची वृत्ति होतीच. त्रिवेणीच्या कांठाशीं गेलों. थोडें पाणीहि प्यालों. महेशबाबूंनीं गंगाजलाचा वैज्ञानिक महिमा अघळपघळ सांगितला. अपचनाचे व त्वचेचे विकार नाहींसे करण्याची अद्भुत शक्ति प्रयागच्या गंगाजलांत असल्याची प्रसिद्धि जुनीच आहे. तें नासत किंवा विटत नाहीं हें तर इष्टच आहे. तरी पण मी त्रिवेणींत आंघोळ न करतांच परतलों. माझ्या बाबतींत ही गोष्ट अपूर्व होती.

गंगेच्या कांठीं किंवा त्रिवेणीच्या जवळपास जाऊन मीं गंगास्नान अगर त्रिवेणीस्नान केलें नाहीं असें कधींच घडलें नाहीं. हिमालय, समुद्र व गंगा यांचें आकर्षण अनिवार्य आहे. डोंगर, नदी व प्रशस्त जलाशय पाहून कोणाला आनंद होत नाहीं ?

त्रिवेणीहून आंघोळीवांचून परतलों खरा, पण मनाला सारखी रुखरुख लागून राहिली. रात्र झाल्यानंतरहि एकदां जाऊन बुडी मारून यावें अशी उर्मि पुनःपुन्हां येई. यांत फार थोडा भाविकतेचा संस्कार असेल. नसेलच असें नाहीं; पण भाविकतेपेक्षां भावनात्मकताच विशेष होती. संगम मला स्नेहयुक्त मीलनाचें प्रतीक वाटतो, म्हणून संगम-स्नानाची महती वाटते. त्यांतल्या त्यांत त्रिवेणी संगमाच्या पावित्र्याचा व सौंदर्याचा ठसा मनावर कायमचा उमटलेला. त्या त्रिवेणीच्या पवित्र स्पर्शानें पावन न होतां आपण परतलों ही कल्पना मनाला टोंचत होती. शेवटीं रात्रीं ११-२० च्या एक्स्प्रेसनें प्रयाग सोडलेंच.

गाडींत जागा नाहीं या सबबीवर दुसऱ्या वर्गाचें तिकीट मिळालें नाहीं. दिल्लीलाहि असेंच झालें होतें. शारीरिक कष्ट सहन करावेत पण सार्वजनिक कामांत उगीच फार पैसा खर्च होऊं देऊं नये, या नेहमींच्या वृत्तीमुळें मीं 'दिल्ली' स्टेशनवर जाऊन कुठल्या तरी गाडींत जागा मिळविण्याची खटपट केली. पण जागा न मिळाल्यामुळें शेवटीं मीं विमानानें प्रवास केला. रेल्वेंत काय किंवा इतर खात्यांत काय लांचखोरीला सीमाच राहिलेली नाहीं. इंग्रजांच्या वेळीं साहेबाचा धाक होता. आतां आपलेंच राज्य आहे. आपल्या हातीं सत्ता असल्यावर आतां भीति कशाची ? पोलिसाचें महत्त्व कशांत आहे ? इतरांकरितां जे नियम आहेत, त्यांचें पालन त्याला करावें लागत नाहीं या गोष्टींत ! सायकलला दिवा लावण्याची जरूर त्याला नसते. त्याचप्रमाणें आपलें राज्य झालें याची साक्ष काय ? कोणालाच नियम किंवा कायदा पाळण्याची गरज न उरणें ही. त्यामुळें सार्वत्रिक अनास्था, गबाळे-पणा व अप्रामाणिकपणा यांचा अम्मल सुरू आहे. दुसऱ्या व पहिल्या वर्गांतील उतारू देखील जागा असून जागा नाहीं, म्हणून खुशाल सांगतात. ट्रेन-कंडक्टर व तिकिट-कलेक्टर खुशाल पैसे घेऊन लोकांना जागा

देतात. माझ्याकडूनहि अपेक्षा होती, पण आशा नव्हती. तरी मला एक वरची ' फळी ' मिळाली आणि मी जबलपूरपर्यंत झोंपूं शकलों.

बुधवारीं ता. १ ला दुपारीं विमानानेंच प्रयागला आलों. विमानाचा 'सारथी' (त्याला 'तांडेल' म्हणतात ) परिचयाचा निघाला. त्यानें मला समोरच्या बाजूला आपल्या शेजारीं बसविलें. एक नवीनच अनुभव आला. मागें बसलें म्हणजे एका बाजूचा देखावा दिसतो. त्यामुळें आपण पोकळींत प्रवास करीत आहोंत याची जाणीव होत नाहीं. कुठल्या तरी एका निश्चित मार्गानें व निश्चित दिशेला आपण जात असल्याचा भास होतो. पण पुढें बसलें म्हणजे अगदीं शून्यांत उडी घेत असल्याचा प्रत्यय येतो. दऱ्या, खोरीं, पर्वत, नद्या सारें कांहीं खालीं दिसतें. आपण अगदीं अधांतरीं तरंगत असल्याचें प्रत्यक्ष अनुभवाला येतें. पण पडण्याची भीति मात्र आजिबात वाटत नाहीं.

जबलपूर ते प्रयागपर्यंतचा देखावा सपाटीचा नाहीं. मधून मधून उंचवटे, टेकड्या, डोंगर आहेत. उजवीकडे शोणभद्र आहे. डावीकडे कटणी व मैहर हीं गांवें दिसतात. कटणीला चुन्याच्या भट्ट्या बऱ्याच आहेत. पण लांबून तें सारें शुभ्र घरांचें शहरच चुन्याच्या ढिगासारखें दिसतें. मैहर एखाद्या प्रचंड खडीच्या राशीसारखें दिसतें, उजवीकडे लांब रेषा दिसते. कितीतरी विस्तृत प्रदेश दृष्टिपथांत येत असल्यामुळें अनेक लहानमोठ्या नद्या, ओढे व त्यांचे धबधबे, आणि संगम दिसतात. शोणभद्राचें पाणी हिरव्या रंगाचें दिसतें. गंगेच्या पाण्याचा रंग लांबून कांहींसा चहाच्या रंगासारखा दिसतो. म्हणून तें आधुनिकांनाहि अधिक प्रिय व आकर्षक वाटतें. चहाप्रमाणें त्याचीहि रुचि अवीट आणि अनुपम आहे म्हणतात ! शोणभद्र येथें इतका रोड व नम्र दिसतो, पण तोच बिहारमध्यें टेहरीला केवढा रुंद झाला आहे ! शोणावरील टेहरी येथील पूल या देशांतलि फार मोठ्या पुलांपैकीं आहे.

दुपारच्या वेळीं सकाळच्या इतकें वातावरण स्वच्छ नसतें. रिकामटेकडे ढग इकडे तिकडे उनाडक्या करतांना आढळतात. पण एकएकटे असल्या-मुळें वाऱ्याची लहानशी झुळुक लागली तरी बारगळतात. खालीं त्यांची

सांवली जमिनीवर पडलेली दिसते. त्या सांवलीच्या ठिपक्यांमुळें तो देखावा तुमच्या खोलींतील शाईचे डाग पडलेल्या चौकड्याच्या चादरीसारखा दिसतो. आमचें विमान मुसंडी मारून ढगांच्या राशीवर चाल करून जात असे आणि त्या ढगांच्या फळीचा अक्षरशः धुव्वा उडवून देत असे. अर्थातच दुपारच्या वेळीं विमानाची गति सकाळच्याप्रमाणें संथ व सारखी नसते. त्याला अगदीं सौम्य आंदोलनें व हेलकावे खावे लागतात. पण त्रास मात्र मुळींच होत नाहीं.

हिंवाळ्याचे दिवस असल्यामुळें जमीन निरनिराळ्या आकारांच्या व निरनिराळ्या रंगांच्या आरसपानी दगडांच्या फरशीसारखी दिसते. शेताच्या सांध्यावरलि झाडांचीं कुंपणें दोन फरशांच्या सांध्यावर उगवलेल्या हिरवळी-सारखीं दिसतात. निरनिराळ्या धान्यांचीं शेतें निरनिराळ्या प्रकारचीं दिसतात. कांहीं दोरीच्या चटयासारखीं, कांहीं लोंकरीच्या गालिच्यासारखीं, कांहीं फरशांसारखीं, कांही थुल्म्यासारखीं, तर कांहीं चौकड्याच्या दुलयां-सारखीं दिसतात. संत्रीं, पेरू, लीची या फळझाडांच्या बागा मोहरे मांडलेल्या बुद्धिबळाच्या पटांसारख्या दिसतात. ज्या बागांत अगदीं लहान झाडें सारख्या अन्तरावर लावलीं असतात तीं मधून मधून बटणें किंवा गोंडे लावलेल्या रजईसारखीं दिसतात. हिंवाळ्याचे दिवस असल्यामुळें मला घोंगडीं, कांबळीं, लेप, गाद्या, गालिचे यांची आठवण व्हावी हें साहजिकच नाहीं का? हे नाना तरंग मनांत उठतात, इतक्यांत शोणभद्र दृष्टीआड होऊन यमुनेचें पात्र दिसूं लागतें. हां हां म्हणतां गंगा-यमुनांचा संगम येतो. हजारों वर्षांपूर्वी प्रभु रामचंद्रांनीं हाच संगम पुष्पकांतून सीतामाईंना दाखविला असेल?

तीर्थक्षेत्राच्या ठिकाणीं उपाध्ये, याज्ञिक व वैदिक यांच्या हांवऱ्या, आशाळभूत दैन्याची प्रतीति येते. विद्या हेंच जीविकेचें साधन असल्यामुळें त्यांना विद्या शिकावी लागली. इतर जातींना जीविकोपार्जनाचे इतर उद्योग उपलब्ध असल्यामुळें त्यांना विद्येची जीविकेसाटीं गरज राहिली नाहीं. विद्येवर जगावें लागल्यामुळें ब्राह्मणाला तिचा विक्रय करावा लागला. विक्रय म्हटला कीं विद्येचें मोल पैशानें करावें लागतें. जो पैसा विद्या विकत घेऊं

शकतो, तो विद्येपेक्षां श्रेष्ठ ठरतो. मानवस्पर्शापेक्षां सुवर्णस्पर्शाचेंच महत्त्व वाटतें.

पूर्वींचा ब्राह्मण अपरिग्रही असावा अशी अपेक्षा होती. तो ‘उदरपात्र’ होता. त्याचें पोट हेंच त्याचें भांडें. कुणाला दान द्यायचें असलें म्हणजे आपण कांठोकांठ भरून देतों. ब्राह्मणाचेंहि पोट तुडुंब भरून देण्याचा प्रघात पडला. ब्राह्मणालाहि पोटांत जिन्नस कोंबून कोंबून अगदीं तड लागेपर्यंत भरण्याची संवय झाली. तो ‘उदरपात्रा’ चा ‘उदरपरायण’ झाला आणि ‘भोजन-प्रवीण’ बनला. दारिद्र्यामुळें तो हीन व लोभी बनला. दौलतीची बटीक बनलेली विद्या निस्तेज व निर्माल्य झाली! तिच्यांत जिवन्त माणसांना टवटवी आणण्याची किंवा मेलेल्यांना सद्‌गति देण्याची शक्तीच उरलेली नाहीं. विद्या हें उदरभरणाचें साधन असल्यामुळें कुशल व्यापाऱ्याप्रमाणें कुशल उपाध्ये आपली विद्या नित्य ‘उपस्थित’ म्हणजे ‘विक्रीस तयार’ ठेवतात. कुशल व्यापाऱ्याप्रमाणें तिची जाहिरात देतात आणि गिऱ्हाइकें मिळविण्याच्या नाना युक्त्या योजतात. पोट हेंच सांज्याचें पोतें बनलेलें असल्यामुळें तोंड सतत वासलेलें आणि हात नेहमीं पसरलेला असतो. पोतें तडतें पण पोट फुटत नाहीं. पण पोट फुगलें म्हणजे मेंदूहि सुजतो आणि ब्राह्मणाच्या पोकळ ताठ्याखेरीज शिल्लक कांहींच रहात नाहीं.

गंगा-यमुनांच्या त्या शाश्वत प्रवाहशाली विस्तृत पात्रांच्या शेजारींच ‘कूपमंडूक वृत्ती’ चा साक्षात्कार होतो. विज्ञानाच्या साहाय्यानें गगनांत भरारी मारून पृथ्वीचें विश्वरूपदर्शन घेण्याची त्यांना संधि किंवा आकांक्षाहि नसते. त्यामुळें त्यांना पुराणपरम्परेनें वारशादाखल मिळालेल्या पौराणिक जगांत गुरफटून रहाण्यांतच खैर वाटते. धर्म हें जीवनाचें नियामक तत्त्व असेल; पण आज त्याचीं जीं नानाविध रूपें दिसताहेत तीं पाहून मात्र धर्म हें जीवनाचा कोंडमारा करणारें तत्त्व असावें असें वाटूं लागलें आहे.

धर्माच्या मक्तेदारांपैकीं कांहीं संस्थानिष्ठ महन्त व धर्माधिकारी आहेत. त्यांचा धर्म मठ, गाद्या व पीठ यांच्या रक्षणाच्या विवंचनेंतच विरून जातो. ख्रिश्चियानिटीचें पर्यवसान चर्चानिटींत होऊन जातें. इतर कांहीं वैदिक असतात. ते शब्दनिष्ठ असतात. ग्रंथाच्या जोपासना करणें हेंच त्यांचें काम.

त्या उद्योगांत त्यांना धार्मिक वृत्तीचा विकास करायला सवडच मिळत नाहीं. वेदप्रामाण्य, कुराणप्रामाण्य, ग्रंथसाहेबप्रामाण्य हेंच त्यांच्या धर्माचें पहिलें व अखेरचें कलम. तिसरे कांहीं याज्ञिक असतात. विधी व तंत्र टिकविणें हेंच त्यांचें श्रीद. हे तंत्रवादी ( Ritualist ) असतात. या मक्तेदारींत व्यत्यय आणणारे बदल त्यांना खपत नाहींत आणि मानवतहि नाहींत. मन्दिरें, ग्रन्थ आणि तन्त्र या तीन कुलुपांच्या तिजोरींत धर्म कडेकोट बन्दोबस्तानें सुरक्षित राखून हे त्याचे राखणदार त्याला जीवनाचा स्पर्श होऊं देत नाहींत.

दुसऱ्या दिवशीं ११ च्या सुमारास पुन्हां विमानानें प्रयागहून रवाना झालों. कानपूरपर्यंतचा प्रवास गंगामाईच्या सान्निध्यांत झाला. जबलपूर ते प्रयाग विमानांत ' Air hostess ' एक मुलगी होती. पण प्रयाग ते दिल्ली एक तरुण होता. तो विशेष दक्ष व विनयशील होता. त्यानें मला चित्रांचीं मासिकें आणून दिलीं. फारच सुंदर होतीं. पण माझ्या दृष्टिपुढें पसरलेल्या अफाट विश्वरूपाच्या जीवनचित्रपटापुढें मला त्या चित्रांचीं कांहींच कदर वाटली नाहीं. डोळ्यांना थोडासा सराव झाल्यामुळें मला आतां रस्ते, सडका, पाउलवाटा, खेडीं, शहरें स्पष्ट पहातां येऊं लागलीं. सहासात हजार फुटांच्या उंचीवरून रस्त्यावरील वाहनें, गुरें, झाडें, त्यांच्या सांवल्या स्पष्ट दिसत. बहुतेक घरें खानदेशी पद्धतीच्या धाब्यांचीं असल्या-मुळें लहान मुलांनीं घराच्या अंगणांत उभारलेल्या घरकुलांसारखीं दिसत. हिरव्या, निळ्या, करड्या, भुरकट व लाल रंगाचीं डबकीं पाहून जागजागीं विखुरलेल्या कांचेच्या तुकड्यांची आठवण होई. सगळ्याच प्रांतांतील आदिवासी जाती मधून मधून टिकल्या व कांचेचे तुकडे गुंफलेले कापड तयार करीत असतात. प्रयागपासून दिल्लीपर्यंतचा सारा सपाट प्रदेश त्या कलापूर्ण कापडाची आठवण करून देणारा आहे. कानपूर सोडल्यानंतर सुमारें अर्ध्या तासानें यमुना दिसूं लागली. नद्यांप्रमाणेंच चाकोऱ्या जणुं निसर्गतःच निर्माण झाल्या आणि कालवे व सडका मानवकृत आहेत असें वरून पाहाणाराला वाटतें. थोड्याच वेळानें दिल्लीचें ' इंडिया गेट ', ' सचिवालय ' व ' बडे लाटकी कोठी ' दिसूं लागली. कुठल्याहि ओळ-खीच्या गांवावरून आतां उडत गेलों, तरी खुणेचीं ठिकाणें मी ओळखूं शकेन.

विमानाच्या प्रवासांत ' हवाई तांडेलां ' च्या जीवनाचा थोडासा परिचय झाला. गाडीवानांची, सारथ्यांची, शोफरांची, रेल्वे-ड्रायव्हरांची आणि खलाशांची व तांडेलांची निरनिराळी ' संस्कृति ' असते. गाडीवान बैलांना ज्या शिव्या देतो त्या कानानें ऐकवत नाहींत. त्याचप्रमाणें ' ब्लडी ', ' बगर ', ' डॅम ', ' ड्यूस ' , ' डॅश ' यासारखे शेलके व ठराविक शब्द वापरलेच पाहिजेत असा आधुनिक सारथी, नावाडी व वैमानिक यांच्या संस्कृतीचा संकेत दिसतो. नित्य अस्मानांत वावरणाऱ्या हवाई तांडेलांच्या जीवनाला व वृत्तीला पृथ्वीवरील नीतीची व शिष्टाचाराची फारशी तमा वाटत नसावीसें दिसतें. नित्य अप्सरांच्या संगतींत चैन करणाऱ्या देवांच्या वृत्तीचें अस्मानी वारें त्यांना लागलेलें असतें. साऱ्या आयुष्याची हवाई उडवावी किंवा तें सिगारेटसारखें फुंकून टाकावें आणि त्याच्या कुरळ्या धूम्रवलयांकडे गमतीनें बघत बसावें ! त्यांच्या साऱ्या गोष्टी कुठल्या तरी ' फटाकड्या छोकरी 'विषयींच्या असायच्या. पार्थीव नीतीची चाड नसल्यामुळें कुठल्याहि स्त्रीविषयीं असभ्य थट्टेची भाषा वापरणें ' अस्मानी संस्कृती ' चें आवश्यक अंग होऊन बसलेलें दिसतें. सोजीर म्हटला कीं त्याच्या भाषेंत Ribaldry असलीच पाहिजे. एयर पायलट म्हटला कीं त्याच्याहि भाषेंत ती ' सैनिकाची छटा ' असलीच पाहिजे. अर्थात् कुठल्याहि व्यवसायांतील वरच्या श्रेणींतील लोकांना हें वर्णन लागू नाहीं.

तुझा,

दादा

१३९, कॉन्स्टिटयूशन हाउस,
नवी दिल्ली,
११-१२-४८

प्रिय चंदूराजा,

घटनापरिषदेंत मूलभूत हक्कांची चर्चा चालू आहे. आतां ती संपतहि आली आहे. आमचे मुसलमान बंधू अतिशय राजनिष्ठ नागरिक आहेत. वैयक्तिक स्वातंत्र्याच्या हक्कांचा कैवार घेण्याचा त्यांनीं मक्ता घेतलेला आहे. हिंदी लोकराज्य नागरिक-स्वातंत्र्याच्या बाबतींत व लोकशाहीच्या बाबतींत जगांतील इतर कुठल्याहि देशाच्या मागें राहतां कामा नये याबद्दल ते अगदीं डोळ्यांत तेल घालून जपत असतात. अगदीं समाजवादी व साम्यवादी देखील या बाबतींत त्यांचा हात धरूं शकणार नाहींत. फक्त अल्पसंख्याकांचा प्रश्न आला, म्हणजे मात्र त्यांची लोकशाहीवरील निष्ठा डगमगते. नव्हे नव्हे, ते उलट असें प्रतिपादन करूं लागतात, कीं ज्या राज्यांत अल्पसंख्याकांना अभय असेल व आश्वासन असेल तेंच खरें लोकराज्य; किंबहुना, अल्पसंख्याकांची सुस्थिति हें लोकराज्याच्या उत्तमतेचें गमक आहे.

त्यामुळें संपूर्ण स्वातंत्र्यवादी, निर्भेळ लोकसत्तावादी, ज्वलज्जहाल समाजवादी मौलाना हजरत मोहानी आपल्या बदसूर किंगरीसारख्या आवाजांत आरोळी ठोकतात, ' याद राखा, तुम्ही जर आमच्या वैयक्तिक आचारनियमांवर आक्रमण कराल, तर या देशांतील मुसलमान तें कधींहि सहन करणार नाहींत ! '

जमीयत–उल्–उलेमांसारखे स्वातंत्र्यवादी लोक उत्तान संप्रदायवादी भाषणें करून हिन्दूंवर व सरकारवर निरर्गल आरोप करण्यास कचरत नाहींत. ठिकठिकाणीं आपली गेलेली अदब पुन्हां बसविण्याचे त्यांचे अश्लाघ्य प्रयत्न चालू आहेत.

अर्थातच या प्रकाराची प्रतिक्रिया तल्लख काँग्रेस-सभासदांवरहि होते. "पाकिस्तानांत हिंदूना श्वासोच्छ्वासाचा जन्मसिद्ध अधिकारहि नसतांना आम्ही मात्र यांच्या या गमजा चालू द्याव्या. पुरें झालें हें धर्मनिरपेक्ष-राज्याचें स्तोम. आपण त्याचा बाऊ करतां कामा नये. संप्रदायातीत राष्ट्रीयतेच्या मोहानें आम्ही पाकिस्तानी वृत्तीच्या लोकांच्या प्रच्छन्न सांप्रदायिकतेचें फाजिल प्रस्थ माजूं देणार नाहीं," असा खणखणीत इशारा श्री. बालकृष्ण शर्मासारख्या कसलेल्या व नैष्ठिक काँग्रेसभक्तानें दिला.

शीखांनीं पूर्व पंजाब अगदीं अक्षरशः डोक्यावर घ्यायला सुरुवात केली आहे. आणि रा. स्व. संघानेंहि याचवेळीं दावा साधण्याचा चंग बांधला आहे. त्यामुळें मुसलमानांना आणखी अवसान आलें. हल्लीच्या सरकार-विषयीं त्यांना आपुलकी मुळींच वाटत नाहीं. म्हणून जो जो या सरकारला विरोध करील अगर तंग करील, तो तो त्यांना आपला मित्र वाटतो. घटनापरिषदेंत काँग्रेसपक्षाच्या नियोजित धोरणाला काँग्रेसपक्षांतील जहाल म्हणविणाऱ्या सभासदांनीं किंवा प्रो० के. टी. शहा, पं. कुंझरू, दामोदर स्वरूप शेठ यांच्यासारख्या स्वतंत्र सदस्यांनीं विरोध केला म्हणजे त्यांना गुदगुल्या होतात. काँग्रेसपक्षांतील अशा असंतुष्ट सभासदांची त्यांनीं वाहवा केली म्हणजे त्या असंतुष्टांनाहि आपली कोणी तरी कदर करणारें आहे या विचारानें समाधान वाटतें. ही गोष्ट दिसायला अगदीं क्षुल्लक दिसली, तरी पक्षाच्या बळकटीच्या दृष्टीनें अत्यंत भयावह आहे हें उघड आहे.

कुठलाहि प्रश्न आला म्हणजे व्यक्तिस्वातंत्र्याच्या व लोकशाहीच्या नांवावर अगदीं कांगावखोरपणानें ओरड करण्याची मुसलमान बंधूंची तयारी असते. सगळ्या अल्पसंख्याकांच्या वतीनें बोलण्याचा आव तर ते आणतातच, पण बहुसंख्य जनतेचें प्रतिनिधित्व करण्याचाहि घाट घालायला कमी करीत नाहींत. वैयक्तिक आचारनियमांच्या बाबतींत भाषणें करतांना त्यांनीं हिंदूंचाहि कैवार घेण्याची काळजी घेतली. जणुं कांहीं घटना-परिषदेंत मुसलमानेतर अल्पसंख्याकांचे व हिंदूंचे कोणी प्रतिनिधीच नाहींत! वेळींच सावध होऊन पुन्हां हलके हलके वर डोकें काढू पहाणाऱ्या मुसलमानी सांप्रदायिकतेला आळा घातला नाहीं, तर अनर्थ ओढवेल एवढें बरीक खास! ठिकठिकाणीं किरकोळ व तुरळक सांप्रदायिक दंग्यांच्या

बातम्या पुन्हां कानांवर येऊं लागल्या आहेत हें कांहीं बरें लक्षण नव्हे. हें भूत वेळींच गाडून टाकणें आवश्यक आहे.

राष्ट्रभाषेचा प्रश्नहि यांच्याच असमंजस आग्रही वृत्तीमुळें सांप्रदायिक सांच्याचा होऊन बसला आहे. मध्यप्रांताच्या असेंब्लींत वऱ्हाडांतला मुसलमानहि चुकीचें उर्दू बोलतो, पण चुकीचें मराठी बोलूं इच्छीत नाहीं. या देशांत धर्मांतराबरोबर भाषा बदलते. हिरालालचा अब्दुल्ला झाला कीं त्याची मातृभाषा उर्दू झाली आणि परत हिरालाल झाला कीं पुन्हां मातृभाषा गुजराती झाली. असेंब्लींत कुठलाहि उत्तर हिंदुस्थानी हिंदु शुद्ध उर्दूत बोलूं लागला म्हणजे बंगाल-आसाम-म्हैसूरच्याहि मुसलमानाला त्याचें कौतुक करावेसें वाटतें; आणि एखादा मुसलमान हिन्दी वळणाचें उर्दू बोलूं लागला कीं ते त्याची निर्भर्त्सना करतील. ठाकुरदास भार्गव, देशबंधु गुप्त, जवाहरलालजी अगदीं साहित्य बोलतात असें ते म्हणतील, पण बाळकृष्ण शर्मा, गोविंद मालवीय बोलूं लागले म्हणजे नाकें मुरडतील. उर्दू ही मुसलमानांची भाषा नव्हे ती अनेक मुसलमानेतरांचीहि भाषा आहे असें वादाकरितां बोलतील; पण ज्या प्रांतांतील मुसलमानेतरांची उर्दू ही मातृभाषा आहे असें ते म्हणतात, त्याच प्रांतांतील मुसलमानेतर हिन्दीचा व नागरीचा आग्रह कां धरतात याचें कारण अंतर्मुख होऊन पाहणार नाहींत. उर्दू ही भाषा या देशांतीलच आहे. मग, मुसलमानेतरांना तिचा अभिमान कां वाटूं नये ? याचें कारण इंग्रजीप्रमाणेंच एके काळीं त्या भाषेनें इतर भाषांची गळचेपी केली आणि आज मुसलमान अल्पसंख्याकांची भाषा म्हणून सांस्कृतिक व सांप्रदायिक मुद्द्यावर तिचें समर्थन करीत आहेत !

उर्दूचा हा उपसर्ग उत्तर हिंदुस्थानांतील भाषांनाच विशेष झाला. त्यामुळें हिंदी-उर्दू हा वाद वास्तविक उत्तर भारतीयांचा आहे. प्रांतीय भाषा बोलणारांना उर्दू शब्दांचें वावडें नाहीं आणि उर्दूच्या आक्रमणाची भीतीहि नाहीं. कुठला शब्द मुळांत अरबी-फारशींतून आला याची त्यांना माहितीहि नाहीं आणि पर्वाहि नाहीं. प्रांतीय भाषा-भाषीच शेवटीं राष्ट्रभाषा घडवतील.

पण पाकिस्ताननें सरकारी भाषा म्हणून उर्दूचा स्वीकार केला आणि निझामानें मोगलाईतील सर्व लोकांचें व्यवस्थित 'उर्दूकरण' चालविलें होतें,

म्हणून या प्रश्नाला सांप्रदायिक स्वरूप प्राप्त झालें. याचा परिणाम म्हणून आपल्या लोकांना 'पाकिस्तानगंड' झालेला आहे. ते प्रत्येक प्रश्नाचा विचार पाकिस्तानच्या तुलनेनें करतात. त्यामुळें दृष्टि सापेक्ष व प्रतियोगी झालेली आहे. कुठल्याहि प्रश्नाचा विचार स्वतंत्र गुणदोषांच्या दृष्टीनें न करतां पाकिस्तानचें चित्र समोर ठेवून विचार करण्याची घातुक खोड जडली आहे. हा 'पाकिस्तानगंड' बाजूला ठेवून विचार केला तर राष्ट्र-भाषेचें स्वरूप संग्राहक, उदार व व्यापक रहावें म्हणून सर्व हिंदू काळजी घेतील आणि उर्दू विरोध निदान आजच्या स्वरूपांत व प्रमाणांत उरणार नाहीं. धर्मान्तर केल्याबरोबर भाषा बदलत नाहीं; बदलण्याचें कारण नाहीं. म्हणून उर्दू ही मुसलमानांची भाषा नव्हे, ही वस्तुस्थिति उभय पक्षांच्या लक्षांत येईल आणि 'हिंदी कीं हिंदुस्तानी' या वादाची नांगी मोडेल.

अरबी-फारशी या भाषांत मुसलमानांचे धर्मग्रंथ आहेत हें खरें; आणि म्हणून ज्या भाषेंत त्या शब्दांचा किंवा प्रयोगांचा विशेष भरणा असेल तिच्याविषयीं त्यांना विशेष आपुलकी वाटतें हेंहि खरें, त्याच न्यायानें शीखांना गुरुमुखीविषयीं आपुलकी वाटते. पण ही वस्तुस्थिति सार्वत्रिक नाहीं. बौद्धग्रंथ पालींत असले तरी बौद्धधर्मीय देशांना पालीविषयीं किंवा खिस्ती राष्ट्रांना हिब्रूविषयीं आग्रह धरण्याची बुद्धि होत नाहीं. मुस्लिम राष्ट्रांतहि हा आग्रह नाहीं. अफगाणिस्ताननें तर नुकतीच संस्कृताच्या अध्ययनाला सुरुवात केली आहे. हिंदुस्थानांतील पाकिस्तानवासी मुसलमानांतहि पुश्तू, बलूची, बंगाली, सिंधी या प्रान्तीय भाषांचा त्याग करण्याची वृत्ति दिसून येत नाहीं. उत्तरेकडील व दक्षिणेकडील सर्वच प्रांतीय भाषांत उर्दू शब्द व प्रयोग भरपूर आहेत आणि मुसलमानांनीं त्या भाषांचा आत्मीयतेनें अंगीकार केला, तर हे शब्द व प्रयोग वाढतील. म्हणून राष्ट्रभाषेच्या प्रश्नांत त्यांनीं उर्दूचा चांदभाई घालण्याचा नसता उपद्व्याप करणें अयोग्य आहे.

घटकाभर असें. मानलें कीं उर्दू ही मुसलमानांची भाषा आहे, तरी तिला प्रांतीय भाषेच्या बरोबरीचें स्थान देतां येईल. एखादें विद्यापीठ किंवा जरुरीप्रमाणें अधिक विद्यापीठें स्थापन करतां येतील. इतर प्रांतीय भाषांप्रमाणें त्याहि भाषेचा परिणाम जीवनद्वारें व परस्पर-व्यवहारांतून

राष्ट्रभाषेवर होईल. पण तिचें राष्ट्रभाषेंत एक स्वतंत्र स्थान करून नवीन भाषा घडविण्याचा आग्रह धरणें सर्वस्वीं अप्रस्तुत आहे.

आजहि काँग्रेस-संस्थेंत व सरकारांत मुसलमानांना जें स्थान व महत्त्व आहे तें कायम राहिलें, म्हणजे तक्रार करावयास त्यांना सयुक्तिक कारण उरणार नाहीं. घटना–परिषदेंत उपाध्यक्ष डॉ. एच्. सी. मुखर्जी हे ख्रिस्ती गृहस्थ आहेत, मुख्य अध्वर्यु डॉ. आंबेडकर आहेत आणि मुहम्मद सादुल्लांना अनेकदां अधिकृत प्रवक्त्याचा मान मिळतो. मंत्रिमंडळांत मौलानासाहेब व रफीसाहेब यांच्या शब्दाला विलक्षण मान आहे. माजी राष्ट्राध्यक्ष म्हणून मौलाना साहेबांचें स्थान काँग्रेसच्या वर्किंग कमिटींत आजहि फार मानाचें आहे. पाकिस्तानचें चित्र व नमुना समोर ठेवून त्याचें अनुकरण करण्याचा मोह निग्रहपूर्वक आवरून आपण जर सांस्कृतिक समन्वयाच्या द्वारें म्हणजे सांस्कृतिक अविरोधाच्या मार्गानें सांस्कृतिक अभेदाचा व्यवस्थित विकास करूं शकलों, तर आपलें राष्ट्र खऱ्या अर्थानें धर्मनिरपेक्ष राष्ट्र म्हणजेच संप्रदाय पंथ निरपेक्ष राष्ट्र बनेल.

धर्मनिरपेक्ष राज्याचा माझा अर्थ हा असा आहे. ‘ सेक्युलर स्टेट ’ म्हणजे ऐहिक राज्य. या भूलोकांत सलोख्याचें, सहजीवनाचें व संविभागाचें वातावरण टिकविण्यास उपयोगी पडणारें राज्य. धर्माधिष्ठित राज्य म्हणजे विशिष्ट धर्मावर आधारलेलें किंवा विशिष्ट धर्माला मान्यता देणारें राज्य. पूर्वीं धर्म हा राज्यातीत असे. धर्मांचा अम्मल राज्यावर चाले, पण राज्याचा धर्मावर चालत नसे. इहलोक हा परलोकाकारितां असे. म्हणून नवखंड पृथ्वीच्या बाहेर देवनगरी काशी असे. काशींत सत्ता विश्वनाथाची व भैरवाची. तें ‘ स्वर्गलोकचें द्वार ’ असे. म्हणून तेथें जाऊन राहणारे लोक बहुधा ‘ मरणाकांक्षी ’ असत. काशीला मरायला जावें व जगायला राजधानींत जावें असा अव्यक्त संकेतच होता जणुं कांहीं. तीर्थक्षेत्रांवर कुठल्याहि राज्याची सत्ता नसावी असा आरंभींचा संकेत दिसतो. परधर्मीयांची सत्ता नसावी असा नंतरचा संकेत दिसतो. त्यामुळें ‘ येरूशलेम ’-करितां किती तरी धर्मयुद्धें झालीं. आज ‘ नानकानासाहेबा ’ करितां होतच आहेत. बुद्धगयेकरितां झालें नाहीं हें मानवजातीचें मोठेंच भाग्य म्हटलें पाहिजे. धर्म हा राज्यातीत असावा म्हणून ‘ धर्मक्षेत्रें ’ ‘ स्वतंत्र ’ अथवा

आन्तरराष्ट्रीय असावी या संकेतांत बरेंच तथ्य होतें. आज ' धर्मक्षेत्रां 'च्या ताब्याविषयीं वाद चालले आहेत.

मुंबईच्या ताब्याविषयीं चाललेला वाद अगदींच भिन्न भूमिकेवरील आहे. तो अमरपुरीच्या ताब्याविषयींचा वाद नसून रत्नपुरीच्या ताब्या बद्दलचा आहे. तो शालिग्रामाच्या पूजेच्या हक्काचा वाद नसून सोन्या-चांदीच्या उपकरणांच्या ताब्याचा वाद आहे. निदान संपत्तीच्या मुद्द्यावर हक्क सांगणाऱ्या पक्षाची भूमिका तरी या स्वरूपाची आहे. म्हणून एक म्हणतो तें शहर स्वतंत्र ठेवा म्हणजे आन्तरप्रान्तीय किंवा प्रान्तीय राज्या-तीत ठेवा. दुसरा म्हणतो सांस्कृतिक व ऐतिहासिक परंपरेनें तें शहर माझें आहे.

' ऐहिक ' व ' धार्मिक ' यांतील भेद दाखविण्यापुरतींच दोन उदा-हरणें घेतलीं आहेत. हल्लींच्या वादांत भर घालण्याची बुद्धि त्यांत नाहीं. याहून अगदीं वेगळ्या प्रकारचें उदाहरण म्हणजे आमच्या दिल्लीचें. तें शहर कोणाचेंहि देऊळ नव्हे, मशीद नव्हे, गिरजाघर नव्हे, अथवा गुरु-द्वार नव्हे. म्हणून तेथें कुठल्याहि विशिष्ट धर्माची मालकी नाहीं, कुठल्याहि धर्माच्या अनुयायाला मज्जाव नाहीं, बंदी नाहीं. देवनगरी वाराणशींत धनदौलत, सत्ता, मान्यता यांना किंमत नाहीं, तेथें पुण्यार्जनाला किंमत आहे. ज्याचें तें पुण्यक्षेत्र असेल त्यालाच त्या नगरीचा लाभ घेतां येईल. ' स्वर्गारोहण वैजयंती ' अशी गंगा तेथें असल्यामुळें वाराणसी नगरी स्वर्गाची शिडी आहे. पण ज्याचा गंगेवर विश्वास असेल व काशीवर श्रद्धा असेल त्याला. म्हणून काशींत धर्माला महत्त्व आहे. सुवर्णपुरी मुंबईत धर्म हा व्यापाराचाच एक भाग आहे. पुण्य देखील सट्टयाचा जिन्नस आहे. म्हणून तेथें माणसापेक्षां धनाचें महत्त्व अधिक आहे. पण दिल्ली ही राज-धानी आहे. राजा गेल्यानंतर आतां ती राजधानी राहिलेली नाहीं. ती आतां सार्वजनिक ( Cosmopolitan ) आहे. सर्व धर्मांच्या, मतांच्या, पंथांच्या व सम्प्रदायांच्या मानवांच्या समान भूमिकेवर सहनिवासाचें तें ' मानवक्षेत्र ' आहे. तेथें स्वर्गारोहणाची तयारी करायची नसून या पृथ्वीवरच स्वर्गतुल्य अमृतमय प्रसाद व देवलोकांत नसलेली सार्वजनिक नीति व चारित्र्य यांचा विकास करायचा आहे. धर्मनिरपेक्ष सामान्य मानवनीति म्हणजे धर्मबाह्य

किंवा अधार्मिक भोगपरायणता नव्हे. नीतिहीन, धर्महीन राज्य निराळें आणि धर्मनिरपेक्ष राज्य निराळें. तेथें ' धर्म ' शब्द ' विशिष्ट धर्म ' या अर्थीं योजिलेला आहे. सार्वजनिक धर्म किंवा सार्वजनिक नीति या अर्थीं वापरलेला नाहीं.

लौकिक राज्य, ऐहिक राज्य किंवा भौतिक राज्य म्हणजे लोकांना याच पृथ्वीवर गुण्यागोविंदानें व परस्परांच्या उष्कर्षाला उपकारक रीतीनें जगण्याची संधि देणारें राज्य. आजपर्यंत धार्मिक राज्याची परिणति सांप्रदायिकतेंत झालेली आहे. जडराष्ट्रपूजक हा ' राष्ट्रदेववादी ' बनतो. तो मातीचाच पूजक बनून संस्कृति धुळीला मिळवितो. पण अध्यात्मवादी हा हळूहळू अहंवादी बनतो. तो इहलोकला परलोकाची शिडी समजतो. त्यामुळें साऱ्या संस्था, साऱ्या संघटना, यांचा तो स्वतःच्या उत्कर्षाकरितां शिडीसारखा उपयोग करून गरज संपतांच त्यांना लाथाडून मोकळा होतो. आणखी वर ' निस्पृहस्य तृणं जगत् 'चा तोरा मिरवितो. म्हणून ज्याप्रमाणें अध्यात्म-निष्ठा म्हणजे ' अहंनिष्ठा ' नव्हे, त्याचप्रमाणें ' लौकिकता ', ' भौतिकता ' किंवा ' ऐहिकता ' म्हणजे ' न्याय-नीतिहीन भोगपरायणता नव्हे.

ज्याचें चित्त अस्वस्थ असेल, अपराधाच्या जाणिवेमुळें मन खात असेल, तो सदसद्विवेक बुद्धीची टोंचणी विसरायला गुंगीचा आश्रय घेतो. कित्येक धर्मनिष्ठ धर्माचा उपयोग अशा रीतीनें करतांना दिसतात. अत्यन्त क्रूरपणाच्या कृत्यांचें समर्थन धर्माच्या नांवावर करण्यांत येतें आणि अत्यंत अधम आचरणानें परितप्त झालेल्या अस्वस्थ चित्ताला गुंगी आणण्याकरितांहि धर्माची कांस धरण्यांत येते. म्हणून धर्मनिरपेक्ष मानव-नीतीच्या पायावरच लोकराज्याची इमारत उभारणें श्रेयस्कर आहे. या बाबतींत हॅरॉल्ड लास्कीचीं खालील वाक्यें उद्बोधक वाटतातः—

There is no form of cruelty in human experience to which the religion's spirit has not been able to accommodate itself. There is no advance in human knowledge of which classic religions have not been uncompromising opponents.

There is a grim truth in the accusation that its votories have been content, for the most part to let it operate as the opium of the people.

But if by the religion's spirit we mean an insistent call to devote oneself to an end beyond the private satisfaction of personality, the answer surely is that all great movements of our time have commanded the power to invoke in their service a quality of effort in which the essence is the religion's spirit.

( Reflections on the Revolution of our time )

ओघाला आलें म्हणून लिहीतच चाललों. थोडक्यांत सांगायचें म्हणजे धर्मनिरपेक्षराज्य धर्मनिष्ठ असेल, पण धर्मवादी असूं शकणार नाहीं. धर्मनिरपेक्षराज्य म्हणजे जें राज्य धर्माच्या रक्षणासाठीं देवाला बंदीवान करून मानवाचा अव्हेर करणार नाहीं असें राज्य.

लोकशाहीबरोबर पक्षनिष्ठ राजनीतीचाहि आरंभ होतो. पक्षनिष्ठेंत तारतम्य राहिलें नाहीं तर लोकराज्याऐवजीं पक्षाचें अधिराज्य माजतें. आदर्शनिष्ठ म्हणतो when none shall be for the party, all for the state अशी स्थिति आम्हांला निर्माण करायची आहे. पक्षांधता आली कीं All shall be for the Party, none for the state अशी स्थिति निर्माण होते. अशी स्थिति निर्माण होऊं नये म्हणून घटनापरिषदेंतील कॉंग्रेस-पक्ष शिस्तीच्या बाबतींत बराच लवचिक व उदार आहे. कारण घटनापरिषद् म्हणजे सामान्य कायदेमंडळ नव्हे. घटनेच्या बाबतींत दरेकाच्या कांहीं उत्कट व निश्चित कल्पना असणें अपरिहार्य आहे. म्हणून शिस्तीच्या बाबतींत कडक किंवा कांटेकोर रहातां येणें शक्य नाहीं. तरी पण एक गंमत झालीच. वैयक्तिक स्वातंत्र्याच्या कलमावर काझी करीमुद्दीन यांनीं एक उपसूचना आणली. काझी साहेबांनीं मोठ्या चातुर्यानें ती उपसूचना बाबासाहेब आंबेडकरांच्या एका पुस्तकांतून शब्दशः घेतली होती. ती अर्थातच आंबेडकरांनीं स्वीकारली. आंबेडकर हे पार्टीचे प्रवक्ते म्हणून

अध्यक्षांनीं ती मताला टाकली असतां आंबेडकरांबरोबर इतर कॉंग्रेस-सभासदांनीं 'होय' म्हटलें. पण ती उपसूचना पार्टींत 'नामंजूर' झाली होती. म्हणून कांहीं प्रमुख सदस्यांनीं उच्च स्वरांत 'नाहीं' म्हणून म्हटलें. शेवटीं सभेनें दोनदां मंजूर केलेली उपसूचना अध्यक्षांनीं पुनर्विचाराकरितां तहकूब केली. यांत आम्हीं तयार केलेले व मान्य केलेले सभानियंत्रणाचे नियम आम्हींच धाब्यावर बसविले. हा प्रकार अत्यंत अप्रशस्त व अभूतपूर्व असा झाला. हीच परिपाठी चालू राहिली तर पक्षशाही लोकशाहीचा चट्टामट्टा केल्यावांचून राहणार नाहीं. पण आमच्या पक्षांतील सर्वच जबाबदार व्यक्तींना हा प्रकार अत्यंत खेदजनक वाटला. म्हणून त्याची पुनरावृत्ति होण्याची भीति नाहीं. पक्षनेते पं. नेहरू यांचा मुख्य गुण म्हणजे त्यांच्या वृत्तीची समयानुरूप विकासक्षमता आणि पारदर्शक प्रामाणिकता. त्यांच्या निष्कपट व नित्य विकासशील वृत्तीमुळें पक्षशाहीचें स्तोम माजण्याची भीति वाटत नाहीं.

सुप्रसिद्ध अर्थशास्त्री प्रो. के. टी. शहा अगदीं धर्मप्रचारकाच्या उत्साहानें व कळकळीनें आपल्या उपसूचना मांडून भाषणें करतात. त्यांची भाषा शुद्ध असते. प्रो. शहा, श्री. टी. टी. कृष्णम्माचारी, गोपालस्वामी इत्यादि कांहीं वक्त्यांचें इंग्रजी शुद्ध असतें. त्या मानानें वक्तृत्व कमी. टी. टी. कृष्णम्माचारींचा आवाज अनुकूल असला तरी आंबेडकरांसारखा भरदार नाहीं. आंबेडकर-जयकर यांचें वक्तृत्व भरदार असतें, पण भाषेची शुद्धता व सौष्ठव त्या मानानें कमी. गोपालस्वामींच्या निराग्रही प्रांजलपणाची जशी छाप पडते, तशीच आंबेडकरांच्या असंदिग्ध विचारशक्तीची व निश्चयात्मक मांडणीची पडते.

व्यक्तिस्वातंत्र्याच्या कलमावर प्रसिद्ध घटनाशास्त्र्यांत व कायदेपंडितांत इतका मतभेद झाला, इतकी भवति न भवति झाली, इतके उलट सुलट निर्णय झाले, कीं शेवटीं तें कलम ज्या स्वरूपांत मान्य झालें त्या स्वरूपांत तें कोणालाच मान्य नाहीं ! ' अति विचारो न कर्तव्यश्चक्रं भ्रमति मस्तके ' म्हणण्याची पाळी आली.

घटना-परिषद् व पार्टी मीटिंग या दोन विदग्ध परिषदांत ' दुर्विदग्ध ' झाल्यावर घटकाभर कनॉटप्लेसमध्यें फेरफटका करून येतों. मला बाजारा-

विषयीं विलक्षण आकर्षण वाटतें. तो समुद्रासारखा व आकाशासारखा नित्य-नूतन वाटतो. त्याचें स्वरूप कधींच शिळें किंवा जुनें होत नाहीं.

हें पत्र मात्र बेसुमार लांबलें. म्हणून आतां आटोपतोंच.

तुझा,

दादा

— २७ —

१३९, कॉन्स्टिटयूशन हाउस,
नवी दिल्ली,
२९-१२-४८

प्रिय चंद्रराजा,

या पूर्वींचें सविस्तर पत्र पोंचलेंच असेल. जयपुराहून आल्यानंतर सर्वोदय-सम्मेलनाच्या अहवालाचें काम श्रीपादांच्या मदतीनें सुरू केलें आहे. काम गोगलगायीच्या गतीनें चाललें आहे, पण चाललें आहे.

जयपूरनंतर घटनापरिषदेंत पहिलाच प्रश्न ईश्वराविषयींचा आला. हिंदुस्थानच्या राष्ट्रपतीच्या शपथपत्रकांत ईश्वराला जागा नाहीं ही गोष्ट यतिराजांना खपली नाहीं. म्हणून त्यांनीं त्या प्रतिज्ञेंत ' ईश्वराला स्मरून ' (' In the name of God ') असे शब्द घालण्याचा आग्रह धरला. ईश्वराचा इन्कार करण्याची हिम्मत कोणाची आहे? तरी पण राज्यकार-भारांत त्याच्या नांवाचा उपयोग करावा कीं नाहीं याबद्दल मतभेद आलाच. ठग, गळेकापू, वाटमारे, चांचे या सर्वांनीं आपापल्या देवतांचें स्मरण करूनच रोजच्या उद्योगाला आरंभ करण्याचें व्रत निष्ठापूर्वक पाळलें आहे! कोणी म्हणाला, " हिंदुस्थानच्या संस्कृतीचा आत्मा आध्यात्मिकता व ईश्वरनिष्ठा आहे. आमच्या राष्ट्राध्यक्षांच्या संकल्पांत ईश्वराचें नांवहि नसावें हें लांच्छनास्पद आहे. " इतर कांहींजणांनीं गांधीजींच्या नांवावर ईश्वराचें

समर्थन केलें. आपल्या नांवाला वशिल्याची, शिफारशीची व युक्तिवादाची गरज लागावी हें पाहून त्या जगन्नियंत्याला काय वाटलें असेल?

याचें कारण आहे. आजपर्यंत देवाच्या नांवाचा उपयोग ज्यानें त्यानें आपापल्या मतलबाकरितां केलेला आहे. दांभिकांनीं बगलेंतील 'छुरी' लपविण्याकरितां 'मुखमें रामनामा' च्या धोरणाचें मोठ्या दक्षतेनें पालन केलें. ज्यांच्या हृदयांत व आचारांत देवाला स्थान नव्हतें, त्यांनीं त्याच्या नांवाचा सारखा घोष करून आपली प्रतिष्ठा कायम ठेवण्याचा प्रयत्न केला. देवाविषयीं निष्ठा नव्हती म्हणूनच त्यांना त्याच्या नांवाचा गजर करून आपल्या भाविकतेची जाहिरात देण्याची गरज वाटली. म्हणूनच ईश्वरवादी व आस्तिक यांच्यांत भेद करण्यांत आला. आणि येशूनें तर स्पष्ट बजावलें कीं "मला 'प्रभु प्रभु' म्हणून आळविणारे सारेच कांहीं स्वर्गाच्या राज्यांत प्रवेश करूं शकणार नाहींत." देवाच्या नांवाचा मोठमोठ्यानें जप करणारे सर्वच कांहीं भक्त नसतात. ते 'ईश्वरवादी' असतात. दुसऱ्यावर आपलें वर्चस्व स्थापन करण्याकरितांच ते ईश्वरवादाची कांस धरतात. म्हणून देवाच्या नांवावर खपूं पहाणारांविषयीं वृत्ति साशंक होते. राजकारणांत ईश्वरनिष्ठा किंवा भगवंताचें अधिष्ठान आलें तर त्यांत कल्याणच आहे. पण राजकीय धोरणाचा एक भाग म्हणून जर ईश्वराचा उपयोग करण्यांत येऊं लागला, तर अधःपाताला सीमा राहणार नाहीं. म्हणून 'देवाची शपथ' घेणारा नेहमीं पापभीरु किंवा देवभक्तच असेल असें नाहीं.

आपल्या या धर्मप्राण देशांत तर माणसानें माणसाचा छळ व उपमर्द देवाच्या नांवावरच केलेला आहे. इंग्रजांविषयीं लिहितांना एका मार्मिक लेखकानें असें म्हटलें आहे कीं, इंग्रज माणूस लोकांचें शोषणहि कुठल्या तरी तत्त्वाप्रमाणें करतो. त्याचप्रमाणें हिंदु माणसाबद्दल दुसऱ्या एका मार्मिक लेखकानें म्हटलें कीं, हिंदु माणूस 'पाप देखील धार्मिकतेनें करतो.' आपल्या सत्तेच्या स्थापनेकरितां व रक्षणाकरितां देवाच्या नांवाचा शस्त्र म्हणून उपयोग करणाऱ्या सत्ताधीशांनीं व आपल्या धनराशींत सतत भर घालण्याकरितां देवाच्या नांवाचा बनावट नोटांसारखा उपयोग करणाऱ्या धनाधी-

ह्यांनीं देवाची विटंबना करण्यांत कांहीं तरी बाकी ठेवली आहे का ? म्हणून कांहीं देवनिष्ठ व धर्मपरायण माणसें कळकळीनें म्हणालीं, कशाला देवाला यांत उगीच ओढतां ? आपल्या भांडणांत आईबापांचें नांव कशाला आणतां, म्हणण्यासारखेंच हें आहे.

बिहारचे ताजमल हुसेनसाहेब निर्भेळ बुद्धिवादाच्या भूमिकेवरून वाद घालण्याचा आव आणतात. मूलभूत हक्कांच्या वादाच्या वेळीं त्यांनीं असा ठराव आणला होता कीं, कुठल्याहि नागरिकानें विशिष्ट जातीचा किंवा धर्माचा निदर्शक पोषाख, नांवें, खुणा किंवा इतर चिन्हें धारण करतां कामा नये. 'आधीं आपलें नांव बदलण्याची कृपा आपण कराल का,' एका मार्मिक पृच्छकानें विचारलें. नांव बदललें तरी कुठलें तरी हिंदू, ख्रिस्ती, फारशी किंवा यहुदी नांव स्वीकारावें लागेल. म्हणून या देशांत लोकांना नांवाच्याऐवजीं 'नंबर' च द्यावे लागतील. पण फारसा खोल विचार न करतां बुद्धिवादित्वाचा तोरा जर ताजमल हुसेनसाहेबांना मिरवितां आला, तर त्यानीं ती संधि कां दवडावी ?

ईश्वराच्या बाबतींतहि ताजमल हुसेनसाहेबांनीं बुद्धिवादाचा आव आणण्यास कमी केलें नाहीं. ते म्हणाले ज्याचा त्याचा देव ही त्याची खासगी बाब आहे. दरेकानें आपापला देव आपल्या देव्हाऱ्यांत ठेवावा, देवघरांत ठेवावा किंवा फार फार तर आपल्या घराच्या आवारांत बंद ठेवावा, त्याला बाहेरील जीवनांत फिरकूं देऊं नये, असें ते म्हणाले. देव देवघरांत बंद राहिला, म्हणजे जगांत सुख व शान्ति राहील असा त्यांचा आशय. ईश्वराचा संबंध जीवनाशीं येतां कामा नये. ताजमल हुसेनांचा देव त्यांच्या पाकिस्तानांत सुरक्षित आहे. त्यांनीं आपलें घर व देवघर निर्माण करून तेथें कडेकोट बंदोबस्त ठेवण्याची काळजी घेतली आहे. तेव्हां हिंदुस्थानांत देव व धर्म यांच्या सत्तेला विरोध करण्यास त्यांना हरकत कां वाटावी ?

कनुभाई मुनशी यांनीं सयुक्तिक मीमांसा केली. ते म्हणाले, धर्मनिरपेक्ष राज्य म्हणजे नास्तिकतेचें किंवा देवद्रोही ( Godless ) राज्य नव्हे. अनेक निरीश्वरवादी माणसेंहि आस्तिक असूं शकतात. विशिष्ट धर्माच्या पायावर ज्या राज्याची स्थापना झालेली नाहीं, तें राज्य देवाला पारखें

(God-forsaken)च असलें पाहिजे असें नाहीं. उलट, मानवमात्रांच्या सामान्य धर्मावर अधिष्ठित असें जें 'लोकराज्य' असेल, तें मानवाची संप्रदायनिरपेक्ष सत्ता स्थापन करून नीतिमत्ता व ईश्वर यांचें वास्तविक अधिराज्य स्थापन करील.

निरीश्वरवादीहि नीतिनिष्ठ व आस्तिक असूं शकतो ही गोष्ट लक्षांत घेऊन यतिराजांनीं शपथविधींत 'मी शुद्ध बुद्धीनें प्रतिज्ञा करतों' असा पर्याय स्वीकारला. त्यामुळें देवाच्या नांवाचीहि कुणावर 'सक्ती' राहिली नाहीं. 'धर्मांत सक्ती नको' या तत्त्वाची अम्मलबजावणी झाली. शेवटीं आंबेडकरांनीं आपल्या नेहमींच्या सुबोध व जोरदार पद्धतीनें यतिराजांच्या व निरीश्वरवाद्यांच्या भूमिकेचा समन्वय करून समारोप केला. आंबेडकरांच्या प्रतिपादनांत युक्तिवादाखेरीज एक प्रकारचा आवेश व जिव्हाळा असतो; म्हणून शुद्ध शास्त्रार्थ निरूपणापेक्षां त्यांच्या विवेचनाची छाप श्रोत्यांवर पुष्कळच जास्त पडते. घटनेच्या कलमांचें प्रतिपादन इतक्या समर्पकतेनें, कौशल्यानें व कळकळीनें इतर कोणाला साधलें नसतें, असे उद्‌गार तोंडून निघतात. 'ज्यांना ईश्वरनिष्ठेचें बळ आवश्यक वाटतें त्यांच्या कर्तव्यभावनेला पावित्र्य-भावनेची जोड मिळाली तर तें इष्टच आहे' असें ते म्हणाले.

राष्ट्रपति होणाऱ्या माणसाजवळ फारशी माया नसावी, निदान ती वाढविण्याची संधि राहूं नये या उद्देशानें प्रा० शहांनीं व इतर कांहीं सदस्यांनीं अनेक उपसूचना आणल्या. देशाचा पहिला नागरिक 'अपरिग्रही' असला तर उत्तमच, पण निदान त्याला 'धनागमतृष्णा' नसावी अशी इच्छा सर्व सदस्यांना असावी हें स्वाभाविकच होतें. 'उंट सुईच्या नेढ्यांतून जाईल, पण धननिष्ठाचा स्वर्गांत प्रवेश होऊं शकणार नाहीं' हें जितकें खरें तितकेंच हेंहि खरें आहे कीं ज्याला रत्नखचित सुवर्ण-सिंहासनावर बसण्याची हौस असेल, त्याला लोकराज्यांत मज्जाव राहील. एरवीं तें 'लोकराज्य' सामान्य जनतेचें राज्य न होतां महाजनांचें महाजनांकरितां, महाजनांनीं चालविलेलें राज्य होईल. अर्थात् महाजन म्हणजे धननिष्ठ. 'कोणाच्याहि धनाचा अभिलाष धरूं नकोस' या आदेशाचा समावेश राष्ट्रपतीच्या आचारनियमांत व्हावा हें तत्त्व सर्वांनाच मान्य आहे. पण अपरिग्रहाची इयत्ता व मर्यादा ठरविणें ज्याप्रमाणें सर्वोदय-समाजाच्या

प्रवर्तकांना अशक्य वाटलें, त्याचप्रमाणें आंबेडकरांना व त्यांच्या सोबत्यांनाहि वाटलें. म्हणून त्या अर्थाचें कलम घालतां आलें नाहीं.

कायद्याची कदर, शांतता व सुव्यवस्था यांच्यावर एक पक्ष जोर देतो. दुसरा पक्ष 'कमींत कमी शासन व जास्तींत जास्त स्वातंत्र्य' या तत्त्वाचा पुरस्कार करतो. याचें मुख्य कारण हें कीं समाजाचा पाया काय असावा, कायदा, शासनव्यवस्था यांचा हेतु काय यांच्याविषयीं एकवाक्यता नाहीं. आज आर्थिक सुरक्षिततेचा संपूर्ण अभाव आहे. बेकारी सार्वत्रिक आहे. अशा वेळीं ज्यांच्या हातीं आर्थिक जीवनाचीं सूत्रें असतील त्यांनाच स्वातंत्र्याचा उपभोग घेतां येईल. खाजगी स्वार्थांच्या अनियंत्रित स्पर्धेतून शांतता व व्यवस्था कधींच निष्पन्न होत नाहींत. सर्वसामान्य जनतेच्या दृष्टीनें समान अवसराचें क्षेत्र निराशेच्या क्षेत्रांत परिणत होऊन जातें. म्हणून समाजाच्या आधारभूत सिद्धांताविषयीं मतभेद होतो आणि एकाला कायदा व सुव्यवस्था यांची काळजी वाटते, तर दुसऱ्याला स्वातंत्र्याचें महत्त्व वाटतें.

आपणांस शासन व कायदा यांचा प्रतिकार करावा लागेल अशी ज्याला जाणीव असते, तो मानवतेच्या व भूतदयेच्या तत्त्वांचाहि आधार घेतो. तो म्हणतो, 'अरे, गायींचा कैवार घेता, माणसाच्या जिवाची किंमत तुम्हांला वाटत नाहीं का? गायींचा जीव खुशाल वांचवा, पण आधीं मनुष्य अवध्य ठरवा, फांशीची शिक्षा रद्द करा. आधीं मनुष्य, मग पशु. पशु असहाय असतो, त्याला खातात, राबवितात, त्याचा अनन्वित छळ करतात. माणसाचा खून झाला तर देहान्ताची शिक्षा होते. याचें कारण मनुष्य स्वतःच्या कृत्याबद्दल जबाबदार असतो. पशु तसा जबाबदार नसतो म्हणून पशूच्या रक्षणाचा प्रश्न मनुष्याच्या रक्षणाच्या प्रश्नाहून अगदींच भिन्न भूमिकेवरील आहे. पण राजकारणांतील वादाच्या अभिनिवेशांत ह्याचें भान कसें रहावें?'

घटनापरिषदेंतील परस्पर-विरोधी मनोवृत्तींचीं अशीं अनेक खोल दडलेलीं कारणें आहेत. 'ईश्वर' हा संस्कृत शब्द खपत नाहीं म्हणून देवाचा उल्लेखच नको. नागरी-अरबी लिप्यांचा वाद संमत नाहीं म्हणून

दोन्ही नकोत, ‘ रोमन ’ लिपि हवी. तुमच्या हातीं शासन आहे म्हणून कमींत कमी शासनाचें तत्त्वच आम्हांला प्रिय वाटतें. जेथें आर्थिक विषमता असेल तेथें स्वातंत्र्य म्हणजे धनिकांचें स्वातंत्र्य या वस्तुस्थितीची आम्हांला आठवण रहात नाहीं. सत्तावादी आणि स्वातंत्र्यवादी असे दोन पक्ष विनाकारणच निर्माण होतात आणि घटनेंतील तारतम्य कमी करण्याचा प्रयत्न होतो.

घटनापरिषदेच्या कामांत आतां जरा शैथिल्य आल्यासारखें दिसतें. डॉ. आंबेडकरांना हरेक कलमावरील चर्चेला व उपसूचनांना उत्तरें द्यावीं लागतात. तरी त्यांची तडफ व तरतरी कमी होत नाहीं. पण भाषण संपवितांना शेवटलीं दोन चार वाक्यें पुटपुटत जेव्हां ते आपल्या जागेकडे वळतात तेव्हां त्यांच्यावर पडत असलेला ताण लक्षांत येतो. त्यांच्या आवाजांतील खणखणीतपणा आणि भाषेंतील जोरकसपणा कायमच आहे. ‘ मुस्लिम लीगच्या मित्रांनीं अजून लीगी मनोवृत्तीचा त्याग केलेला नाहीं, ’ असा ठणठणीत इशारा त्यांनीं दिला. आज त्यांनीं लीगी मित्रांच्या जातिवादाची चांगलीच हजेरी घेतली. प्रा० शहा मात्र कधींच थकत नाहींत. महावीर त्यागी देखील उबगले व म्हणाले, ‘ महाराज, मी आता थकलों आहें. ’ सिध्वा, शिब्बनलाल, अलगूराय, यांच्यासारखे खंदे वाग्वीरहि आतां कंटाळलेले दिसतात. म्हणून घटनापरिषदेचें काम ता. ८ ला तहकूब होईल असा रंग दिसतो. म्हणजे मग पार्लमेंटच्या बैठकीकरितां पुन्हां सारे सभामल्ल ताज्या दमानें येतील.

यतिराजांच्या पांडुरंगाला घटनेंत आतां कायदेशीर, हक्काचें व मानाचें स्थान मिळाल्यामुळें घटनेचें कार्य यापुढें तरी त्वरेनें व निर्विघ्नपणें पार पडेल अशी आशा वाटते. बिचारे यतिराज ‘ अनिकेत ’ असल्यामुळें पांडुरंग हेंच त्यांचें खरेंखुरें जिव्हाळ्याचें स्थान आहे. त्याची प्राणप्रतिष्ठा घटनेंत झाल्यामुळें त्यांना आपले बेचाळीस पूर्वज स्वर्गाला गेल्याचा आनंद होत आहे.

तुझा,

दादा

१३९, कॉन्स्टिट्यूशन हाउस,

नवी दिल्ली,

३-१-४९

प्रिय चंदूराजा,

घटनापरिषदेनें आतां निवडणुकीविषयींचीं कलमें आधीं घेण्याचें ठरविलें आहे. बहुतेक प्रांतांतून मतदारांच्या याद्या तयार होण्याच्या बेतांत आल्या आहेत. म्हणून निवडणुका शक्य तितक्या लवकर करतां याव्या हें महत्त्वाचें आहे. सबंध घटना तिसऱ्या वाचनानंतर मान्य झाल्यावर तिच्या कलमांची अंमलबजावणी होऊं शकेल हें खरें असलें, तरी निवडणुक-विषयक कलमें मंजूर झाल्यावर निवडणुकींच्या तयारीला लागतां येईल. घटनापंडित व कायदेपंडित याला अनुकूल असा एखादा शास्त्रार्थ सहज काढतील. शास्त्रांतून सोयीचा शास्त्रार्थ काढण्यांतच शास्त्र्यांचें खरें कौशल्य असतें. जुन्या शास्त्र्यांनीं आपल्या कुशाग्र बुद्धीचा उपयोग याचकरितां केला. आजचे कायदेपंडित या बाबतींत त्यांना हार जाणार नाहींत. निवडणुकीसंबंधीं कलमें ता. ८ पर्यंत पुरतील. अर्थातच अल्पसंख्याकांच्या प्रतिनिधित्वाचा प्रश्न अथवा राखीव जागांचा प्रश्न या बैठकींत येण्याचा संभव दिसत नाहीं.

सर्व अल्पसंख्याक आतांपासून सावध व जागरूक झाले आहेत. दरेकाला आपापलें घोडें पुढें दामटण्याची काळजी आहे. आपापल्या जमातीवर आपलें राज्य कसें राहील या विवंचनेंत सर्व आहेत. श्री. जयपालसिंग आजपर्यंत घटनापरिषदेंत आदिवासी लोकांचे पुढारी म्हणून त्यांच्या वतीनें बोलत आले आहेत. आतां आदिवासी लोकांच्या कुठल्याशा मंडळाकडून एक पत्रक आलें आहे. त्यांत म्हटलें आहे कीं जयपालसिंग हे ख्रिस्ती असल्यामुळें ते फक्त ख्रिस्ती झालेल्या आदिवासी लोकांचे प्रतिनिधि आहेत. आपल्या परंपरागत धर्माला चिकटून राहाणाऱ्या आदिवासी समाजाचें प्रतिनिधित्व करण्याचा अधिकार त्यांना नाहीं. धर्माश्रित प्रतिनिधित्व म्हणजेच संप्रदायवाद आणि धर्माश्रित प्रतिनिधित्ववार आधारलेलें राज्य

म्हणजे संप्रदायनिष्ठ राज्य. संप्रदाय आला कीं पोटसंप्रदाय आलाच आणि जात आली कीं पोटजातहि आलीच.

मुसल्मान सदस्यांपैकीं ज्यांनीं राष्ट्रीयतेची उसनी ऐट आणून आतांपर्यंत राखीव जागा नकोत म्हणून म्हटलें त्यांचें तें अवसान आतां ओसरलें असून आतां त्यांच्या मनोवृत्तीचा लंबक पुन्हां राखीव जागांकडे वळलेला आहे. श्री. ताजमल हुसेन व बेगम ऐजाज रसूल राखीव जागांच्या विरुद्ध मत व्यक्त करीत आहेत. म्हणून इतर मुसलमान सदस्य त्यांच्यावर मतलबीपणाचा व वैयक्तिक महत्त्वाकांक्षेचा आरोप करीत आहेत. जो कोणी आपल्यापेक्षां प्रगतिशील वृत्ति दाखवील किंवा प्रगतिशील मतांचें प्रतिपादन करील त्याच्यावर दांभिकपणाचा व पाखंडीपणाचा आरोप करून त्याचा निषेध करण्याची रीति जुनीच आहे. बाकी आजपर्यंत अगदीं शंभरनंबरी राष्ट्रीयत्वाचा बाणा मिरवणाऱ्या भल्याभल्या मुसलमान पुढाऱ्यांना सवतासुभा नको असला, तरी आपलें राखीव जागांचें खुराडें मात्र हवें आहे.

याची प्रतिक्रिया होणें अपरिहार्य आहे. पारशी, हिंदी ख्रिस्ती, इत्यादि चिमुकल्या जमातींना घरकुलें नको आहेत. हरिजनांना व आदिजनांना तात्पुरतीं हवीं आहेत. शीखांना अगदीं पाकिस्तानच्या नमुन्याचें शीखिस्तान हवें आहे. राखीव जागा मिळाल्यानंतरहि सर्वसामान्य जागांकरितां उभें राहातां यावें अशी सर्वांची मागणी आहे. मागेंपुढें हरिजन व आदिजन सर्वसामान्य जनतेंत विरून जाणार असल्यामुळें त्यांना सर्वसामान्य जागांकरितां उमेदवारी करण्याचा हक्क देण्याची सर्वांची तयारी आहे. पण आपलें स्वतंत्र अस्तित्व राखूं इच्छिणाऱ्या जमातींच्या बाबतींत ही सवलत कोणीच देऊं इच्छीत नाहीं. म्हणून अल्पसंख्याकांत दोन गट पडण्याचा रंग दिसतो. हरिजन व मागसलेल्या जाती कदाचित् ज्यादा जागांकरितां उभे राहण्याचा हक्क मागण्याचें सोडून देतील. तसें झालें तर मात्र मौज होईल.

दिल्लीला कॉंग्रेसची वरिष्ठ कचेरी आहे आणि सरकारची वरिष्ठ कचेरी आहे. त्यामुळें राष्ट्रसभा व राष्ट्रसरकार यांच्याकडे दाद मागणारांना दिल्लीची वारी करावीच लागते. प्रांतिक कॉंग्रेस कमिट्यांच्या निर्णयाविरुद्ध

अपील करण्याकारितां सारखीं निरनिराळ्या प्रांतांतून माणसें येतात; त्याच-प्रमाणें ज्यांना मध्यवर्ती सरकारच्या खात्यांत कामें असतात तींहि माणसें येथें येतात. पण दिल्ली जशी राज्यनगरी व लोकनगरी झाली आहे, तसेंच तें आतां लोकक्षेत्र झालेलें असल्यामुळें येत्या ३० तारखेला 'सर्वोदयमेळा' दिल्लीलाच होणार आहे. आतांपर्यंत दिल्लीला दरबारच होत असत. अलीकडे वर्किंग कमिटीच्या व ऑ. इं. कमिटीच्या बैठकी येथें होऊं लागल्या होत्या. कुंभमेळे प्रयागला किंवा हरिद्वारलाच होत असत. पण एका असामान्य पुण्यात्म्यानें सर्व धर्मांच्या व जातींच्या लोकांचा 'सर्वोदयमेळा' भरविण्याचें 'सर्वोदयक्षेत्र' हि तिला बनविलें; तेव्हां आतां दिल्ली राज्य-नगर, लोकनगर व सर्वोदयनगर अशा त्रिविध महत्त्वानें संपन्न झाली आहे!

घटनापरिषद व पार्टीमीटिंग यांतून जो वेळ मिळतो त्यांत अहवालाचें काम करतों. त्या कामांतहि माझें लक्ष लागतें व कंटाळा येत नाहीं, पण एखाद्या वेळीं थकवा येतो. थकवा आला म्हणजे कनॉटप्लेसमध्यें किंवा चांदणीचौकांत एक फेरी करून येतों. बाजार ही मोठी गहन आणि विचित्र संस्था आहे. त्या ठिकाणीं अजब जादूचें वातावरण असतें. तेथील आकर्षणाला अंत नाहीं. तेथें माणूस शुद्धीवर रहात नाहीं. बाजारांत पाऊल ठेवल्याबरोबर तो गिऱ्हाईक म्हणूनच तेथें वावरूं लागतो. तेथील प्रत्येक वस्तु त्याच्या मालकीची होण्याची प्रतीक्षा करीत असल्याचा त्याला भास होतो. घरीं जी वस्तु अगदीं मामुली वाटते, तीच बाजारांत मांडलेली असली म्हणजे मोहक भासते. माणसाला भुरळ पडते. तो दुकानांत शिरतो. तेथें शिरला म्हणजे त्याला आपल्या गरिबीची लाज वाटते. तो अगदीं कुबेराचा डौल आणतो. केवळ खोट्या इभ्रतीच्या कल्पनांना बळी पडून अनावश्यक वस्तू खरेदी करतो. घरीं आल्यानंतर पुन्हां शुद्धीवर येतो आणि मग फुरसतीनें पस्तावतो!

हुदली-संमेलनाच्या वेळीं जाजूजींबरोबर मीहि प्रदर्शन पाहायला गेलों. तुमच्या आईला म्हटलें थोडे पैसे बरोबर घे. जाजूजी म्हणाले, 'प्रदर्शनांत बघायला आणि शिकायला जायचें कीं वस्तू घ्यायला?' मी म्हणालों, 'वस्तू घेण्याचें ठरवून जात नाहीं. चांगलीशी वस्तु दिसली तर घेऊं.' जाजूजींना

मोठें आश्चर्य वाटलें. ते म्हणाले, ' असें कसें म्हणतां? तुम्हांला जर एकाद्या वस्तूची गरज असेल तर आपण ती शोधूं. पण गरज नसतांना फक्त वस्तु चांगली दिसते म्हणून तिचा संग्रह करणें योग्य आहे का? अनावश्यक वस्तु म्हणजेच अडगळ नव्हे का? मला माझ्या कचेरींत ठेवायला एक केराची टोपली हवी आहे. तेवढी मी घेणार आहे. बाकीच्या वस्तू प्रदर्शनांत मांडल्या आहेत. जेथें ज्या वस्तूची गरज तेथेंच ती गेली तर शोभेल.' एका गमतीच्या अर्थानें मी ' वस्तुनिष्ठ ' ठरलों आणि जाजूजी 'आत्मनिष्ठ' ठरले. मी वस्तूच्या अधीन होतों, जाजूजी वस्तु आपल्या अधीन ठेवूं इच्छीत होते. ज्ञान हें कर्तृतंत्र आहे कीं वस्तुतंत्र, हा वाद जुने शास्त्री करीत. बाजारांत गेलेलें माणूस मात्र ' वस्तुतंत्र ' बनतें यांत शंका नाहीं. माणूस ' वस्तुतंत्र ' असावा कीं ' स्वतंत्र ' असावा हा आधुनिक सांस्कृतिक जीवनाचा प्रश्न आहे.

माणूस जिनसेकरितां नसून, जिन्नस माणसाकरितां आहे, या तत्त्वाचा बाजारांत विसर पडतो. बाजारांतील हरेक वस्तु त्याच्या खिशाला आह्वान करते. मग त्याला आपल्या ऐपतीची जाणीव राहात नाहीं. फक्त मनीबॅगचा मात्र राग येतो! क्रयशक्ति वाढल्यावांचून समाज सुखी होणार नाहीं, या तत्त्वाचा त्याला प्रत्यय येतो. बाजारांतून कांहीं न घेतां परत जाणें त्याला कमीपणाचें वाटतें. तो पूर्णपणें ' Market-Psychology ' ( बाजारमनोवृत्ति ) च्या आहारीं जातो.

मोठे गमतीचे अनुभव येतात. हस्तीदंताच्या सामानाच्या दुकानांत गेलों. एक सुंदर पलंग पाहिला. किंमत विचारली. एक लाख रुपये! एक लाख रुपये खर्च करून घेतलेला पलंगच माणसाला इतक्या मोलाचा वाटेल, कीं तो कोणी चोरूं नये म्हणूनच त्याला झोप येणार नाहीं! ' ऋणं कृत्वा ' जर घेतला, तर कर्ज फेडण्याच्या विवंचनेमुळेंच झोप नाहींशी होईल. ' हा पलंग ' घोडे बेचकर ' निजायला उपयोगी नाहीं ' मीं दुकानदाराला सांगितलें. दुसऱ्या दुकानदारानें चंदनाची ' कॅशबॉक्स ' दाखविली. तिची किंमत ऐकून मीं म्हटलें, ' ही पेटी घेण्यांत जवळचे सारे पैसे खर्च होतील. मग तिच्यांत ठेवायला कांहींच शिल्लक उरणार नाहीं. ' काश्मीरची शाल

तर अंगापेक्षांहि जास्त किंमतीची वाटली. ज्याला स्वतःचा चेहरा आरशांत पाहण्याच्या लायकीचा वाटत नाहीं, त्या मला शरीर सजवायला इतक्या मूल्यवान् वस्तू घेण्याची बुद्धि कशी व्हावी? सुंदर माणसाला कुठलीहि वस्तु शोभते, पण सुंदर वस्तूला कुठलेंहि माणूस शोभत नाहीं. माझीं उत्तरें ऐकून त्या त्या दुकानदाराचें मनोरंजन झालें आणि मी अगदींच अरसिक आहे, दरिद्री आहे किंवा कंजूष आहे असा त्याचा ग्रह झाला नाहीं. बाजारांतून कांहीं न घेतां अव्हनिशीं बाहेर पडलों, हा कांहीं सामान्य पराक्रम नव्हे !

सायंकाळीं यतिराज परत आले. त्यापूर्वीं मुंबईच्या 'Times of India' वरून हकिकत समजली होती. 'स्पष्टीकरणात्मक चर्चेनंतर प्रेमपूर्ण वातावरणांत सभा संपली.' ही फुलश्रुति कांहीं असमाधानकारक नाहीं. पुढें आणखी काय निष्पत्ति होते यावर सर्व अवलंबून आहे. एकंदरींत अविश्वासाच्या ठरावावर मतें घेतलीं गेलीं नाहींत हें चांगलेंच झालें. या प्रसंगापासून कन्नमवारजी व त्यांचे सोबती नम्रता शिकतील आणि पूनमचंद–आबासाहेब मंडळी नव्या जोमानें आपलें काम पुढें चालवितील, तर प्रांताचें कल्याणच होईल.

आज देशाला सलोख्याचीच गरज आहे. पूनमचंदजींना आमच्याबरोबर सहकार्यानें जर काम करणें शक्य झालें, तर त्यांना त्याच्या पूर्वींच्या सहकाऱ्यांबरोबर काम करणें कां शक्य होणार नाहीं? पूनमचंद, आबासाहेब व कन्नमवारजी यांच्या सहकार्यांतून नवीन शक्ति निर्माण होण्यास हरकत नाहीं. मुख्य गरज परस्पर-विश्वासाची आहे.

तुझा,

दादा

१३९, कॉन्स्टिटयूशन हाउस,
नवी दिल्ली,
७-१-४९

प्रिय चंद्रराजा,

घटनापरिषदेंतील काम बरेचसें अनौपचारिक पद्धतीनें चालतें. एकंदरींत बराच लवचिकपणा आहे. सोयीच्या दृष्टीनें ठरलेल्या वेळेपेक्षां दहापंधरा मिनिटें जास्त बसावें लागलें किंवा एकाद्या नियमाला थोडीशी मुरड घालावी लागली, तरी अध्यक्षांना फारशी दिक्कत वाटत नाहीं. घटनापरिषद् या दृष्टीनें जशी 'कालवश' नाहीं, तशीच ती 'विधिवश'हि नाहीं. सामान्य कायदेमंडळांतील तांत्रिक कडकपणा किंवा कांटेकोरपणाचा आग्रह घटना-परिषदेला शोभणार नाहीं हें खरेंच आहे. म्हणूनच पक्षाच्या शिस्तीच्या बाबतींतहि कडकपणा किंवा आग्रह नसावा असें मला वाटतें. साधारणपणें तसें होतहि असतें.

पण पार्लमेंटरी पद्धतीचें तंत्र लोकशाहीच्या तत्त्वाप्रमाणें चालावें म्हणून इतर पार्लमेंटांतून जे नियम व जे विधी घालून देण्यांत आले आहेत, मला वाटतें, ते फार पथ्यकारक आहेत. या तंत्राच्या व विधींच्या अनुपानावांचून अनियंत्रित लोकसत्तेचें पर्यवसान अनियंत्रित पक्षसत्तेंत होण्याचा संभव आहे. पण या गोष्टीकडे जावें तसें लक्ष पक्षनेत्यांचें जात नाहीं असें दिसतें, ही दुर्दैवाची गोष्ट आहे. लोकसभांच्या नियंत्रणाचे आवश्यक नियम व आवश्यक विधीहि जर पाळण्यांत न आले, तर हितकारक लोकसत्तेचा विकास होणें अशक्य होईल.

दोन-तीन दिवसांपासून निवडणुकींच्या कलमांवर चर्चा चालू आहे. मतदारसंघ म्हटला कीं संख्येचा प्रश्न आलाच. म्हणून खानेसुमारीचाहि मुद्दा आल्यावांचून कसा राहील ? निर्वासितांमुळें पश्चिम बंगाल व पूर्व पंजाब या दोन प्रांतांच्या लोकसंख्येंत फरक झाला आहेच. पण त्याखेरीज इतरहि मोठे मनोरंजक मुद्दे निघत आहेत.

पश्चिम बंगालचे एक हरिजन पुढारी डॉ. मनमोहन दास यांचें भाषण काल झालें. त्या भाषणाकडे कोणाचें फारसें लक्ष गेलेलें नसावें. डॉ. दास म्हणाले, "१९४१ च्या खानेसुमारींत पुष्कळशा हिंदूंनीं आपली जात लिहिली नाहीं. त्यामुळें घोटाळा झाला. सवर्ण म्हणतात, हे आमच्यापैकीं आहेत आणि हरिजन म्हणतात आमच्यापैकीं आहेत, म्हणून कोणाची संख्या जास्त हा वाद आहे."

कशी गंमत आहे ती पाहा. हरिजनांच्या चळवळीचा अंतिम हेतु हरिजन व सवर्ण यांच्यांतील भेद नाहींसा करणें हा आहे. सवर्ण लोक हरिजनांचा समावेश आपल्यांत करून घेत नाहींत, ही हरिजनांची मुख्य तक्रार आहे. पण आतां शिरगणतीच्या वेळीं मात्र हरिजनांचा समावेश सवर्णांमध्यें होऊं नये याची काळजी त्यांना लागून राहिलेली आहे! हरिजनांची संख्या जितकी मोठी नमूद होईल तितक्या त्यांना जागा जास्त मिळतील, ही त्यांतली मख्खी आहे. म्हणून हरिजनांना आंकडेवारींत सवर्णांपासून अलग व अस्पृश्यच राहाण्याचा आग्रह धरणें इष्ट वाटतें.

याच्या उलट, सवर्णांना हरिजनांच्या जीवनांत प्रवेश रुचत नाहीं. पण मतदारांच्या यादींतील सवर्णांची संख्या फुगविण्याकरितां कागदावर हरिजनांची गणना सवर्णांत झाली, तर त्यांना तें इष्टच नव्हे, तर हवेंहि आहे. म्हणजे त्यांना आंकड्यांतील अस्पृश्यतानिवारण हवें आहे. लोकसत्ता आंकडेवारीची अंकित झाली म्हणजे अशी विसंगति निर्माण होणें अपरिहार्यच आहे. यालाच विनोबांनीं 'आंकडेशास्त्राचा वांकडेपणा' म्हटलें होतें.

आंकडेशास्त्राचा हा वांकडेपणा इतर क्षेत्रांतहि भोंवत आहे. आन्ध्र देशांत रायसलाम व उत्तर सरकार या दोन भागांतहि असाच वाद आहे. आज राष्ट्रसभाध्यक्ष म्हणाले, 'कांहीं भाग असा आहे कीं कुत्र्याला फेकून मारायला लहानसा दगड सांपडायचा नाहीं आणि कांहीं भाग असा आहे कीं मातीचें लहानसें ढेकूळ सांपडणार नाहीं. इकडे $\frac{1}{3}$ भागांत $\frac{2}{3}$ लोक राहातात. तिकडे $\frac{2}{3}$ भागांत $\frac{1}{3}$ लोक राहातात. या सगळ्यांना योग्य प्रमाणांत प्रतिनिधित्व मिळालें पाहिजे.' आसाममध्येंहि निरनिराळ्या जमातींचीं निवासक्षेत्रें आहेत. त्यांच्याहि प्रतिनिधित्वाची तरतूद करायची आहे.

हे सारे प्रश्न गुंतागुंतीचे असल्यामुळें आज शेवटीं ११-४५ लाच काम तहकूब करावें लागलें. उद्या पुन्हां चर्चा होईल. लोकशाहीचें मुख्य कर्मकांड निवडणूक हें असल्यामुळें हा प्रश्न जिकरीचा होऊन बसला आहे.

ज्या देशांत जातवारी हेंच सामाजिक जीवनाचें आधारभूत तत्त्व आहे, तेथें जातिनिहाय मतदारसंघ निर्माण करायचे नसले म्हणजे किती भानगडी उत्पन्न होतात, हें यावरून तुझ्या लक्षांत येईल. जातिनिहाय मतदारसंघ निर्माण केले तर जातिभेद वज्रलेप होतील किंवा जातींना अन्न नसल्यामुळें जातवारीच्या तत्त्वाचाच लय होईल. पण दरम्यान समाजव्यवस्थाच कोलमडून पडण्याची भीति आहे.

जातीय प्रश्नाचीं रूपें दरेक प्रांतांत निरनिराळीं आहेत. पंजाबांत शीखांचा प्रश्न, राजपुतान्यांत राजपूत जाटांचा प्रश्न, दक्षिणेंत ब्राह्मण-ब्राह्मणेतरांचा प्रश्न अशीं त्याचीं विविध रूपें आहेत. ही गोष्ट रा. स्व. संघ व हिंदुसभा यांच्या ध्यानांत अजून येऊं नये यांत देशाचें दुर्दैव आणि त्यांचा करंटेपणा आहे. हिंदुत्वाची जुनी व्याख्या कायम ठेवून हिंदुत्व व राष्ट्रीयत्व ह्या संज्ञा परस्पर पर्यायवाचक मानून जातिनिरपेक्ष राजकारणाचा तोरा मिरवायचा हें तर्कशास्त्र लोकविलक्षण आहे! 'जातीय' व 'जातिवादी' असा सूक्ष्म श्लेष भोपटकरांनीं काढला आहे. राजकारणांत जातीचें तत्त्व आणणें म्हणजेच जातीयता. हिंदुसभेला तें आणायचें नसेल, तर जातीय संस्थांनीं राजकारणापासून अलिप्त रहावें. जातिवादाचा प्रतिकार करायचा असेल तर रा. स्व. संघानें आपला 'न्यायाग्रह' हिंदुसभा, शीखसभा, इत्यादि जातीय संस्थांच्या राजकारणाविरुद्ध करावा. हल्लींची त्यांची चळवळ 'करनकन्याचा न्याय' या सदरांत येणारी आहे.

संकुचिततेवर एकच रामबाण उपाय आहे. तो म्हणजे व्यापकता. संकुचिततेचा कडेलोट झाला कीं ती विरूं लागते. तिला एका मर्यादे-बाहेर ताणली कीं ती तुटते. दरेक अ-सामाजिक वृत्तीचें असेंच आहे. सर्वच चोर झाले आणि एकमेकांची चोरी करूं लागले, तर शेवटीं चोरी ही संस्थाच नाहींशी होईल. प्रत्येक समाजविरोधी व्यवस्थेंत ही स्वभावसिद्ध विसंगति असते. म्हणूनच ती व्यवस्था त्याज्य व नश्वर ठरते. भांडवल-

शाहींत असा अंतर्गत विरोध असल्यामुळेंच तिच्या पोटीं जी व्यवस्था जन्माला येते ती भांडवलशाहीचा नाश करते. जातिवादाच्या पोटीं उपजातिवाद, पोटजातिवाद व पोट-पोटजातिवाद यांचा जन्म होतो आणि शेवटीं 'यादवींत' पर्यवसान होतें.

हिंदुसभा व रा. स्व. संघ यांचा प्रयत्न जातिवादाचा शेवट संप्रदायवादानें करण्याचा आहे. पण संप्रदायवाद हा स्वभावगुणानेंच आक्रमणशील व असहिष्णु असल्यामुळें तो 'असुर्यानाम ते लोकाः' चें मूळ ठरेल. या दृष्टीनें हिंदुसभेनें दीर्घ 'अ-विचारानंतर' स्वीकारलेली भूमिका घातक आहे.

तुझा,
दादा

— ३० —

इलेक्ट्रिक लेन,
नवी दिल्ली,
९-१-४९

प्रिय बाळू,

कालची घटनापरिषदेची बैठक वादळी झाली. थंडीची चांगलीच प्रचंड लाट दिल्लींत येऊन गेली. ती ओसरल्यानंतर घटनापरिषदेंत हें वादळ झालें! या वादळाचें मुख्य श्रेय यतिराजांना (श्री. कामथ) आहे. यतिराजांच्याविषयीं मी फारसें लिहीत नाहीं. मधून मधून त्यांची थोडी गंमत करतों. याचें कारण त्यांचा माझा स्नेहसंबंध आणि दुसरें कारण असें, कीं यतिराज अगदीं रोजच बोलतात. त्यांचें आपलें 'सावधपण सर्व विषयीं' आहे. प्रत्येक मुद्द्यावर त्यांची कांहीं तरी सूचना किंवा उपसूचना असतेच. त्यांच्या बुद्धीला 'अनंत फाटे' आहेत असेंहि त्यामुळें कित्येकांना वाटतें. पण ते कुठला तरी मुद्दा उपस्थित करतातच. पुष्कळांना हें मोठें तापदायक वाटतें. उगीच कामांत व्यत्यय येतो असेंहि वाटतें. पण मधून मधून 'हटकणारे'

माणूस असलें म्हणजे गाडी रुळांवर राहातें. अगदींच बेदरकारपणानें नियम धाब्यावर बसविण्याची वृत्ति कमी होते.

काल असेंच झालें. काल यतिराजांनीं अतिप्रसंग केला असें मला वाटत नाहीं. त्यांनीं काल दाखविलेल्या साहसाला नीतिधैर्य म्हणावें लागेल. घटनापरिषद् फारशी ' तंत्रनिष्ठ ' नसावी, सारे विधी अगदीं तंतोतंत पाळण्याची बळजबरी तिच्यावर नसावी हें मीं पूर्वींच लिहिलें आहे. काल आमचे उपाध्यक्ष डॉ. एच्. सी. मुकर्जींनीं यतिराजांना बजावलें, ' अहो शब्दानें नाश होतो. शब्दांतील अर्थ माणसाला तारतो ! ' हें अगदीं खरें आहे. पण सभानियंत्रण म्हटलें कीं नियम आलेच आणि नियम शब्दात्मक असतात. शब्दांच्या अर्थाविषयीं वाद होतो म्हणून तर शक्य तितके असंदिग्ध व नेमके शब्द वापरण्याचा प्रयत्न असतो. अर्थाच्या दृष्टीनेंहि लोकशाहीला बळकटी आणणारे प्रघात घटनापरिषदेनें पाडायला पाहिजेत. एकादी गोष्ट करण्याची घाई झाल्यामुळें नियमांची चाड न बाळगतां चटदिशीं आपल्या मनासारखें करून घेण्याची सोय राहूं नये, म्हणून तर कायदा पास करून घेण्याकरितां इतक्या नियमांचें कुंपण घातलें आहे. लोकांना निवडणुका लवकर हव्या आहेत हें खरें. विनाकारण दिरंगाई होऊं नये हेंहि कबूल. पण त्याकरितां सभासंचालनाचे मूलभूत नियम कुणी धाब्यावर बसवूं लागले, तर लोकशाहीचें रोपटें वठून जाईल.

कालचा प्रसंग असाच होता. अध्यक्षांनीं ठराव मांडण्याच्या अपवादात्मक अधिकाराचा फायदा घेण्यांत आला. ज्या ठरावाविषयीं मतभेद होण्याचा संभव असेल तो अध्यक्षांनीं मांडूं नये, अशी वहिवाट अत्यन्त पथ्यकारक व सयुक्तिक आहे. उपाध्यक्षांनीं काल ती मोडण्याचें ठरविलें. स्वतः ठराव मांडण्याचा संकल्प जाहीर केला आणि त्याच्यावर वादविवाद करण्याची किंवा उपसूचना मांडण्याची मनाई केली. यतिराजांनीं शास्त्रार्थाचा मुद्दा उपस्थित केला. त्यानंतर इतरांनाहि अवसान आलें. अनेक सभासदांनीं त्यांचें समर्थन केलें. युक्त प्रांताचे स्पीकर टंडनजी यांचें भाषण फारच परिणामकारक झालें. ते म्हणाले, " आधीं अध्यक्षांनीं ठराव मांडणेंच बरोबर नाहीं. मांडलाच तर तो वादग्रस्त नसावा. वादग्रस्त ठराव मांडून त्यावर वादविवादाला व उपसूचनेला बन्दी करण्याची रीति तर अश्रुत-

पूर्वच आहे." आपल्या प्रांताचे स्पीकर घनश्यामसिंग गुप्त यांनीं टंडनजींच्या म्हणण्याला दुजोरा दिला. श्री. अनंतशयनम् अय्यंगार यांनीं या आक्षेपांना उत्तरें देण्याचा अयशस्वी प्रयत्न केला. सभेंत त्यांचें कोणी ऐकून देखील घ्यायला तयार होईना ! सभेंत शिस्त म्हणून राहिली नाहीं. एकाद्या सार्वजनिक सभेसारखा गोंगाट व अव्यवस्था माजली ! शेवटीं उपाध्यक्षांनीं ठराव परत घेतला. यांत उपाध्यक्षाकडे गौणत्व आलें खरें, पण सभेची प्रतिष्ठा रक्षिली गेली आणि एक अयोग्य प्रघात पडला असता तो टळला.

एकदां चुकीचें पाऊल पडलें म्हणजे त्याचा पाठपुरावा करायला दुसऱ्या चुकांची मदत घ्यावी लागते. तसेंच झालें. ठराव जवाहरलालनीं मांडल्यानंतर त्याच्यावर उपसूचना मांडण्यांत आल्या. उपसूचनांवर चर्चा झाल्यानंतर मूळ ठरावावर चर्चा झाली. चर्चेला उत्तर जवाहरलालांच्या वतीनें बाबासाहेब आंबेडकरांनीं दिलें. आणि त्यांत पुन्हां मौज अशी, कीं ठरावावरील चर्चेला उत्तर देतांना आयत्या वेळीं ज्या उपसूचना मांडल्या गेल्या, त्या उपसूचनांवर चर्चा नाहीं, प्रश्न नाहींत, कांहीं नाहीं.

तांत्रिकतेचा व औपचारिकतेचा बाऊ करूं नये हें खरें; पण घटनापरिषदेनें जर अनियंत्रित व तंत्रहीन वागणुकीचा पायंडा पाडला, तर ग्रामपंचायती व न्यायपंचायती नियमांची कितपत तमा बाळगतील ? उच्छृंखल लोकसत्तेलाच तर 'अंधेर गर्दी' म्हणतात ना ? बेलगाम लोकशाही म्हणजेच बेबन्दशाही.

या दृष्टीनें यतिराजांचा कालचा अवखळपणा अप्रयोजकपणांत न मोडतां नीतिधैर्यांत मोडेल. कोठें चुकतें तें दाखवायला टपून बसणाराला सतत जागरूक, सावध राहावें लागतें हें उघडच आहे. यतिराज अभ्यासू व कष्टाळू आहेत. बुद्धीहि तशी तरतरीत आहे.

उपाध्यक्षांच्या कारकीर्दीच्या शेवटच्या दिवशीं हा जरा अनिष्ट असा प्रकार झाला. पण लोकशाहीला इष्ट वळण मिळण्याच्या दृष्टीनें तो इष्ट असल्यामुळें परिणामीं गोडच म्हणावा लागेल. ज्याचा शेवट चांगला, तें चांगलेंच.

तुझा,

दादा

ता. क. कुठल्याहि नवीन ठिकाणीं राहायला गेलें म्हणजे तुमची व तुमच्या आईची आठवण होते. पण याखेरीज आणखी कांहींच वाटत नाहीं. नुकतेंच जें ठिकाण सोडलें असेल त्याविषयींची आपुलकीची भावना घुटमळत राहात नाहीं. ज्याचें बिऱ्हाड नेहमीं पाठीवर असतें त्याला इकडील लोक ' खानाबदोष ' घर घेऊन हिंडणारा म्हणतात. उडाणटप्पूहि ' अनिकेत ' असतोच. जेथें आपल्याला निवाऱ्याची जागा मिळेल, तेंच आपलें घर नव्हे का ? घर हें दगडमातीचें नसून माणसांचें असतें. म्हणून मला फक्त तुमची आठवण होते.

— ३१ —

१३९, कॉन्स्टिटयूशन हाउस,
नवी दिल्ली,
१८-५-४९

प्रिय चंदूराजा,

ता. १२ ला सायंकाळीं पंचमढीला पोंचलों. ता. १३ चा सबंध दिवस कामांत गेला. कोठें बाहेर गेलों नाहीं. ता. १४ ला सकाळीं निघून ता. १५ ला येथें पोचलों.

येथें पुन्हां आपल्या जुन्या खोलींत येऊन दाखल झालों. जुनेपणामुळें तिच्यावर थोडी ' अवकळा ' आलेली आहे. पंखा व इतर सामान किंचित् जुनाट व खिळखिळें झालेलें आहे. लोक म्हणतात ' वेस्टर्न कोर्ट ' मध्यें विशेष चांगली सोय आहे. पण जुनी खोली जुनेपणामुळें प्रिय आहे. तिचा अव्हेर करण्याचा चंचलपणा करणें प्रशस्त वाटत नाहीं. वस्तु जितकी जुनी असेल तितकीच ती अभिमानाला व स्नेहाला पात्र होते. सहवासानें आत्मीयता वाढते ! आपला दिनू लहान असतांना एकदां त्याची तांब्याची लोटी कोणी तरी घांसून आणली. तिचा मळकट रंग तांबडा झालेला पाहून दिनू म्हणाला, ' ही माझी लोटी नव्हे. मी साफ घेणार नाहीं ! ' मीहि माझ्या खोलीला सफेदी करूं दिली नाहीं, सामानाला ' रोंगण ' लावूं दिलें नाहीं.

खिळखिळा झालेला पंखा थकलेल्या म्हाताऱ्या मोलकरणीप्रमाणें सतत कटकट करीत वारा घुसळतो !

घटनापरिषदेचा दिवाणखाना मात्र तितिक्षेला प्रतिकूल आहे. तेथील हवामान अगदीं ' माफक ' आहे. हिंवाळ्यांत तेथें थंडी वाजत नाहीं. उन्हाळ्यांत मुळींच उकडत नाहीं. अगदीं बेताचें ' गरम—थंड ' वातावरण असतें. या ' युक्तवायुमानांत ' ' समशीतोष्णवृत्ती 'चा परिपोष उत्तम प्रकारें होतो. पण आमची तितिक्षेची संवय समूळ नाहींशी होऊं नये याची काळजी मानवाला नसली तरी देवाला, किंवा ' अत्र पंचमम् ' योगायोगाला आहेच. म्हणून ऐन मध्यान्हीं जेव्हां आम्ही सभागृहांतून बाहेर पडतों, तेव्हां गरम वारे एकदम अंगावर झडप घालतात. थंड पाण्याच्या सुखदायक शीतल कारंज्याखालीं मनसोक्त स्नान केल्यानंतर गरम पाण्याच्या पिचकाऱ्या अंगावर सोडण्यांत आल्या म्हणजे जसें वाटेल, तसें वाटतें. विरोधामुळें गरम झळांची तीव्रता अधिकच जाणवते ! कोणाला ती बाधणारच नाहीं याची खात्री कुणी द्यावी ?

सभागृहाच्या समशीतोष्ण वातावरणाला अनुरूप अशा समशीतोष्णवृत्तीचे अध्यक्ष लाभले आहेत. राजेंद्रबाबू ' मुलायम ' आदमी नाहींत. त्यांच्या सौजन्यालाहि धार आहे. पं. जवाहरलालांनीं जेव्हां उपसूचनांना हरकत घेतांना म्हटलें, कीं उपसूचनांचा परिणाम सरकारला कमीपणा आणण्यांत होईल तेव्हां राजेंद्रबाबू खंबीरपणानें म्हणाले, ' आम्हांला परिणामाशीं कर्तव्य नाहीं. आम्हांला फक्त आमच्या नियमांचा विचार करायचा आहे. ' लोणी मऊ असतें. तें कापतां येतें. नरम वस्तूहि कापतां येते. पण पाणी नम्र असलें तरी दाबतां किंवा कापतां येत नाहीं. आपल्या मार्दवयुक्त बाणेदारपणानें घटनापरिषदेचे अध्यक्ष मधून मधून याचा प्रत्यय आणून देतात.

पहिल्या दिवशीं जवाहरलालांनीं आपला कॉमनवेल्थसंबंधीं ऐतिहासिक ठराव मांडला. अशा प्रसंगीं जवाहरलालांचें भाषणहि त्या प्रसंगाला अनुरूप असें भरदार भव्य होत असतें. पण ता. १६ ला ठराव मांडतांना त्यांनीं जें पाल्हाळिक भाषण केलें तें अगदींच पडलें. त्यांत नेहरूंचा ' रुबाब ' किंवा मनाची पकड घेणारी बुद्धीची ' चमक ' नव्हती. स्वपक्षमंडन किंवा

परपक्षखंडनहि बेताचेंच होतें. तें बचावाचें भाषण होतें. त्यांत मुद्दे होते पण ते अंतःकरणाला जाऊन भिडत नसत. त्या मानानें त्यांचें कालचें समारोपाचें भाषण पुष्कळच चांगलें झालें. त्यांत विधायक मांडणी होती, आत्मप्रत्यय होता आणि ओजहि होतें.

जवाहरलालांच्या ठरावाला कोणाच्याहि मनांत अगदीं स्पष्ट विरोध क्वचितच असेल ! पण बहुतेक सगळ्यांच्या मनांत एक ‘ हलकासा खटका’, थोडीशी सौम्य मळमळ, राहून गेली आहे. ब्रिटिश सत्तेच्या मगरमिठींतून एकदांचें सुटलों. स्वातंत्र्य आलें. भारतमातेचें पांग फिटले. आतां सुखानें जगतां न आलें तरी समाधानानें मरायला हरकत नव्हती ! पण पुन्हां ब्रिटिशांचा संसर्ग नको, त्यांची सांवलीहि आमच्या नव्या स्वातंत्र्यावर पडतां कामा नये ! इतरांची मैत्री बाधणार नाहीं. पण कालच्या धन्याची मैत्री ही त्याच्या मालकीची पडछाया तर नसेल ना, अशी शंका मनाला येते. म्हणून ब्रिटिशांचा संपर्क नको, त्यांच्या संगतीचा आभासहि नको ’ अशी वृत्ति स्वाभाविक आहे. ‘ आजचा मित्र उद्यांचा शत्रूहि असूं शकेल, ’ हें जसें शहाणपणाचें सूत्र आहे तसेंच ‘ आजचा शत्रुहि उद्यांचा मित्र असूं शकेल, ’ हें सूत्र शहाणपणाचें व सौजन्याचेंहि आहे. पण कमकुवत मनाला इतका विश्वास ठेवणें जड जातें. त्यामुळें ज्या कारणामुळें ब्रिटिशांची सत्ता संपली त्याच कारणामुळें त्यांचें वैरहि संपलें, असा प्रत्यय जवाहरलाल विरोधकांच्या मनांत उत्पन्न करूं शकले नाहींत. परिस्थिति बदलल्यामुळें स्वतःच्या मतलबाकरितां कां होईना, कालचा शत्रु आजचा मित्र बनूं शकतो हें हिकमतीच्या राजकारणाचें पायाभूत धोरण आहे. जवाहरलालांसारख्या धडाडीच्या राज्यनेत्यांना त्याचेंच अवलंबन करावेसें वाटलें.

बहुतेक सभासदांना ब्रिटिशांच्या सांवलीला उभें राहणेंहि खपत नसतांना जवाहरलालांचा ठराव मान्य झाला हा त्यांचा फार मोठा विजय आहे. त्यांच्या प्रामाणिकपणावर व देशभक्तीवर सगळ्यांचा अढळ विश्वास आहे. जवाहरलालांचें नेतृत्व सगळ्यांना हवें आहे. म्हणून मनाला रुचत नसलेली गोष्टहि मान्य करून जवाहरलालांच्या दानतीवरील व शाबूत बुद्धीवरील आपला विश्वास घटनापरिषदेनें व्यक्त केला. एक अस्फुट रुखरुख मात्र मनात राहून गेली.

ठरावावर जीं भाषणें झालीं त्यांपैकीं ' यतिराजांचें ' भाषण बरें झालें. यतिराज कष्टाळू व अध्ययनशील आहेत. त्यांना विषय कळतोहि. आय्. सी. एस्. चें वळण त्यांना चांगलें उपयोगी पडतें. आपले संदेह व आक्षेप मोठ्या परिणामकारक रीतीनें मांडून शेवटीं मात्र त्यांनीं ठरावाचें समर्थन केलें. ' आपण जगांत एकाकी राहिलों तर आपलें कसें होईल, अशी भीति बाळगूं नका, ईश्वर तुमच्या पाठीशीं आहे, ' असा इशारा त्यांनीं ' क्लैब्यं मास्म गमः 'चा उल्लेख करून दिला. जवाहरलाल म्हणाले, ' क्लैब्याचा त्याग करायचा म्हणूनच मित्रत्व जोडण्याचें धाडस करतों.'

दामोदरस्वरूप शेठ हे तर बोलून चालून समाजवादी पक्षाचे. त्यांनीं ठरावाला निकराचा विरोध केला. नेहमींच्या मानानें त्यांचें भाषण बरेंच चांगलें वठलें. प्रा. शिब्बनलाल सक्सेनांचें अनियंत्रित धैर्य प्रसिद्धच आहे. त्यांची राष्ट्रसभापति डॉ. पट्टाभि व युक्त प्रांताचे पंतप्रधान गोविंद-वल्लभपंत यांच्याशीं चकमक चालू आहे; आतां कॉंग्रेसपक्ष व जवाहरलालजी यांच्याशीहि ' सलामी ' झाली. त्यांच्या बोलण्याच्या पद्धतीमुळें शब्द घशांत व तोंडांत घुटमळून एकमेकांवर आदळतात. त्यामुळें कोणाला कांहींच बोध होत नाहीं. मौलाना हजरत मोहानी त्यांच्याहिपेक्षां वरचढ आहेत. त्यांच्या आवाजाचा कोंडा उडूं लागला म्हणजे शब्दांचाहि धुव्वा उडतो आणि ऐकणाऱ्यांच्या पदरांत कांहींच पडत नाहीं. त्यांच्या भाषणां-तील एक-दोन वाक्यें ऐकूं आलीं. लो. टिकळांचा त्यांनीं आपलें ' राजकीय गुरु ' म्हणून दोन तीनदां उल्लेख केला. त्यांचा मुद्दा असा होता कीं लोकमान्यांनीं आम्हांला ' प्रतियोगित्वा 'चें तत्त्व शिकविलें. आम्ही कोणाशीं मैत्री करायला पुढें सरसावणार नाहीं. जो ज्या प्रमाणांत आमच्या जवळ येईल त्या प्रमाणांत आम्ही त्याला जवळ करूं. गोरे लोक अजून आमच्याशीं दुर्वर्तन करतात, म्हणून आम्ही त्यांच्या वाऱ्याला उभे राहूं इच्छीत नाहीं. या वाणगटांच्या कपटपटु गटांत सामील होण्यापेक्षां आम्ही रशियाशीं सख्य जोडूं !

पूर्वी ' सर्वतंत्रस्वतंत्र ' म्हणून पंडितांचा एक वर्ग असे. त्याची गति कुठल्याहि शास्त्रांत सारखीच असे. तसे मौलाना हजरत मोहानी हे ' सर्व-

मतस्वतंत्र ' आहेत. त्यांना कशाचेंच बंधन नाहीं. त्याचमुळें ते निर्भेळ स्वातंत्र्यवादी आहेत.

मौलाना हजरत मोहानी यांनीं ज्यांना आपलें " राजकीय गुरु " म्हटलें आणि अलीबंधूंनीं अमृतसर-काँग्रेसमध्यें आपले राजकीय गुरु म्हणून ज्यांच्या पायांवर टोपी ठेविली त्या लो. टिळकांच्या एका सुप्रसिद्ध भाषणाची मला आठवण झाली. त्यांत टिळकांनीं व्यक्त सरकार व अव्यक्त सरकार असा भेद करून त्यांची व्याख्या व विवेचन केलें आहे. बादशहाला अव्यक्त सरकार म्हटलें आहे. जवाहरलालांनीं ' कॉमनवेल्थ 'ची व्याख्या कांहींशी अशीच केली. ती संस्था नव्हे, तें संघटन नव्हे, तिला व्यक्त स्वरूपच नाहीं, तिला कर्तव्य नाहीं, तिला कचेरी नाहीं, असें त्यांनीं वर्णन केलें. वेदान्तांत मायेचें वर्णन असेंच आहे. ती ' सदसदभ्यागनिर्वचनीया ' असून वर पुन्हां ' भावरूप ' आहे. तसेंच हें ' कॉमनवेल्थ ' अनिर्देश्य आहे. त्याला आकार नाहीं व कार्यहि नाहीं. कनुभाई मुनशी म्हणाले कीं टीकाकारांनीं फक्त निषेधात्मक टीका केली. टीकाकारांच्या मतें जणुं कांहीं-हें ब्रह्मच आहे. त्याचें ' नेति नेति ' असेंच वर्णन करणें शक्य आहे असें टीकाकारांना वाटतें. मुनशींचा हा आक्षेप बरोबर आहे. पण त्याचें कारण जवाहरलालांनीं सांगितलेलें स्वरूपलक्षण आहे, हें विसरतां येणार नाहीं.

पण जें फार व्यामिश्र व गुंतागुंतीचें भासतें तें पुष्कळदां साधें व सरळ असतें, असा तत्त्वज्ञानाचा सिद्धान्त आहे. त्याचाहि अनुवाद जवाहरलालांनीं केला. ते म्हणाले, ही योजना इतकी सोपी व साधी आहे आणि इतकी अपूर्व आहे कीं अशी गोष्ट शक्य कशी झाली याचेंच लोकांना नवल वाटतें ! अशा रूपहीन, गुणहीन संबंधापासून काय फायदा ? पण भाऊजी दफ्तरी ' बायोकेमिक ' औषधाविषयीं जो दावा करतात, तोच जवाहरलाल या योजनेविषयीं करतात. आला तर गुणच येईल, अपाय व्हायचाच नाहीं. पण हें अल्पमर्दनाच्या मात्रांच्याच बाबतींत खरें आहे. त्या मात्रांनीं नुकसान नाहीं आणि फायदाहि नाहीं. ज्यांच्यांत रावण होण्याची पात्रता नाहीं, त्यांच्या अंगीं राम बनण्याची पात्रता तरी कशी येणार ? म्हणून मायेप्रमाणें अनिर्वचनीय पण भावरूप असा हा कॉमनवेल्थचा नवीन उपक्रम ' मायावी ' तर ठरणार नाहीं ना, असा संशय वाटल्यावांचून रहात

नाहीं. पण जवाहरलालांचा आत्मविश्वास व देशहिततत्परता देशाचें नुकसान कदापि होऊं देणार नाहीं, अशी अढळ निष्ठा दरेकाच्या मनांत आहे. हीच जवाहरलालजींची शक्ति आहे आणि आमचें 'तारकतत्त्व' आहे.

प्रा. खुशाल तकलशी (के. टी.) शहा यांनीं मोठें मुद्देसूद भाषण केलें. अर्थात् विरोधाचें. त्यांनीं विरोधाचें व्रत अगदीं निर्वैरवृत्तीनें आणि मोठ्या खेळाडूपणानें पाळलें आहे. त्यांना एकट्यांनाच जरी 'आय' किंवा 'नो' म्हणावें लागलें, तरी ते मोठ्या प्रामाणिकपणें म्हणतात आणि हंसून 'अरे, आमच्या बाजूला एक देखील मत नाहीं!' म्हणून गम्मतहि करतात. प्रा. शहांचें म्हणणें असें कीं कॉमनवेल्थपासून फायदे तर नाहींतच पण तोटे आहेत आणि धोकेहि आहेत. इंग्रज म्हणजे सौदागरांचें राष्ट्र. सौदा करण्यांत त्यांचा हातखंडा आहे. तें आपल्या बारशाला जेवलेले आहेत. 'माझें तें माझें आणि तुझें तें आपलें,' असा त्यांचा 'कॉमनवेल्थ'-(सामायिक संपत्ति)चा अर्थ आहे. आपण 'राजा' ही संस्थाच नाहींशी करूं इच्छितों. श्रीरामाच्या सूर्यवंशाच्या वंशजांचीहि आम्हीं गय केलेली नाहीं. मग कॉमनवेल्थचा उपलक्षणात्मक प्रमुख म्हणून तुम्ही राजा कां मान्य करतां, असा सवाल त्यांनीं केला.

ठरावाला समर्थनपर जीं भाषणें झालीं त्यांत पं. हृदयनाथ कुंझरू यांचें भाषण सर्वांत तर्कशुद्ध व परिणामकारक झालें. पं. बालकृष्ण शर्मा यांनीं अतिरेकी भूमिका घेतली. ते म्हणाले, 'आम्हांला समाजवादाचीं मूलतत्त्वेंच मुळीं मानण्याला घातक वाटतात. म्हणून रशियापेक्षां इंग्लंडचा संबंध आम्हांला परवडतो. अनंतशयनम् पूर्वीं विरुद्ध होते. पण आतां त्यांनीं जवाहरलालांचें तोंडभर समर्थन केलें. ते म्हणाले, आम्हांला हुकूमशाही नको, म्हणून रशिया नको; आम्हांला लोकशाही पाहिजे म्हणून इंग्रजांचा संबंध चालेल.' श्री. फ्रँक अँटनी यांचें भाषण वक्तृत्वाच्या दृष्टीनें, मांडणीच्या दृष्टीनें व भाषेच्या दृष्टीनें बरेंच चांगलें झालें. मुनशींचें भाषण कायद्याचें विवेचन करणारें झालें, त्यामुळें परिणामकारक झालें नाहीं.

दरभंग्याच्या राजेसाहेबांनीं आपलें लेखी भाषण वाचून दाखविलें. लेखी वक्तृत्वाची लहर मधून मधून कांहीं सभासदांना येते. वास्तविक येथें लेखी

भाषणांना परवानगी नाहीं. ख्रिस्ती प्रार्थना जशी समयस्फूर्त असावी लागते, तशीं येथील भाषणेंहि समयस्फूर्त असावीं लागतात. पण कोणी पाठ केलेलीं भाषणें म्हणूं लागला, तर त्याला मनाई कशी करतां येणार? त्याचप्रमाणें कोणी लेखी भाषण वाचूं लागला तर अध्यक्ष लक्षपूर्वक दुर्लक्ष करतात आणि म्हणतात, कीं नामदार सदस्यांनीं भरपूर टांचणें केलेलीं दिसतात! बिहारचे बाबू वज्रेश्वरीप्रसाद यांचा लेखी भाषणें करण्यांत हातखंडा आहे. त्यांच्या भाषणांत पूर्णविराम सहसा नसतातच. दरभंगा-महाराजांच्या भाषणांत—वाचनांत—स्वल्पविराम व अर्धविरामहि होते!

ऐतिहासिक प्रसंगीं बोलायचा मोह अनावर होतो. अध्यक्षांकडे चिठ्यांवर चिठ्या जातात. एकाच वेळीं दहा दहा, पंधरा पंधरा माणसें उभीं राहतात. अध्यक्षांच्या 'डोळ्यांत भरण्याची' धडपड दरेकाची असते. आपलें भाषण 'रिले' होणार, तें घरोघरीं ऐकलें जाणार, या कल्पनेनें लोक भारले जातात. माझ्या सारख्या बोलघेवड्या माणसाला अक्षरशः संयम करावा लागतो. कारण येथें जीं भाषणें होतात त्या बेताचीं भाषणें मला साधणारच नाहींत असें नाहीं.

आजपासून घटनेच्या कलमांचा विचार सुरू झाला. राष्ट्रसभापति पट्टाभींनीं पक्षाच्या सभेंत प्रतिज्ञा केली, कीं आकाश कोसळलें किंवा पृथ्वी गडप झाली तरी आम्ही १५ ऑगस्टपूर्वीं घटना मान्य करणार. पट्टाभि पक्षाचे अध्यक्ष आहेत. पण राजेंद्रबाबू हे घटनापरिषदेचे सनदशीर अध्यक्ष आहेत. त्यांना असा निर्धार जाहीर करतां येत नाहीं. म्हणून त्यांना फक्त आशा व्यक्त करूनच समाधान मानावें लागलें.

आतां घटनेचा जगन्नाथाचा रथ वेगानें चालू झाला आहे. बाबासाहेब आंबेडकरांची उपाध्येगिरी पुन्हां पूर्ववत् सुरू झाली आहे. मुनशी, अनंतशयनम्, टी. टी. कृष्णम्माचारी त्यांच्या दिमतीला आहेत. त्यांच्या स्पष्ट व असंदिग्ध विचारसरणीची छाप पुन्हां पडूं लागली आहे. दर पाळीला उठून उत्तरें देण्याची त्यांना आतां इतकी संवय झाली आहे, कीं जागेवरून उठतां उठतांच ते बोलायला सुरुवात करतात आणि वाक्य संपवितां संपवितां मायक्रोफोनवरून आपल्या जागीं येतात. सेकंड चेंबरच्या मुद्द्यावर त्यांच्यांत व डॉ. पट्टाभि आणि अल्लादि कृष्णस्वामी यांच्यांत बरीच मार्मिक व किंचित् गरम चर्चा झाली.

अल्पसंख्याकांच्या अधिकाराच्या बाबतींत झालेला निर्णय कित्येक मुसलमानांच्या मनांत 'सलतो.'. त्यांना राखीव जागा हव्या आहेत. आम्हांला देणार नसलां तर अस्पृश्यांनाहि देऊं नका, असा मुद्दा उपस्थित करण्याचा त्यांचा बेत दिसतो.

अजून बाहेर हिंडलों नाहीं. सकाळीं घटनापरिषद्, संध्याकाळीं पार्टी-मीटिंग, दुपारीं ऊन. बाहेर जायला मुळीं वेळच नाहीं. उन्हामुळें गुलहौशी व सुखवस्तु मंडळी 'पहाडा' वर गेली आहेत. त्यामुळें 'कनॉट प्लेस'-मध्यें मुळींच 'रौनक' नाहीं, तिथली मजा 'फिक्की' झाली आहे. उलट, 'इंडिया गेट' ला चौपाटीची शोभा आलेली आहे. संध्याकाळीं तेथें मेळाच भरतो. खलबतें करणारे मुत्सद्दी, अभिन्न मित्र, अभेद्य जोडपीं, मुलांना घेऊन निघालेल्या दाया यांच्या अस्पष्ट आकृती त्या अर्धवट अंधारांत मोठ्या रहस्यमय दिसतात! ती सारी गूढता व रहस्यमयता मोठी मनोहर वाटते!

शरणार्थी आतां इतरांनाच शरणार्थी बनविण्याचा बेत करीत आहेत! त्यांना 'शरणार्थी' हें नांव सहन होत नाहीं. ते म्हणतात आम्ही 'पुरुषार्थी' आहोंत. इतरांना 'दे माय धरणी ठाय' करण्याकडे त्यांचा कल आहे. सरकारवर त्यांचा रोष आहे. त्याचें बदनाम करण्यांत त्यांना गोडी वाटते. शरणार्थी टांगेवाले व टॅक्सीवाले तुम्हांला ऐकूं येईल इतक्या मोठ्यानें एकमेकांना म्हणतात, 'आतां ते इंग्रजांचे दिवस विसरा. आतां आपलें राज्य आहे. गरिबांना मरण्याचा हक्क प्राप्त झालेला आहे!' आम्ही टॅक्सीऐवजीं टांगा केला म्हणून आम्हांला हा टोला देण्यांत आला!

स्थायिक झालेल्या गृहस्थांची जशी एक सुप्रतिष्ठित, टिकाऊ व स्थायी स्वरूपाची संस्कृति असते, तशी पांथस्थांची एक पांथस्थ किंवा 'जंगम' संस्कृति असते. या पांथस्थ सभ्यतेचा विकास शरणार्थी करीत आहेत आणि ती गृहस्थी सभ्यतेपेक्षां कमी उदात्त व संभावित नाहीं. रस्त्यावर वावरणाऱ्यांच्या नित्य प्रवासी जीवनांतहि सौंदर्य, माधुरी व कुलीनता असूं शकते.

तुझा,

दादा

१३९, कॉन्स्टिट्यूशन हाउस,
नवी दिल्ली,
३०-५-४९

**चि. चंदूराजाला** अनेक उत्तम आशीर्वाद.

मध्यें दोन दिवस घटनापरिषदेला शनिवार-रविवारची सुटी होती.

काश्मीर हातचें जाऊं नये ही काळजी सामान्य माणसाला वाटते. 'सार्वमत' जर घेण्यांत आलें तर काश्मीरांत मुसलमानांची संख्या जास्त असल्यामुळें 'सार्वमत' पाकिस्तानला अनुकूल पडेल अशी भीति दरेकाला वाटते. म्हणून हरेकाला मनांतून अशी आशा वाटते, कीं हिंदुस्थान-सरकार कांहीं तरी निमित्त काढून 'सार्वमत' मुळीं घडूनच येऊं देणार नाहीं. या गोष्टीचा जवाहरलालजींना मनस्वी राग येतो. ते म्हणतात, अविश्वास व भीति या विकारांमुळें आमचें नीतिबल कमी झाल्याचें हें लक्षण आहे. आमचा आमच्या शक्तीवर विश्वास नाहीं, म्हणून स्वतःच्या सरकारच्या दानतीवर व इमानावरहि विश्वास बसत नाहीं, असें जवाहरलालजींचें म्हणणें. मोठीं कामें विश्वासाच्या व इमानाच्या भरंशावरच होत असतात हें कांहीं खोटें नाहीं. जेथें पराक्रम आहे तेथें जोखीम ही राहणारच !

या दृष्टीनें श्री. गोपालस्वामी अय्यंगार यांनीं केलेला खुलासा फार महत्त्वाचा आहे. काश्मीर बिनशर्त व सपशेल आमच्यांत येऊन मिळालें आहे. त्याला निघून जायचें असेल तर आम्ही आडकाठी करणार नाहीं, इतकेंच आम्हीं आश्वासन दिलेलें आहे. ज्या संघराज्यांत जें राज्य सामील झालें असेल, त्या संघराज्याच्या संमतीवांचून बाहेर पडतां येत नाहीं असा नियम असल्यामुळें हें आश्वासन दिलें आहे. जवाहरलालजींचें भाषणहि महत्त्वाचें झालें. त्यांत सत्यनिष्ठ व प्रामाणिकपणाची मुत्सद्देगिरी आहे.

काश्मीरांत शांतता स्थापन झाल्यावांचून व आपापलीं गांवें सोडून बाहेर पळून गेलेले लोक परत आल्यावांचून 'सार्वमत' अशक्य आहे असा मात्र हिंदुस्थान-सरकारचा आग्रह आहे आणि तो वाजवीहि आहे.

पाकिस्तान-सरकार आपलें सैन्य काढून घ्यायला तयार होत नाहीं. त्यामुळें लोक परत येऊं शकत नाहींत. म्हणून 'सार्वमत' किती लांबणीवर पडेल याचा नेम नाहीं. दरम्यान शेख अब्दुल्लांनीं हिंदुस्थानांतच सामील होण्याची–नव्हे, सामील झाल्याची–घोषणा पुन्हां केली आहे.

काल रविवार असल्यामुळें सकाळीं बिर्ला-मंदिरांत जाऊन आलों. रविवारीं बरेच लोक आपापल्या शिदोऱ्या आणून बिर्ला मंदिराच्या वाटिकेंत वनभोजनाला येत असतात. परत येतांना एक टांगा केला. 'टांगेवाला' मोठा नमुनेदार माणूस होता. त्याला दिल्लीचे रस्ते माहीत नाहींत. त्यामुळें अगदीं जवळच्या ठिकाणचें अव्वाच्या सव्वा भाडें मागत असे आणि लांबच्या ठिकाणचें भलतेंच कमी भाडें ठरवीत असे. कोणा तरी मुसलमान टांगेवाल्याचा घोडा भटकत होता, तो त्यानें धरून घेतला आणि दुसऱ्या एकाचा मोडका तोडका टांगा दुरुस्त करून धंदा सुरू केला. म्हणाला, 'महाराज, देवाच्या दयेनं चार माणसांचं पोट भरतों. जो देव नेतो तोच देतोहि. त्याला न्यायला हात आहेत, तसे द्यायलाहि आहेत!'

पण जवाहरलाल-सरदार यांच्यावर मात्र मोठीच इतराजी! टांगेवाला असो, टॅक्सीवाला असो, गाडीवाला असो, सरकारवर सगळे भयंकर नाराज! 'बापू असते तर आम्हांला ही दशा प्राप्त झालीच नसती! ते गेले! आतां अगदीं कुचकामाचीं सत्तालोलुप माणसें राहिलीं आहेत. त्यांना गरिबांचा कळवळा नाहीं.'

आमच्या टांगेवाल्याला टांगासुद्धां नीट जवळच्या रस्त्यानें नेण्याची अक्कल नव्हती. तो बिर्ला-मंदिरापासून गोल डाकखान्याला, गोल मार्केटला वळसा देऊन आला! पण सरदार-जवाहरांविषयीं तोंडाला येईल तें बोलायचा. तो आपला अविवाद्य हक्कच तो मानतो. तो म्हणाला, या नेहरू-पटेलांपेक्षां माझ्यांत कांहीं कमी अक्कल नाहीं. मला कां नाहीं गादीवर बसवीत?

हा शरणार्थी टांगेवाल्याचा नमुना नंबर १ झाला. असे निरनिराळे नमुने पहायला मिळतात. सुमारें एक आठवड्यापूर्वीं म्हैसाळकरांना घेऊन एक टांगेवाला येथपर्यंत आला. येथून चार पावलांवर असलेल्या बियाणींच्या घरीं जायला मात्र तो तयार होईना. मला आतां घरीं जायचें आहे. कोणी

पन्नास रुपये दिले तरी दुसरीकडे जाणार नाहीं. त्याच्या घराच्या दिशेनें जाणाऱ्या दोन माणसांना मात्र आग्रहानें फुकटांत घेऊन गेला गब्रू !

घरादारांना मुकलेल्या या धाडसी व उद्योगी लोकांमध्यें अनेक मासलेवाईक मनोवृत्तीचे खेळ दिसून येतात. एकदां आमच्याबरोबर कांहीं शरणार्थी बसस्टँडवर बसची वाट बघत होते. आमच्या समोरून बऱ्याच रिकाम्या किंवा अर्धवट रिकाम्या खासगी मोटारींची ये-जा सुरू होती. तेव्हां शरणार्थी प्रतीक्षकांपैकीं एक म्हणाला, 'हें सरकार मुळीं गरिबांचें नाहींच. यानें आपली अक्कल गमावली आहे. नाहीं तर त्यानें असा कायदा केला असता, कीं ज्या दिशेनें मोटार जात असेल त्या दिशेनें जाणाऱ्या माणसांपैकीं मावतील तेवढीं माणसें मोटारींत घेतलींच पाहिजेत !'

बिचाऱ्याची दाद सरकारकडे लागली नाहीं. पण सद्विचार फुकट जात नाहीं म्हणतात. तो वातावरणांत व्यापून आसमंतात् पसरतो. त्याप्रमाणें हाहि विचार पसरला. एक दिवस एका मोटारवाल्यानें नानाजींना अयाचित 'लिफ्ट' दिला आणि परवां बसस्टँडवर वाट बघत उभ्या असलेल्या लोकांपैकीं तिघांना दुसरा एक मोटारवाला आग्रहानें बसवून घेऊन गेला ! हें निरपेक्ष सौजन्य होतें ! हे शरणार्थी आपल्याबरोबर एक मोठ्या दिलदारीचें व अकारण आणि निरपेक्ष उपकारांचें लोणहि घेऊन आले आहेत.

याचें कारण आहे. हे शरणार्थी उद्योगी पुरुषसिंह आहेत. त्यांच्यापैकीं भीक कुणीहि मागत नाहीं. दिल्लींतील भिकारी पुरुष व बाया त्यांच्यापैकीं नाहींत. त्यांनीं नाना प्रकारचे किरकोळ धंदे शोधून पोटापुरतें मिळवावयाला सुरुवात केली. कोणापुढें तोंड किंवा पदर पसरला नाहीं. त्यांच्या उद्योगशीलतेमुळें इतरांच्या नाकीं नव आले; पण त्यांची धडाडी व पुरुषार्थवृत्ति प्रत्ययाला आली. आपल्याकडे मोठा कर्मठ ब्राह्मण जरी प्रवासाला निघाला, तरी प्रवासांत शूद्राप्रमाणें वागावें या सूत्राचा खुशाल अवलंब करतो आणि सारे नियम गुंडाळून ठेवतो. सभ्य व घरंदाज माणसेंहि प्रवासांत पुष्कळशा शिष्टाचारांना फाटा देतात ! फार मोठ्या प्रमाणावर हीच स्थिति या प्रवासी नागरिकांची झालेली आहे.

एक आणखी नमुना दाखवावासा वाटतो तुला. शनिवारीं रात्रीं ज्या टांग्यांत आलों, त्याचा घोडा मोठा चपल व 'जानदार' होता. तो टांगेवाला

म्हणाला, ' महाराज हा घोडा आमचा अन्नदाता आहे. पोशिंदा आहे ! आमच्या भाग्याचा अधिष्ठाता आहे. मी रामपूरला पळून जातांना एका हिंदु गृहस्थाला हा घोडा देऊन गेलों. स्थिरस्थावर झाल्यावर फक्त तिकीटापुरते पैसे घेऊन परत आलों. त्या गृहस्थानें माझा घोडा परत दिला. आज तोच आम्हांला रोटी देतो. लालाजी, हें राज्य माणसांचें नाहीं, तर फरिश्त्यांचें (देवदूतांचें) आहे हो ! '

आज पुन्हां सकाळीं घटनापरिषदेचें काम चालू झालें. प्रांताचा गव्हर्नर निवडलेला असावा कीं नेमलेला असावा, हा वादाचा मुद्दा होता. या बाबतींत बराच तीव्र मतभेद आहे. जवाहरलालांना व इतर बऱ्याच लोकांना असें वाटतें कीं तो नेमलेलाच असावा. आंबेडकरांना व उडीसा आणि आसाम या प्रांतांतील सदस्यांना वाटतें, कीं तो लोकनियुक्त किंवा लोकसभेनें दिलेल्या पॅनेलमधून नेमलेला असावा. दोन्ही पक्षांनीं आपापले मुद्दे मोठ्या कुशलतेनें व आवेशानें मांडले. पण शेवटीं पक्षाचें बहुमत नेमणुकीच्या बाजूला पडलें. घटनापरिषदेंत या मुद्द्यावर डॉ. पंजाबराव देशमुखांचें भाषण चांगलें झालें. गव्हर्नर कां नको यांचें मोठें मुद्देसूद विवेचन त्यांनीं केलें.

श्री. लक्ष्मीनारायण साहू यांनीं अशी उपसूचना मांडली, कीं सर्व प्रांतांतील व्यक्तींना गव्हर्नर होण्याची संधि देण्यांत यावी. या संधीचा मोठ्या शिताफीनें फायदा घेऊन डॉ० पंजाबरावांनीं आपल्या वकिली कौशल्यानें प्रांतीय स्वायत्ततेवर मोठा जोरदार हल्ला चढविला ! फेडरल पद्धति कां नको, युनिटरीच कां पाहिजे, याचें त्यांनीं मोठें सोपपत्तिक व तर्कशुद्ध विवेचन केलें. तें भाषण इतकें परिणामकारक झालें, कीं अध्यक्षांनीं तें अप्रस्तुत असल्याचें भान बऱ्याच उशिरा झालें.

या देशांत संघराज्याऐवजीं एकराज्यपद्धतीचा अवलंब करावा असा एक ठराव पंजाबरावांनीं पाठविला होता, तो स्टियरिंग कमिटीनें नामंजूर केला. म्हणून पंजाबरावांनीं आपलीं मतें मांडण्याची ही संधि मोठ्या खुबीनें साधून घेतली. त्यांना समर्थनपर भाषण करण्याचा मोह मला अनावर झाला. पण अध्यक्षांनीं आतां आपण विषयांतराला परवानगी देणार नाहीं असें निक्षून सांगितलें.

पंजाबरावांच्या भाषणांतील भाषावारीच्या भागाखेरीज एक एक वाक्य मला मान्य होतें. त्यांनीं जातां जातां भाषावार प्रांत कितीहि लांबणीवर पडले तरी करावेच लागणार, असें विधान केलें आणि हळूच मुंबईचा उल्लेख करून मुनशींना बारीकसा चिमटाहि घेतला. भाषावारीमुळें पुढारीपणाला सीमा उरणार नाहीं, म्हणून भाषावार प्रांतरचना होण्याच्या आधींच प्रांताचे सारे अधिकार काढून घ्या असा त्यांचा कोटीक्रम होता. संस्थानांना तर स्वायत्तता मुळींच देतां कामा नये. येथील पुढारी गोंधळ माजवितील, असें त्यांचें ठाम मत आहे.

भाषावर प्रांत व्हायचेच असतील तर प्रांतांना जिल्ह्यांचेंच स्वरूप आलेलें बरें, असें मलाहि वाटतें. पण आतां तें कोण ऐकणार ? नेहरू पटेल किंवा आंबेडकर यांना पटलें तरच तें शक्य आहे. आंबेडकर म्हणाले, आतां आम्ही इतके पुढें गेलों आहोंत कीं आतां परतणें शक्य नाहीं.

काल अर्धवट राहिलेली चर्चा आज पुढें चालू झाली. उडीसा व आसाम या दोन प्रांतांचे प्रतिनिधी गव्हर्नराच्या नेमणुकीच्या तत्त्वाच्या विरुद्ध होते. उडीसाचे माजी पंतप्रधान श्री. विश्वनाथ दास यांनीं जरी आपल्या नेहमींच्या पद्धतीनें थबकत थबकत व रेंगाळत रेंगाळत भाषण केलें, तरी नेमणुकीच्या विरुद्ध चांगले मुद्दे मांडले. त्यांच्या आक्षेपाचा थोडक्यांत आशय असा होता कीं गव्हर्नर जर राष्ट्रपतींनीं हिंद-सरकारच्या प्रधानमंत्र्याच्या संमतीनें नेमला, तर घोटाळे कमी न होतां उलट वाढतील. मध्यवर्ती सरकारांत जो गट सत्ताधिष्ठित असेल तोच पक्ष किंवा गट जर प्रांतांत नसला, तर गव्हर्नर एका पक्षाचा आणि प्रांताचा पंतप्रधान निराळ्या पक्षाचा असा विरोध निर्माण होईल आणि जे खटके तुम्ही टाळूं इच्छितां ते पदोपदीं उडतील.

श्री. विश्वनाथ दासांच्या मुद्द्यांना श्री. मुनशींनीं बरींच समर्पक उत्तरें दिलीं. गव्हर्नर जर त्याच प्रांताचा व त्याच पक्षाचा असला, तर जास्त भानगडी उपस्थित होण्याचा संभव कसा आहे याचें त्यांनीं मोठें मुद्देसूद विवेचन केलें.

जवाहरलालजींनीं ' नेमणुकी 'च्या तत्त्वाचें समर्थन करणारें भाषण केलें.

मुनशींप्रमाणेंच त्यांनींहि ह्या मुद्द्यावर जोर दिला, कीं गव्हर्नर हा प्रांतीय मंत्रिमंडळाच्या पक्षाचा नसावा किंवा त्याच्या विरुद्ध पक्षाचाहि नसावा. तो तटस्थ व पक्षातीत असावा. लोकशाहीच्या तत्त्वाचा उल्लेख करून त्यांनीं असें प्रमेय मांडलें, कीं नेमणुकीच्या पद्धतीनें लोकनियुक्त सरकारचा कारभार जास्त सुरळीत चालेल म्हणून ही नवीन सुधारणा लोकशाहीला पोषकच ठरेल.

आसामचे माजी पंतप्रधान श्री. मुहम्मद सादुल्ला यांनीं श्री. मुनशी व पं. जवाहरलाल यांच्या विरुद्ध नेहमींप्रमाणें मोठें चतुर भाषण केलें. त्यांत त्यांचें भाषापटुत्व व तर्ककौशल्य प्रकट झालें होतें. त्यांच्या भाषणांतील या गुणांचा गौरवपूर्ण उल्लेख करून त्यांना श्री. टी. टी. कृष्णम्माचारी यांनीं उत्तर दिलें.

आसामच्या व उडीसाच्या सदस्यांप्रमाणें डॉ. आंबेडकरांचें मतहि निवडलेल्या गव्हर्नराच्या पक्षाचें होतें. त्यांनीं आपलें मत मोठ्या जोरकस व कळकळीच्या भाषणांत कॉंग्रेसपक्षाच्या सभेंत मांडलेंहि होतें. तरीपण चर्चेला उत्तर देतांना त्यांनीं नेहमींप्रमाणें मोठें असंदिग्ध भाषण केलें. ते म्हणाले मुख्य प्रश्न निवडलेला गव्हर्नर असावा कीं नेमलेला हा नसून मुद्द्याचा सवाल गव्हर्नर नुसता नामधारी सत्ताधीश राहील कीं त्यांच्या हातांत कांहीं वास्तविक सत्ता राहील हा आहे. जर तो नुसता नामधारी राहणार असेल, तर तो निवडलेला असला काय किंवा नेमलेला असला काय, त्याचें फारसें महत्त्व नाहीं.

एका गोष्टीचा मात्र त्यांनीं खुलासा केला. गव्हर्नर लोकनियुक्त असला तर भानगडी होतील ही गोष्ट त्यांना पटत नाहीं. कारण, “ पंतप्रधान हा एका विशिष्ट राजकीय धोरणाकरितां निवडला जाईल आणि गव्हर्नर कुठल्याहि पक्षाचा असल्यामुळें किंवा विशिष्ट धोरणामुळें निवडला जाणार नसून तो स्वतःच्या व्यक्तित्वामुळें व प्रतिष्ठेमुळें निवडला जाणार आहे. म्हणून निवडलेला गव्हर्नर असायला हरकत राहूं नये. पण जर त्याला कांहीं भरीव अधिकार राहणार नसतील, तर निवडणुकीचा प्रचंड खटाटोप करा कशाला ! ”

शेवटीं नेमणुकीचें तत्त्वच मान्य झालें. श्री. विश्वनाथदास, मुहम्मद सादुल्ला व शेवटीं श्री. बी. के. दास यांनीं पक्षाच्या बंधनाचा उल्लेख केला. " येथें कोणी कोणच्याच पक्षाचा नाहीं, " असें अध्यक्षांनीं दोनदां सांगितलें. शेवटीं ते अंमळ त्वेषानें म्हणाले, " कोणी जर पक्षाला बांधला गेला असेल, तर तो ज्याच्या त्याच्या मर्जीचा व खुषीचा प्रश्न आहे. तेथें त्याचा संबंध आहे. येथें त्याचा संबंध नाहीं. येथें दरेक सभासद स्वतंत्र आहे. आपल्या मताचा परिणाम भोगण्याची ज्याची तयारी नसेल, त्यानें येथें बसण्याचें कारण नाहीं. "

आसाम व उडीसा या प्रांतांतील सदस्यांच्या मनांत एक शल्य आहे. त्यांच्या प्रांतांतील माणसांना कुठेंहि संधि मिळत नाहीं. इतर प्रांतांचे लोक त्यांच्या प्रांतांत गव्हर्नर म्हणून जातात. पण त्यांच्या प्रांतांतील माणसाला मध्यवर्ती मंत्रिमंडळांत, गव्हर्नर म्हणून किंवा इतर कोणत्याहि महत्त्वाच्या पदावर जाण्याची संधि नाहीं. त्यामुळें त्यांचीं मनें प्रक्षुब्ध झालेलीं आहेत.

सिध्वा जेव्हां म्हणाले, कीं गव्हर्नराच्या पदावर नेमलेलीं माणसें 'चारित्र्यवान्' आहेत, तेव्हां आसाम व उडीसा या प्रांतांचे कांहीं सभासद चवताळून उद्गारले, आमच्या चिमुकल्या प्रांतांत चारित्र्यवान् माणसें औषधालाहि नाहींत का हो? त्यांच्या उद्गारांत, आवाजांत व मुद्रेंत त्यांचा रुसवा व संताप स्पष्ट उमटलेला दिसत होता.

संप्रदायवाद व जातीयवाद अजून धुळीस मिळण्याचीं चिन्हें दिसत नाहींत. उलट, प्रांतवादाच्या अक्राळ-विक्राळ दाढा मात्र दिसूं लागल्या आहेत. वेदांत एक वाक्य आहे : 'इन्द्रो मायाभिः पुरुरूप ईयते.' इन्द्र मायेचा आश्रय करून नानाविध रूपें घेतो. 'इन्द्र' म्हणजे सत्ताधीश. सत्तेची अभिलाषा अनेकविध मायावी रूपें घेऊन गोंधळ घालते. प्रत्येक महत्त्वाच्या कलमाच्या बाबतींत प्रांतवादाचें हें पिशाच्च आपलें डोकें वर काढतें. पण अजून डॉ. पंजाबरावांचा ठराव मान्य करण्याची हिम्मत मात्र होत नाहीं. ही सद्बुद्धि केव्हां सुचेल तें देवच जाणे. प्रांतीय स्वायत्ततेकडून मध्यवर्ती सत्तेकडे पाऊल पडत आहे, ही त्यांतल्या त्यांत समाधानाची गोष्ट आहे.

एकेकट्या व्यक्तीचा सत्तावाद दुर्गुण समजला जातो; पण तोच जेव्हां समुदायाचें किंवा प्रादेशिकतेचें पांघरूण घेऊन येतो तेव्हां तो सद्गुणांत मोडूं लागतो. आज प्रांतीय स्वायत्ततेच्या नांवाखालीं प्रांतीय सत्तावाद धुडगूस घालूं पाहत आहे.

तुझा,

दादा

— ३३ —

१३९, कॉन्स्टिटयूशन हाउस,
नवी दिल्ली,
३–७–४९

चि० चंदूराजाला अनेक उत्तम आशीर्वाद.

दिल्ली हें ' इंद्रवृत्ती 'चें क्रीडास्थळ झालें असल्यामुळें यंदा तिच्यावर भगवान् इंद्राची बरीच मेहेर नजर झालेली दिसते. मुंबईच्या रस्त्यांवर गुडघा गुडघा पाणी झाल्याचें आपण वर्तमानपत्रांत अनेकदां वाचतों. पण दिल्लीच्या रस्त्यांचे कालवे झाल्याचें क्वचितच कोणी वाचलें असेल. यंदा मात्र कनॉट सर्कसजवळील मिंटो रोडवरल्या ओव्हरब्रिजखालीं इतकें पाणी झालें कीं दोन ' तगडीं ' माणसें वाहून गेलीं म्हणतात. आणि मदनच्या अतिशयोक्तिपूर्ण भाषेंत तर एक मोटर लॉरी संपूर्ण बुडून गेली होती. कनॉट प्लेसच्या आंतल्या भागांत पार्कचें तळें झालें होतें. वरुणदेवतेच्या कृपेचा असा अतिरेक दिल्लीनें कित्येक वर्षांत पाहिलेला नव्हता.

घटनापरिषदेचें काम ता. ३० जुलैला सकाळीं ८ वाजतां सुरू झालें. पहिल्याच दिवशीं वादाला रंग चढेल असें वाटलें नव्हतें. पण द्वितीय सभागृहाच्या मुद्द्यावर बरीच चांगली चर्चा झाली. या बाबतींत निर्णय करण्याचें भावी पार्लमेंटवर सोंपवावें अशी सूचना आंबेडकर कमिटी (मसुदासमिती)-नें

केली होती. घटनेंत अवांतर अनावश्यक तपशिलांचा समावेश करणाऱ्या कमिटीनें एवढ्या महत्त्वाच्या बाबतींत मात्र निर्णय करण्याचें टाळावें याबद्दल बरीच कडक टीका अनेक सदस्यांनीं केली. पण मसुदासमितीवर त्या टीकेचा परिणाम होण्याचें लक्षण दिसेना. शेवटीं अध्यक्ष राजेंद्रबाबू यांनीं घटनासमितीच्या 'अनिर्णयाबद्दल' खेद व्यक्त करून तें कलम पुनर्विचाराकरितां त्या समितीकडे पाठवावें अशी सूचना केली. अध्यक्षांच्या खंबीरपणामुळें पहिल्याच दिवशीं परिषदेंतील 'नाठाळ' गटाचा विजय झाला आणि सारें सभागृह टेबलावरील थयथयाटानें दुमदुमलें.

या नाठाळ गटाचे बिनीवरले शिलेदार 'यतिराज', शिब्बनलाल सक्सेना, महावीर त्यागी व रुस्तमकाका सिध्वा हे आहेत. बिहारचे 'हुकूमशाहीवादी' सभासद ब्रजेश्वर यांची आतां या मंडळींत भर पडली आहे. हीं सारींच माणसें व्यासंगी, चिकाटीचीं व परिश्रमी आहेत. यतिराजांमध्यें प्रतिभेची खास 'चमक' आहे. अर्थपूर्ण व सूचक 'शब्दप्रयोग' तयार करण्याची त्यांची हातोटी विलक्षण आहे. इंग्रजी भाषेवर त्यांचें प्रभुत्व दांडगें आहे. इतर भाषांतहि गमतीचे व मार्मिक शब्द बनविण्यांत ते पटाईत आहेत. आमच्या घटनापरिषदेचे एक पन्नाशी उलटलेले सभासद जेव्हां या वयांत 'चतुर्भुज' झाले, तेव्हां यतिराजांनीं 'बालकृष्णाचा आतां गोपीकृष्ण झाला,' या एका मार्मिक वाक्यांत जें कांहीं म्हणतां येण्यासारखें होतें तें सारें म्हणून टाकलें. संक्षेप हा प्रतिभेचा आत्मा आहे. या म्हणीप्रमाणें यतिराज क्वचितच वागतात. पण त्यांच्या सूचक शब्दप्रयोगांत मात्र ती सार्थ झालेली दिसते! बाहेरून सकृद्दर्शनी लहरी व तऱ्हेवाईक दिसणाऱ्या या 'स्वारी'च्या 'अंतरीं नाना कळा' आहेत. निरलस उद्योगप्रियता, तीव्रता आणि कार्यदक्षता हे गुण त्यांच्या त्या विचित्र वेषाखालीं दडलेले आहेत.

डॉ. पंजाबरावहि अलीकडे चर्चेंत बराच भाग घेतात. मला वाटतें, आंबेडकरांच्या खालोखाल विवेचनाची स्पष्टता त्यांच्याच भाषणांत असते. आंबेडकरांच्या प्रतिपादनांत विदग्धता व वैभव अधिक असतें, तर पंजाबरावांचें प्रतिपादन सुबोध असतें आणि त्यांची भाषा सोपी व व्याकरणशुद्ध असते. एखाद्या कुशल वकिलाप्रमाणें ते आपले मुद्दे थोडक्यांत सडेतोड-

पणानें, स्पष्टपणानें व सोप्या, शुद्ध भाषेंत मांडतात. पार्लमेंटरी वक्तृत्वांत या गुणांचें महत्त्व कांहीं कमी नाहीं. प्रतिराजांच्या भाषणांत जोम, आवेश, भाषेची करामत आणि हातवारे त्यांचें अनावश्यक आधिक्य असतें. त्या मानानें पंजाबरावांचें सर्वच माफक व बेताचें असतें. पण आपले मुद्दे मांडण्याचें त्यांचें कौशल्य अधिक तर्कसंगत वाटतें. 'द्वितीय सभागृह' व राष्ट्रपतीचे विशेषाधिकार या मुद्द्यांवरील त्यांचीं भाषणें या दृष्टीनें नमुनेदार होतीं.

परवां दिल्ली प्रांताला स्वायत्तता देण्याच्या मुद्द्यावर बरीच मनोरंजक चर्चा झाली. दिल्ली हें भारताचें 'पाटनगर' असल्यामुळें तें कुठल्याच प्रदेशाचें किंवा प्रान्ताचें नाहीं. दिल्ली भारताची आहे आणि भारत दिल्लीचा आहे. ती अखिल भारताची 'राष्ट्रपुरी' आहे. हा अद्वितीय गौरव दिल्लीला प्राप्त झालेला आहे; तरी पण दिल्लींत राहणारांना आपल्या 'घरकुलांत' स्वायत्तता हवी आहे. आपापल्या 'चुल्हाचौक्या' पुरतें पाहाण्याची आमची संवय दुर्निवार्य आहे खरी ! दिल्लीचें हें वैभव परिमित करण्याचा प्रयत्न 'दिल्लीकर' नागरिक करीत आहेत. दिल्लींत फक्त अखिल भारताचा नागरिकच जन्माला यावा हे दिव्य डोहाळे त्या नगरीच्या औरस पुत्रांना केव्हां होतील ते होवोत ! काशीला स्थानिक स्वराज्य होतें. त्या नगरीचा कालभैरव कोतवाल होता. तशीच स्वायत्तता दिल्लीला असायला हरकत नाहीं. पण दिल्लीचा एक स्वतंत्र प्रान्त बनविण्याचा प्रयत्न कितपत योग्य आहे हा प्रश्नच आहे !

दिल्लीला प्रांतिक स्वायत्तता कां द्यावी याचें प्रतिपादन दिल्लीचे प्रतिनिधि लाला देशबंधु गुप्त यांनीं मोठ्या अभिनिवेशानें केलें. ठाकुरदास भार्गव यांनीं त्यांचें समर्थन करतांना दिल्ली पूर्व पंजाबांत विलीन करून टाकावी असें सुचविलें. श्री. मोहनलाल गौतम हे आन्तरराष्ट्रीय पार्लमेंटरी परिषदेला जाणार आहेत. त्यांनीं आपलें पहिलें भाषण याच ठरावावर केलें. "युक्त प्रांताला राज्यतृष्णा नाहीं. तें सर्वांचें 'मायपोट' आहे. ज्यांना इतर कोठें थारा नसेल त्यांचें तो स्वागत करतो. दिल्लीच्या बाबतींतहि युक्त प्रान्ताची अशीच निरपेक्ष वृत्ति आहे. दिल्लीचा पूर्व पंजाबांत समावेश करावा हेंच सर्व दृष्टींनीं प्रशस्त आहे." अशा आशयाचें भाषण त्यांनीं

केलें. वाटल्यास नवी दिल्ली स्वतंत्र करून ' पुरानी देहली ' व इतर गावें पूर्व पंजाबांत घालावीं असा पर्यायहि त्यांनीं सुचविला.

' सर्वांना स्वतःपुरतें स्वराज्य आहे, तर आम्हांलाच तेवढी स्वतःची चूल कां नको ? आम्हीच तेवढें सार्वजनिक भटारखान्यांत रोज काय म्हणून जेवावें ? ' अशी दिल्लीकरांची तक्रार आहे. त्यांना पाटनगरीचें वैभव व मानहि पाहिजे आणि इतरांना मिळणारें स्वतःपुरतें ' प्रपंचसुख 'हि पाहिजे. व्यापकता व विशिष्टता यांचा समन्वय करून एकादी योजना पार्लमेंटकडून मान्य करवून घेण्याचें आश्वासन पंतप्रधान व सभागृहाचे नेते पं. जवाहरलाल यांनीं दिलें व लाला देशबंधूंचें समाधान झालें.

प्रो. शहा या तीन-चार दिवसांत एकदाच बोलले. श्री. ताजमल हुसेन यांच्या भाषणांत अभिनयाचा अतिरेक असतो. त्यांचें सारें अंग-प्रत्यंग बोलतें जणुं कांहीं. आमच्या घटनापरिषदेंत कांहीं नमुने मोठे मासलेवाईक आहेत.

शेठ गोविंददासांच्या अंगांत राष्ट्रभाषा हिंदीचा 'संचार' झालेला आहे. ते सतत सह्या गोळा करीत हिंडत असतात. त्यांच्या उत्साहाच्या अतिरेकामुळें दक्षिणभारतीयांचा विरोध जास्त प्रखर होण्याचा संभव आहे. कमींत कमी पंधरा वर्षें तरी इंग्रजीला राष्ट्रभाषेच्या बरोबरीचें स्थान मिळावें अशी त्यांची मागणी दिसते. इकडे पंजाबांत हिन्दीच्या विरुद्ध गुरुमुखी उभी आहेच.

राष्ट्रपतीच्या विशेषाधिकारांवर तब्बल पांच तास चर्चा झाली ! यतिराजांचें मोठें आवेशयुक्त व कडक भाषण झालें. डॉ. पंजाबरावांनीं मोठा सडेतोड समर्पक युक्तिवाद केला. पं. कुंझरूंनीं व टी. टी. कृष्णम्माचारींनीं एकमेकांविरुद्ध शास्त्रार्थ केला. एकंदरींत वादविवाद मोठा उद्बोधक झाला. ब्रजेश्वरीप्रसाद यांनीं नेहमींप्रमाणें लोकशाहीच्या विरुद्ध व्याख्यान देण्यासाठीं या संधीचा फायदा घेतला.

' खासगी संपत्तीच्या पवित्रतेविषयीं व सुरक्षिततेविषयीं लोकांना खात्री वाटवी आणि लोकहिताकरितां मालमत्ता फारसा मोबदला दिल्यावांचून घेतांहि यावी, हा प्रश्न बराच भानगडीचा आणि गुंतागुंतीचा होऊन बसला आहे. हा मुद्दा दिसतो तितका सोपा नाहीं. वाटेल तेव्हां मोबदल्यावांचून ' सम्पत्ति '

घेण्याचा अधिकार जर सरकारला दिला, तर लोकांना सम्पत्तीबद्दल खात्री व शाश्वति वाटणार नाहीं आणि कोणी उत्पादन किंवा उद्योगधंद्यांत भांडवल अगर श्रम घालण्यास धजणार नाहीं. उलटपक्षीं, सामाजिक पुनर्रचनेकरितां संपत्ति थोड्याशा मोबदल्यानें घेतां आली नाहीं, तर कुठलीहि मोठी योजना तडीस जाण्याचा संभव दिसत नाहीं. असा हा पेंच आहे. त्यांतून मार्ग कसा काढावा याचा विचार करण्यांत घटना-परिषदेंतील पंडितांची सारी बुद्धिमत्ता खर्ची पडणार आहे. सर रॉजर डी. कॉवारल्हीप्रमाणें डॉ. पंजाबराव व इतर मित्रहि म्हणतात कीं दोन्ही बाजूंच्या म्हणण्यांत बरेंच तथ्य आहे. मोबदल्याची बाब चुटकीसरशी उडवून देण्यांत त्यांना धोका वाटतो. पण 'मोबदल्या'चा बाऊ केला, तर मालगुजारी व जमीनदारी नष्ट करण्याची आशाच नको ! ज्या प्रांतिक सरकारांना जमीनदारी-मालगुजारी पद्धतीचा अंत करायचा आहे त्यांना मोबदल्याचा मुद्दा नडतो !

घटनापरिषदेंत दोनच जोडपीं आहेत आणि तीं देशविख्यात आहेत. दादा कृपलानी व सुचेतादेवी थोड्या वेळाकारितां घटनापरिषदेंत येऊन जातात. त्यांचा इतर कामांचा व्याप इतका मोठा आहे, कीं 'फक्त हजर रहाण्या'च्या निष्क्रिय कर्तव्याला प्राधान्य देतां येणें त्यांना शक्य नाहीं. डॉ. जीवराज मेहता आणि हंसाबाई मात्र अगदीं नियमितपणें अथपासून इतिपर्यंत हजर राहतात; पण त्यांच्यापैकीं कोणीहि तोंड उघडीत नाहीं.

हा मजकूर लिहीत असतांना सहज एका गोष्टीचें स्मरण झालें. परवां एक सुविद्य पदवीधर तरुणी भेटायला आली होती. "विद्यार्जन संपलें; वरसंशोधन सुरू झालें काय?" मीं सहज गमतीनें विचारलें. बोलणें चालू झालें. चर्चेमध्यें एक मुद्दा असा आला, कीं अलीकडे तरुण मुली मध्यम वयाच्या प्रौढांशीं फार लग्नें करूं लागल्या आहेत, हें कितपत इष्ट आहे. कांहीं वर्षांपूर्वीं आपल्या महाराष्ट्रांत 'सुशिक्षित द्वितीये'च्या प्रश्नाला मोठें प्रामुख्य प्राप्त झालें होतें. अनेक सुशिक्षित तरुणींनीं पहिलें कुटुंब जिवंत असलेल्या पुरुषांशीं लग्न केलें होतें. ती एक सांथच आली होती. अलीकडे 'जरठानुरक्त' तरुण पोरी बऱ्याच आढळतात. परवां

आलेली मुलगी म्हणाली, " आमच्याकडून फारशी अपेक्षा न राखणारा, आमचे कोड पुरविणारा आणि वडील माणसाप्रमाणें आमची काळजी वाहून संभाळ करणारा ' पालक भ्रतार ' मिळाला, तर तो बरोबरीच्या प्रियकरापेक्षां अधिक परवडण्यासारखा नाहीं काय ?" मी अगदीं थिजलों ! तारुण्याचा जीवनदायी झरा कोणा तरी नतद्रष्टाच्या पापी दृष्टीनें शुष्क होत आहे असा भास मला झाला !

आमच्या लहानपणीं ' शारदा ' नाटक पाहत असतांना कांचनभटानें शारदा भुजंगनाथाला देण्याची गोष्ट काढली, कीं आमच्या संतापाला सीमा राहत नसे ! शारदा जेव्हां ' वयीं आजोबा माझे दिसतां ' म्हणत असे, तेव्हां आम्हांला गुदगुल्या होत ! पण आतां मात्र खरोखरच ' जन खुळावले, सकल उलट चाललें ! ' ही तक्रार खरी वाटते. तारुण्य-सुलभ स्वाभाविक व स्वास्थ्ययुक्त कामाचें स्थान विकृत व रोगट वासना बळकावीत आहे, असें मला स्पष्ट दिसतें. तारुण्यांतील इन्द्रियांतील वेग जोमदार व निर्मळ असतात. एखाद्या डोंगरी झऱ्याप्रमाणें त्याचें पाणी गढूळ झालें तरी नित्य वाहणारें असल्यामुळें तें डबक्यांच्या पाण्यासारखें अपथ्य-कर नसतें. म्हातारपणीं वेग क्षीण व मन्द झालेला असतो. तारुण्याचा डौल आणला, तरी तो पुष्कळदां कृत्रिम व पोकळ असतो. अनेकदां तो उसनाहि असतो.

तारुण्याचा आव आणणाऱ्या म्हाताऱ्या माणसासारखी अभद्र व अदर्शनीय वस्तु दुसरी नाहीं. कांहीं दिवसांपूर्वीं नागपूरला जुन्या तालीम-बाज लोकांच्या एका अड्डयावर जाण्याचा योग आला. पांसष्टीच्या घरांत गेलेले एक गृहस्थ तावातावानें म्हणाले, " काय अलीकडलीं मरतुकडीं तरुण पोरें आहेत ! पिचलेलीं, खप्पड, म्हाताऱ्याहून म्हातारीं दिसतात. मला तर आजहि कुणीं म्हातारें म्हटलें तर राग येतो. " मीं त्यांना म्हटलें, " म्हातारा, बुढ्ढा किंवा पोक्त म्हटल्याबद्दल ज्याला राग येतो त्याला वार्धक्य आलें आहें हें निश्चित समजावें. म्हातारपणाचें हें पहिलें लक्षण आहे. " गृहस्थांनीं माझ्यावर डोळे वटारले. अर्थात् माझा मुद्दा त्यांच्या वर्मी लागला. वृद्धापकाळींहि वृद्धत्वाची जाणीव किंवा भावना उत्पन्न न होणें हें मोठें भाग्य आहे. तारुण्यांतील तरतरी, उत्साह व

साजुकपणा साठी उलटल्यानंतरहि कायम रहावा, सगळ्या अवयवांची कार्यशक्ति पूर्ववत् अविकल रहावी असा दरेकाचा प्रयत्नहि असावा आणि इच्छाहि असावी. पण तारुण्यांतील भोगवासना व विकारहि आजन्म टिकावेत ही इच्छा माणसाच्या सांस्कृतिक विकासाला पोषक आहे असें कोण म्हणेल ? या वृत्तीला मी ययाति-वृत्ति म्हणत असतों. स्वतःच्या मुलाचें तारुण्य उसनें घेऊनहि ययातीला ' न जातु कामः कामानां उपभोगेन शाम्यति ' असाच प्रत्यय आला. स्थविरावस्थेंतहि बाशिंग बांधण्याची हौस ' कुलीनते 'ची द्योतक नाहीं इतकेंच म्हणावेंसें वाटतें.

हा ' कुलीनता ' शब्द मीं विचारपूर्वक वापरलेला आहे. कुलीन म्हणजे कुलामध्यें राहण्यास योग्य; कुटुंबाला उचित अशा भावना व संस्कार ज्याच्या अंगीं विकसित झालेले आहेत तो. येथें मुद्दा शारीरिक भोगक्षमतेचा नाहीं; मानसिक विकासाचा आहे. माणसानें शरीर किती कमावलें याच्यापेक्षां त्यानें वृत्ति किती कमावली हें सांस्कृतिक दृष्ट्या अधिक महत्त्वाचें आहे. दरेक तरुणी ही माझी संभाव्य पत्नी आहे अशी ज्याची मनोवृत्ति असेल त्या वृद्धाला पितृत्वाची व शिक्षकत्वाची स्वाभाविक ' मनोभूमिका ' प्राप्त होण्याची कधींहि आशाच नको. म्हणून उतारवयांतील मनोविकार सळसळणाऱ्या तारुण्यांतील विकारांपेक्षां अपथ्यकर, कुजट व खवट असण्याचाच संभव अधिक. आणि अशा विकारप्रधान अथवा विकारयुक्त व्यक्तीविषयीं जिला आकर्षण अथवा प्रेम वाटत असेल, त्या मुलीच्या भावना प्राकृत म्हणाव्या की विकृत ? त्यांना संस्कृत म्हणण्याची तर सोयच नाहीं.

माझ्या म्हणण्यांतील मुद्दा ध्यानांत आला असेल. एखाद्या वयोवृद्धाच्या गुणामुळें किंवा रूपामुळें त्याच्याविषयीं प्रेम वाटलें आणि तिनें त्याच्याशीं लग्न केलें तर तें उदाहरण अपवादात्मक मानावें लागेल. पण सामान्यतः तरुण मुलीनें वयस्कर पुरुषाशीं लग्न करण्याची इच्छा करणें हा सामान्य नियम किंवा प्रशस्त पक्ष मानला जाणार नाहीं. जिच्या भावना व आवेग तारुण्योचित आहेत, तिला आपल्याला अनुरूप व अनुगुण अशा तरुणाचीच संगत आवडावी हेंच अधिक स्वाभाविक आहे आणि सांस्कृतिक विकासाला अधिक पोषक आहे. हा प्रश्न फक्त शारीरिक नाहीं. हा प्रश्न सांस्कृतिक

उत्कर्षापकर्षाचा आहे. मातृत्वाच्या, पितृत्वाच्या व कौटुंबिकतेच्या विकासाचा आहे. स्त्री-पुरुषांचा सामाजिक संबंध शारीरिकतेच्या भूमिकेवरून समान-नागरिकत्वाच्या व सह-नागरिकत्वाच्या उन्नत भूमिकेवर प्रस्थापित करणें हा विवाहसंस्थेचा उद्देश असला पाहिजे. या दृष्टीनें अलीकडे बळावूं लागलेली ही विकृत मनोवृत्ति सांस्कृतिक ऱ्हासाला कारणीभूत होईल अशी भीति मला वाटते !

या प्रश्नाची शास्त्रीय व सांगोपांग मीमांसा करायच्या हेतूनें हें लिहिलें नाहीं. ओघाला आलें म्हणून जसें सुचलें तसें लिहिलें आहे. माझा आशय तुझ्या लक्षांत आला म्हणजे झालें.

दिल्लीची हवा या वेळीं हवी तशी स्वास्थ्यकर नाहीं. मधून मधून पावसाच्या सरी येतात. पाऊस नसला म्हणजे मनस्वी उकडतें.

सोमवार ता. ११८ पासून घटनापरिषद ९ ते १ असते आणि तिसऱ्या प्रहरानंतर पार्टीमीटिंगहि दररोज असते. आर्थिकसंविभाग, नागरिकत्व इ० महत्त्वाच्या विषयांचा विचार व्हायचा असल्यामुळें पार्टीमीटिंगमधील चर्चा फार महत्त्वाची आणि उद्‌बोधक असते. जवाहरलालजी, आंबेडकर, अल्लादी, गोविंद वल्लभ पंत, बी. नरसिंहराव इ० सर्वच रथीमहारथी चर्चेंत भाग घेतात. सर्वांचींच भाषणें विचार-प्रवर्तक होतात. मुद्द्यांचें अधिकार-युक्त स्पष्टीकरण अर्थातच आंबेडकर करतात. त्यांचें भाषण ऐकल्यावांचून सभेला समाधान होत नाहीं. कळावें.

तुझा,

दादा

१३९, कॉन्स्टिटयूशन हाउस,
नवी दिल्ली,
१०-८-४९

चि. चंदूराजाला अनेक उत्तम आशीर्वाद

मागल्या शुक्रवारीं घटनापरिषदेंत २५३ कलम चर्चेकरितां आलें. या कलमान्वयें मिठावर कर लावण्याची मनाई करण्यांत आली होती. श्री. महावीर त्यागी यांनीं अशी उपसूचना मांडली, कीं हें कलम काढून टाकण्यांत यावें. या उपसूचनेवर बरींच अनुकूल-प्रतिकूल भाषणें झालीं. मत्स्य यूनियनचे श्री. राजबहादुर यांनीं मिठावरील कराला विरोध करण्याकरितां गांधीजींनीं केलेल्या ऐतिहासिक चळवळीचा उल्लेख केला. गांधीजींच्या अकरा मागण्यांपैकीं मिठावरील कर रद्द करण्यांत यावा ही एक मागणी होती हें सर्वविदितच आहे. श्री. राजबहादुर यांनीं ज्या भावना व्यक्त केल्या त्यांचे पडसाद सबंध सभागृहांत उमटले.

पण मसुदासमितीचे अध्यक्ष डॉ. आंबेडकर यांनीं श्री. महावीर त्यागींची उपसूचना स्वीकारून घेतली. तेव्हां मोठी विचित्र परिस्थिति निर्माण झाली ! मसुदासमितीचें मत म्हणजे काँग्रेस पक्षाचें मत ! ही परिस्थिति उत्पन्न होतांच घटनापरिषदेचे अध्यक्ष राजेंद्रबाबू यांच्या कणखर स्वतंत्र वृत्तीचा पुन्हां प्रत्यय आला. त्यांनीं मोठ्या आवेशयुक्त भाषेंत मिठावरील कराविरुद्ध राष्ट्रानें पुकारलेल्या रोमहर्षक लढ्याचा उल्लेख करून त्यागींची उपसूचना फेटाळून लावण्याची कळकळीची सूचना केली. सभागृहांतील वातावरण एकदम तेज झालें ! त्याच वेळीं त्यागींची उपसूचना मताला टाकली असती तर त्यागींचा व आंबेडकरांचा पराजय खात्रीनें झाला असता ! पण मोठ्या कौशल्यानें तें कलम लांबणीवर टाकण्यांत आलें. राजेंद्रबाबूंच्या हृदयाच्या जिवंतपणाची आणि स्वतंत्र बाण्याची तारीफ करीत सभासद आपापल्या घरीं गेले.

राजेंद्रबाबूंच्या बाबतींत आणखी एका गोष्टीचा उल्लेख केल्यावांचून राहवत नाहीं. परवां अन्नखात्यांत नोकरी करणारी एक मुलगी भेटली.

राजेंद्रबाबूंची स्तुति करतांना ती म्हणाली 'ते मंत्री असतांना कचेरींत आले म्हणजे कचेरींतील नोकरवर्ग त्यांच्या दर्शनाकरितां मोटारीजवळ उभा राहात असे. त्यांची ती सौम्य, करुणामय मूर्ति पाहून मनाला मोठें पवित्र समाधान वाटत असे !' इतर कोणत्याहि मंत्र्याविषयीं असे हृदयस्फूर्त उद्‌गार ऐकले नव्हते.

सोमवारीं घटनापरिषदेची बैठक रक्षाबंधनामुळें तिसरे प्रहरीं तीन ते सात झाली. सुरुवातीलाच जवाहरलालांनीं मिठावरील कराच्या कलमाविषयीं खुलासा केला. ते म्हणाले, 'मिठावरील कराच्या निषेधाचें कलम घटनेंत नको. आपल्या देशांत परदेशी मीठहि येतें. या देशांतील मिठावर कर बसविण्यांत येणार नाहीं याची काळजी घेण्यांत येईल.'

जवाहरलालजींच्या खुलाशानंतरहि आम्हीं कांहीं सभासदांनीं २५३ कलमांतील तो भाग गाळण्याच्या विरुद्ध मतें दिलीं. पण जवाहरलालजींनाच बहुमत मिळालें. देशी मिठावर कर लादण्यांत येणार नाहीं हें त्यांचें आश्वासन खरें ठरो म्हणजे झालें.

संपत्तीच्या मोबदल्याचा प्रश्न फारच कटकटीचा व भानगडीचा ठरत आहे. या प्रश्नावर मत बनविणें सदस्यांना जड जात आहे. भल्या भल्या घटनापंडितांत व राज्यधुरीणांत या बाबतींत मूलभूत मतभेद आहेत. आपल्या प्रधानमंत्र्यांनीं जाहीरपणें दिलेलीं तोंडभर आश्वासनें आहेत. कॉंग्रेसच्या जाहीरनाम्यांत मोबदल्याचें अगदीं असंदिग्ध आश्वासन दिलेलें आहे. प्रधानमंत्री व कॉंग्रेस यांच्या आश्वासनांना हरताळ फासायचा नसेल, तर न्याय्य मोबदला दिला पाहिजे. योग्य मोबदला न देतां जर सरकारनें सार्वजनिक हिताकरितां मिळकत ताब्यांत घेतली तर संपत्तिधाऱ्याला कोर्टांत जातां येतें. त्यामुळें मोठीच पंचाईत झाली आहे. ज्या प्रांतांना मालगुजारी नष्ट करावीशी वाटते त्यांना तशा प्रकारचीं बिलें तयार केलीं आहेत. कांहीं प्रांतांच्या कायदेमंडळांत हीं बिलें कायदेमंडळासमोर मांडलींहि गेलीं आहेत. त्यामुळें त्यांना न्याय्य मोबदल्याचें निरपवाद तत्त्व स्वीकारतां येणें शक्य नाहीं.

या परस्पर-विरोधी परिस्थितींतून मार्ग काढावयाचा प्रयत्न चालू आहे. मोठमोठाले पंडित व व्यवहारधुरंधर आपलें बुद्धिकौशल्य हा प्रश्न सोड-

विण्याच्या कामीं लावीत आहेत. सरदार पटेलांनीं कॉंग्रेस पक्षाला एक अत्यंत हृदयस्पर्शी, गंभीर इशारा देणारें व युक्तिवादपूर्ण पत्र पाठविलें. संपत्तिधाऱ्यांच्या मनामध्यें अस्थिरतेची व अशाश्वतेची भावना उत्पन्न झाली, तर देशामध्यें आर्थिक अनवस्था व अस्थैर्य यांचा अंमल सुरू होईल असा गंभीर इशारा सरदारांनीं दिलेला आहे.

संपत्तीच्या हक्काचें अगदीं निरपवाद आश्वासन दिलें पाहिजे आणि संपत्तिधाऱ्याला योग्य मोबदला न मिळाला तर त्याला कोर्टांत तक्रार गुदरतां आली पाहिजे, हें आंबेडकरांचें व त्यांच्या समितीचें निश्चित मत आहे. पं. गोविंद वल्लभ पंत यांचेंहि मत असेंच आहे. जवाहरलालजींनीं तर त्या आशयाचें आश्वासनच दिलें आहे. पण पं. पंतांना मालगुजारी व जमीनदारी पद्धतीचा अंत करायचा आहे. म्हणून अशा प्रकारचें निराधार तत्त्व त्यांना परवडत नाहीं. त्यांच्यावर जर का 'न्याय्य मोबदला' देण्याची पाळी आली, तर त्यांचा हेतु तडीस जाण्याची आशाच नको. पण फक्त जमीनदारांपुरता अपवाद केला तर, जमीनदार व भांडवलदार यांच्यांत फरक करावा लागतो, आणि सरकार जमीनदारांना सापत्न भावानें वागवून भांडवलदारांना मात्र गोंजारतें अशा आरोपाला जागा उरते. ही गोष्ट दोन्ही पक्षांना इष्ट वाटत नाहीं. खासगी मालकीचा निरपवाद हक्क देऊं इच्छिणारेहि जमीनदार व भांडवलदार यांच्यांत फरक करूं इच्छीत नाहींत आणि ज्यांना मोबदल्याचें तत्त्वच मुळीं मान्य नाहीं तेहि जमीनदार व भांडवलदार यांच्यांत फरक करूं इच्छीत नाहींत. पण जमीनदारांना न्याय्य मोबदला देण्याची सोयच नाहीं म्हणून हा पेच उत्पन्न झाला आहे.

पं. गोविन्द वल्लभ पन्त यांनीं फक्त जमीनदारांपुरता अपवाद करणारा एक मसुदा तयार केला आहे. त्यांचें म्हणणें असें, कीं सरंजामशाही व भांडवलशाही यांच्यांत मूलतःच फरक आहे. म्हणून मोबदल्याच्या बाबतींत या दोन पद्धतींकरितां निरनिराळे नियम करण्यास हरकत नसावी. पं. पंतांनीं आपलें सारें युक्तिवादकौशल्य खर्चीं घालून ही गोष्ट पटवून देण्याचा प्रयत्न केला. पण खासगी सम्पत्तीच्या दोन प्रकारांत असा फरक करणें सदस्यांच्या अगदीं जिवावर येतें.

डॉ. आंबेडकरांनीं निराळीच तोड सुचविली आहे. कुठल्याहि प्रश्नाची फोड डॉ. आंबेडकरांनीं केल्यावांचून सदस्यांचें बौद्धिक समाधान होत नाहीं. त्यांचें म्हणणें पटो वा न पटो, पण दोन्ही बाजूंच्या मुद्द्यांचें स्पष्टीकरण त्यांच्याइतकें सुबोधपणानें कोणीच करीत नाहीं. लोक त्यांना 'मूर्तिमंत असंदिग्धता व सुबोधता' असें म्हणतात.

आंबेडकरांनींहि एक मसुदा तयार केला आहे. त्याचा आशय असा:—दरेकाला खासगी मालकीचा निरपवाद हक्क असावा आणि मोबदल्याच्या बाबतींत कोर्टाकडे दाद मागण्याचाहि हक्क असावा; पण निरनिराळ्या कामांकरितां सरकारजमा होणाऱ्या मालमत्तेकरितां निरनिराळा मोबदला ठरविण्याचा हक्कहि सरकारला असावा.

सुप्रसिद्ध कायदेपंडित अल्लादी कायद्याची मीमांसा उत्तम करतात. त्यांनीं आंबेडकरांच्या भूमिकेच्या कायदेशीरपणाचें विवेचन केलें. पंतजींच्या प्रतिपादनामध्यें थोडीशी ढिलाई होती. अल्लादींची रूक्ष शास्त्रमीमांसा होती. आंबेडकरांनीं मुद्दे खऱ्या, खडतर, फटकळ व सुबोध भाषेंत पिंजले. डॉ. मथाई हे फडणीस असल्यामुळें त्यांचा वेद, त्यांचें पंचांग वहीखातेंच आहे. ते म्हणतात 'कायदा, शास्त्र आणि ध्येयवाद यांच्या पातळीवरून अंमळ व्यवहाराच्या पातळीवर या. हल्लींच्या परिस्थितींत जर तुम्ही खासगी मालकीचें निश्चित व असंदिग्ध आश्वासन दिलें नाहीं, तर वैयक्तिक पराक्रम-वृत्तीचा अंत होईल आणि आपली सारी आर्थिक व्यवस्था कोलमडून पडेल.

जवाहरलालजी हे फक्त सरकारचे प्रधानमंत्री नाहींत. ते पुढारी आणि ध्येयवादी व्यक्तीहि आहेत. सार्वजनिक हिताकरितां कोणाची खासगी सम्पत्ति राष्ट्राला थोडकासा मोबदला देऊन घेतां येऊं नये, हें त्यांच्या जनताभिमुख वृत्तीला खपत नाहीं. म्हणून सम्पत्तीचें आश्वासन आणि सम्पत्तीचें अल्प प्रतिमूल्य दिल्यानंतर राष्ट्रीयीकरण, या दोन तत्त्वांचा समन्वय करणारा मसुदा त्यांना हवा आहे.

( १ ) मोबदल्याचें तत्त्व मान्य करणें, ( २ ) दोन प्रकारच्या संपत्तीं-मध्यें फरक करावा कीं करूं नये, आणि ( ३ ) लोकशाहीच्या स्थापनेकरितां सरंजामशाही व भांडवलशाही यांचा नाश करण्याच्या उद्देशानें संपत्तीचें

राष्ट्रीयीकरण कसें करावें, या तीन तत्त्वांचा मेळ घालण्याचा प्रयत्न चालू आहे. भल्याभल्यांची मति कुंठित होतांना दिसत आहे.

कारण उघड आहे. आर्थिक स्थैर्य व स्वास्थ्य यांचा पाया समाजानें स्वीकारलेल्या आर्थिक सिद्धान्तांच्या चोखपणावर आहे. धनिक व धनहीन यांच्यांतील स्वार्थविरोध ज्या मानानें कमी होईल, त्या मानानें आर्थिक स्थैर्य व स्वास्थ्य स्थापन होईल. अर्थात् धनवानांना नफ्याची हांव सोडावी लागेल. म्हणजे ' लाभा 'ऐवजीं सामाजिक उपयुक्ततेच्या तत्त्वाला प्राधान्य द्यावें लागेल. तें दिलें म्हणजे कांहीं प्रकारच्या सम्पत्तीचें राष्ट्रीयीकरण करावें लागेल. धनिकांनीं जर या कामीं सहकार्य करण्याचें नाकारलें, तर ' वर्ग-कलह ' अपरिहार्य आहे. घटनेंत सम्पत्तीच्या मालकीचें आश्वासन दिलें तर सम्पत्तिमानांचा जीव भांड्यांत पडेल, पण सम्पत्तिहीनांचे प्राण कंठांत येतील !

एकंदरींत प्रश्न इतका कटकटीचा व जिकिरीचा आहे कीं त्याचा निर्णय तडकाफडकीं करणें शक्यहि नाहीं आणि इष्टहि पण नाहीं. जवाहरलालजींच्या मनांत या प्रश्नाच्या कायदेशीर, व्यावहारिक व तात्त्विक पैलूंमध्यें कुठलाहि विरोध नाहीं. ते म्हणतात कीं माझ्या मनांत अगदींच घोटाळा नाहीं. परिस्थितीची योग्य तीच प्रतिक्रिया माझ्या मनावर होते.

ठरल्याप्रमाणें सायंकाळीं पक्षसभेंत राष्ट्रभाषेचा गाजलेला विषय चर्चेला आला. बाबू गोविंददासांनीं या बाबतींत दोन महिन्यांपासून रान उठवायला सुरुवात केली होती ! ते सारखे सह्या गोळा करण्याच्या उद्योगांत चूर होते. घटनापरिषदेंत काय चाललें आहे याचें त्यांना भानहि नव्हतें ! बाबूसाहेबांचा आवेश आणि उद्योग जसजसा वाढत होता, त्याच प्रमाणांत दाक्षिण भारतीयांचें विरोधाचें अवसानहि वाढत होतें. राज्यसत्तेच्या संविभागाच्या या मुहूर्तावर हे अंतर्वेदी, उत्तरभारतीय, हिंदुस्थानी लोक भाषिक साम्राज्याची स्थापना करूं इच्छितात असें दक्षिणात्यांच्या मनानें घेतलें आहे. म्हणून सांस्कृतिक कुरुक्षेत्रावर गंगा-कावेरी युद्धाचे ढग जमूं लागण्याचीं चिन्हें दिसूं लागलीं होतीं.

राज्यभाषेचें कलम घटनेंत असावें कीं नसावें हा मुद्दा जवाहरलालांनीं उपस्थित केला असावें असें ठरलें. आंबेडकरांनीं नेहमींप्रमाणें प्रश्नाचें

विश्लेषण केलें. त्यांनीं पार्लमेंटमधील वादविवादाची भाषा व राज्यकारभाराची भाषा यांच्यांत भेद केला आणि कांहीं वर्षें राज्यकारभाराची भाषा इंग्रजीच राहावी पण पार्लमेन्टची भाषा ' हिंदी अथवा हिंदुस्थानी ' व्हावी असें सुचविलें. डॉ. आंबेडकरांनीं दोन वाक्यें फारच महत्त्वाचीं उच्चारिलीं. ते म्हणाले, ' मी एका अशा प्रान्ताचा आहें कीं, ज्याला इतिहास आहे आणि ज्या इतिहासाची मला लाज वाटण्याचें कारण नाहीं असा इतिहास आहे. माझ्या भाषेंत असें साहित्य आहे, कीं ज्याचा मला अभिमान वाटावा. तरी मी असें जाहीर करूं इच्छितों, कीं सबध हिंदुस्थानची एकच राज्यभाषा असावी. त्याकरितां मी माझ्या भाषेचें बलिदान करायला तयार आहें. एरव्हीं आमच्या अखिल भारतीयत्वाच्या बाता फोल ठरतील ! '

व्यापक देशभक्तीच्या व भावी राष्ट्रोत्कर्षाच्या कळकळीनें उच्चारलेले हे शब्द ऐकून श्रोत्यांनीं टाळ्यांचा गजर केला. ' तुम्ही वाटल्यास प्रांतिक कायदेमंडळांत व विद्यापीठांत प्रांतिक भाषा वापरा, पण कृपा करून समग्र देशांत राज्यकारभाराची भाषा मात्र एकच ठेवा. ' आंबेडकरांनीं आपल्या विधानाचा पुनरुच्चार केला. त्यांच्या वृत्तीचें कौतुक झालें, त्यांच्या उद्‌गाराचें स्वागत झालें.

त्यानंतर दुसरे दिवशीं पुन्हां पक्षसभेंत राष्ट्रभाषेच्या चर्चेला आरंभ आपले पंतप्रधान शुक्लजी यांनीं केला. हें त्यांचें पहिलेंच भाषण होतें. त्यांच्यानंतर सन्तानम् यांनीं कांहीं वर्षें इंग्रजीचें राज्यभाषेचें स्थान कायम ठेवण्याच्या आवश्यकतेवर जोर दिला. एक, दोन हे आंकडे निरनिराळ्या प्रांतांत निरनिराळ्या पद्धतींत लिहितात. आंकडे लहानपणींच शिकतांना मनांत कायमचे ठसतात. म्हणून सबंध देशाकरितां राज्यभाषेची नागरी लिपि स्वीकारली तरी आंकडे मात्र हल्लींचेच इंग्रजी आंकडे असावेत, अशीहि त्यांनीं सूचना केली.

शंकरराव देवांनीं डॉ. आंबेडकरांच्या विधानाचा उल्लेख करून प्रांतीय भाषांच्या क्षेत्रावर आक्रमण होऊं देण्यांत धोका आहे, असा इशारा दिला. हिन्दी ही एका किंवा दोन तीन प्रांतांची भाषा असल्यामुळें ' हिन्दी ' नांव

स्वीकारल्यास त्या प्रान्तांकडेच भाषेच्या बाबतींत नेतृत्व व मार्गदर्शकत्व येण्याची भीति आहे. आम्हांला अशी राष्ट्रभाषा हवी, कीं जिच्या विकासाला सर्वच भाषांनीं मदत केली असेल, म्हणून हिन्दीऐवजीं ' हिंदुस्थानी ' शब्द हवा आणि नागरीच लिपि हवी." असा त्यांच्या भाषणाचा आशय होता.

मौ. अबुल कलाम आझाद यांचेंहि भाषण पक्षसभेंत यापूर्वीं कदाचितच झालें असेल. त्यांचें भाषण अत्यंत स्पष्ट, समतोल व वस्तुनिष्ठ वृत्तीचें होतें. मुख्य मुद्दे असे : ( १ ) पाकिस्तानच्या पूर्वीं राष्ट्रभाषेचा प्रश्न सांप्रदायिक झाला होता. मुस्लिम लीग उर्दूचा आग्रह करीत होती. देशाच्या विभाजनानंतर ती स्थिति पालटली आहे. आतां उर्दूचा प्रश्नच शिल्लक राहिलेला नाहीं. ( २ ) भाषेंत आलेले अरबी-फारसी शब्द कायम ठेवावेत. नवीन शब्द व पारिभाषिक शब्द बनविण्याच्या बाबतींत संस्कृत भाषेचाच आश्रय घेणें इष्ट व स्वाभाविकहि आहे. व्यापकता व संग्राहकता या भावनांचा संबंध ' हिंदी 'पेक्षां ' हिंदुस्थानी ' शब्दांशीं अधिक आहे म्हणून त्यांतल्या त्यांत ' हिंदुस्थानी ' शब्द स्वीकारणें जास्त बरें. ( ३ ) लिपि एकच राहील आणि ती म्हणजे नागरी. सर्वांस नागरी येत नाहीं, म्हणून कांहीं वर्षेंपर्यंत उर्दूमध्यें अर्ज स्वीकारण्यांत यावेत.

श्री. रामालिंगम् चेट्टियार यांनीं दक्षिण भारतीयांची कैफियत मांडली. ते म्हणाले, ' आमच्या अडचणी लक्षांत घेऊन अंमळ हलके हलके चला. आम्हांला हिन्दीवांचून गत्यंतर नाहीं. पण जरा धीरे.'

हिन्दी पक्षातर्फे पं. गोविन्द वल्लभ पंत यांचें भाषण कसलेल्या व कुशल सभापंडिताला शोभण्यासारखें झालें. भारदस्त व रेखीव भाषा, समतोल व असंदिग्ध विचार आणि युक्तिबद्ध मांडणी हे गुण त्या भाषणांत होते. त्यांच्या भाषणांतील मुख्य मुद्दे येणें प्रमाणें:—

( १ ) आपल्या देशांत अनेक भाषा आहेत, पण त्या क्षेत्रनिष्ठ आहेत. संप्रदायनिष्ठ भाषा या देशांत जवळ जवळ नाहींत. बंगालमध्यें विशेषतः पूर्व बंगालांत, मुसलमानांचें संख्याधिक्य असूनहि तेथील भाषेंत संस्कृत शब्द व प्रयोग अधिक आहेत.

( २ ) पुश्तु व बलुची मुसलमान प्रांतांच्या भाषा मानल्या जातात. पण

त्यांचें संस्कृतशीं विलक्षण साम्य आहे. म्हणून माझें विधान स्थूल मानानें खरें आहे.

( ३ ) राष्ट्रभाषा म्हणजे मध्यवर्ती सरकारची राज्यभाषा.

( ४ ) कांहीं वर्षें इंग्रजी ठेवणें अपरिहार्य आहे. मुदत दक्षिण भारतीय मित्रांनीं ठरवावी. पण त्या मुदतींत इंग्रजीची जागा हिंदीला घेतां येईल अशी तरतूद ताबडतोब करावी. इंग्रजी आजच काढून टाकली तर सगळा राज्यकारभारच बंद पडेल.

( ५ ) 'हिंदी' म्हणावें कीं 'हिंदुस्तानी'? मला हिंदी नांव आवडतें. त्यांत माधुर्य आहे, व्यापकता आहे. सुटसुटीतपणाहि आहे. कलात्मकतेच्या दृष्टीनें तें नांव सुबक आहे. अभिजात उर्दूचाहि समावेश हिंदींत होतो.

( ६ ) हिंदुस्तानी शब्दानें एका कृत्रिम व अविकसित भाषेचा बोध होतो. हिंदीपेक्षां तिच्यांत उर्दू शब्दांचा भरणा अधिक असतो असा सर्वसाधारण ग्रह आहे.

( ७ ) हिंदी शब्द स्वीकारल्यानें वस्तुहानि किंवा अर्थहानि न होतां हजारों लोकांच्या भावनेचें समाधान होतें.

( ८ ) ही हिंदी भाषा संकुचित असणार नाहीं, तिच्यांत उर्दूचाहि समावेश होईल.

( ९ ) हिंदीवाल्यांच्या मनांत भाषिक साम्राज्यवाद उत्पन्न होईल ही भीति स्वाभाविक आहे. आम्ही दक्षिण भारतीयांच्या ठिकाणीं असतों तर आम्हांलाहि अशी भीति वाटली असती. म्हणून इंग्रजी किती वर्षांकरितां ठेवायची आणि राष्ट्रभाषेचा विकास कोणत्या पद्धतीनें करायचा तें दक्षिण भारतीयांनीं ठरवावें. निर्णय त्यांनीं करावा, आम्ही त्यांचें अनुयायित्व करूं.

आंबेडकरांनीं आणखी एक मुद्दा विचाराकरितां सुचविला. तो असाः—

राष्ट्रभाषेचें कार्य द्विविध आहे. एक, तिचा उपयोग चलनासारखा आंतरप्रांतीय व्यवहाराकरितां झाला पाहिजे. आणि दुसरें, खजिन्याप्रमाणें ती ज्ञानाचें भांडारहि असली पाहिजे. पहिल्या प्रकारची योग्यता हिंदीची आहे. दुसऱ्या प्रकारची तिनें संपादन केली पाहिजे.

दुसऱ्या दिवशीं संध्याकाळीं पुन्हां पक्षसभेंत राष्ट्रभाषेच्या प्रश्नावर चर्चा झाली. डॉ. श्यामप्रसाद मुखर्जी यांनीं आपल्या भाषणांत इंग्रजीच्या स्थानाबद्दल चर्चा केली. ते म्हणाले, ' इंग्रजी किती दिवस ठेवायची हा मुद्दा गौण आहे. पण ज्या अवधींत इंग्रजी भाषा ठेवायची असेल, त्या अवधींत वाटेल तेव्हां वाटेल त्या खात्यांत हिंदीचा आरंभ करण्याची मोकळीक पार्लमेंटला असूं नये; आणि तसा अधिकार पार्लमेंटला द्यायचाच असला तर निदान दोनतृतीयांश बहुमताची अट ठेवावी, म्हणजे दक्षिण भारतांतील सदस्यांची उपेक्षा होणार नाहीं. '

श्यामबाबूंनीं इंग्रजी भाषेविषयीं एक सामान्य विचार आणखी सुचविला. ते म्हणाले, ' इंग्रजी भाषेविषयींचा आपला तिरस्कार इंग्रज राज्यकर्त्यांमुळें होता. त्या भाषेमुळें आपली सांस्कृतिक हानि झालेली आहे; नाहीं असें नाहीं. पण आपणावर तिचे उपकारहि कांहीं कमी नाहींत. आंतरराष्ट्रीय परिषदांमध्यें इंग्रजी न जाणणाऱ्या प्रतिनिधींपेक्षां आपल्या प्रतिनिधींना अनेक दृष्टींनीं इंग्रजीच्या ज्ञानाचा फायदा होतो. '

' हिंदी भाषा सगळ्या प्रांतांतील लोकांना लौकर यावी म्हणून तिच्या खास शिक्षणाची सोय करावी लागेल. त्याकरितां मध्यवर्ती सरकारनें आवश्यकतेप्रमाणें देणग्या दिल्या पाहिजेत. ' अशी सूचना करून शेवटीं श्यामबाबू म्हणाले, कीं भारतवर्षांतील सर्वच भाषांकरितां देवनागरी ही एकच लिपि असावी ही सद्बुद्धि जर सगळ्या प्रांतांना सुचली, तर वीसपंचवीस वर्षांतच आपण भक्कम पायावर एक अभेद्य भारतीय संस्कृति निर्माण करूं शकूं.

तामिळनाडचे श्री. अनंतशयनम् अय्यंगार यांनीं तामिळ भाषीयांनादेखील हिंदुस्तानीपेक्षां हिंदीच अधिक जवळची कशी आहे, हें थोडक्यांत सांगितलें.

जमीयत उल्-उलेमाचे चिटणीस मौलाना हिफ्जुर्रहमान यांचें इरसाल गणंगाला शोभण्यासारखें सनातनी थाटाचें भाषण झालें. बापूंच्या नांवाचा वारंवार उल्लेख करून त्यांनीं भाषा हिंदुस्तानी आणि लिप्या दोन्ही असें प्रतिपादन केलें.

त्यानंतर जवाहरलालजींचें मानवी जीवनांत भाषेचें स्थान, भाषेची भूमिका, तिचें स्वरूप इत्यादि मुद्द्यांचें तात्त्विक विवेचन करणारें भाषण झालें. ते म्हणाले, "मी भाषेचा पूजक आहें." भाषेचा संबंध संप्रदायाशीं कसा नाहीं, क्षेत्राशीं कसा आहे, उर्दू भाषेला या देशांत महत्त्वाचें व मानाचें स्थान कां असायला पाहिजे, ती आमच्या जीवनांत किती खोल व किती व्यापक स्वरूपांत शिरलेली आहे, इत्यादि मुद्द्यांची मीमांसा त्यांनीं स्वतःच्या कुटुंबापासून तों तिब्बत व मध्यआशिया या देशांतील दाखले देऊन मोठ्या आवेशानें केली.

त्यांनीं एकंदर तीन सूचना केल्याः—

( १ ) आमची राज्यभाषा संग्राहक, लवचिक व व्यापक असावी. संकुचिततेमुळें भाषेचाहि विनाश होतो व राष्ट्राचाहि होतो. म्हणून भाषेचें नांव कांहींहि ठेवा, पण तिच्यांत हिंदुस्थानी व उर्दू शैलींचाहि समावेश होतो असें नमूद करा.

( २ ) आतां राष्ट्रभाषेच्या बाबतींत उर्दूचा प्रश्नच राहिलेला नाहीं. तेव्हां दुसरी कोणतीहि प्रतिस्पर्धी भाषा मैदानांत उभी ठाकलेली नाहीं.

( ३ ) लिपि देवनागरीच राहूं शकते. देशांत जितक्या म्हणून कायद्यानें मान्य केलेल्या भाषा असतील, त्यांपैकीं कुठल्याहि भाषेंत अगर लिपींत अर्ज देण्याची मोकळीक असावी.

जवाहरलालांचें अशा अर्थाचें भाषण झाल्यानंतर टंडनजींचें हिन्दी-पक्षाचें समर्थन करणारें अंमळ पाल्हाळिक भाषण झालें.

आतांपर्यंत झालेल्या चर्चेवरून मुख्य प्रश्नाच्या बाबतींत वास्तविक मतभेद असा फार थोडा आहे ही गोष्ट सगळ्यांच्याच ध्यानांत आली होती. पण थोरामोठ्यांच्या मध्यें कोणी बोलावें? शेवटीं घोंटाळा, गल्लत व गुंतागुंत यांचें वावडें असणाऱ्या आंबेडकरांनीं वादाला पायबंद घातला. ते म्हणाले, "आतांपर्यंत झालेल्या भाषणांवरून खालील मुद्द्यांवर ढोबळ मानानें ऐकमत्य दिसतेंः—

( १ ) इंग्रजीच्या ऐवजीं कुठली तरी भारतीय भाषा राज्यभाषा व्हावी. ती भाषा हिंदी किंवा हिंदुस्तानीच असूं शकते.

( २ ) राज्यभाषेची लिपि नागरी हीच राहील.

( ३ ) कांहीं काळपर्यंत इंग्रजीचें स्थान आहे तसेंच राहील.

( ४ ) राष्ट्रभाषेचें स्वरूप कसें असावें, तिचा अंमल केव्हां व कशा रीतीनें सुरू व्हावा, हें ठरविण्याच्या बाबतींत अहिन्दी प्रान्तीयांचें मत निर्णायक राहील. ''

आतां वादाचा मुद्दा एकच शिल्लक राहिला आणि तो म्हणजे इंग्रजीला राज्यभाषेचें पद आणखी किती दिवस लाभूं द्यायचें आणि त्या मुदतींत भारतीय राज्यभाषा हळूहळू सुरू करायची कीं नाहीं ?

ज्या मुद्द्यांसंबंधीं एकमत झालेलें आहे त्यांच्यापुरता मसुदा तयार करण्याचें मसुदाकमिटीवर सोंपवावें, ही आंबेडकरांची सूचना मान्य झाली. नेहमींप्रमाणें मुद्द्यांचें स्पष्ट भाग पाडण्याचें काम आंबेडकरांनीं केलें आणि त्यामुळें चरकाच्या बैलाप्रमाणें गोल गोल फिरणारी चर्चा थांबली.

आतां मुद्दा हिंदी-हिंदुस्तानीचा नाहीं. नागरी लिपीचाहि नाहीं. संक्रमणकालांत हिंदी किंवा हिंदुस्तानीचा आरंभ करण्याचें नांव काढूं नका असा दक्षिण भारतीयांचा कटाक्ष आहे. आणि गंगा-यमुनापुत्र व गोदा-कृष्णातुंगाकावेरीपुत्र यांच्यांत याच मुद्द्यावर कुरुक्षेत्र माजण्याचा रंग दिसतो.

चर्चा ऐकत असतांना एका मुद्द्याची मोठी गंमत वाटली, आणि तीव्र खेदहि वाटला. भारतीय राज्यभाषा सोपी, स्वाभाविक आणि समृद्ध असावी यापेक्षां एका प्रान्ताची भाषा दुसऱ्या प्रांतावर लादली जाऊं नये याचीच काळजी सगळ्यांना जास्त दिसली. तुझ्या भाषेंत सहजता, प्रान्तीय भाषांची निकटता आणि विकासशीलता हे गुण असतील, पण ती तुझी आहे हा तिचा सगळ्यांत मोठा दोष आहे असें भारतमातेचा एक सुपुत्र भारतमातेच्या दुसऱ्या सुपुत्राला जणुं सांगत होता ! जें राजकारणाच्या क्षेत्रांत, तेंच भाषेच्या क्षेत्रांत चालू झालें ! ' दिल्लीचें सिंहासन रिकामें राहिलें तरी चालेल, पण तुला बसूं देणार नाहीं. राज्यभाषेच्या देव्हाऱ्यांत उंदरांनीं धुडगूस घातला तरी चालेल, पण तेथें तुझ्या भाषेला स्थानापन्न होऊं देणार नाहीं ', या भारतीय भाऊबंदकीच्या परंपरेला आम्ही इमानेंइतबारें जागत आहोंत. हिन्दी भाषा

स्वाभाविक आहे, प्रांतीय भाषांच्या कुटुंबांतील आहे, नित्य विकासमान आहे आणि वर पुन्हां कांहीं प्रांतांची मातृभाषा आहे हा तिचा गुण मानायचा कीं दोष? ती या देशांतल्या कांहीं लोकांची भाषा आहे म्हणूनच देशी भाषा आहे ना? पण धर्मक्षेत्राची परिणति जर कुरुक्षेत्रांत झाली नाहीं तर मानवाच्या पुरुषार्थाची रग जिरत नाहीं. मार्क्स म्हणतो, संघर्ष हाच जीवनाचा नियम आहे. वर्गसंघर्ष संपला म्हणजे प्रकृति-पुरुष संघर्ष सुरू होईल. पण संघर्षाला अंत म्हणून येणार नाहीं. हिन्दु-मुसलमानांचा सांप्रदायिक संघर्ष संपला, तर त्याच्याऐवजीं उत्तर-दक्षिणेचा प्रादेशिक संघर्ष सुरू होईल. संख्यावादाच्या पोटीं 'संख्यच' निपजायचें, दुसरें काय?...

तुझा,

दादा

— ३५ —

१२९, कॉन्स्टिटयूशन हाऊस
नवी दिल्ली,
२०-८४-९

चि. चन्दूराजाला अनेक उत्तम आशीर्वाद.

दिल्लीची हवा मध्यें अतिशयच उष्ण व असह्य झाली होती. रात्रीं देखील उकडत असे. झोप कांहीं केल्या येत नसे. काल सकाळपासून उष्णता अम्मळ कमी झाली आहे. मळभ असतें. पण ढग बहुधा 'गर्जन्ति केचिद्वृथा' पैकींच असतात.

स्वातंत्र्यदिन व जन्माष्टमी हे दोन समारंभ झाले. खास मनांत भरण्यासारखें दोन्ही समारंभांत कांहींच नव्हतें. पुष्कळसा जडतांत्रिकतेचाच भाग होता. जन्माष्टमीच्या दिवशीं बिडला मंदिरांत देवदर्शनाला गेलों होतों. मीं देवदर्शन घेतलें. गर्दी अलोट होती. भाविकतेला आणि श्रद्धेलाहि भरतें आलें होतें. भाविकतेच्या आवेशांत पुरुषांप्रमाणेंच स्त्रियांनाहि 'स्पर्श-

निषेधा 'चें भान नव्हतें. मुरलीधराची मुरली ऐकून जणुं सारेजण देह-भान विसरले होते. मंदिर लक्ष्मीनारायणाचें असलें तरी 'बिडला मंदिर' म्हणूनच ओळखलें जातें. पूर्वी देवापेक्षां भक्त मोठा मानला जात असे. तरी देवाचें मंदिर भक्ताच्या नांवावर क्वचितच खपत असे. येथें मात्र मंदिरांतील उपास्य देवतांपेक्षांहि मंदिर बांधणाऱ्याचाच महिमा अधिक आहे. भगवानापेक्षां धनाची मातब्बरी विशेष आहे. भांडवलशाहींत मंदिर देखील वैभवप्रदर्शनाचेंच एक साधन होऊन बसतें !

पांच दिवसांच्या सुट्टीनंतर परवां दुपारीं ३ पासून पुन्हां घटनापरिषदेचें अधिवेशन सुरू झालें. श्री. गोपालस्वामी अय्यंगार यांनीं आपलें 'हिंदुस्थान सरकारच्या विधाना'च्या दुरुस्तीचें बिल मांडलें. यतिराजांनीं अगदीं सुरुवातीलाच 'पॉइन्ट ऑफ ऑर्डर' काढून तीन मुद्द्यांवर हरकत घेतली. अध्यक्षांनीं ती हरकत अमान्य केली. या बिलांतील ज्या कलमान्वयें राष्ट्रपतीला अनियंत्रित अधिकार देण्याची तरतूद केली आहे त्या कलमाला यतिराज, प्रो. शहा इत्यादींनीं निकराचा विरोध केला. यतिराजांच्या भाषेला कांहीं धरबंदच राहिला नाहीं. त्यांनीं त्या बिलाला 'आसुरी' देखील म्हटलें. प्रो. शहांनीं देखील बरीच कडक टीका केली. गोपालस्वामींनीं श्री. रुस्तम काका सिध्वा यांची एक उपसूचना मान्य करून बिलांतील दोषाची तीव्रता कमी केली आणि आंबेडकरांनीं आपल्या नेहमींच्या युक्ति-कौशल्यानें गोपालस्वामींचें समर्थन केलें.

कालच्या बैठकींत द्वितीय सभागृहाच्या मुद्द्यावर बरीच चर्चा झाली. डॉ. पंजाबराव म्हणाले, "अध्यक्षांच्या कृपेनें आम्हांला द्वितीय सभागृहाची रूपरेषा तर मिळाली. पण ती इतकी अस्पष्ट आहे कीं, तिच्या रेषाहि कोठें आढळत नाहींत आणि रूपाचीहि कल्पना येत नाहीं." या नवीन मसुद्यांतहि रूपरेषा ठरविण्याचें काम भावी पार्लमेंटवरच सोपविण्यांत आलें आहे. दुय्यम शाळांतील शिक्षक व विद्यापीठाचे पदवीधर यांचे मतदारसंघ बनविण्याच्या कल्पनेवर पंजाबरावांनीं कडक टीका केली. ते म्हणाले, "अशा रीतीनें शिक्षण देखील राजकारणाच्या कर्दमांत खेंचलें जाईल आणि सरकारी नोकऱ्यांतहि राजकारण शिरेल !" डॉ. हृदयनाथ कुंझरू म्हणाले, "हें द्वितीय सभागृह म्हणजे अठरा पगड स्वार्थसंबंधांचें विचित्र कडबोळेंच होणार आहे." द्वितीय

सभागृहांतील नेमणुका जन्माच्या किंवा संपत्तीच्या आधारावर करायच्या नाहींत हें एकदां ठरल्यानंतर त्याची रचना कोणत्या आधारावर करावी, हें कोडें आंबेडकर-कमिटीला कांहीं सोडवितां आलें नाहीं. निरनिराळ्या हितसंबंधांचें प्रतिनिधिभूत एक सभागृह असावें इतकेंच त्यांनीं ठरविलेलें दिसतें. वास्तविक 'राज्यसभा' ही निरनिराळ्या राज्यांच्या किंवा प्रांतांच्या प्रतिनिधींची असली म्हणजे लोकसभेच्या स्वरूपाहून तिचें स्वरूप निराळें राहू शकतें. पण याबाबतींत अजून घोटाळा दिसतो. म्हणून हें जरा घोटाळ्याचें कलम मंजूर झालें आहे. बहुतेकांचें मत 'ही द्वितीय सभागृहाची अडगळ हवीच कशाला' असें दिसतें.

२०-८-४९

त्यानंतर ता. १४ ला प्रांत व केंद्र यांच्यामधील अर्थविभाजनाच्या मुद्यांवर बरीच चर्चा झाली. या कलमांत आणीबाणीच्या प्रसंगीं आर्थिक अधिकारहि तात्पुरते स्वतःच्या हातीं घेण्याचा अधिकार राष्ट्रपतीला देण्यांत आला आहे. प्रांतीय स्वायत्ततेच्या अभिमान्यांना अर्थातच हें खपत नाहीं. डॉ. कुंझरू म्हणाले, "ही 'आर्थिक' हुकूमशाही आहे. असे अधिकार केंद्राकडे देणें म्हणजे 'प्रांताच्या ललाटावर कायमचें आर्थिक निर्वाण' लिहून ठेवण्यासारखें आहे." केंद्राची अनियंत्रित हुकूमशाही म्हणजे कांहीं सुदृढ केंद्र नव्हे असा युक्तिवाद बहुतेकांनीं मांडला.

२२-८-४९

परवां ता. २० ला २८० वें कलम चर्चेकरितां आलें. हें कलम 'भयंकर महत्त्वाचें' आहे. आणीबाणीच्या प्रसंगीं मूलभूत हक्कच तहकूब करण्याचा अधिकार या कलमान्वयें राष्ट्रपतींना देण्यांत आलेला आहे. येथें साध्य-साधनांचा प्रश्न उत्पन्न होतो. व्यवस्थेचें साध्य स्वातंत्र्य आहे कीं स्वातंत्र्याचा बळी देऊनहि व्यवस्था स्थापन करणें हें साध्य आहे, हा महत्त्वाचा प्रश्न आहे. साध्य-साधनांचा हा वाद अति-प्राचीन आहे. राज्यवादी म्हणतो, अव्यवस्था म्हणजे अनवस्था प्रसंग ! बेबंदशाही ! कोणाचा पायपोस कोणाच्या पायांत नाहीं ! बळी तो कान पिळी ! कोणाचेच कान कोणाच्या चेहऱ्यावर राहणार नाहींत, म्हणून व्यवस्थेवांचून स्वातंत्र्य उपभोगतां येत नाहीं. क्रांतिवादी

म्हणतो, तुमची व्यवस्था मोठी अपूर्व आहे. तिच्यांत उपासमारीचें, बेकारीचें, अज्ञानाचें स्वातंत्र्य भरपूर आहे. ज्याच्याजवळ साधनें असतील त्याची सत्ता, असें या व्यवस्थेचें पायाभूत तत्त्व दिसतें. ही व्यवस्थित विषमता म्हणजे अनवस्थाच नव्हे का?—असा हा अराज्यवादी व राज्यवादी यांच्या भूमिकेंतील मूलभूत फरक लक्षांत घेतला म्हणजे या कलमांवरील 'गरमागरम' चर्चेचें मर्म लक्षांत येतें. मूलभूत मानवी हक्कांचें संरक्षण हाच व्यवस्थेचा हेतु असल्यामुळें व्यवस्थेला धोका असला तरी मूलभूत हक्कांना हात घालतां कामा नये अशी प्रवृत्ति अधिकांश सभासदांची होती व आहे.

यतिराज, प्रो. शहा इत्यादि अनेक सभासदांनीं अगदीं कडकडून टीका केली. पं. ठाकुरदास भार्गव यांनीं मोठें जोरदार भाषण केलें. यतिराज, शहा व ठाकुरदास यांनीं आपापल्या उपसूचना मांडल्या. इंग्रजी कोशांत जितकीं कडक विशेषणें सहज गवसलीं त्या सर्वांचा उपयोग यतिराजांनीं केला आणि शेवटीं मसुदासमितावर असा ताशेरा मारला कीं, हें कलम म्हणजे 'विनायकं प्रकुर्वाणो रचयामास वानरम्'चें उत्कृष्ट उदाहरण आहे.

आंबेडकरांनीं उत्तर दिल्यानंतर हें राज्यवादी कलमहि मंजूर झालें. तेव्हां यतिराज उद्गारले, 'महाराज! हा शोकाचा व शरमेचा दिवस आहे. हिंदुस्थानांतील लोकांचा ईश्वरच वाली आहे!' यतिराजांच्या भाषेंत असंयम व उतावीळपणा आहे. पण हें कलम मंजूर करतांना सदस्यांच्या मनांमध्यें कळ अवश्य उठली असेल, यांत शंका नाहीं.

मुसलमान सदस्यांपैकीं कांहीं जणांनीं ज्याप्रमाणें श्री. गोपालस्वामींच्या बिलाला विरोध केला, त्याचप्रमाणें या कलमालाहि विरोध केला. गोपालस्वामींच्या बिलांतील शरणार्थींच्या मालमत्तेबद्दलचें कलम त्यांना पसंत नाहीं. कसें पसंत पडणार? "चित्ता आपले ठिपके टाकून देईल, पण यांचें 'येळकोट' जाणार नाहीं." त्यांची सांप्रदायिक वृत्ति दुरतिक्रम आहे. येथील राज्य सुदृढ व समर्थ व्हावें असें त्यांना मनांतून वाटत नाहीं. ते 'राष्ट्रीय' नाहींत. 'राष्ट्रीय मुसलमान' आहेत. 'राष्ट्रीय' हें फक्त विशेषण आहे. त्याचप्रमाणें हिंदुसभा व रा. स्व. संघ यांचेंहि आहे. राष्ट्राला 'हिंदु' हें विशेषण लावल्यावांचून त्यांनाहि चैन पडत नाहीं. राष्ट्रीयत्व हें यापुढें अविशिष्ट व निरपेक्ष पाहिजे हें दोघांनाहि पटलेलें नाहीं.

आज ‘ पब्लिक सर्व्हिस कमिशन ’ वर चर्चा झाली. नोकरांचा प्रश्न हा अर्थातच अत्यंत जिव्हाळ्याचा प्रश्न आहे. नोकरी गुणावर व योग्यतेवर लक्ष ठेवून द्यावी हें तत्त्व सर्वमान्यच आहे. पण बौद्धिक योग्यता व गुणवत्ता ज्यांना केवळ जन्मामुळें मिळवितां आली नाहीं त्यांना खास सवलती दिल्या नाहींत तर ते इतरांच्या बरोबरीला कसे येतील ? म्हणून या देशांत निरपवाद गुणवत्तेचें तत्त्व लागू करणें गैर आहे आणि भयावहहि आहे असें माझें निश्चित मत झालें आहे.

या मुद्द्यावर अर्थातच डॉ. पंजाबरावांनीं मोठें निर्भीड भाषण केलें. ते म्हणाले, “ खेड्यांत राहणाऱ्या बहुसंख्य व मागसलेल्या लोकांच्या अडचणी लक्षांत घेऊन जर का तुम्ही त्यांची कांहीं तरतूद करणार नाहीं तर या देशांत क्रांति होईल ! ही बहुसंख्य जनता अस्पृश्यांपेक्षांहि अडाणी व मागसलेली आहे ! आणि यांत तिचा दोष नाहीं.” कमिशनवर ग्रामीण मनोवृत्तीचे सदस्य असावेत असें त्यांनीं सुचविलें.

वज्रेश्वरबाबू प्रांतीय स्वायत्ततेचे प्रतिज्ञाबद्ध वैरी आहेत. ते म्हणाले, ‘ प्रांतीय कमिशनें नकोच आहेत मुळीं. सारे सरकारी नोकर हे हिंदुस्थान सरकारचेच नोकर असले पाहिजेत ! ’

अस्पृश्य, शीख इ. अल्पसंख्यजमातींनीं अर्थातच आपापलें ताकाचें भांडें राष्ट्रीयतेचें आवरण ठेवण्याचा प्रयत्न करीत पुढें केलें ! मागसलेल्या व अशिक्षित वर्गांच्या सवलती आणि गुणवत्तेचा विकास यांचा मेळ घालण्याचें कौशल्य ज्यांच्या ठिकाणीं असेल, तेच हा प्रश्न सोडवूं शकतील.

शरणार्थींचा प्रश्न दिल्लीचा मुख्य प्रश्न आहे. अनेक शरणार्थी तरुण व तरुणी उद्योगाच्या शोधांत आहेत. त्यांच्या वृत्तींत संताप आहे, उद्वेग आहे, किंचित् सूडबुद्धिहि आहे. दोन-तीन शरणार्थी कुटुंबांत जाऊन त्यांच्याकडे जेवून आलों. एका कुटुंबांतील सोळा वर्षांची मुलगी मोठी जहांबाज आहे. ती समाजवादी पक्षाची सदस्य आहे. सकाळपासून रात्रीपर्यंत अगदीं अंग मोडून पक्षसंघटनेचें काम करते आणि पोटाचा उद्योगहि करते. थकवा नाहीं, कंटाळा नाहीं. संताप आहे, क्रांतीची उत्कंठा आहे ! विवेकाला व विचाराला अवकाश नाहीं. दुसरें कुटुंब त्या मानानें बरेंच सौम्य आहे. मुलगी

कॉलेजांत जाते. मधून मधून माझ्याकडे येऊन भजनें म्हणून दाखविते. पहिल्या मुलीकडे तिच्या मैत्रिणी जेवायला आल्या होत्या. दोघींनीं माझ्याशीं परिचय करून घेतला. आपल्या कुटुंबाच्या निर्वाहाला हातभार कसा लावतां येईल याची त्यांना तळमळ आहे. त्यांच्या जीवनांत इतर कशाला अवकाशच उरलेला नाहीं.

आज पार्टीपुढें डॉ. आंबेडकरांनीं भाषेच्या मुद्द्यासंबंधीं फार चांगला मसुदा मांडला. आतांपर्यंत अनेक मुद्द्यांबद्दल कमिट्या झाल्या. पण मला वाटलें इतका चांगला मसुदा क्वचितच तयार केला असेल कुठल्याहि कमिटीनें. मसुद्याच्या स्पष्टीकरणार्थ आंबेडकरांचें भाषणहि सुबोध झालें. या मसुद्यांत मुख्यतः खालील गोष्टी आहेतः—

( १ ) राज्यभाषा हिन्दी असावी. लिपि नागरी. अपवाद—आंकडे तूर्त इंग्रजी वापरण्यांत येतील. तूर्त म्हणजे राष्ट्रपति ठरवितील तोंवर.

( २ ) आजपर्यंत इंग्रजीचा उपयोग ज्या ज्या सरकारी कामांकरितां व ज्या मर्यादेंत होत आला आहे तसाच तो पंधरा वर्षेपर्यंत होत राहील; दरम्यान राष्ट्रपतीच्या हुकुमानें इंग्रजीच्या बरोबर हिंदीचाहि उपयोग होऊं शकेल.

( ३ ) पंधरा वर्षांनंतर इंग्रजीचा उपयोग कितपत व्हावा तें पार्लमेंट ठरवील.

( ४ ) आंकड्यांच्या बाबतींत किंवा इंग्रजीच्या ऐवजीं हिंदीचा उपयोग करण्याच्या बाबतींत हुकूम करायचा झाल्यास राष्ट्रपतीला तो त्याकरितां नेमलेल्या कमिशनच्या शिफारशीप्रमाणेंच करतां येईल. कमिशनची तरतूद योजनेंत आहे.

( ५ ) केंद्र व प्रांत यांची सरकारी भाषा हिंदीच असावी हें आंबेडकरांचें मत कायमच आहे. त्यांनीं तें पुन्हां सांगितलें. पण त्यांचा पराभव झाला. प्रांतांना आपापली भाषा किंवा हिन्दी वापरतां येईल. वाटल्यास त्यांनीं इंग्रजी ठेवावें. आंतरप्रांतीय व्यवहाराची भाषा व प्रांत आणि केंद्र यांच्या व्यवहाराची भाषा हिन्दी राहील. एखाद्या प्रांतांत अल्पसंख्याकांची पुरेशी संख्या असल्यास त्यांच्या भाषेलाहि राष्ट्रपति मान्यता देऊं शकतील.

यानंतर दोन मार्गदर्शक सिद्धान्त घातले आहेतः—

( १ ) हिन्दीचें स्वरूप संग्राहक असावें व व्यापक असावें. तिच्यांत हिंदुस्थानी शैलीचाहि समावेश व्हावा. शब्दांची आयात मुख्यतः संस्कृतांतून व इतर भाषांतूनहि व्हावी.

( २ ) सबंध देशाकरितां केंद्रीय सरकारनें नागरी लिपीचा व्यवहार चालू करण्याचा प्रयत्न करावा अशा आशयाचा मसुदा आहे. मला वाटतें फार चांगला आहे. पण हिन्दीचे दुराराध्य अभिमानी फाजील आग्रहामुळें अतिरेकी वृत्ति स्वीकारतील अशी भीति वाटते. आंबेडकरांनीं अशी कळकळीची विनंति केली कीं, हा जिव्हाळ्याचा व मूलगामी मुद्दा आहे, मेहेरबानी करून हा बहुमतानें ठरवूं नका, एकमतानेंच ठरवा.

मसुद्याचा विचार पार्टींत उद्यां होईल.

तुझा,
दादा

— ३६ —

१३९, कॉन्स्टिटयूशन हाउस,
नवी दिल्ली,
२४-८-४९

प्रिय चन्दूराजा,

पाब्लिक सर्व्हिसेस् कमिशनच्या प्रकरणांत एकंदर आठ कलमें आहेत. त्या कलमांवर काल पुढें चर्चा झाली. डॉ. पंजाबरावांनीं पुन्हां आपली भूमिका स्पष्ट केली. ते म्हणाले कीं, आमच्यावर जातिवादाचा आरोप करण्यांत येतो. पण वास्तविक तो आरोप आम्हांला लागू होत नाहीं. जातिभेदामुळेंच ज्यांना विद्यार्जनाची संधि मिळाली ते आपल्या सवलती सोडूं इच्छीत नाहींत यांत जातिवादाला चिकटून राहण्याची वृत्ति त्यांची आहे, आमची नव्हे !

सरदार हुकूमसिंहांची उपसूचना मोठी गमतीची होती. त्यांचें म्हणणें असें, कीं शिक्षणाच्या व आर्थिक बाबतींत मागसलेल्यांना खास सवलत द्यावी. एकदां आर्थिक बाबतींत मागसलेल्यांचाहि समावेश करतों म्हटलें तर मग मागसलेल्या जातींची कांहीं मर्यादाच ठरवितां येणार नाहीं हें उघडच आहे.

तर्कशुद्धतेची दृष्टि बाजूला ठेवली, तर मूळ मुद्दा खरा आहे. कांहीं अपराध नसतांना केवळ जन्मामुळें व परिस्थितीमुळें ज्यांना शिक्षणाला पारखें व्हावें लागलें त्यांना सर्वसामान्य नियम लागू करतां येणार नाहीं, या म्हणण्यांत तथ्य आहे. म्हणूनच जेव्हां यतिराजांनीं असा आक्षेप घेतला, कीं डॉ. पंजाबरावांचा मुद्दा मूलभूत हक्कांत मान्य केलेल्या धर्म-जातिनिरपेक्ष समानतेच्या तत्त्वाच्या विरुद्ध आहे, तेव्हां पंजाबरावांनीं ठासून सांगितलें, कीं त्या तत्त्वाची योग्य अंमलबजावणी करण्याचा उपायच मीं सुचविला आहे. मागसलेल्या जाती मागसलेल्या राहाव्या असा आमचा हेतु नाहीं. ' मागसलेल्या ' हें विशेषण त्यांच्या आजच्या स्थितीचें वर्णनात्मक आहे. ठाकुर फूलसिंग यांनीं डॉ. पंजाबरावांचें समर्थन करतांना मोठा मजेदार युक्तिवाद केला. ते म्हणाले, " लोकांचें राज्य म्हणजे कांहीं मूठभर साक्षर लोकांचें राज्य नव्हे. बहुसंख्य जनता निरक्षर आहे. त्याअर्थीं निरक्षरांचें राज्य व्हायला काय हरकत आहे ? ज्या कामाकरितां नेमणूक करायची असेल त्या कामाला लागणाऱ्या योग्यतेचा विचार व्हायला हवा, असें म्हणून शेवटीं त्यांनीं न कळत मागसलेल्यांचा पक्षच सोडून दिला !

बाबू वज्रेश्वरप्रसाद यांनीं आपल्या नेहमींच्या खड्या आवाजांत व विरामरहित वाक्यांत असें प्रतिपादन केलें कीं, कुठल्याहि राजकीय पक्षाशीं ज्याचा संबंध असेल अशा माणसाची नेमणूक सरकारी नोकरींत होऊं नये. राज्यकर्त्यांप्रमाणें राज्यकर्मचारीहि प्लेटोच्या तत्त्वज्ञ शासकांप्रमाणें संसारापासून व राजकारणापासून अलिप्त असायला पाहिजेत. नागप्पा यांनीं नेहमींप्रमाणें शिरा ताणून ताणून व आवाजापेक्षां आणि भाषेपेक्षांहि हातवाऱ्यांवर अधिक भर देऊन भाषण केलें. ते म्हणाले, हा योग्यतेचा मुद्दा मोठा भानगडीचा आहे. विद्यापीठाच्या परीक्षेंत पहिल्या वर्गांत आलेलीं माणसें मुलाखतीच्या वेळीं तिसऱ्या दर्जाचीं ठरतात. ' नेकटाय बांधतां येतो का

नाहीं, कपडे नीट घालतां येतात कीं नाहीं, आरशी कशी आहे, दिसायला कसा आहे, एकंदरींत चेहरा, डौल वगैरे कसा आहे अशा एक ना दोन, किती तरी गोष्टींचा विचार करण्यांत येतो. त्यामुळें पहिल्या दर्जाचा माणूस तिसऱ्या वर्गाचा ठरतो आणि त्याचप्रमाणें तिसऱ्या दर्जाचा पहिल्या प्रतीचा ठरतो ! महाराज, योग्यतेचा व्यर्थ बाऊ करूं नका !

राजबहादुर यांनीं गुणवत्तेचें समर्थन करतांना मोठें युक्तिवादपूर्ण व जोरदार भाषण केलें. ते म्हणाले, जातीचा नायनाट करणें हाच एकमात्र तोडगा गुणकारी ठरेल. सवर्णविवाह कायद्यानेंच बंद करण्याची सूचना त्यांनीं केली.

अनंतशयनम् अय्यंगार, डॉ. कुंझरू व डॉ. आंबेडकर यांनीं सर्व टीकाकारांना उत्तर देऊन मूळ कलमांचें समर्थन केलें. आंबेडकर म्हणाले, कीं या घटनेंत शेडयुल्ड कास्ट व मागसलेल्या जाती यांच्या संरक्षणाची पुरेशी तरतूद आहे. पब्लिक सर्व्हिस कमिशनचा सभासद हा सर्वांचा आहे. त्यानें सर्वांचा विचार केला पाहिजे. कुठल्याहि एका वर्गाचा, जातीचा किंवा संप्रदायाचा हितकर्ता कमिशनवर असूं शकत नाहीं. मागसलेल्या जाती कोणत्या हें ठरविण्याकरितां एक कमिशन नेमण्यांत येईल. निरनिराळ्या प्रांतांत मागसलेल्यांच्या सदरांत निरनिराळ्या जातींची गणना होईल हें उघड आहे.

संध्याकाळीं पार्टीच्या सभेंत पुन्हां राज्यभाषेच्या प्रश्नावर सामान्य चर्चात्मक भाषणें झालीं. एकंदरींत भाषणें उंच पातळीवरून झालीं आणि वातावरण फार चांगलें होतें.

मौलाना हिफझुर रहमान यांनीं हिन्दीविरुद्ध मोठें आवेशयुक्त भाषण केलें. भाषणाचा चांगला परिणाम अर्थातच झाला नाहीं. राजकुमारींनीं हिंदुस्तानी विषयींचा आपला आग्रह कां होता हें सांगून शेवटीं मसुद्याला पाठिंबा दिला. श्री. तिरुमलराव व म्हैसूरचे हनुमन्तय्या यांनीं दक्षिण भारतीयांची बाजू मांडून मसुद्याचें समर्थन केलें. टंडनजींनीहि मसुद्याच्या मार्गदर्शक सिद्धांतांतील 'हिन्दुस्तानी'चा हिन्दींत समावेश करणारें कलम देखील मान्य केलें. त्यांनीं मसुद्यांतील कांहीं कलमांना उपसूचना मांडण्याचा

आपला बेत जाहीर केला. अनंतशयनम् अय्यंगार यांनीं दक्षिण भारतीयांची बाजू मांडतांना इंग्रजी आंकडे स्वीकारलेच पाहिजेत, आमच्या विषयींच्या तुमच्या आस्थेचें तें द्योतक ठरेल, असें सांगितलें. काका गाडगीळ दक्षिण भारतीयांना म्हणाले, ' अरे हत्ती विकल्यानंतर आतां ' अंकुशे किं विवादः ! ' ठक्करबाप्पा म्हणाले, ' बाप हो, उंट घशाखालीं उतरूं दिलांत, आतां लहानसा किडा गिळणें जिवावर कां येऊं देतां ? '

पं. जवाहरलालांचें भाषण नेहमींप्रमाणें कळकळीचें, स्पष्टोक्तिपूर्ण तर झालेंच पण विचारप्रवर्तकहि झालें. भाषा, वाङ्मय, विज्ञान इ० विषयांवर जवाहरलाल बोलूं लागले म्हणजे त्यांच्यांतील रसिक कलाकार जागृत होतो. भाषेवर त्यांचें अगाध प्रेम आहे. भाषेच्या शक्तीवरील त्यांची श्रद्धा अढळ आहे. ते म्हणाले, या प्रश्नाला तीन बाजू आहेत--( १ ) हिंदी-हिंदुस्तानी ( २ ) उत्तर-दक्षिण, ( ३ ) इंग्रजीचें स्थान घेण्याकडे उत्तरोत्तर प्रगति.

पहिल्या मुद्द्याविषयीं बोलतांना पंडितजी म्हणाले, या मुद्द्याविषयीं मसुद्यांत व्यक्त झालेली वृत्ति मला फारशी आवडलेली नाहीं. ती वृत्ति भयावह आहे, हानिकारक आहे, चुकीची आहे, अ-भारतीय आहे. म्हणून ' हिंदुस्तानी 'चा समावेश करणारें कलम कोठें तरी मार्गदर्शक तत्त्वांच्या प्रकरणांत न घालतां, याच प्रकरणांत घालावें. भारतीय वृत्ति म्हणजे संग्राहक वृत्ति, इतरांना आत्मसात् करण्याची वृत्ति, हें विसरूं नका.

दुसरा मुद्दा त्यांनीं असा सुचविला कीं देशांतील सर्व प्रमुख भाषांची एक यादी करून त्यांना सरकारी मान्यता देण्यांत यावी. या यादींत उर्दू भाषा व उर्दू लिपि यांचाहि समावेश व्हावा. या भाषांपैकीं कोठल्याहि भाषेंत अर्ज करण्याची मोकळीक नागरिकांना असावी. मार्गदर्शक तत्त्वांत एक असेंहि तत्त्व आहे, कीं मध्यवर्ति सरकारनें सबंध देशांत नागरीचा प्रचार वाढविण्याचा प्रयत्न करावा. त्या बाबतींत जवाहरलाल म्हणाले, ' अशा प्रकारचें कलम घालून विनाकारण संशयाला व विरोधी वृत्तीला जागा देण्यांत अर्थ नाहीं.'

इंग्रजी किती दिवस राहावी हें अहिंदी भाषीयांच्या मतावर अवलंबून असावें अशी त्यांनीं सूचना केली.

आंकड्यांच्या बाबतींत ते म्हणाले, " जों जों मी विचार करतों, तों तों माझें असें निश्चित मत होत आहे कीं ज्यांना आम्ही इंग्रजी आंकडे म्हणतों, पण वस्तुतः जे हिंदीच आहेत, तेच आपण स्वीकारूं या. ते मुळांत आपलेच आहेत, आज ते आंतरराष्ट्रीय झाले तरी आपण स्वीकारूं या. विज्ञान, उद्योग, सैन्य, आरमार, सर्वच बाबतींत हे आंकडे सोयीचे आहेत. तेव्हां ते स्वीकारावेत.

एकंदरींत चर्चा वरच्या पातळीवरून केल्याबद्दल जवाहरलालांनीं सभेचें अभिनंदन केलें.

२५-८-४९

काल सकाळीं घटनापरिषदेंत हरिजन व आदिजन यांचा दिवस होता. ज्याला जें वाटेल तें त्यानें बोलून घेतलें. कांहीं सुमार म्हणून राहिला नाहीं. पुष्कळ दिवसांनंतर काल पुन्हां आदिजनांचे पुढारी श्री. जयपाल सिंह बोलले. ' हा देश मूळ आमचा आहे. तुम्ही सारे आगंतुक आहांत. आमचा देश तुम्ही बळकावलांत, आम्हांला बेगुमानपणें पायाखालीं तुडविलेंत, आमची भाषा, संस्कृति, यांचा विध्वंस केलांत, सहा हजार वर्षांपासून आम्ही तुमच्या गुलामगिरींत खितपत आहोंत. या पापाचें अंशतः तरी परिमार्जन करा, " इत्यादि इत्यादि त्यांचें कायम ठशाचें भाषण झालें.

अनेक हरिजन वक्त्यांनीं मोठीं कळवळून व तळमळून भाषणें केलीं. हेमचंद्रराव खांडेकरांचा आवाज तर खूपच चढला होता. त्यांनीं हरिजनांचीं गाऱ्हाणीं मोठ्या आवेशपूर्ण भाषेंत वेशीवर टांगलीं आणि हरिजनांकरितां प्रांतांत व केंद्रांत एक स्वतंत्र खातेंच उघडून त्याकरितां एक खास दिवाण नेमण्यांत यावा, अशी सूचना केली.

काल व आज या विषयावर बरीच चर्चा झाली. अध्यक्षांनीं आदिजनांना व हरिजनांना आपला मनस्ताप व्यक्त करण्यास भरपूर वाव दिला. अँग्लो-इंडियनांना दहा वर्षांनंतरहि ' राखीव जागा ' हव्या आहेत. पण पं. ठाकुरदास भार्गवांनीं दहा वर्षांनंतर ' राखीव जागा ' आपोआप नाहींशा होतील, अशी उपसूचना आणली व आंबेडकरांनीं ती स्वीकारली, म्हणून तें प्रकरण संपलें.

वादाचा समारोप करतांना आंबेडकर म्हणाले, "मुसलमानांना 'राखीव जागा' १८९२ च्या सुमाराला मिळाल्या. म्हणजे जवळ जवळ साठ वर्षे त्यांनीं या सवलतीचा फायदा घेतला. इतर कांहीं जमातींनाहि चाळीस वर्षे फायदा घेतां आला. अस्पृश्यांना तर अलीकडे हा हक्क मिळाला आहे. तेव्हां त्यांच्या बाबतींत अपवाद करून दहा वर्षांपेक्षां जास्त मुदत देण्याचा उदारपणा बहुसंख्याकांनीं दाखवायला हवा होता. पण हरकत नाहीं. आपण सर्वांनीं मिळून दहा वर्षांची मुदत मान्य केली आहे. मीं व माझ्या अस्पृश्य मित्रांनीं तिला मान्यता दिलेली आहे. आतां बदलण्यांत शोभा नाहीं. दहा वर्षांनंतर अस्पृश्यांना 'राखीव जागां'ची गरज भासली, तर त्या मिळविण्याइतकी बुद्धि व शक्ति त्यांच्यापाशीं आहे. बहुसंख्यांना माझें बर्कच्या शब्दांत एवढेंच सांगणें आहे कीं, "मोठें साम्राज्य व कोतें दिल एकत्र राहूं शकत नाहीं हें लक्षांत ठेवा."

आंबेडकरांच्या या गंभीर इशाऱ्यानंतर मूळ कलम मंजूर झालें. उपसूचना सर्वांनीं परत घेतल्या.

काल (ता. ४।८) संध्याकाळीं पार्टीमध्यें पुन्हां राज्यभाषेच्या मुद्यावर सर्वसामान्य चर्चा झाली. परवाच्या सभेंतील चर्चेचा बराच इष्ट परिणाम झालेला होता. टंडनजींनीं मसुद्यांत कांहीं सुधारणा सुचविल्या होत्या. जेथें 'प्रांतीय भाषेंत किंवा हिंदींत राज्यकारभार व हायकोर्टाचा कारभार चालत आला असेल किंवा चालूं लागला असेल, तेथें इंग्रजी कायम ठेवण्याचा आग्रह नसावा, ही त्यांपैकीं एक सूचना होती. त्याचप्रमाणें ज्या प्रांतांचा परस्पर-व्यवहार एखाद्या प्रांतीय भाषेंत अगर हिंदींत चालत असेल किंवा चालू करण्याचें ठरलें असेल, तेथेंहि इंग्रजीचा आग्रह नसावा अशी त्यांची दुसरी सूचना होती. त्यांच्या बाकीच्या सूचना आंकड्यांविषयीं व इंग्रजीच्या आयुर्मर्यादेविषयींच्या होत्या. वर सांगितलेल्या दोन सूचना जवाहरलालांना व इतरांनाहि मान्य होत्या. खुद्द राष्ट्रसभापति डॉ. पट्टाभि यांनीं त्या मांडल्या होत्या.

काल डॉ. रघुवीर, पं. लक्ष्मीकान्त मैत्र, दुर्गाबाई, मौ० आझाद व दिवाकर यांचीं भाषणें झालीं.

पं. लक्ष्मीकान्त मैत्र म्हणाले, " दक्षिण व उत्तर यांच्या वादाचा उल्लेख जो तो करतो, जणुं कांहीं होकायंत्रांत दुसऱ्या दिशाच नाहींत. पश्चिमे-कडील लोकांच्या वतीनें मी बोलत नाहीं. मी बंगाली आहें. म्हणून पूर्वे-कडील लोकांच्या वतीनें बोलतों. आमच्या भाषा म्हणजे कांहीं ' बोल्या ' नाहींत. त्या समृद्ध भाषा आहेत, त्यांचीं उत्कृष्ट वाङ्मयें आहेत. हिंदीचा अंगीकार करतांना आम्ही किती त्याग करीत आहोंत व ताण सहन करणार आहोंत याची आपण कांहीं तरी कदर करा. इंग्रजीची मुदत आम्हांला ठरवूं द्या. जरा सबूर. तुम्ही घिसाडघाई कराल किंवा आम्हांला फरफटत नेण्याचा घाट घालाल तर आम्ही तें चालूं देणार नाहीं. इंग्रजीचें इतकें वैर कां ? राममोहन रॉयांसारख्या आमच्या राष्ट्रनिर्मात्यांनीं इंग्रजीला आग्रहाचें आमंत्रण दिलें. इंग्रजीचा अव्हेर कराल तर पुढें पस्तावाल, ती मोठी घातक चूक ठरेल. हिंदी मला हवी आहे. नव्वद वर्षांपूर्वीं पहिलें हिंदी वर्तमानपत्र आमच्या कलकत्त्यांतच निघालें. हिंदी पाहिजे, पण इंग्रजीची अजिबात हकालपट्टी नको. "

श्री. दुर्गाबाईंनीं मुद्दाम हिंदींत भाषण केलें. फार छान हिंदी होतें त्यांचें. त्या म्हणाल्या, " आज तीस वर्षें मी हिंदी शिकत आहें आणि कित्येक वर्षें शिकवीत आहें, तरी मला सहज बोलतां येत नाहीं. आम्हांला तुमची भाषा शिकावी लागणारच आहे. पण तुम्ही मात्र आमच्या भाषेचें ज्ञान मिळवायला तयार नाहीं. आमच्यावर बळजबरी करूं नका. परस्पर-सद्भावाचें वातावरण निर्माण कराल तर कार्यभाग सुकर होईल. आम्ही सांस्कृतिक किंवा साहित्यिक दृष्टीनें हिंदीचा स्वीकार करीत नसून राजकीय ऐक्याकरितां, फक्त राष्ट्रीय सोयीच्या दृष्टीनें करीत आहोंत. त्या भाषेविषयीं आमच्या मनांत कांहीं भावना नाहींत. आजची राजकीय गरज हें एकच तत्त्व आहे. इंग्रजीच्या कालमर्यादेचा प्रश्न अहिंदीभाषीयांना ठरवूं द्या. कृपा करून हा मसुदा आहे तसाच स्वीकारा—उपसूचना नकोत, मत विभागणी नको."

मौ. आझादांचें भाषण त्यांच्या नेहमींच्या लौकिकाला अनुरूप असें भारदस्त व समतोल झालें नाहीं. त्यांना वातावरणहि प्रतिकूल होतें. ते म्हणाले, " हिंदींत हिंदुस्तानी, उर्दू वगैरे सर्व शैलींचा समावेश होईल असा

माझा समज पंतजी व जवाहरलालजी यांच्या भाषणांवरून झाला होता. पण तो चुकीचा आहे. आपण मोठी संकुचित दृष्टि स्वीकारलेली आहे. म्हणून मला मसुदा पसंत नाहीं. ''

भाषेच्या स्वरूपाचें विवेचन करतांना त्यांनीं असें सांगितलें कीं, भाषा शब्दांनीं बनत नसून एका ' चौकटी ' नें बनत असते. शब्द त्या चौकटीचे खिळे आहेत.

जातां जातां मौ. साहेबांनीं एक असेंहि विधान केलें कीं, ' उर्दू लिपि व उर्दू भाषा यांचा संबंध मुसलमान व इस्लाम यांच्याशीं उगीच लावण्यांत येतो. ' हें विधान खरेंहि आहे आणि खोटेंहि आहे. मुसलमानांनाच फक्त त्या भाषेबद्दल जिव्हाळा वाटतो आणि ज्याची ती स्वभाषा आहे त्या हिन्दूलाहि वाटत नाहीं, हें मात्र निर्विवाद आहे. ''

'' अलीकडे दीड वर्षांपासून मी सतत असा प्रयत्न सुरू केला आहे कीं, उर्दू भाषा व लिपि जाणणाऱ्या दरेक इसमानें नागरी व हिंदी शिकायलाच पाहिजे. इंग्रजी मला नको आहे. पण कांहीं वर्षें राज्यकारभारांतील व विद्यापीठांतील तिचें स्थान कायम ठेवणें प्राप्त आहे '' असें त्यांनीं आपलें मत सांगितलें.

मौलानांच्या भाषणांत असन्तोष होता, रोष होता आणि त्याचमुळें दोषहि होता.

शेवटीं रंगराव दिवाकरांचें भाषण झालें. ते म्हणाले, '' या वादाला भलतेंच वळण लागत आहे. हिन्दी फक्त आमच्या राज्यकारभाराची भाषा होणार नसून, ती आमच्या आंतरप्रांतीय जीवनाची म्हणजे आन्तरप्रान्तीय विचाराची, व्यवहाराची व साहित्याची भाषा होणार आहे. यापुढें ती फक्त प्रांतीय भाषा राहाणार नाहीं, म्हणून आपण सर्वांनीं मिळून तिचा त्या दृष्टीनें विकास करायला पाहिजे. मला सबंध देशाकरितां एक लिपि हवी, पण तो प्रयत्न बिनसरकारी मार्गांनीं करावा. हा मसुदा सर्वांनीं मान्य करावा.''

या मसुद्यांत इंग्रजीची सरशी आहे, असें उत्तरभारतीयांना वाटतें. आणि दक्षिण भारतीयांना वाटतें कीं, हे ' भय्ये लोक ' आमच्यावर अम्मल गाजवूं इच्छितात. हिन्दीवाले आपली ठायीं ठायीं कशी कुचंबणा व विटंबना करीत आहेत, याचे अनेक काल्पनिक व खरे दाखले ते देत आहेत. ' इंग्रजी आंकडे ' हा आतां त्यांचा ' इभ्रतीचा मुद्दा ' होऊन बसला आहे. ' तुम्ही आमच्याकरितां काय करायला तयार आहांत याची परीक्षा यावरून होणार आहे, ' असें त्यांचें म्हणणें. कन्हैयालाल मुनशी व गोपालस्वामी अय्यंगार या नर्मदा-कावेरी पुत्रांनीं मिळून यांतून एक शक्कल काढली आहे. त्यांनीं या आकड्यांना ' आंतरराष्ट्रीय वापरांतील भारतीय किंवा हिंदी आंकडे ' असें यथार्थ नांव दिलें आहे.

या विषयाची अधिक चर्चा आज सायंकाळीं होईल. काल कॉन्स्टिट्यूशन क्लबमध्यें डॉ. राधाकृष्णन् यांना निरोप देण्याचा समारंभ झाला. राधाकृष्णन् कांहीं तरी उपयुक्त व सुंदर असें सांगतातच. या पाळीला त्यांनीं एकदोन मोठ्या मार्मिक गोष्टी सांगितल्या. शिक्षकाचें वैशिष्ट्य सांगतांना ते म्हणाले, ' विवेकपूर्ण अनिर्णय ' Conscientious indecision हें शिक्षकाचें लक्षण आहे. त्याच्या ठिकाणीं आग्रह नसतो. त्याची वृत्ति ' मोकळी ' open असते. याहि बाबतींत एक मोठी मार्मिक गोष्ट ते बोलले. ते म्हणाले, open म्हणजे empty नव्हे हो ! ' मोकळें ' म्हणजे ' पोकळ ' नव्हे. शिक्षकानें घाईनें मत बनवूं नये, त्याला ' क्षिप्रनिर्णया'ची गरज नसते, पण म्हणूनच भरीव व सम्यक् विचारांची गरज असते. अर्थस्वास्थ्य हा इतर स्वास्थ्यांचा पाया आहे, असाहि इषारा त्यांनीं देऊन ठेवलाच.

आजची बैठक दोन तासच चालली. कारण, मसुदासमितीला मुदपाकखान्यांत वेळ पाहिजे. उद्यांहि दोन तासच बैठक चालेल. संध्याकाळीं पार्टीच्या सभेंत भाषेवर भाषणें होतील.

तुझा,

दादा

१३९, कॉन्स्टिट्यूशन हाउस,
नवी दिल्ली,
३०-८-४९

चि. चन्दूराजाला अनेक उत्तम आशीर्वाद.

येथें झालेल्या शिक्षणाधिकाऱ्यांच्या परिषदेनें जेव्हां ' आशियाच्या एकीकरणा 'चा संकल्प केला, तेव्हां त्याचें समर्थन करतांना राष्ट्रसभापति डॉ. पट्टाभि म्हणाले, ' आधीं आपल्या देशाचें एकीकरण साधूं या. आपल्या येथें एक प्रकारचें सांस्कृतिक ऐक्य तर आहे, पण भाषिक ऐक्याच्या अभावीं तें व्यवहारांत उतरत नाहीं. '

याचा अनुभव मागील आठवड्यांत आला. अखिलभारतीय व्यवहाराच्या भाषेचा प्रश्न जसजसा धसाला लावण्यांत येत आहे तसतसा हा अनुभव येतो आहे कीं, या देशाचें सांस्कृतिक ऐक्यहि सर्वमान्य नाहीं. दक्षिण भारतांत, विशेषत: तमिळ प्रांतांतील लोकांत असें अनेक लोकांचें म्हणणें आहे कीं,संस्कृत-भाषाश्रित संस्कृति आमची संस्कृति नव्हे. तमिळ ही संस्कृत भाषेइतकीच जुनी भाषा असून ती कांहीं संस्कृतजन्य भाषांपैकीं नव्हे, असा त्यांचा दावा आहे. म्हणून त्यांना हिन्दी भाषेचें वर्चस्व किंवा तिचें व्यापक आधिपत्य मनांतून नको आहे. पण सांस्कृतिक ऐक्य असो किंवा नसो, त्यांना व्यावहारिक व राजकीय ऐक्य हवेंच आहे. म्हणून एक अखिलभारतीय व्यवहारोपयोगी भाषाहि मान्य करणें प्राप्त आहे. त्यामुळें त्यांची हिन्दीला मान्यता आहे. पण देशांत आपलें राजकीय व इतर दृष्टींनीं महत्त्व कायम ठेवण्याचीहि ते काळजी घेणार आहेत. त्यांचे सारे पवित्रे त्या धोरणानें योजिले जात आहेत.

मागील आठवड्यांत त्यांनीं ' आंतरराष्ट्रीय हिन्दी आंकड्यां 'चा आग्रह धरला. त्यांनीं तो मुद्दा कसोटीचा मानला. आपली सगळी इभ्रत इरेस लावली. उत्तरेकडील लोक आमच्याखातर काय स्वीकारायला तयार आहेत याची परीक्षा या मुद्यावरून आम्ही करूं, असें ते उघड उघड म्हणाले. अर्थात्, हा मुद्दा सद्भावाचें उपलक्षण म्हणून मानला गेला. शेवटीं या मुद्यावर उत्तर–

दक्षिणवादाला तोंड लागलें आणि उत्तर-दक्षिणभेद चव्हाट्यावर आला. ७४।७४ किंवा ७४।७५ अशीं मतें दोन्ही बाजूंना पडलीं. प्रादेशिक भेद-भावाचा कडेलोट झाला. ज्या प्रमुख प्रमुख पुढाऱ्यांच्या खांद्याला खांदा लाऊन स्वराज्याचा लढा चालविला, ज्यांचा श्रद्धेनें व विश्वासपूर्वक सत्कार केला, त्यांच्याविषयीं असत्याचरणाची व खोट्या सह्या केल्याची शंका घेण्यापर्यंत मजल गेली ! खुद्द बापू असते, तरी ते अमुक भाषा बोलणाऱ्यां-पैकीं आहेत, म्हणून भिन्न भाषीयांनीं त्यांच्या विषयींहि शंका घेण्यास कमी केलें नसतें हें उघड आहे. वर्ध्याच्या नीरा प्रकरणाच्या वेळीं जें काय घडलें, त्यावरून हें आणखी स्पष्ट होतें.

'अरे, हत्ती विकलांत आणि आतां अंकुशाकरितां भांडतां?', असें काकासाहेब गाडगीळांनीं दाक्षिणात्यांना विचारलें. त्यांचें उत्तर असें, कीं 'आमच्या हातांत अंकुश तरी राहूं द्या. त्यानें आम्ही हत्तीला कह्यांत ठेवूं शकूं.' आंकड्यांचा मुद्दा हा उभयपक्षीं 'इज्जतीचा प्रश्न' झाला आणि म्हणून त्यावरच रण माजलें.

या देशाचें नष्टचर्य संपलेलें नाहीं, याचें हें निदर्शक आहे. मुख्य प्रश्न मानसिक विच्छेदाचा आहे. 'मनोविच्छेद' झाला म्हणजे देशाची फाळणी व्हायला वेळ लागत नाहीं. दक्षिणेंतील लोकांचा मनोविच्छेद होऊं न देण्याची काळजी यावेळीं घ्यायला हवी होती. त्यांनीं हिन्दी भाषेला व नागरी लिपीला मान्यता दिलेलीच होती. आकड्यांच्या बाबतींत त्यांचा हट्ट पुरवून ती मान्यता पदरांत पाडून घेणेंच शहाणपणाचें झालें असतें. इंग्रजीची कालमर्यादा व आंकडे या बाबतींत नमतें घेऊन कार्यभाग साधून घेण्याचें कौशल्य दाखविण्यांतच यावेळीं देशहित आहे.

पाकिस्तानचा प्रश्न तादृश सोपा आहे. त्यांना उर्दू ही राष्ट्रभाषा कमी प्रयासांनीं करतां आली. कारण, पाकिस्तानपूर्वींहि जेथें जेथें उर्दू विरुद्ध प्रान्तभाषा असा सवाल आला, तेथें तेथें मुसलमानांनीं उर्दूचा आग्रह धरला आणि प्रान्तभाषेचा अव्हेर केला. अर्थातच भाषेपुरती तरी एक आन्तर-प्रान्तीय भूमिका अगोदरच तयार झालेली होती. म्हणून त्यांचें कार्य सुकर झालें. आपलें तसें नाहीं. आपण प्रांतीय भाषांना आपल्या मातृभाषा मानतों.

त्यामुळें हिन्दी स्वीकारतांना आपण फार मोटा त्याग करतों अशी आपली भावना असते. म्हणून हे सगळे वाद, सौदे, करारनामे उत्पन्न होतात.

दाक्षिणोत्तर भेद जर विकोपाला गेला, तर या देशाच्या अवदसेला सीमा राहाणार नाहीं. हिंदुस्थानीला हिंदीच्या पोटांत कसेंबसें बसण्यापुरतें स्थान मिळालें आणि उर्दूला नांवापुरती मान्यता मिळाली, हें शल्य मुसलमानांच्या मनांत सारखें बोंचत आहे. हें हिन्दी-नागरीचें तारूं आंकड्यांच्या खडकावर फुटलें, तर तें त्यांना इष्टच आहे. म्हणून ते सारे आन्तरराष्ट्रीय आंकड्यांच्या तर्फेंच आहेत. दाक्षिणात्यांसमोर नमणें म्हणजे देशांतील व्यवच्छेदक वृत्तीचा प्रतिकार करणें होय, अशी माझी तरी खात्री झालेली आहे.

हिंदी स्वीकारण्यांत आपण फार मोठा त्याग करीत आहोंत, असा अहिंदी प्रांतांचा प्रामाणिक समज आहे. जणुं कांहीं त्यांचा या देशाच्या ऐक्याशीं कांहीं संबंधच नाहीं. तें ऐक्य कायम ठेवण्याच्या बाबतींत त्यांची जणुं काय मुळीं जबाबदारीच नाहीं. या देशाचें ऐक्य कायम ठेवण्यांत आपण इतरांवर उपकार करीत आहोंत, असेंच दरेकाला वाटतें--आणि दुर्दैव असें, कीं तें प्रामाणिकपणानें वाटतें. म्हणजे हा देश कोणाचाच नव्हे. सगळेच एकमेकांवर उपकार करतात याचा अर्थ कोणीच कोणावर उपकार करीत नाहीं, असा करायला पाहिजे. पण परस्परोपकार म्हणजे माझा तुझ्यावर उपकार, इतकाच 'आत्मनेपदी' अर्थ करण्यांत येतो. त्यामुळें 'त्याग व उपकार माझा' आणि 'जबाबदारी व कर्तव्य तुझें' अशी मनोवृत्ति निर्माण झालेली आहे. 'प्रांतदेवता' व 'राष्ट्रदेवता' यांच्यांत 'आधीं' कोण, असा प्रश्न उत्पन्न झालेला आहे. 'प्रांतदेवता' ही 'ग्राम-देवते'-प्रमाणें सगुण आहे व रोजच्या व्यवहारांतली आहे; 'राष्ट्रदेवता' त्या मानानें दूरची व अव्यक्त आहे! माणूस दोन मालकांची चाकरी करूं शकत नाहीं!

वास्तविक राष्ट्रैक्याकरितां एक भाषा स्वीकारण्यांत कोणी कोणावर उपकार करीत नाहीं. देशाचें ऐक्य जर मनःपूर्वक सर्वांना हवें असेल, तर त्याकरितां करावा लागणारा त्याग हा त्याग नसून तो आवश्यक करभार किंवा हविर्भाव आहे. म्हणून उत्तर भारतीयांची भाषा स्वीकारण्यांत आम्ही

त्यांच्यावर उपकार करतों ही वृत्तीच अत्यंत संकुचितपणाची व देश-विघातक आहे.

अशा रीतीनें एकीकडे संकुचित प्रांताभिमान व प्रदेशाभिमान आहे आणि दुसरीकडे अनुदार व प्रतिक्रियाजन्य संस्कृतिवाद आहे. दाक्षिणात्यांनीं क्षेत्रवाद सोडावा असें जर उत्तर भारतीयांना वाटत असेल, तर त्यांनीं ' अर्धं त्यजति ' धोरणाचें अवलंबन केलें पाहिजे.

भाषेच्या वादामुळें उभयपक्षांच्या झालेल्या मनोभंगाची व मानभंगाची छाया घटना परिषदेच्या इतर कामावर पसरल्यावांचून कशी राहील ? सर्वांचाच विरस झालेला आहे. एक प्रकारची अनास्था व शिथिलता उत्पन्न झाली आहे. मसुदाकमिटीची मति कुंठित झाली आहे. प्रकरण चिघळत जाण्याची भीति सर्वांनाच वाटते अखिल भारतीय ऐक्याची आकांक्षा अजून शिल्लक आहे, हाच एकमात्र आशेचा आधार आहे. शुक्रवारीं पुन्हां हा प्रश्न पार्टीपुढें येईल.

हा प्रश्न संख्येचा मुळींच नाहीं. एकीकडे शंभर मतें असलीं आणि दुसरीकडे पन्नासच असलीं, तथापि जर एकीकडे सारीं दक्षिण भारतीयांचीं मतें पडलीं, तरी तें देशविघातकच ठरेल ! दक्षिण व उत्तर यांची मानसिक फाळणी होऊनच जाईल. या वादांत पूर्व पंजाबचे शीख कदाचित् हिंदी-वाद्यांचा पक्ष घेतील, पण पुढें लवकरच पंजाबी विरुद्ध हिन्दी हा वाद काढतील ! भाषावादा, तुझी मातब्बरी अतर्क्य आहे !

मध्यें घटना परिषदेचीं अधिवेशनें दोनदोन व दीडदीड तासांचीं झालीं. सभासदांना हें मुळींच आवडत नव्हतें यांत सार्वजनिक पैशाचें नुकसान होतें हें त्यांना जाणवत होतें. पण वातावरणच मोठें अनपेक्षित निर्माण झालें होतें. आजपासून पुन्हां पूर्ववत् चार तासांची बैठक होईल. पाहूं कें सदस्यांचा उत्साह व आस्था कितपत वाढतात तीं !

मध्यवर्ती कायदेमंडळांत काँग्रेसपक्षाचेंच एकाधिपत्य असल्यामुळें तेथील कामकाज अगदींच आळणी व फिकें वाटतें. त्याला थोडा चटकदारपणा यावा म्हणुन एका विरोधी पक्षाची स्थापना झालेली आहे. सुप्रसिद्ध व निष्ठावान् अर्थपंडित प्राध्यापक खुशाल तलकशी शहा हे त्या पक्षाचे पुढारी

आहेत. श्री. दामोदरस्वरूप शेट व समाजवादी पक्षांत नुकतेच सामील झालेले कांहीं माजी कॉंग्रेस सभासद या नवीन विरोधी पक्षांत दाखल झाले आहेत. मुसलमान सभासद अर्थातच मोठ्या उत्साहानें सामील झाले आहेत. ते साम्यवादी होतील, समाजवादी होतील, मजूरवादीहि होतील. अधिकारारूढ पक्षाच्या जो कोणी विरुद्ध असेल तो त्यांचा सोयरा व आप्त आहे ! विरोधी पक्ष अवश्य हवा. पण केवळ विरोधाकरितां उभारलेला विरोध फारसा परिणामकारक व भरीव स्वरूपाचा ठरत नाहीं. आज जो विरोधी पक्ष बनला आहे त्यांतील सभासदांचें एकमात्र ‘ समानाधिकरण ’ विरोध हेंच आहे. कांहीं मुसलमान सदस्यांनीं तर हिंदु कोड बिला विरुद्धहि बोलायला कमी केलें नाहीं. जेथें जेथें विरोधाला संधि असेल, तेथें तेथें त्यांना ती हवीच आहे.

सायंकाळीं पार्टींत मोबदल्याचा प्रश्न आला. पं. जवाहरलालजींनीं एक मसुदा मांडला. तो फारसा असंदिग्ध नव्हता. त्यामुळें कोणाचेंच समाधान होण्यासारखें नव्हतें. समेटाचें स्वरूप दोन प्रकारचें असूं शकतें. ( १ ) तो दोन्ही पक्षांना अंशतः मान्य असतो; म्हणजे दोन्ही पक्षांना सारखाच मान्य असतो. ( २ ) तो दोन्ही पक्षांना सारखाच अमान्य असतो. दुसऱ्या पक्षाची सरशी झाली नाहीं, इतकेंच समाधान दरेक पक्षाला लाभतें ! आपल्या देशांत आपल्याला एकमेकाचें पाणी चालत नाहीं, अन्न चालत नाहीं, हुक्का चालत नाहीं, सोयरीक चालत नाहीं, त्याच प्रमाणें भाषा चालत नाहीं आणि योजनाहि चालत नाहीं. जें एकमेकांचें नसेल तें तेवढ्या गुणामुळेंच दोघांनाहि चाललें नाहीं तरी खपतें. आजचा मसुदाहि असाच अभावात्मक गुणसंपन्न आहे. तो दोन्ही पक्षांना सारखाच अमान्य असल्यामुळें दोघांनाहि परवडला !

तुझा,

दादा

१३९, कॉन्स्टिट्यूशन हाउस,
नवी दिल्ली.
ता. १४-९-४९

चि. चंदूराजाला अनेक उत्तम आशीर्वाद.

घटना परिषदेंत आसामच्या आदिवासींविषयींचा वाद चांगलाच रंगला. त्याला आसाम प्रांतांतील स्थानिक राजकारणाचा रंग भडकपणानें चढल्यामुळें विशेष मनोरंजक स्वरूप प्राप्त झालें. मनोरंजक शब्द मी विचारपूर्वक वापरलेला आहे. वक्ते जरी तीव्रतेनें व तावातावानें बोलत होते, तरी एकंदरींत दोन्ही पक्षीयांच्या मनांत आदिवासीयांच्याबद्दल सारखाच जिव्हाळा होता.

आदिवासी व मागासलेले वर्ग यांच्या विषयींच्या कलमावर भाषण करतांना डॉ. पंजाबराव देशमुख यांनीं घटनेच्या भाषेवर मोठी बहारीची टीका केली. ते म्हणाले, " या घटनेंत यद्यपि-तथापि, किंतु-परंतु, जरी असें असलें तरी पण, इत्यादि मुरड घालणाऱ्या शब्दप्रयोगांचा इतका भरणा आहे कीं, जें सुरवातीला म्हटलेलें असतें त्याच्या अगदीं उलट शेवटल्या वाक्यांत म्हटलें असल्याचें आढळून येतें. आपण एखाद्याला म्हणावें, 'तूं पुरुष आहेस हें मी जाहीर करतों. तूं जरी पुरुष असलास तरी तुला लुगडें नेसण्याची मोकळीक राहील. यद्यपि तूं लुगडें नेसलेला असलास, तथापि तुला गांधीटोपी घालण्याची मुभा राहील आणि इतकेंहि करून तुला स्वतःला स्त्री देखील म्हणवून घेतां येईल.' महाराज ! या घटनेची भाषा अशा थाटाची आहे." ज्यांना कायदेशीर भाषेच्या खाचाखोंचा, कावे आणि वळसे फारसे कळत नाहींत व आवडतहि नाहींत, त्यांना अर्थात् या वर्णनानें गुदगुल्या झाल्या. त्यांतील मार्मिक विनोद सगळ्यांनाच आवडला.

पूर्वयोजनेप्रमाणें ता. १० ला संपत्तीच्या मोबदल्यासंबंधींच्या कलमाचा मसुदा सभागृहाचे नेते खुद्द श्री. जवाहरलाल नेहरू यांनींच मांडला मसुदासमितींत त्याबाबतींत एकमत झालेलें नव्हतें. डॉक्टर आंबेडकरांना तो मसुदा

गुळमुळित आहे, ‘रामाय स्वस्ति रावणाय स्वस्ति’च्या वृत्तीचा आहे असें वाटत होतें. प्राप्त परिस्थितींत याहून कांहीं निराळें करतां येणें शक्य नाहीं, असें पं. गोविंदवल्लभपंत, जवाहरलालजी आणि इतर राजकीय पुढारी यांस वाटत होतें. प्रत्यक्ष राज्यकर्ता आणि तर्कनिष्ठ व सिद्धांतवादी शास्त्री यांच्या मनोभूमिकेंतील फरक स्पष्टपणें दिसून आला. आंबेडकर आपल्या बौद्धिक सचोटीकरितां प्रसिद्ध आहेत. म्हणून त्यांनीं जरी सदर मसुद्याला विरोध केला नाहीं, तरी त्याचें पौरोहित्य करण्याचें टाळलें. आणि ही संबंध चर्चा चालू असतांना ते सभागृहांत मागल्या बाजूला बसलेले किंवा सभागृहाबाहेर दुसरीकडे वाचत बसलेले आढळून येत.

ज्यावेळीं एखादा प्रत्यक्ष कर्तव्यात्मक प्रश्न उभा राहातो, त्यावेळीं कारभाराची धुरा ज्याच्या खांद्यावर असेल त्याच्यावरच सर्वांत जास्त जबाबदारी असते हें उघड आहे. त्याला आपलीं महनीय तत्त्वें व उराशीं जतन करून बाळगलेल्या भावना संभाळून प्राप्त कर्तव्य पार पाडावें लागतें. अशा वेळीं जवाहरलालजी आपली ध्येयवादी भूमिका सांभाळण्याकरितां कायद्यांत थोडेसें वैगुण्य राहिलें तरी पत्करतात, हेंच त्यांचें वैशिष्ट्य आहे. जवाहरलाल हे फक्त आमच्या देशाचे मुख्य प्रधान नाहींत, नेतेहि आहेत. नेत्याला लागणारी ध्येयदृष्टि आणि उन्नत भूमिका त्यांच्या इतकी दुसऱ्या कुठल्याहि व्यक्तींत नाहीं. हा माणूस पराकाष्ठेचा सुसंस्कृत आहे. त्याचें हृदय उदार व उदात्त आहे. बहुश्रुतपणांत, विद्याव्यासंगांत आणि विद्वत्तेंतहि त्याचा हात या देशांतील फारशीं माणसें धरूं शकतील असें नाहीं. असा हा बहुगुणसंपन्न आमचा नेता आहे. बौद्धिक प्रामाणिकतेमुळें त्यांच्या ठिकाणीं एकप्रकारचा अनिर्णयाचा भास होतो. ध्येयवादित्वामुळें त्यांना कायद्याच्या बिनचूक व कांटेकोर परिभाषेविषयीं फारशी तमा वाटत नसल्याचें दिसून येतें.

ज्यांत निरनिराळ्या दृष्टिकोनांचा व मनोवृत्तींचा समन्वय करण्याचा प्रयत्न असेल, अशा प्रश्नावर जवाहरलालजी बोलूं लागले म्हणजे ते वादविवादाची भूमिका पुष्कळच उन्नत करतात. त्यांच्या भाषणांत त्यांची ध्येयनिष्ठा, सामान्य माणसांविषयींचा त्यांचा जिव्हाळा, त्यांची बहुश्रुतता आणि अंतःकरणाची तळमळ हे सगळे गुण उमटलेले असतात. त्यांना

भाषा नटवावी लागत नाहीं. अलंकार शोधावे लागत नाहींत. अत्यंत सोप्या, सहजप्रवाही, गोड अशा इंग्रजींत ते आपलें म्हणणें मांडतात. कलाकृतीच्या प्रयत्नांचा कुठें भास होत नाहीं. पण कलाकृति पाहिल्याचा आनंद तर होतो.

मोबदल्याच्या प्रश्नावर भाषण करतांना ते म्हणाले, "या प्रश्नावर फार प्रसिद्ध व महान् कायदेपण्डितांनीं आपापल्यापरीनें प्रकाश पाडलेला आहे. पण हे प्रकाशाचे झोत निरनिराळ्या बाजूंनीं इतके टाकण्यांत आले कीं, त्यांच्या गर्दींत फक्त अंधाराचेंच भान शिल्लक राहिलें. मूलभूत प्रश्न खासगी मालकीचा आहे. आम्ही खासगी मालकी मान्य केलेली आहे. पण याचा अर्थ असा नाहीं कीं, समाजाच्या हिताचें आणि समाजाच्या मालकीचें तत्त्व आम्ही झुगारून दिलेलें आहे. व्यक्तीचा हक्क व समाजाचे हित यांच्यामध्यें वास्तविक विरोध नाहीं आणि नसावा. पण विरोध उत्पन्न झालाच तर त्याचा निर्णय कुणी करावा? अर्थात् लोकांनीं; आणि लोकराज्याच्या आजच्या व्याख्येप्रमाणें लोकप्रतिनीधींच्या सभेनें. प्रातिनिधिक लोकसत्तेत लोकप्रतिनिधींची सभा ही देशांतील सर्वश्रेष्ठ संस्था होय. तिचा निर्णय अखेरचा मानला पाहिजे. न्यायालयांची व न्यायाधीशांची सत्ता देखील एका मर्यादेपलीकडे लोकसभेच्या सत्तेपेक्षां गौणच मानावी लागेल. लोकांना ज्यावेळीं एखादे क्रांतिकारक पाऊल टाकायचें असेल त्यावेळीं कोर्ट-कचेऱ्यांच्या कटकटी व कायदेबाजी त्यांच्या आड येतां कामा नये. एकंदर आशियाखंडाची परिस्थिति पाहिली असतां आज शेतकीसंबंधीं सुधारणेची जेवढी निकड आहे तेवढी इतर कशाचीहि नाहीं. म्हणून आम्ही जमीनदारी पद्धतीचा शेवट करण्याचें योजिलेलें आहे. हा आमचा निश्चय आहे आणि तो अढळ आहे. न्याय्य मोबदल्याखेरीज कोणाचीहि मालमत्ता हिरावून घेऊं नये हें तत्त्व मान्य, पण न्याय्यतेला जशी एक व्यक्तीची बाजू आहे तशी समाजाचीहि आहे कीं नाहीं? समाजालाहि न्याय दिला पाहिजे. न्याय्य मोबदला कुठला, हेंहि ठरविण्याचा अखेरचा हक्क समाजाचाच आहे."

थोडक्यांत अशा अर्थाचें दणदणीत व समतोल भाषण पंतप्रधान नेहरू यांनीं केलें. खासगी संपत्तीचा विकास कसा होत गेला, आज तिचें स्वरूप

बहुतांशीं अव्यक्त कसें होऊन बसलेलें आहे, संपत्ति मूटभर लोकांच्या व संस्थांच्या हातांत एकवटल्यामुळें वैयक्तिक संपत्तीचा हक्क नष्ट कसा झाला आहे, यांचीहि मार्मिक मीमांसा ध्येयवादी नेहरूंनीं केली. त्यांचा मसुदा तुम्हांला आवडो अथवा न आवडो, भाषण मात्र प्रमाणबद्ध होतें.

मसुद्याच्या विरुद्ध झालेल्या भाषणांपैकीं प्राध्यापक खु. त. शहा यांचें भाषण रेखीव व सयुक्तिक असें झालें. शहांच्या भाषणांत नेहमींच्या मानानें ओजहि चांगल्या प्रमाणांत होतें. त्यांच्या उपसूचना मनांतून आवडत होत्या, पण स्वीकारण्याची ताकद कुणालाहि वाटेना.

मोबदल्यासंबंधीं मसुद्याचे आद्य प्रवर्तक म्हणजे युक्तप्रांताचे प्रधानमंत्री श्री. गोविंदवल्लभ पंत. हा सर्व खटाटोप वास्तविक त्यांच्याकरितां. पंत यांतला मुरब्बी माणूस. त्यांच्या जबाबदारीला साजेसेंच त्यांचें भाषण झालें. भारदस्त, युक्तिवादपूर्ण, आवेशशून्य पण अत्यंत परिणामकारक. पंतांचीं वाक्यें किंचित् नागमोडी व लांबलचक असतात. पण त्यांत संदिग्धता किंवा मोघमपणा नसतो. भाषा प्रसन्न नसते पण शुद्ध आणि विषयाला अनुकूल अशी असते. एकंदर त्यांच्या शरीरासारखीच भारदस्त, शांतगंभीर, हेमाडपंती घाटाची !

ठरल्याप्रमाणें ता. १२ ला सकाळच्या ऐवजीं दुपारीं ' हिंदी ' वरील चर्चेला सुरुवात झाली. आंबेडकरांचें नांव हें कलम मांडणारांत होतें. तरी त्यांनीं तें मांडलें नाहीं. कारण, त्या मसुद्याविषयीं पक्षसभेंत एकमत झालें नव्हतें. म्हणून हा अनधिकृत, पण वस्तुतः मसुदासमितीचा अधिकृत मसुदा श्री. गोपालस्वामी अय्यंगार यांनी मांडला. श्री. गोपालस्वामी हे दक्षिण पक्षाचे म्हणजे दाक्षिणात्य पक्षाचे प्रतिनिधि आहेत. त्यांच्या भाषणांत वक्तृत्वाचा व भावनेचा संपूर्ण अभाव असतो. भाषेंतहि कलाकुसर नसते. आवाजांत आरोह-अवरोहाचें प्रयोजनच नाहीं. आपला मुद्दा एखाद्या भूमितीच्या प्रयोगाप्रमाणें ते शुष्क भाषेंत, थोडक्या शब्दांत, एकाच स्वरांत मांडतात. त्यांनीं उत्तर भारतीयांना जरासें दाक्षिण्य दाखविण्याची विनंति केली.

ता. १२ ला खास उल्लेखनीय भाषणें अशीं कोणाचींच झालीं नाहींत. बाबू गोविंददासांचें भाषण यथातथाच झालें. त्यांचे शब्द, त्यांचे मुद्दे,

भाषा–सारें कांहीं त्यांच्या भुंग्यासारख्या आवाजांत बुडून गेलें ! परत्यांच्या मानानें कालची चर्चा बरीच चांगली झाली. जवळ जवळ तीनशेंच्यावर उपसूचनांपैकीं ज्यांनीं मूलभूत स्वरूपाच्या उपसूचना मांडल्या, त्यांना आधीं संधि देण्याचें धोरण अध्यक्षांनीं स्वीकारलें.

सकाळीं झालेल्या भाषणांपैकीं बंगालचे श्री. लक्ष्मीकांत मैत्र व आपल्या प्रांताचे श्री. फ्रँक अँटनी यांचीं भाषणें उल्लेखनीय झालीं. लक्ष्मीकांत मैत्र यांचें भाषण वक्तृत्वपूर्ण भावनावेशसंपन्न असें झालें. संस्कृत हीच राष्ट्रभाषा होण्यास सर्वतोपरी योग्य आहे असें त्यांनीं प्रतिपादन केलें. फ्रँक अँटनी यांनीं रोमन लिपींत हिंदी राष्ट्रभाषा असावी असें प्रतिपादन केलें. ते आंग्ल-हिंदी असल्यामुळें त्यांनीं म्हटलें, " माझी मातृभाषा इंग्रजी आहे. मी हिंदुस्थानी आहे. म्हणून माझी मातृभाषा इंग्रजी ही देखील भारतीय भाषा आहे. तिचा समावेश भारतीय भाषांच्या यादींत कां केला नाहीं ?" रोमन लिपीच्या उपयुक्ततेविषयींहि त्यांनीं मोठें युक्तिवादपूर्ण आणि ओजस्वी भाषण केलें. कलेच्या दृष्टीनें अँटनींचीं भाषणें सर्वांगसुंदर असतात.

वऱ्हाडचे काझी करीमुद्दीन यांनीं असें सुचविलें, कीं भाषेचा प्रश्न भावी पार्लमेंटवर सोंपवावा. संयुक्त मतदानपद्धतीनें निवडून आलेले लोकप्रतिनिधि आपली भाषा ठरवितील. त्यांच्यामध्यें सांप्रदायिक व विशिष्ट सांस्कृतिक वृत्तीचें प्राबल्य असणार नाहीं.

मध्यप्रांत-वऱ्हाडच्या मुसलमानांची मातृभाषा उर्दू आहे असें काझी साहेब म्हणाले. मुसलमानांना नकळत सांप्रदायिक आवेशाला वश होण्याची सवयच आहे. खरें म्हटलें तर मुसलमान या नात्यानें मुसलमानांची अशी भाषाच निराळी असूं नये. प्रादेशिक भाषा असूं शकेल. पण मराठी, गुजराती, बंगाली, कुठलीहि भाषा बोलणारा माणूस मुसलमान होऊं शकतो. मग मुसलमानांची भाषा उर्दू आहे, या म्हणण्यांत संप्रदायांधतेपेक्षां आणखी काय आहे ? मुसलमानांना इतर कोणाची भाषा शिकावीच लागली नाहीं. ते मालक होते. त्यांना कळावें म्हणून इतर लोक त्यांना कळणारी भाषा बोलत असत ! म्हणून जेव्हां मुसलमान इतरांवर सांप्रदायिकतेचा व संकुचितपणाचा आरोप करतात, तेव्हां त्यांचा कांगावखोरपणा ‘ उलटा ’

असतो. मौ. हिफझुर रहमान यांचें ता. १२ चें भाषण काय, किंवा काझी साहेबांचें कालचें भाषण काय, असाध्य सांप्रदायिकतेनें बरबटलेलें होतें.

दक्षिणेकडील आत्यंतिक मतवादी पुढारी म्हटले म्हणजे श्री. रामलिंगम् चेट्टियर. त्यांना इंग्रजी, उर्दू, हिंदी या साऱ्या भाषा सारख्याच. त्यांना तर संस्कृतहि मान्य नाहीं. ती भाषा देखील त्यांना स्वतःची भाषा वाटत नाहीं त्यांनीं म्हटलें, आम्ही हिंदी व नागरी स्वीकारतों. तुम्ही आमचीहि सोय पाहा. इंग्रजीची कालमर्यादा व आंकडे यांच्या बाबतींत तुम्ही आमचें ऐका.

भाषेच्या प्रश्नाच्या बाबतींत तामिळ लोकांची वृत्ति पाहिली, म्हणजे नवीनच प्रकाश पडतो ! त्यांना संबंध भारताची सामान्य संस्कृति मान्य नाहीं. अलीकडे तर त्यांना 'वैष्णवजनां'तील 'वैष्णव' शब्द देखील संस्कृत म्हणून खपत नाहीं. पण तामिळ गाण्यांत देखील 'द्वारका' 'आदिनारायण' इ. चा महिमा गाइला आहेच ! पण भाषावादाचा प्रताप कांहीं औरच आहे !

श्री. गोपालस्वामींच्या मसुद्याला समर्थनपर असें श्यामबाबूंचें उदात्त-रुचिर भाषण झाल्यानंतर मोठ्या गोड वातावरणांत सकाळचें काम आटपलें.

श्री गोपालस्वामींच्या मसुद्याचें समर्थन करणारें जवाहरलालजींचें भाषण मार्मिक, विचारपूर्ण व विद्वत्तापरिप्लुत असें झालें. ते म्हणाले, 'महाराज, हा मुद्दा जिव्हाळ्याचा आहे. जिव्हाळ्याची व जानदार माणसें जिव्हाळ्यानें व जानदार शब्दांत बोललीं. ज्यांच्यांत आवेश आहे, तीं आवेशानें बोललीं, यांत काय बिघडलें ?' भाषेचें स्वरूप, तिच्या विकासाचे नियम, तिचें सौन्दर्य, तिचा महिमा या सर्व गोष्टींचें विवेचन त्यांनीं मोठें रसाळ व विचारप्रवर्तक असें केलें. घरांतल्या कर्त्यापुरुषाप्रमाणें त्यांच्या भाषणांत जबाबदारीची जाणीव होती.

त्यानंतर आपल्या प्रांताचे मुख्य प्रधान पं. रविशंकर शुक्ल यांचें भाषण झालें. त्यांचें पहिलेंच भाषण आणि तेंहि जवाहरलालांनंतर. कांहीं मोठीशी अनुकूल परिस्थिति नव्हे. पण शुक्लजींनीं कुशल व्यवहारनिष्ठ माणसाप्रमाणें, मुरब्बी कारभाऱ्याप्रमाणें आणि अनुभवी वकिलाप्रमाणें, वादांत न पडतां,

कोणाला न दुखवितां, आपले मुद्दे, आपल्या सूचना व आपल्या अडचणी मांडल्या.

सरदार हुकुमसिंहांचें भाषण नवीन रहस्यें प्रकट करणारें झालें. ते म्हणाले, "पंजाबांत 'हिंदी-पंजाबी' वाद प्रादेशिक किंवा प्रांतीय राहिलेला नसून आतां त्याला शीख-हिंदु असें सांप्रदायिक स्वरूप प्राप्त झालें आहे. कारण, ज्यांची मातृभाषा पंजाबी आहे त्या मुसलमानांनीं जसा पंजाबीचा इनकार केला, तसा ज्यांची मातृभाषा पंजाबी आहे ते हिंदुहि करीत आहेत. एकटे शीखच काय ते पंजाबीचे पुरस्कर्ते उरलेले आहेत." त्यांनीं 'हिदुस्तानी व रोमन' हा पक्ष माडला.

त्यानंतर जयपालसिंह आले. ते म्हणाले, 'तुम्ही जें ठरवाल, तें आम्ही मान्य करूं. पण भारतीय भाषांच्या यादींत आदिवासींच्या भाषांचाहि समावेश तुम्ही केला पाहिजे.'

यानंतर हिन्दी पक्षाचे प्रमुख अध्वर्यु, हिन्दीतर प्रान्तांच्या रोषाला पात्र झालेले, दाक्षिण भारतीय व मुसलमान यांचे 'अमित्र' मानले गेलेले टंडनजी यांचें भाषण झालें. भाषण लांबलचक व रसाळ झालें. दाक्षिण भारतीयांनीं व कांहीं महाराष्ट्रांतील सदस्यांनीं त्यांना मधून मधून अडथळेहि केले. पण त्यांनीं आपली बाजू शांतपणें व निष्ठापूर्वक मांडली. त्यांच्या भाषणांतील मुख्य मुद्दा असा कीं, 'हिन्दीचें राष्ट्रभाषेचें स्थान सुमारें पाउणशें किंवा शंभर-सव्वाशें वर्षांपूर्वींच हिंदीतर पुढाऱ्यांनीं मान्य केलेलें आहे. हिन्दीतर प्रांतांतील लोकांचें आजहि सार्वमत घेतलें तर, तें 'हिंदुस्थानी' किंवा इतर कुठल्याहि भाषेपेक्षां हिंदीलाच अनुकूल राहील. मी श्री. शंकरराव देव व डॉ. आंबेडकर यांनाच विचारतों कीं महाराष्ट्रांत हिन्दी आकड्यांनाच बहुमत मिळेल, असें त्यांस वाटत नाहीं काय?"

शंकरराव, रंगराव दिवाकर व श्यामबाबू यांनीं म्हटलें, आम्ही सार्वमताचें आव्हान स्वीकारतों. खांडेकर व पंजाबराव यांनीं सांगितलें कीं, टंडनजींचें म्हणणें खरें आहे. टंडनजींचें भाषण पुष्कळच विस्तृत झालें, पण फारसें परिणामकारक झालें नाहीं.

शंकररावांनीं थोडें लढाऊ भाषण केलें होतें. "मला कोणी विचारलें कीं तूं कोण आहेस, तर मी म्हणेन मी हिन्दुस्थानी आहे. पण मला जर

विचारलें कीं तुझी भाषा कुठली, तर मी म्हणेन मराठी." हें विधान त्यांनीं केलें तें सर्व मान्यच होतें. पण तें हिन्दी पक्षाला मान्य नसावें असें त्यांनीं ध्वनित केल्यामुळें बाळकृष्ण शर्मांचा पारा चढला.

टंडनजी व मौलाना साहेब यांचीं भाषणें ऐकल्यानंतर मतभेदाची बाब फारच बारीक आहे, याविषयीं खात्री पटली. त्यामुळें पुन्हां समेटाचे निर्वाणीचे प्रयत्न सुरू झाले आणि दुपारीं ३ ते ४-४५ पर्यंत पार्टीची बैठक झाली. अनेक सत्प्रवृत्त मित्रांच्या अविरत प्रयत्नांमुळें देशबंधु गुप्त व इतर शांतिप्रिय मित्र यांनीं एक निवेदन तयार केलें होतें. त्यांत समेटाची दिशा दाखविलेली होती. सुरुवातीला वातावरण फार विरुद्ध होतें. धुळेकरांनीं ओरडून सांगितलें, कीं आम्हांला समेट नको. टंडनजींनीं कायद्याची गैरकायदेशीर हरकतहि घेतली. पण पं. गोविंदवल्लभ पंत यांचें पुन्हां अत्यंत उदात्त-गंभीर भाषण झालें. मागें त्यांचें पार्टींत जें भव्य भाषण झालें होतें, त्याचे पडसाद अजून सदस्यांच्या मनांत उठत होते. त्यांच्या भाषणानंतर सलोख्याचें वातावरण उत्पन्न झालें. पं. पंत थोर मनाचे, शहाणे व कुशल 'सभापंडित' आहेत. गोपालस्वामींनीं भाषण करून शुक्लजी, घनश्यामसिंह गुप्त, व टंडनजी यांच्या उपसूचनांपैकीं मुख्य मुख्य मान्य करून समेटाचें वातावरण निर्माण केलें. खेळाडू वृत्तीचे धुळेकर यांनीं उठून त्यांचे आभार मानून अभिनंदन केलें! महावीर त्यागींनीं त्यांना दुजोरा दिला. मुनशींनीं सलोख्याचा ठराव मांडला. टंडनजींनीं पुन्हां कायदेशीर हरकत घेतली. अध्यक्षांनीं ती अमान्य केली. मुनशींचा ठराव मान्य झाला. दुफळी टळली! सगळ्यांना आनंद झाला. दडपण दूर झालें!

या दुफळीचा फायदा घेण्यास मुसलमान सदस्य टपून बसलेले होते. दक्षिण भारतीयांचीं मनें हिंदीऐवजीं 'हिंदुस्थानी व दोन लिप्यां'च्या प्रमेयाला अनुकूल करून घेण्याचा त्यांचा कावा होता. रागाच्या भरांत ते लोक त्यांच्या डावाला बळीहि पडणार अशी भीति होती. काँग्रेसपक्षाच्या नेत्याला, हिन्दच्या पंतप्रधानाला आमच्या मतामुळें जय मिळेल, अशी घमेंड मुसलमान सदस्य मिरवूं लागले होते. समेटामुळें त्यांचा विरस झाला.

पार्टीच्या सभेनंतर उभय पक्षांतील सर्व सदस्यांच्या चर्येवर स्मित खेळत होतें. पार्टीची अब्रू बचावली गेली, पंतप्रधानांची 'शान' राहिली, देशाची

मानसिक फाळणी टळली, म्हणून सर्वांना आनंद वाटत होता. फक्त कांहीं दुराराध्य, अतिवादी व मुसलमान सदस्य यांचीं तोंडें आंबट झालेलीं होतीं. पूर्वीं कधींहि ज्यांच्याविषयीं आदर व आपुलकी वाटली नाहीं, त्या मौलाना व गांधी यांच्याविषयीं आज त्यांना मोठा पुळका आला होता.

सायंकाळीं ५ ला पुन्हां घटनापरिषद भरली. अध्यक्ष येतांच श्री. बाळकृष्ण शर्मांनीं चर्चासमाप्तीची सूचना माडली. कांहीं मुसलमान सभासदांनीं विरोध केला, तरी ती सूचना मान्य झाली. नंतर नवीन उपसूचनांचा मसुदा तयार करण्याकरितां मसुदासमितीला वेळ मिळावा म्हणून पाऊण तासपर्यंत काम तहकूब करण्यांत आलें. सहा वाजतां पुन्हां बैठक भरली. श्री. मुनशी यांनीं उपसूचना मांडल्या. टंडनजी, शिब्बनलाल सक्सेना व रामलिंगम् चेट्टियार या तीन कॉंग्रेससदस्यांखेरीज इतर सर्व कॉंग्रेससदस्यांनीं आपल्या उपसूचना परत घेतल्या. टंडनजी करारी, निष्ठावान् पण एकमार्गी व आग्रही, तरी आदरणीय ! बाकीचे दोन दुराराध्य, हटवादी. एका लहानश्या बाबीला सदसद्विवेकबुद्धीच्या प्रश्नाइतकें महत्त्व देण्यांत टंडनजींनीं तारतम्य नाहीं दाखविलें ! ' हिन्दुस्थानी ' तर्फे फक्त मुसलमान सदस्यांनीं मतें दिलीं. प्रचंड बहुमतानें गोपालस्वामींचा ठराव मंजूर झाला. मसुदा जरी गोपालस्वामींनीं मांडलेला असला, तरी त्याचें मुख्य श्रेय आंबेडकरांना आहे हें विसरतां कामा नये. गोपालस्वामींनाच तो मांडायला सांगण्यांत मुद्दा होता. हसरत मोहानी उद्गारले, " पंतप्रधान व मौलाना आझाद यांची प्रतिपक्षाराधनाची वृत्ति पाहून मी वैतागलों आहे. मला आपल्या उपसूचना परत घ्यायच्या आहेत ! "

शेवटीं अध्यक्षांनीं ' अंमळ ' पाल्हाळीक भाषण करून सभेचें अभिनंदन केलें. सबंध देशाकरितां राज्यकारभाराची एक भाषा ठरविण्याचा निर्णय हा या देशाच्या इतिहासांत जसा अपूर्व तसाच अभिनंदनीय आहे, असें ते म्हणाले. मोठ्या उत्साहाच्या व संतोषाच्या वातावरणांत सायंकाळीं ७-४० ला सभा समाप्त झाली !

तुझा,

दादा

●●●